
मराठी अनुवाद : फ्रान्सिस आल्मेडा

# संक्षिप्त शुभवर्तमान

# The Gospel In Brief



Leo Tolstoy

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

# द गॉस्पेल इन ब्रीफ़

## संक्षिप्त शुभवर्तमान

मूळ लेखक : लिओ टॉलस्टॉय

मराठी अनुवाद : फ्रान्सिस आल्मेडा

ई साहित्य प्रतिष्ठान

द गॉस्पेल इन ब्रीफ़

मूळ रशियन लेखक : लिओ टॉलस्टॉय

मराठी अनुवाद : फ्रान्सिस आल्मेडा

francism.almeida@gmail.com

९२२४२९२७५२

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh foloor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www. esahity. com**

**esahity@gmail. com**

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : २० जानेवारी २०१६

## प्रकाशकाचे दोन शब्द

२०१६ हे वर्ष ई साहित्यासाठी फ़ारच उत्साहाने सुरू होत आहे. या वर्षाची सुरुवातच मुळी लिओ टॉलस्टॉय, पॉल ब्रन्टन, आणि मनुस्मृतीने होत आहे. धर्माकडे पहाण्याचे तीन विविध दृष्टीकोन यांत आहेत. २०१५ मध्ये ई साहित्य मधून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत बहिणावाई, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, गीतारहस्य, भगवद्गीता, अशा अनेक मौल्यवान ग्रंथांची ई निर्मिती करण्याचा योग आला. २०१६ ची सुरुवात बायबल, मनुस्मृती पासून झाली आणि त्यात कुराण, बौद्धमत, जैनधर्म, ज्यू, पारशी, वेद, उपनिषदे अशा विविध धर्मशास्त्रांची भर पडावी असा योग दिसतो आहे. योग दिसतो असे यासाठी म्हणतो की ही पुस्तके गेल्यावर्षीही आम्ही कुठे मुद्दाम शोधायला गेलो नव्हतो. श्री विजय पांढरे, डॉ. श्री अशोक धांडे, श्री अविनाश नगरकर, श्री अरुण फ़डके, श्री रत्नाकर महाजन, श्री फ़्रान्सिस आल्मेडा, श्री मधुकर सोनावणे, श्री अशोक कोठारे, श्री अरुण काकतकर या व इतर अनेक विद्वानांनी हे साहित्य मोठ्या विश्वासाने आमच्या हाती सोपवलं. आणि आम्ही फ़क्त पोस्टमनगिरी केली. आमच्या सुदैवाने प्रचंड मोठ्या वाचकवर्गाने या साहित्याचा आस्वाद घेतला. या महानुभावांच्या श्रमाचे काही प्रमाणात चीज झाले.

ई साहित्य प्रतिष्ठान निर्माण झाले नवीन साहित्यिकांसाठी एक व्यासपीठ म्हणून. ते तसेच आहे. आणि तसेच राहील. साधारण ८० टक्के पुस्तकं ही नवसाहित्यिकांचीच असतील. पण सुमारे वीस टक्के पुस्तकं नावाजलेली, वाचकप्रियही असावीत. म्हणजे वाचकांचा ओघ वाढता आणि वाहता रहातो.

मराठीतल्या महान प्रकाशकांच्या तुलनेत ई साहित्य अगदीच नगण्य आहे. आणि त्यांच्याशी तुलना वा स्पर्धा करण्याचा मानसही नाही. परंतू दर्जाच्या बाबतीत मात्र

आम्ही तोडीस तोड राहू. हे वर्ष अत्यंत दर्जेदार कथा, कादंबऱ्या आणि काव्य-विनोद-शास्त्र पुस्तकांचे असेल याची आम्ही ग्वाही देतो.

आपण या साहित्य यज्ञात यथाशक्ती इंधन पुरवावे ही विनंती. आपल्या ओळखीच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला आमचे VIP सभासद करू. याशिवाय या कामात इतर अनेक तऱ्हांनी आपण सहभागी होऊ शकता. वेबसाईटला भेट तर देतच रहा. खंबीरपणे पाठीशी उभे रहा. मग बघाच काय काय चमत्कार घडतील ते.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य



अनुक्रम

टॉलस्टॉयची प्रस्तावना

विषय प्रवेश

देवाचा पुत्र

देवाची सेवा

जीवनाचे उगमस्थान

देवाचे राज्य

सत्य जीवन

असत्य जीवन

मी आणि पिता एकच आहोत

जीवन क्षणिक नाही

मोह

मोहाशी लढा

निरोपाचे प्रवचन

आत्म्याचा जडत्वावर विजय

सर्व प्रकरणांचा सारांश

## टॉलस्टॉयची प्रस्तावना

शुभवर्तमानाचे हे संक्षिप्त स्पष्टीकरण रशियात प्रसिद्ध करता न आलेल्या मोठ्या प्रमाणात केलेल्या, हस्तलिखित स्वरुपात अस्तित्वात असलेल्या लिखाणाचा सारांश आहे. रशियन भाषेतील ते लिखाण चार भागात विभागलेले आहे.

१) माझ्या स्वतःच्या जीवनाचा आणि विचारांचा खुलासा ज्यांच्यामुळे मी ख्रिस्ती शिकवणीत सत्य असल्याच्या खात्रीलायक मतापर्यंत पोहोचलो.

२) ख्रिस्ती शिकवणीची तपासणी: प्रथम पारंपारिक रुसो-ग्रीक चर्चने केलेले स्पष्टीकरण, नंतर चर्चने प्रेषित, सल्लगार मंडळे, चर्चचे तथाकथित फादर्स यांनी केलेले स्पष्टीकरण आणि त्या स्पष्टीकरणातील खोटेपणा उघड करणे.

३) ख्रिस्ती शिकवणीची या स्पष्टीकरणाच्या आधारे नव्हे तर केवळ शुभवर्तमानांतून त्याची म्हणून आपल्या पर्यंत आलेल्या शिकवणीची तपासणी.

४) ख्रिस्ताच्या शिकवणीचा खरा अर्थ आणि तिचा विपर्यास केला जाण्याची कारणे आणि त्याचे पुढे होणारे दुष्परिणाम.

वरील पैकी तिसऱ्या भागातून सद्याचे हे लिखाण संकलित केले आहे. ख्रिस्ताच्या शिकवणीच्या अर्थाच्या आधारे चार शुभवर्तमानांची सुसंगत मांडणी केली आहे. तसे करताना मला शुभवर्तमानात असलेल्या मांडणीमध्ये क्वचितच बदल करावा लागलेला आहे, त्यामुळे मला माहीत असलेला किंवा(Grechulevich’s) ग्रेकुलेविचची चार शुभवर्तमानाची मांडणी, शब्दक्रम किंवा काव्यार्थ बदलण्याचा प्रसंग फारच कमी वेळा आलेला आहे. जॉनच्या शुभवर्तमानाचा वापर करताना मला कोणताही बदल करण्याची गरज भासली नाही तर सर्वकाही मुळाबरहुकूम क्रमानुसार आहे.

शुभवर्तमानाची बारा (किंवा सहा जर प्रत्येक दोन प्रकरणे एकत्र केल्यास) प्रकरणात विभागणी ख्रिस्ताच्या शिकवणीच्या अर्थानुसार आपोआप झालेली आहे. त्या प्रकरणांचा अर्थ पुढील प्रमाणे आहे.

१) मानव हा अनंत उद्गमाचा पुत्र आहे. तो त्या पित्याचा पुत्र शरीराने नव्हे तर आत्म्याने आहे.

२) म्हणूनच मानवाने त्या उद्गामाची सेवा आत्म्याने केली पाहिजे.

३) सर्व मानवाच्या जीवनाचा उद्गम दैवी आहे. तोच फक्त पवित्र आहे.

४) म्हणून माणसांनी सर्व मानवांच्या जीवनात त्या उद्गमाची सेवा केली पाहिजे. अशीच त्या पित्याची इच्छा आहे.

५) जीवनाच्या त्या पित्याच्या इच्छेची सेवा आपल्याला जीवन देते.

६) म्हणून आपल्या स्वतःच्या इच्छेचे समाधान जीवनासाठी आवश्यक नाही.

७) ऐहिक जीवन हे खऱ्या जीवनाचे खाद्य आहे.

८) म्हणून खरे जीवन काळावर अवलंबून नाही. ते वर्तमान काळात(आताच) आहे.

९) काळ हा जीवनातील भ्रम आहे. भूतकाळ व भविष्यकाळातील जीवन मानवापासून वर्तमानातील खरे जीवन लपवून ठेवते.

१०) म्हणून माणसाने भूत आणि भविष्याच्या ऐहिक जीवनाचा भ्रम नष्ट करण्यासाठी झटले पाहिजे.

११) सर्वांना सामाईक असणारे खरे जीवन वर्तमानकाळात असून ते प्रेमाने व्यक्त होते.

१२) म्हणून जो सर्व मानवाच्या सामाईक जीवनात प्रेमाने वर्तमानकाळात जगतो, तो जीवनाचा उगम व मूळ पाया असलेल्या पित्याशी जोडला जातो.

अशाप्रकारे प्रत्येक दोन प्रकरणात कारण आणि (कार्य) परिणाम संबंध आहे.

या बारा प्रकरणाबरोबर जॉनच्या शुभवर्तमानातील पहिल्या प्रकरणाची प्रस्तावना जोडली आहे. त्यामध्ये शुभवर्तमानाचा लेखक स्वतःच्या नावाने ख्रिस्ताच्या सर्व शिकवणीच्या अर्थावर आणि अगोदरचे त्याच लेखकाच्या पत्रांतून(कदाचित शुभवर्तमाना पूर्वी लिहिलेली) सर्व सामान्य निष्कर्ष कसे काढले यावर भाष्य करतो.

ख्रिस्ताच्या शिकवणीचे हे दोन अत्यावश्यक भाग नाहीत, परंतु ते दोन्ही शिकवणीचा अर्थ न बदलता वगळता येऊ शकतील(ते येशूच्या नव्हे तर जॉनच्या नावाने आलेले आहेत) मी ते तसेच ठेवले आहेत कारण खिस्ताची शिकवण सरळ समजून घेण्यासाठी परस्परांना आणि सर्व शिकवणीला आधारभूत ठरणारे व चर्चने दिलेलेल्या विचित्र अर्थाच्या विरोधात शिकवणीच्या सोप्या अर्थाकडे निर्देश करणारे आहेत.

प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस, विषयाच्या संक्षिप्त निर्देशना बरोबरच त्या प्रकरणाशी संबंधित ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना शिकवलेल्या प्रार्थनेतील शब्द मी घेतले आहेत.

माझ्यासाठी आश्चर्य व आनंदाची गोष्ट म्हणजे, जेव्हा मी माझे काम पूर्ण केले तेव्हा मला असे आढळून आले की प्रभूची प्रार्थना ही दुसरे काही नसून त्याच्या संपूर्ण शिकवणीची संक्षिप्त अभिव्यक्ती असून ती मी केलेल्या प्रकरणांच्या मांडणीच्या अगदी क्रमा प्रमाणेच आहे. तसेच त्या प्रार्थनेतील प्रत्येक वाक्यांश प्रकरणांच्या अर्थाशी व क्रमाशी मिळता जुळता आहे.

१) आमच्या बापा---माणूस देवाचा पुत्र आहे.

२) तू स्वर्गी आहेस----देव हा जीवनाचा अनंत आत्मिक उद्गम आहे.

३) तुझे नाव पवित्र होवो---जीवनाचा उद्गम पवित्र मानला जावो.

४) तुझे राज्य येवो-----त्याचे सामर्थ्य सर्व मानवात अवतीर्ण होवो.

५) तुझ्या इच्छे प्रमाणे होवो, जसे स्वर्गात----या अनंत उगमाची इच्छा स्वतःमध्ये त्याच्या प्रमाणेच पूर्ण होवो.

६) तशी पृथ्वीवर----तशीच शारीरिक जीवनात सुद्धा पूर्ण होवो.

७) दररोजची भाकर -----ऐहिक जीवन हे खऱ्या जीवनाचे अन्न आहे.

८) आज आम्हाला दे------खरे जीवन वर्तमान काळात आहे.

९) आमच्या अपराधांची क्षमा कर जशी आम्ही आमच्या अपराध्यांना क्षमा करतो. . . भूतकाळातील चुका आणि त्रुटीनी खऱ्या जीवनाला झाकून टाकू नये.

१०) आणि आम्हाला मोहात पडू देऊ नको—त्यांनी आम्हाला भ्रमात नेऊ नये.

११) परंतु वाईटापासून आम्हाला सोडव------आणि वाईट काही असू नये.

१२) कारण राज्य सामर्थ्य आणि वैभव तुझेच आहे----आणि सामर्थ्य सत्ता व शहाणपण सर्वत्र प्रस्थापित व्हावे.

तिसऱ्या भागाच्या पूर्ण स्पष्टीकरणात शुभवर्तमानातील सर्व गोष्टी काहीही न वगळता मांडलेल्या आहेत. परंतु सध्याच्या प्रस्तुतीकरणात पुढील गोष्टी वगळलेल्या आहेत. जॉन द बॅप्टिस्टची गर्भधारणा आणि जन्म, त्याची कैद आणि मृत्यू, येशूचा जन्म, त्याची वंशावळ, त्याच्या आईचे त्याच्यासह इजिप्तला पलायन; त्याचे काना व(Caperaum) केपरूम येथील चमत्कार, भुते काढणे, समुद्रावर चालणे, अंजिराच्या झाडाला जाळून टाकणे, आजाऱ्यांना बरे करणे, मेलेल्यांना उठवणे, ख्रिस्ताचे स्वतःचे पुनरुज्जीवन, आणि त्याच्या जीवनाने पूर्ण झालेल्या भविष्यवाणीचे संदर्भ.

या लघू स्पष्टीकरणातून जो भाग वगळलेला आहे, त्यात ख्रिस्ताच्या शिकवणीतील काही नसून ज्या काळात त्याने उपदेश केला त्या काळापूर्वी, त्याकाळात आणि त्या नंतरच्या काळात घडून आलेल्या घटना असून त्यांच्यामुळे स्पष्टीकरणातील गुंतागुंत वाढते. त्या वर्णनात शिकवणीच्या विरोधात किंवा समर्थनार्थ असे काही नाही. त्यांचे ख्रिस्ती धर्मासाठी महत्व एवढेच की विश्वास न ठेवणाऱ्यांना येशूचे देवत्व दाखवून द्यावे. परंतु ज्यांना समजते की चमत्कारांची कथा ही न पटणारी आहे आणि ज्यांना येशूचे देवत्व त्याच्या शिकवणीत सुद्धा ठसवले होते या विषयी शंका असेल. त्याना तो वगळलेला भाग अनावश्यकच वाटणार.

माझ्या मोठ्या कामात नेहमीच्या शुभवर्तमानापेक्षा वेगळा बदल, तसेच नोंदी आणि प्रत्येक वगळलेल्या भागाचे स्पष्टीकरण व समर्थन वेवेगळया शुभवर्तमानाच्या तुलनेने, संदर्भ तपासून आणि भाषाशास्त्रीय व इतर पद्धतीने केलेला आहे. या संक्षिप्त आवृतीत चर्चच्या चुकीच्या समजुतीचे सर्व पुरावे व खंडण तसेच तपशीलवार संदर्भ वगळलेले आहेत. ते कितीही अचूक व प्रत्येक परिच्छेदाची सखोल चर्चा करणारे असले तरी येशूची खरी शिकवण अधिक विश्वसनीय करू शकत नाहीत. येशूच्या शिकवणीच्या समजुतीची प्रमाणता

ही विशिष्ट परिच्छेदांवरच्या चर्चेने नव्हे तर तिच्यातील एकात्मता, स्पष्टता, सुबोधता आणि परिपूर्णता, आणि सर्व सत्यशोधकांच्या आंतरिक भावनाशी सुसंगतीने अधिक सिद्ध होते. वाचकांनी हे विसरून चालणार नाही की चार शुभवर्तमाने त्यातील सर्व काव्य आणि अक्षरासह पवित्र ग्रंथ आहेत असे समजणे हा एक मोठा दोष आहे. त्यामुळे माझ्या या आवृत्तीत चर्चच्या अधिकृत संहिते पासून फरक दाखविण्याच्या दृष्टिने प्रयत्न केला आहे.

वाचकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की येशूने स्वतः कोणतेही पुस्तक लिहिले नाही. जशी प्लेटो, फिलो, किंवा मार्कस, ओरेलीअस यांनी लिहिली. त्याने सॉक्रेटीसाप्रमाणे विद्वान लोकांत त्याची शिकवण प्रसृत केली नाही. परंतु तो पुष्कळ अशिक्षित लोकांशी बोलला आणि त्याच्या मृत्यू नंतर दीर्घ काळाने लोक त्याच्याविषयी ऐकलेल्या गोष्टी लिहून ठेवायला लागले.

वाचकांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की उपलब्ध असलेल्या माहितीपैकी चर्चने पहिली तीन शुभवर्तमाने निवडली आणि नंतर आणखी एक निवडले. आणि ही सर्वोत्कृष्ट शुभवर्तमाने ख्रिस्ता विषयीच्या प्रचंड मोठ्या लिखाणातून निवडताना त्यातही काही दोष होतेच आणि अधिकृत शुभवर्तमानातही नाकारलेल्या लिखाणा इतकेच निकृष्ट काही परिच्छेद आहेत.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे ख्रिस्ताची शिकवण पवित्र असेल पण वेगवेगळया ठिकाणाहून घेतलेले प्रत्येक काव्य व अक्षर लोक म्हणतात म्हणून पवित्र होत नाही.

याही पुढे जाऊन वाचकांना हे माहीत असले पाहिजे की ही निवडक शुभवर्तमाने वेगवेगळया हजारो लोकांच्या बुद्धीने आणि हाताने निवडली आहेत. चवथ्या शतकापासून त्यात भर घालणे, नोंदी करणे आणि कोणत्याही विरामचिन्हांशिवाय लिहिण्याचे हे काम सलग सुरु होते. आणि चवथ्या व पाचव्या शतकानंतर सुद्धा ते वेगवेगळया पद्धतीने वाचले गेले त्यामुळे त्याच्या वेगवेगळया आवृत्या नक्कीच पन्नास हजारापेक्षा कमी भरणार नाहीत.

वाचकांना हे लक्षात ठेवले पाहिजे की शुभवर्तमानाची सद्याची रचना आपल्या पर्यंत सरळ पवित्र आत्म्यापासून आलेली आहे या परंपरागत मताने त्यांची दिशाभूल होऊ नये.

शुभवर्तमानातून निरुपयोगी परिच्छेद काढून टाकणे आणि काही परिच्छेदांचे स्पष्टीकरण दुसऱ्यांच्या मदतीने करणे हे दोषास्पद नाही तर काही काव्ये व अक्षर संख्या पवित्र आहे असे मानून तसे न करणे हा अविवेक ठरेल.

दुसऱ्या बाजूला मी वाचकांना विनंती करीन की त्यांनी हे लक्षात घ्यावे की पवित्र आत्म्या पासून आपल्या पर्यंत आलेले शुभवर्तमान मी पवित्र ग्रंथ मानीत नाही. त्याहीपेक्षा धार्मिक साहित्यातील ऐतिहासिक संस्मरणीय कृती देखील मानीत नाही. मला शुभवर्तमानाचा ईशशास्त्रीय(theological) तसेच ऐतिहासिक दृष्टीकोन समजतो. परंतु मी तो वेगळ्या दृष्टीने घेतो. म्हणून मी वाचकांना विनंती करतो की त्यांनी माझ्या किंवा विद्वान लोकांच्या तसेच चर्चच्या परंपरागत मताने गोंधळून जाऊ नये.

मी ख्रिस्ती धर्म म्हणजे सर्वसमावेशक दैवी प्रकटीकरण समजत नाही किंवा ऐतिहासिक अपूर्व गोष्टही समजत नाही तर फक्त आपल्या जीवनाला अर्थ देणारी शिकवण समजतो. मी ख्रिस्ती धर्माकडे ईश्वर शास्त्र किंवा ऐतिहासिक चिकित्सेमुळे ओढला गेलो नाही तर पन्नास वर्षे वय झाल्यावर मी स्वतःला आणि आजूबाजूच्या विद्वान लोकांना विचारू लागलो की मी कोण आहे आणि माझ्या जीवनाचा अर्थ काय आहे, तेव्हा मला उत्तर मिळाले की मी दैवयोगाने जुळून आलेल्या अणूंची एक रचना असून जीवनाला तसा काही अर्थ नसून ते स्वतःच नश्वर आहे. मी निराश होऊन माझ्या जीवनाचा शेवट करण्याचे ठरवले. परंतु तेव्हा मला बालपणी जेव्हा मी जीवनाला अर्थ आहे आणि माझ्या जवळ राहणारे असंख्य लोक जे विश्वास ठेवत होते आणि श्रीमंतीने भ्रष्ट झाले नव्हते त्यांचा जीवनाला अर्थ आहे यावर विश्वास होता त्याची आठवण झाली. मग मला माझ्या विदवान मित्रांनी दिलेल्या उत्तराच्या खरेपणाची शंका यायला लागली आणि ख्रिस्ती धर्माने प्रत्यक्ष जीवन जगणाऱ्याना दिलेले उत्तर समजून घ्यायचा मी प्रयत्न केला. आणि अशा लोकांना मार्गदर्शन करणारा ख्रिस्ती धर्म ख्रिस्ताच्या शिकवणीत शोधण्याचा मी प्रयत्न केला. जीवनात प्रत्यक्ष वापरलेल्या ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करायला मी सुरुवात केली आणि वापरातल्या ख्रिस्ती धर्माची त्याच्या मूळ उगमाशी तुलना केली.

ख्रिस्ती शिकवणीचा उगम आहेत शुभवर्तमाने, आणि त्यांच्यात मला जे खरे जीवन जगतात त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या आत्म्याचे स्पष्टीकरण सापडले. परंतु मला सापडलेल्या जीवनाच्या शुद्ध पाण्याच्या उगमा बरोबरच, त्याची शुद्धता चुकीच्या पद्धतीने चिखल

मातीने माखून माझ्यापासून लपून राहिली होती. त्याबरोबरच उतुंग ख्रिस्ती शिकवणी बरोबरच तिच्याशी विसंगत एक हिब्रू आणि एक चर्चची शिकवण मला आढळली. माझी स्थिती अशा माणसा सारखी झाली होती की ज्याला दुर्गंधी घाणीने भरलेली एक पिशवी मिळाली आहे आणि खूप घाम गाळून प्रयत्न केल्यानंतर त्या घाणीमध्ये अमूल्य असे मोती त्याच्या हाताला लागतात. आणि त्याला हे समजते की ज्यांनी या दुर्गंधी घाणीत हे मोती जमवून ठेवले त्यांना त्या घाणीसाठी दोष देण्या ऐवजी ते प्रेम व आदरास पात्र आहेत.

मला प्रकाश माहीत नव्हता आणि जीवनात सत्याचा प्रकाश दिसणारच नाही असे मला वाटत होते, परंतु मला स्वतःला पटवून द्यावे लागले की माणसे ज्या प्रकाशात जगतात त्याचा उगम शोधण्याचा मी प्रयत्न केला तेव्हा चर्चच्या चुकीच्या अन्वयार्थावर मात करून मला तो शुभवर्तमानात सापडला. आणि त्या प्रकाशाच्या उगामाशी पोहोचल्यावर मी दिपून गेलो. आणि माझ्या आणि इतरांच्या जीवनाच्या अर्थाविषयी सर्व प्रश्नाची पूर्ण उत्तरे मला सापडली जी इतर राष्ट्रांच्या मला माहीत असलेल्या उत्तराशी जुळणारीच नव्हे तर त्यापेक्षा उच्च दर्जाची होती.

मी ईशशास्त्रीय किंवा ऐतिहासिक नव्हे तर जीवनाच्या प्रश्नाचे उत्तर शोधत होतो. आणि म्हणून मला मुख्य प्रश्न हा नव्हता की येशू देव होता की नाही किंवा कोणापासून पवित्र आत्मा अवतरला वगैरे. आणि प्रत्येक शुभवर्तमान कोणी लिहिले आणि त्यातील अमुक तमुक बोधकथा येशुच्याच आहेत की नाहीत हे मला तितकेच महत्व शून्य व अनावश्यकही होते. माझ्या दृष्टीने महत्वाचा हा प्रकाश होता ज्याने अठरा शतके मानवता अज्ञान अंधकारातून बाहेर काढली आहे. आणि ज्याने मला अज्ञानातून बाहेर काढले होते आणि अजूनही काढीत आहे. परंतु या प्रकाशाच्या उगमाला काय नाव द्यावे किंवा तो कोणत्या पदार्थातून आला किंवा कोणी तो प्रज्वलित केला याच्याशी मला काही कर्तव्य नाही.

या बरोबरच ही प्रस्तावना संपवतांना हे नमूद करतो की आताच्या काळात सापडलेली शुभवर्तमानाची पुस्तके आणि अठरा शतकाच्या सदोष स्पष्टीकरणामुळे ख्रिस्ताच्या शिकवणीवर फारसा वाईट परिणाम झालेला नाही. परंतु आता येशूची शिकवण समजण्यासाठी या सदोष स्पष्टीकरणासाठी वापरलेल्या मुख्य पद्धती स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. आणि सदोष स्पष्टीकरणाची एक परंपरागत पद्धत जी आपल्या अंगवळणी पडलेली आहे तिच्यामध्ये ख्रिस्ताने जे शिकवले नाही त्याचा ख्रिस्ती धर्माच्या नावाखाली उपदेश केला जातो, परंतु चर्चच्या शिकवणीत ख्रिस्ताच्या शिकवणीशी थोडासा संबंध

असलेल्या लिखाणातील विसंगत गोष्टींचा भरणा आहे. आणि ती शिकवणीचा विपर्यास व फिरवाफिरव करून त्या दुसऱ्या लिखाणाशी जुळवली आहे. या सदोष स्पष्टीकरणानुसार जागाच्या सुरुवातीपासून आजतागायत ईश्वराने प्रकट केलेल्या ज्ञानाच्या साखळीतील दुवा ख्रिस्ताची शिकवण आहे. हे सदोष स्पष्टीकरण देणारे ख्रिस्ताला देव मानतात. परंतु येशूला देव म्हणून ओळखण्यामुळे त्यांनी त्याचे शब्द व शिकवण यांना पेन्टटुच, स्तोत्रे, प्रेषितांची कृत्ये, पत्रे, (Apocalypse) जगाच्या शेवटाचे भाकीत किंवा सल्लगार मंडळाचे निर्णय आणि चर्चच्या फादरांचे लिखाण या पेक्षा सुद्धा जास्त महत्व दिले नाही.

हे चुकीचा अर्थ लावणारे ख्रिस्ताची शिकवण जी पूर्वीच्या किंवा त्यानंतर येणाऱ्या प्रकटीकरणाशी जुळणारी नाही हे समजल्याचे मान्य करीत नाहीत. त्यामुळे त्यांचा उद्देश ख्रिस्ताची शिकवण स्पष्ट करण्याचा नसून शक्य असेल तेवढे पेन्टाटुच(बायबलचे प्रथम पंचखंड) , स्तोत्रे, शुभवर्तमाने, पत्रे आणि कृत्ये असे सर्व पवित्र शास्त्र म्हणून समजले जाणारे आत्यंतिक विसंगत लिखाण सुसंगत करण्याचा आहे.

अशा स्पष्टीकरणाचा उद्देश सत्य सांगण्याचा नसतो तर नव्या व जुन्या कराराच्या लिखाणातील विसंगत गोष्टी ज्या स्वाभाविकपणे असंख्य असणे शक्य आहे आणि खरोखरच आहेत, त्या सुसंगत पणे मांडण्याचा असतो. त्यांच्यात पॉलची पत्रे आणि सल्लागार मंडळाचे निर्णय(जे: 'आमच्या व पवित्र आत्म्याच्या कृपेने' या मायन्याने सुरु होतात) , आणि असे कायदे करणारे व पवित्र आत्मा आपल्या मुखाने बोलतो अशी खात्री देणारे पोप, धर्मसभा, दिखाऊ ख्रिस्त, आणि सर्व चुकीचे अर्थ लावणारे आहेत. ते सर्व जण त्यांच्या स्पष्टीकरणाच्या सत्यतेची खात्री देण्यासाठी एकच ढोबळ पद्धत वापरतात ती म्हणजे त्यांची स्पष्टीकरणे मानवी मुखातून आलेली नसून पवित्र आत्म्याने प्रकट केलेली आहेत असे ते ठासून सांगतात.

स्वतःला सत्य मानणाऱ्या या प्रत्येक श्रद्धेच्या तपासणीत न शिरता एखाद्याच्या सहज लक्षात येईल की त्यांच्या नव्या व जुन्या करारातील प्रचंड लिखाणाला सारखेच पवित्र मानण्याच्या सर्वांच्या समान पद्धती मुळे ते स्वतःवर ख्रिस्ताची शिकवण समजून घेण्यातील एक अभेद्य अडथळा उभा करतात. आणि या चुकीमधून त्या शिकवणीचे अनेकविध अर्थ लावले जाण्याची शक्यता आणि अपरिहार्यता निर्माण होते. अनेक प्रकटीकरणाची जोडणी

अनेकविध प्रकारे केली गेली. परंतु एका व्यक्तीच्या(देव मानल्या गेलेल्या) शिकवणीमध्ये एवढे मतभेद होऊ नयेत.

जर लोकांना आपली शिकवण शिकवण्याच्या एकमेव उद्देशाने देव पृथ्वीवर उतरला असेल तर त्याच्या शिकवणीचे एकापेक्षा जास्त अर्थ लावले जाणे शक्य नाही. जर देव पृथ्वीवर माणसांना सत्य प्रकट करण्यासाठी अवतरला असेल तर त्याने ते किमान सर्वांना समजेल असे प्रकट केले असणार. जर त्याने तसे केले नसेल तर तो देव नसणार; आणि जर दैवी सत्ये अशी असतील की जी खुद्द देवासाठी माणसाला समजतील अशी नीट स्पष्ट करता आली नसतील तर ती माणसांना नक्कीच स्पष्ट करता येणार नाहीत.

जर येशू देव नसून एक महापुरुष असता तर मग आतापर्यंत त्याच्या शिकवणी संबंधी कमी मतभेद झाले असते. महापुरुषाची शिकवण महान असते कारण ती दुसऱ्यांनी दुर्बोध व अनिश्चित पद्धतीने सांगितलेली गोष्ट सोप्या व सुबोध पद्धतीने व्यक्त करते. महापुरुषांच्या शिकवणीत जे दुर्बोध असते ते महान नसते, आणि त्यामुळे महापुरुषांची शिकवण त्याच्या पंथाला धोकादायक नसते. पवित्र आत्म्याने प्रकट केलेले स्पष्टीकरणच फक्त सत्य आणि बाकीची स्पष्टीकरणे असत्य असे ठामपणे मांडल्यास वेगवेगळया स्पष्टीकरणातून आलेल्या चर्च मध्ये मतभेद व शत्रुत्व जन्म घेते. असे असले तरीही वेगवेगळी चर्च खात्री देतात की ती दुसऱ्या समाजांना वाईट समजत नाहीत त्यांचा द्वेष करीत नाहीत तर एकत्र येण्यासाठी प्रार्थना करतात, हे असत्य आहे. एरीअसच्या काळापासून विरुद्ध पंथाची श्रद्धा कशी खोटी आहे हे सागण्यापेक्षा वेगळी कोणतीच गोष्ट आपली श्रद्धा सत्य आहे हे ठसवण्यासाठी वापरली गेली नाही. एखादा पंथ पवित्र आत्म्याच्या दैवी प्रकटीकरणातून तयार झाला आहे असे निसंशय म्हणणे म्हणजे आत्यंतिक दुराभिमान आणि दुसऱ्याना कमी लेखने होय. माझ्या मुखातून देव बोलतो असा अत्युच्च समज असणे यापेक्षा मोठा उद्धटपणा (मग्रुरी) असू शकत नाही. आणि एखाद्याने आपल्याकडे निसंदेह सत्य आहे असे घोषित करणे म्हणजे जे त्याचाशी सहमत नाहीत ते सर्व खोटे आहेत असे खात्रीने सांगणे, ही सर्वात मोठी दृष्टप्रवृती आहे. हेच सर्व चर्च सांगत आहेत आणि त्यातूनच धर्माच्या नावाने घडलेल्या व घडत असलेल्या वाईट गोष्टी वाहून आलेल्या आहेत व आता वाहत आहेत.

चर्च आणि पंथ यांनी काढलेले अर्थ जे तात्पुरते अनर्थ घडवून आणतात त्याच्या पलीकडे त्यांत एक अंतर्गत दोष असतो त्यामुळे त्यांच्या ठाम प्रतिपादनाला आंधळेपणा,

अनिश्चितता आणि ढोंगीपणा प्राप्त होतो. या दोषात पवित्र आत्मा जो प्रेषितांवर उतरला त्याच्याकडून झालेल्या ताज्या प्रकटीकरणाचा हवाला चर्च देतात. जे त्याच्याकडून सरळ, निश्चितपणे आणि शेवटपर्यंत सतत येत होते व येत आहे अशा प्रकटीकरणावर आधारलेली असून तिला ख्रिस्ती श्रद्धा म्हणतात. सर्व चर्चचे लोक जे असे मानतात की प्रकटीकरण पवित्र आत्म्याकडून येते ते(मह्मदिया प्रमाणे) मोजेसचे, येशूचे आणि पवित्र आत्म्याचे अशी तीन प्रकटीकरणे मानतात. परंतु महमदीय धर्मात मोजेस आणि येशू नंतर शेवटचा प्रेषित महमद असून त्याने मोजेस आणि येशूच्या प्रकटीकरणाचे स्पष्टीकरण दिलेले आहे आणि हे महमदाचे प्रकटीकरण सच्च्या विश्वासू समोर आहे असा त्यांचा विश्वास आहे.

चर्चच्या श्रद्धेचे तसे नाही. मह्मादिया प्रमाणे ते मोजेस, येशू आणि पवित्र आत्म्याचा हवाला देतात परंतु ते स्वतःला त्यांच्या शेवटच्या प्रकटीकरण करणाऱ्यावरून पवित्र आत्मिक मानीत नाहीत तर त्यांच्या श्रद्धेचा पाया ख्रिस्ताची शिकवण आहे असे मानतात. अशा तऱ्हेने आपला स्वतःचा उपदेशाचा अधिकार ख्रिस्ताच्या माथी मारतात. चर्चच्या लोकांनी त्यांचा शेवटचा प्रकटीकरण करणारा, जो कोणी, तो मग संत पौल, किंवा चर्च सल्लागार मंडळी, किंवा पोप, किंवा वृध्द धर्म पंडित असेल त्याला मान्यता देऊन त्याच्या नावाने त्यांचा धर्म ओळखला जावा. शेवटचे प्रकटीकरण हे अगोदरच्या सर्व प्रकटीकरणाचे स्पष्टीकरण देत असल्याने ते सर्वात जास्त महत्वाचे असते म्हणून मग ते धर्मगुरू असोत की पूर्वेकडच्या जुन्या जाणत्या लोकांचा दरबार, की पोपचे परिपत्रक किंवा लुथर वा फिलारेतचे अभ्यासक्रम किंवा प्रश्नोत्तरी त्याच्या नावाने त्यांचा धर्म ओळखला गेला पाहिजे. परंतु ते तसे न करता ख्रिस्ताच्या शिकवणी पेक्षा पूर्णपणे वेगळी तत्वप्रणाली ख्रिस्ताची म्हणून उपदेश करतात. त्यांच्या उपदेशानुसार येशूने असे जाहीर केले की आदामाच्या पापामुळे विनाश पावलेल्या मानव वंशाचे तारण त्याने आपल्या रक्ताने केले आहे. आणि देवामध्ये तीन जण आहेत. प्रेषितां वर उतरलेला पवित्र आत्मा वारसाहक्काने धर्मगुरू पर्यंत आलेला आहे. पापमुक्ती साठी सात साक्रामेंताची गरज आहे आणि कम्युनिअन दोन्ही हातांनी स्वीकारले पाहिजे इत्यादी इत्यादी. ते आपल्याला ही सर्व ख्रिस्ताची शिकवण आहे असा विश्वास ठेवायला सांगतात. परंतु वास्तवात त्याच्या शिकवणीत यातील एक शब्दही नाही. ते ढोंगी गुरु त्यांच्या शिकवणीला व धर्माला पवित्र आत्म्याची शिकवण व धर्म म्हणू शकतात ख्रिस्ताचा नाही. कारण फक्त शुभवर्तमानातून आपल्या पर्यंत पोहोचलेले शेवटचे प्रकटीकरण मानत असलेली श्रद्धा हीच ख्रिस्ती म्हणता येईल. असे वाटेल की गोष्टी

सरळ आहेत आणि त्यांची चर्चा करायची गरज नाही. पण सांगायला विचित्र वाटते की एका बाजूला जुन्या कराराशी अन्याय व कृत्रिम संयोग तर दुसऱ्या बाजूला पवित्र आत्म्याच्या नावाने केलेली भारुडभरती व विपर्यास यापासून ख्रिस्ताची शिकवण आता पर्यंत वेगळी करण्यात आली नाही.

आजतागायत काही लोक येशूला त्रक्यातील दुसरी व्यक्ती मानतात. तिसऱ्या व्यक्तीचे(पवित्र आत्मा) खोटे प्रकटीकरण जे जुन्या करारात, पत्रात, सल्लगार मंडळाचे हुकूमनामे, आणि धर्म गुरुंचे निर्णय यांच्या जोडीने त्याच्या शिकवणीचा विचार ते करतात तसेच ख्रिस्ताचा धर्म म्हणून अतिशय विचित्र श्रद्धांचा उपदेश करतात. दुसरे लोक जे येशूला देव मानीत नाहीत ते देखील त्याच प्रमाणे ख्रिस्ताची शिकवण जशी त्याने शिकवली असणे शक्य आहे त्यापेक्षा पौल सारख्या त्यावर भाष्य करणाऱ्याजशी समजली आहे तशी विचारात घेतात. येशूला देव न मानता मानव मानणारे हे भाष्यकार त्याला एका न्याय हक्कापासून वंचित ठेवतात. तो हक्क म्हणजे त्याला त्याच्या स्वतःच्या शब्दाचेच उत्तरदायित्व असावे त्यांच्या खोट्या स्पष्टीकरणाचे नव्हे. त्याच्या शिकवणीचे स्पष्टीकरण देतांना हे विद्वान भाष्यकार येशूला बोलावे असे कधीच वाटले नसेल अशा गोष्टी त्याच्या नावावर खपवतात. या स्पष्टीकरण कर्त्यांच्या पंथाचे प्रतिनिधी अत्यंत लोकप्रिय असलेल्यांपासून सुरुवात केल्यास त्याची शिकवण त्यांनी ख्रिस्ताने स्वतः काय शिकवले हे त्याच्या भाष्यकारांनी घातलेली भारुडभरती वेगळी काढण्याचा त्रास न घेता आणि खोलात जाऊन त्याची शिकवण समजून न घेता त्याच्या अवतरण्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतात आणि त्याच्या जीवनातील घटना आणि त्याच्या काळातील परिस्थिती त्याच्या शिकवणीच्या प्रसारा साठी वापरतात.

त्यांच्यापुढे उभी ठाकलेली समस्या ही आहे की अठराशे वर्षापूर्वी एक भणंग माणूस अवतरला आणि काही गोष्टी सांगून गेला. त्याला चाबकाने झोडपले व ख्रुसावर खिळले. आणि त्यावेळेपासून (जरी अनेक न्यायी माणसे त्यांच्या विश्वासासाठी मरण पावली) कोट्यवधी लोक, शहाणे आणि मुर्ख, ज्ञानी आणि अज्ञानी, या विश्वासाला चिकटून आहेत की मानवामध्ये हा एकच माणूस देव होता. ही आश्चर्यकारक वस्तुस्थिती कशी स्पष्ट करणार? चर्चचे लोक सांगतात की तसे घडले कारण येशू देव होता. तसे असेल तर सर्व समजण्या सारखे आहे. परंतु तो देव नसेल तर सर्वजण या सामान्य माणसालाच देव का समजत होते

याचे स्पष्टीकरण आपण कसे देणार? आणि या विचाराच्या विद्वान लोकांनी येशूच्या जीवनाचे सर्व तपशील परिश्रम पूर्वक बारकाईने तपासले आहेत(वास्तवात त्यांना काहीच सापडलेले नाही) जरी त्यांना येशूचे जीवन बारीकसारीक तपशीलासह साकारता आले तरीही त्याचा आणि फक्त त्याचाच लोकांवर एवढा प्रभाव का पडला होता हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतच आहे. या प्रश्नाचे उत्तर येशू ज्या समाजात जन्माला आला त्याच्या ज्ञानाने मिळणार नाही, किंवा तो कसा शिकला, इत्यादिमुळे. त्याही पेक्षा कमी, त्यावेळी रोम मध्ये काय केले जात होते याच्या ज्ञानातून किंवा त्या वेळचे लोक अंधश्रद्धेकडे जास्त झुकलेले होते या वास्तवा पेक्षा या माणसाने असा काय उपदेश केला की ज्यामुळे त्याकाळापासून आज पर्यंतच्या लोकांना तो इतर सर्वांपेक्षा वेगळा आणि देव म्हणून मान्य करावासा वाटला. असे दिसते की प्रथम जी गोष्ट केली पाहिजे ती म्हणजे त्या माणसाची शिकवण समजून घेतली पाहिजे. आणि स्वाभाविकपणे त्याची स्वतःची शिकवण, त्या शिकवणीचे ढिसाळ स्पष्टीकरण जे त्याच्या काळापसून पसरलेले आहे ते नव्हे. परंतु हे केले गेले नाही. ख्रिस्ती धर्माच्या इतिहासाचे हे अभ्यासक येशू देव नव्हता हे समजूनच खुश झाले आणि त्याची शिकवण दैवी नाही आणि म्हणून बंधनकारक नाही हे सिद्ध करण्यासाठी इतके अस्वस्थ होते की त्यांनी येशूला जितके सामान्य माणूस ठरवून त्याची शिकवण दैवी नाही हे सिद्ध करण्याचा त्यांच्या सर्व शक्तीनिशी प्रयत्न केला तितके ते त्यांच्यापुढील समस्या सोडवण्यापासून दूर जात आहेत हे ते विसरून गेले. हा आश्चर्यकारक दोष समजून घेण्यासाठी रेनानचा अनुयायी हेवेटचा एक लेख आठवतो त्यात तो म्हणतो की येशू ख्रिस्त हा खूप गावंढळ व मुर्ख माणूस होता.

येशू देव नव्हता आणि त्यामुळे त्याची शिकवण दैवी नव्हती हे सिद्ध करणे किंवा तो कॅथोलिक होता हे सिद्ध करणे ही अत्यावश्यक गोष्ट नाही, तर असे काय मानावासाठी अत्युच्य आणि मौलिक त्याच्या अतिशुद्ध स्वरुपात त्याने सांगितले की त्याच्या उपदेशकाला देव म्हणून मान्यता दिली गेली व आताही दिली जात आहे.

जर वाचक बहुसंख्य ख्रिस्ती विश्वासात वाढलेल्या पण सामान्यज्ञान व सद्सद्विवेक यांच्या आधारे त्यातील विसंगती सोडून देणाऱ्या सुशिक्षित लोकांपैकी असतील आणि ख्रिस्ती शिकवणीच्या शुध्द रुपाबद्दल प्रेम व आदर बाळगून असतील. (असे म्हणतात की, ढेकणाच्या त्रासाने कंटाळून कोणी आपला लोकरी कोट चुलीत टाकीत नाही) किंवा सर्व ख्रिस्ती धर्म उपद्रवी अंधश्रद्धा समजत असतील. मी त्यांना सांगू इच्छितो की लक्षात ठेवा

त्याना जी अंधश्रद्धा तिरस्कार करायला लावते ती ख्रिस्ताची शिकवण नसून; ज्या कुरूप प्रथा त्याच्या शिकवणी सह गुंफल्या आहेत व ख्रिस्ती धर्म म्हणून सादर केलेल्या आहेत त्यासाठी ख्रिस्ताला जबाबदार धरता येणार नाही. ख्रिस्ती धर्माची पूर्वकल्पना येण्यासाठी आपल्यापर्यंत आलेल्या ख्रिस्ताच्या शिकवणीचा ज्यात उद्बोधक अर्थ असलेले ख्रिस्ताचे शब्द व कृती आहे त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे ख्रिस्ताच्या शिकवणीचा त्या पद्धतीने अभ्यास करून वाचक आपली स्वतः ची समजूत करून घेऊ शकतात की ख्रिस्ती धर्म उच्च व निचतेचे मिश्रण किंवा एक अंधश्रद्धा याच्या पलीकडे अचूक, शुध्द आणि पूर्ण तात्विक आणि नैतिक अशी तत्वप्रणाली आहे. जी मानवी तर्कशक्तीच्या पलीकडील आहे आणि जिच्या कक्षेत (वस्तुस्थिती न ओळखता) माणसाचे राजकीय, विद्वत्तापूर्ण, काव्य विषयक, आणि तत्वज्ञान विषयक उद्योग फिरत आहेत. जर वाचक चर्चचा धर्म बाह्य गोष्टींसाठी नव्हे तर आंतरिक शांतीसाठी मानणाऱ्या थोड्या अल्पसंख्य सुशिक्षित लोकांपैकी असेल तर या पुस्तकात मांडलेली ख्रिस्ताची शिकवण ही तो मानीत असलेल्या शिकवणी पेक्षा पूर्णपणे वेगळी आहे आणि येथे दिलेली शिकवण त्याच्या श्रद्धांशी जुळणारी आहे की नाही हा त्याच्यासाठी प्रश्न नसून फक्त त्याची तर्कशक्ती व सदसद्विवेकबुद्धी यांना उत्तम रित्या पटणारी एकट्या ख्रिस्ताची शिकवण की अनेक ग्रंथांची जुळवाजुळव करून चर्चने तयार केलेली शिकवण? त्याला ही नवी शिकवण स्वीकारायची आहे की आपली स्वतःची श्रद्धा जोपासायची आहे हाच केवळ प्रश्न आहे.

परंतु वाचक जर चर्चची मूल्ये व पंथाचा त्यांच्यावर ती सत्य आहेत असा विश्वास आहे म्हणून नव्हे तर बाहेरून ती मानून त्यांचा उपदेश करणे आपल्याला फायद्याचे आहे म्हणून समर्थक असेल, तर त्याने लक्षात ठेवले पाहिजे की त्याचे कितीही समर्थक असोत, ते कितीही सामर्थ्यवान असोत, कोणत्याही अधिकारावर ते असोत, आणि कोणत्याही महान नावाने स्वतःला संबोधीत असो तो फिर्यादी नसून आरोपी आहे. अशा वाचकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की त्यांना असे काहीही सिद्ध करायचे नाही की त्यांनी फार पूर्वी त्याना सांगायचे होते ते म्हटले होते आणि ते त्यांना हवे असलेले सिद्ध करू शकले तरी ते शेकडो परस्पर विरुध्द चर्चनी जे सिद्ध केले आहे तेच ते स्वतः साठी सिद्ध करू शकतील. आणि ते त्यांच्या स्वतःच्या प्रात्यक्षिकासाठी नव्हे तर स्वतःला देव निंदेच्या ख्रिस्त-देवाची शिकवण एझारे, सल्लागार मंडळी आणि थिओफिलेकट्स यांच्याशी जुळवून घेणे आणि देवाची वचने


माणसांच्या शब्दांशी जोडून घेण्यासाठी त्यांचे अर्थ बदलून घेणे यासाठी त्यांना स्वतःला क्षमा करावी लागेल. त्यांनी स्वतःच्या हृदयातील धर्मांधता देव-येशूवर थोपून ती त्याची शिकवण आहे म्हणून सांगून देवाची जी बदनामी केली आहे त्याबद्दल त्यांनी स्वतःला क्षमा करायला हवी. या जगावर कृपेचा वर्षाव करण्यासाठी आलेल्या देवाची शिकवण लपवून त्याऐवजी त्यांची स्वतःची देवनिंदक पंथांची शिकवण देऊन अब्जावधी लोकांना त्यांच्यासाठी ख्रिस्ताने आणलेल्या आशीर्वाद, शांती आणि प्रेम यांच्या ऐवजी विविध पंथ, मानहानी, हत्त्या आणि सर्व प्रकारचे गुन्हे लादण्याच्या फसवेगिरी बद्दल त्यांनी स्वतःला क्षमा करायला पाहिजे.

अशा वाचकांपुढे बाहेर पडण्याचे दोनच मार्ग आहेत: एक नम्रपणे आपल्या पापांची कबुली देऊन स्वतःच्या खोटेपणाचा त्याग करणे किंवा त्यांना उघडे पाडणाऱ्यांचा त्यांनी केलेल्या व अजूनही करीत असलेल्या गोष्टींबद्दल छळ करणे.

त्यांचा खोटारडेपणा त्यांना नाकारायचा नसेल, तर त्यांच्यासाठी एकच गोष्ट उरते ती म्हणजे माझ्यातील दोषांच्या भीतीने माझ्या आनंदासाठी मी पूर्ण केलेल्या माझ्या लिखाणाबद्दल त्यांनी माझा छळ करावा.

लिओ टॉलस्टॉय,

यास्नाया पोल्यांना, १८८३.



# द गॉस्पल इन ब्रीफ

# अर्थात

# संक्षिप्त शुभवर्तमान

# देवपुत्र येशू ख्रिस्ताची कल्याणाची घोषणा.

## प्रस्तावना,

### जीवनाचे आकलन

येशू ख्रिस्ताच्या घोषणेने बाह्य देवावरील विश्वासाची जागा जीवनाच्या आकलनाने घेतली. देवपुत्र येशू ख्रिस्ताने केलेली कल्याणाची घोषणा.

या कल्याणाच्या घोषणेप्रमाणे जी सर्व माणसे आपण देवाचे पुत्र आहोत यावर विश्वास ठेवतात त्यांना खऱ्या जीवनाचा लाभ होतो. जीवनाचे आकलन हा सर्वाचा आधार आणि सुरुवात आहे. जीवनाचे आकलन म्हणजेच देव आहे. आणि येशूच्या घोषणेने ते सर्व गोष्टींचा आधार व आरंभ झालेली आहे.

सर्व गोष्टींना आकलनाने जीवन लाभेले आहे, आणि त्याशिवाय काहीही जिवंत राहू शकत नाही. आकलन खरे जीवन देते. आकलन हा सत्याचा प्रकाश आहे, आणि प्रकाश अंधारात उजळतो आणि अंधार त्याला विझवू शकत नाही.

सत्याचा प्रकाश नेहमी जगात अस्तित्वात आहे आणि या जगात जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला तो सज्ञानी करतो. तो या जगात होता आणि तो आकलनाचा प्रकाश होता म्हणून जग जिवंत आहे.

परंतु जगाने त्याला धरून ठेवले नाही. तो स्वतः अवतरला आणि त्याने स्वतःला धरून ठेवले नाही. ज्यांना ह्या प्रकाशाचे आकलन झाले ते त्याच्या प्रमाणे झाले कारण त्यांनी त्याच्या सत्यते मध्ये विश्वास ठेवला. ज्यांचा असा विश्वास बसला की जीवन आकलनात आहे ते देहाचे पुत्र राहिले नाहीत तर आकलनाचे पुत्र झाले.

आणि जीवनाचे आकलन ख्रिस्ताच्या व्यक्तित्वात देहरुपाने व्यक्त झाले आणि आकलनाचा पुत्र जो पित्याप्रमानेच जीवनाचा उगम आहे आणि देहरुपातील मानव जीवनाचा उगम असलेल्या पित्याशी एकरूप आहे हे आपल्याला समजले.

ख्रिस्ताची शिकवण ही पूर्ण व सत्य श्रद्धा आहे कारण येशूची शिकवण अनुसरून आपण जुन्या ऐवजी एक नवी श्रद्धा समजून घेतो. मोजेसने आपल्याला एक कायदा दिला परंतु खरी श्रद्धा आपल्याला येशू ख्रिस्ताकडून मिळाली.

देवाला कोणीही पाहिले नाही किंवा कधी पाहणार नाही, फक्त त्याचा पुत्र जो पित्यामध्ये आहे त्याने आपल्याला जीवनाचा मार्ग दाखवला आहे.

देवाचा पुत्र

मानव, देवाचा पुत्र, देहाने दुबळा परंतु आत्म्याने मुक्त आहे.

आमच्या पित्या

येशू ख्रिस्ताचा जन्म असा झाला. त्याच्या माता मेरीचे जोसेफाशी लग्न ठरले होते. परंतु ते पती-पत्नी म्हणून राहायला सुरुवात करण्यापूर्वी असे दिसले की मेरीला दिवस गेले आहेत. जोसेफ एक भला माणूस होता त्याला मेरीला अपमानित करायचे नव्हते. त्याने तिला आपली पत्नी म्हणून स्वीकारले आणि तिला तिचा पहिला मुलगा होऊन त्याला येशू नाव देईपर्यंत त्याने तिच्याशी संबंध ठेवला नाही.

आणि तो मुलगा वाढला, प्रौढ झाला आणि त्याच्या काळापलीकडे प्रज्ञावान निघाला.

जेव्हा येशू बारा वर्षांचा होता तेव्हा मेरी जोसेफसह येशूला घेऊन जेरुसलेमास सुट्टीसाठी गेली होती. जेव्हा सुट्टी संपली तेव्हा ते घरी यायला निघाले तेव्हा मुला विषयी विसरून गेले. नंतर त्यांना आठवले परंतु तो इतर मुलांबरोबर असेल असे वाटून रस्त्यात

त्यांनी चौकशी केली पण तो त्यांना कोठेच सापडला नाही, म्हणून ते त्याच्यासाठी जेरुसलेमला परत गेले. आणि तीन दिवसा नंतर तो चर्च मध्ये सापडला. तेथे तो धर्मगुरु बरोबर बसून प्रश्न विचारीत होता. आणि सगळेजण त्याच्या बुद्धिमत्तेने आश्चर्यचकित झाले होते. त्याच्या आईने त्याला पाहिले आणि म्हणाली: ‘तू आमचे काय हाल केलेस? तुझे वडील आणि मी तुझा शोध घेत होतो आणि दुःखी झालो होतो. ’आणि तो त्यांना म्हणाला: ‘तुम्ही माझा शोध कोठे केलात? खात्रीने तुम्हाला हे माहीत असणार की मुलगा त्याच्या पित्याच्या घरातच सापडणार. ’आणि त्यांना त्याचे म्हणणे समजले नाही, तो पिता कोणाला म्हणतो हेही समजले नाही.

आणि त्यानंतर येशू त्याच्या आईसह राहिला आणि सर्व प्रकारे तिच्या आज्ञा पाळल्या. आणि तो नैतिक उंचीने व बुद्धिमत्तेने वाढला. आणि सगळयांना येशू हा जोसेफचा मुलगा आहे असे वाटले. आणि तो तीस वर्षांचा होईपर्यंत असा जगला.

त्यावेळी जॉन या प्रेषिताने ज्युडेयामध्ये स्वतःला जाहीर केले. तो जॉर्डन जवळच्या जुडेया या उघड्या प्रदेशात रहात होता. त्याचा पोशाख उंटाच्या केसांचा चामडी पट्ट्याने बांधलेला असा होता. आणि तो झाडांची साल व वनस्पती खाऊन जगत असे.

जॉन म्हणत असे: स्वतः विचार करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आहे. तो लोकांना त्यांच्या कमकुवतपणावर मात करून त्यांची जीवने बदलायला बोलावीत असे, आणि त्याबदलाची खूण म्हणून त्यांना जॉर्डन नदीत अंघोळ घालीत असे. तो म्हणे: एक आवाज तुम्हाला बोलावीत आहे. ओसाड प्रदेशातून देवाचा मार्ग मोकळा करा, त्याच्यासाठी रस्ता सपाट करा, अशा प्रकारे करा की सर्व समान होतील, कोठे खाच खळगे नसतील, उच्च नीचता नसेल. मग देव तुमच्यात असेल आणि सर्वांना मोक्ष प्राप्ती होईल. आणि लोक त्याला विचारीत: आम्ही काय करावे? तो उत्तर देई: ज्याच्याकडे दोन कपड्यांचे जोड आहेत त्यांनी एक ज्यांच्याकडे काहीच नाही त्याला द्यावा, आणि ज्याच्याकडे अन्न असेल त्याने ते ज्याच्याकडे नाही त्याला द्यावे, आणि कर गोळा करणारे त्याच्याकडे येऊन त्याला विचारतात: आम्ही काय करावे? तो त्यांना म्हणतो: योग्य असेल त्या पेक्षा जास्त

कोणाकडून घेऊ नका. आणि सैनिकांनी त्याला विचारले: आम्ही कसे रहावे? तो म्हणतो: कोणाला इजा करू नका, किंवा कोणा माणसाला लुबाडू नका, तुम्हाला जे मिळते त्यात समाधानी रहा. आणि जेरुसलेमचे रहिवासी आणि जॉर्डनच्या जवळपासच्या जुडेयाच्या शेजारचे ज्यू त्याच्याकडे आले. आणि त्यांनी त्याच्याकडे आपले गुन्हे कबुल केले. आणि जीवनातील बदलाचे चिन्ह म्हणून त्याने त्यांना जॉर्डन मध्ये अंघोळ घातली.

आणि बरेच सनातनी आणि रुढीप्रिय धर्मवेत्ते गुपचूप जॉन कडे आले. त्याने त्यांना ओळखले आणि तो म्हणाला: तुम्ही घातकी लोकांची जमात आहात वा तुम्हाला कळलेले सुद्धा आहे की देवाच्या इच्छेपासून तुम्ही सुटू शकत नाही? मग स्वतः लक्षात घ्या आणि तुमची श्रद्धा बदला! आणि तुमची श्रद्धा बदलायची इच्छा असेल तर तुम्ही तुमच्याशी लक्षात घेतल्याचे त्याच्या फळावरून दिसू दे. झाडावर कुऱ्हाड अगोदरच पडली आहे. जर झाडाला वाईट फळे येत असतील तर ते झाड कापून भट्टीत टाकले जाते. जीवनाच्या बदलाचे चिन्ह म्हणून मी तुम्हाला पाण्यामध्ये धुतो पण त्या अंघोळी प्रमाणे तुम्हाला आत्म्यानेही अंघोळ घालतो. धान्य मळण्याच्या खळयामध्ये साफ करून मालक ज्याप्रमाणे गहू गोळा करतो व भुसकट जाळून टाकतो तसा आत्मा तुम्हाला स्वच्छ करतो.

जॉन कडून अंघोळ करवून घेण्यासाठी येशू सुद्धा गॅलीली वरून जॉर्डनला आला, आणि अंघोळ घातल्यावर जॉनचा उपदेश त्याने ऐकला.

आणि जॉर्डनवरून तो अज्ञात जागी गेला तेथे त्याला आत्म्याची शक्ती जाणवली.

येशू चाळीस दिवस व चाळीस रात्री वाळवंटात अन्न पाण्याशिवाय राहिला. आणि देहाचा आवाज त्याला म्हणाला: जर तू सर्वसमर्थ देवाचा पुत्र असशील तर तू दगडाची भाकरी करू शकला असता परंतु तसे करू शकला नाहीस याचा अर्थ तू देवाचा पुत्र नाहीस.

परंतु येशू स्वतःला म्हणाला. जर मी दगडातून भाकरी बनवू शकत नसेन तर त्याचा अर्थ मी देहाने नव्हे तर आत्म्याने देवाचा पुत्र आहे. मी भाकरीने नव्हे तर आत्म्याने जिवंत आहे. आणि माझा आत्मा देहाकडे दुर्लक्ष करायला समर्थ आहे.

परंतु तरीही भुकेने त्याला छळले, आणि देहाचा आवाज पुन्हा त्याला म्हणाला: जर तू फक्त आत्म्याने जगतोस आणि देहाकडे दुर्लक्ष करू शकतोस तर देह फेकून दे आणि तुझा आत्मा जिवंत राहील.

आणि त्याला वाटले की तो मंदिराच्या छतावर उभा आहे आणि देहाचा आवाज त्याला म्हणतो आहे: तू जर आत्म्याने देवाचा पुत्र आहेस तर स्वतःला मंदिरावरून फेकून दे तुला कोणतीही दुखापत होणार नाही परंतु अदृश्य शक्ती तुला धरून आधार देईल व सर्व दुखापती पासून वाचवील. परंतु येशू स्वतःशी म्हणाला: मी देहाकडे दुर्लक्ष करू शकेन परंतु त्याला फेकून देणार नाही, कारण मी आत्म्याने देहात जन्म घेतला आहे. ती माझ्या आत्म्याच्या पित्याची इच्छा होती आणि मी त्याला विरोध करू शकत नाही.

नंतर देहाचा आवाज त्याला म्हणाला: जर देहाकडे दुर्लक्ष करून मंदिरावरून स्वतःला फेकून तू तुझ्या पित्याला विरोध करू शकत नाहीस तर तुला जेवायचे असते तेव्हा उपाशी राहून तुझ्या पित्याला विरोध करू शकत नाहीस. देहाच्या इच्छा तू हलक्या समजूच शकत नाहीस. त्या तुझ्यात वसवलेल्या आहेत, आणि तू त्यांची सेवा केली पाहिजे. नंतर येशूला पृथ्वीवरील सर्व राज्ये आणि लोक दिसतात असे वाटले, जसे ते फायद्याच्या अपेक्षेने देहासाठी जगत व खपत होते. आणि देहाचा आवाज त्याला म्हणाला: तेथे पहा ते लोक माझ्यासाठी काम करतात आणि मी त्यांना काय पाहिजे ते देतो. जर तू माझ्यासाठी काम करशील तर तुलाही तसेच मिळेल. परंतु येशू स्वतःशी म्हणाला: माझा पिता देह नसून आत्मा आहे. मी त्याच्यामुळे जिवंत आहे. मला माझ्यामधील त्याच्या असण्याची जाणीव आहे. फक्त त्याचाच मी आदर करीन आणि एकट्या त्याच्याकडून बक्षिसाची अपेक्षा करीत त्याच्यासाठीच फक्त काम करीन.

नंतर मोह थांबले आणि येशूला आत्म्याचे सामर्थ्य कळले. आणि जेव्हा त्याला आत्म्याच्या शक्तीचा अनुभव आला, तेव्हा येशू अज्ञात प्रदेशातून बाहेर आला व पुन्हा जॉन कडे आला आणि त्याच्या सोबत राहिला.

आणि जेव्हा येशू जॉनला सोडून निघाला, तेव्हा जॉन त्याच्या बद्दल म्हणाला: तो मानवाचा रक्षणकर्ता आहे. ते जॉनचे शब्द ऐकून त्याच्या शिष्यांपैकी दोघे आपल्या पूर्वीच्या गुरूला सोडून येशूच्या मागे गेले. तो, त्यांना आपल्या मागे येतांना पाहून, थांबला आणि म्हणाला: तुम्हाला काय पाहिजे? ते उत्तरले: गुरुजी, आम्हाला तुमच्या बरोबर राहून तुमची शिकवण जाणून घ्यायची आहे. तो म्हणाला: माझ्या बरोबर या आणि मी तुम्हाला सारे

सांगेन. ते त्याच्यासह गेले आणि रात्रीच्या दहा वाजे पर्यंत त्याचे ऐकत त्याच्या सोबत राहिले.

त्यांच्यापैकी एक शिष्याला एंड्रयू म्हणत त्याला एक भाऊ होता सिमोन. येशूचे ऐकून एंड्रयू त्याचा भाऊ सिमोन कडे गेला आणि त्याला म्हणाला: आम्ही त्याला ओळखले आहे ज्याच्या विषयी प्रेषितांनी लिहून ठेवले आहे त्या रक्षण कर्त्याने आम्हाला आमच्या मुक्ती विषयी सांगितले आहे. एंड्रयूने सिमोनलाही येशू जवळ आणले. येशूने एंड्रयूच्या या भावाचे नाव खडक या अर्थाचे पीटर ठेवले. आणि हे दोघे भाऊ येशूचे शिष्य झाले. त्यानंतर गॅलीलीत प्रवेश करण्या पूर्वी येशूला फिलीप भेटला आणि त्याला त्याने आपल्यासह यायला सांगितले. फिलीप बेद्सैदा येथला म्हणजे पीटर आणि एंड्रयू यांच्या गावातलाच. जेव्हा फिलिपला येशू विषयी कळले तेव्हा तो त्याचा भाऊ नाथानेलकडे जाऊन म्हणाला: मोजेस आणि प्रेषितांनी ज्याच्याविषयी लिहून ठेवले आहे तो देवाचा निवडलेला आम्हाला सापडला आहे. हाच तो येशू, नाझरेथच्या जोसेफचा पुत्र. नाथानेल आश्चर्यचकित झाला कारण प्रेषितांनी ज्याच्याविषयी लिहून ठेवले आहे तो आपल्या शेजारच्या गावातला होता आणि तो म्हणाला: देवाचा संदेष्टा नाझरेथ मधला असेल अशी शक्यता नव्हती. फिलीप म्हणाला: माझ्या सोबत ये, तू स्वतः बघ आणि ऐक. नाथानियेल त्याच्याशी सहमत होत भावाबरोबर जाऊन येशूला भेटला, आणि त्याचे ऐकले तेव्हा तो येशूला म्हणाला: होय, आता मला कळले की तू देवाचा एक पुत्र व इस्त्राएलचा राजा आहेस हे सत्य आहे. येशू त्याला म्हणाला: त्याच्यापेक्षा काही महत्वाचे शिक: यापुढे स्वर्ग खुला झाला आहे आणि मानव स्वर्गीय शक्तींच्या संपर्कात आला आहे. यापुढे देव मानवापासून जास्त वेळ वेगळा असणार नाही.

आणि येशू नाझरेथला त्याच्या घरी सुट्टीवर आला आणि नेहमीप्रमाणे सभेला जायला लागला आणि तेथे वाचन सुरु केले. त्यांनी त्याला इसाइहा या प्रेषिताचे पुस्तक दिले; आणि त्याने ते उघडून वाचले. त्या पुस्तकात लिहिले होते: प्रभूचा आत्मा माझ्यामध्ये आहे. त्याने मला दुर्दैवी व निराश लोकासाठी सुख जाहीर करण्यास निवडले आहे, बंधनात आहेत त्यांच्यासाठी मुक्ती, अंधांसाठी प्रकाश, आणि गांजलेल्याना संरक्षण व विश्रांती, सर्व मानवाला देवाची द्या जाहीर करण्यास मला निवडले आहे.

त्याने पुस्तक बंद केले, ते सेवकाकडे परत केले, आणि खाली बसला. आणि सर्व तो काय सांगतो ते ऐकायला थांबले होते. आणि तो त्यांना म्हणाला: हे लेखन आता तुमच्या डोळयासमोर पूर्ण होईल.

देवाची सेवा

म्हणून माणसाने देहासाठी काम करू नये तर आत्म्यासाठी काम करावे.

“जो स्वर्गात आहे”

एका शनिवारी येशू आपल्या शिष्यांसह एका शेतातून जात होता तेव्हा असे झाले. शिष्यांना भूक लागली होती, आणि रस्त्यात त्यांनी धान्याची कणसे खुडून हातात मळली आणि दाणे खाल्ले. परंतु सनातन्यांच्या शिकवणी प्रमाणे देवाने मोजेसला जो कायदा दिला आहे त्याप्रमाणे प्रत्येकाने शनिवार पवित्र पाळला पाहिजे आणि त्यादिवशी काहीही करू नये. सनातन्यांच्या शिकवणी प्रमाणे कोणीही जो शनिवारी काम करील त्याच्यावर दगड मारावेत अशी देवाची आज्ञा होती.

सनातन्यांनी शिष्यांना शनिवारी धान्य मळतांना पाहिले आणि त्याला म्हणाले: शनिवारी असे करणे चूक आहे. शनिवारी एखाद्याने काम करूच नये आणि तुम्ही धान्याची कणसे मळीत आहात. देवाने शनिवार पवित्र बनविला आहे, आणि आज्ञा केली आहे की ती मोडणाऱ्यांना मृत्युची शिक्षा द्यावी.

येशूने ते ऐकले, आणि म्हणाला: देवाच्या शब्दाचा खरा अर्थ तुम्हाला समजला असेल: ‘मला प्रेम हवे त्याग नको’तर तुम्ही जे निरुपद्रवी आहे त्याचा निषेध केला नसता. शनिवार पेक्षा माणूस अधिक महत्वाचा आहे. दुसऱ्या वेळी एका शनिवारी असे घडले की जेव्हा येशू सभेत शिकवीत होता तेव्हा एक आजारी बाई त्याच्याकडे आली आणि मदतीची याचना करू लागली. आणि येशूने तिला बरे करायला सुरुवात केली.

सनातनी चर्च-गुरु त्याच्यावर रागावले, आणि लोकांना म्हणाले: ‘आठवड्यात सहा दिवस काम करण्यासाठी असतात. मग येशूने त्या सनातनी कायदे पंडितांना विचारले:

शनिवारी एखाद्या माणसाला मदत करणे चूक आहे असे तुम्हाला वाटते का? आणि काय उत्तर द्यावे ते त्यांना कळले नाही.

नंतर येशू म्हणाला: खोटारड्यानो शनिवारी तुम्ही तुमचा बैल गोठ्यातून सोडून पाणी पाजायला नेत नाही का? आणि तुमची मेंढी जर विहिरीत पडली तर शनिवारीही कोणीही तिला बाहेर काढणार नाही का? माणूस मेंढी पेक्षा कितीतरी अधिक चांगला आहे: तरी तुम्ही म्हणता की माणसाला मदत करणे चूक आहे. मग तुम्हाला काय वाटते आपण शनिवारी चांगले की वाईट काम केले पाहिजे? जीव वाचवला पाहिजे की त्याचा नाश केला पाहिजे. चांगले काम नेहमीच केले पहिजे, शनिवारी सुद्धा.

येशूने एक दिवस जकातदाराला कर जमा करतांना पाहिले. त्या जकातदाराचे नाव मॅथ्यू होते. येशू त्याच्याशी बोलला आणि मॅथ्यूला ते समजले, त्याची शिकवण त्याला आवडली आणि त्याने त्याला घरी बोलावले व त्याचा आदर सत्कार केला.

जेव्हा येशू मॅथ्यूच्या घरी आला तेव्हा त्याचे काही जकातदार व नास्तिक मित्रही तेथे जमले होते. येशूने त्यांचा तिरस्कार केला नाही तर तो आणि त्याचे शिष्य त्यांच्यासोबत बसले. आणि सनातन्यांनी त्याला पाहिले, ते त्याच्या शिष्यांना म्हणाले: तुमचा गुरु जकातदार आणि नास्तिकांबरोबर जेवतो हे कसे काय? कारण सनातन्यांच्या शिकवणी प्रमाणे देव नास्तिकांशी कोणतेही संबंध ठेवायला मना करतो. येशूने ते ऐकले, आणि म्हणाला: जो चांगल्या आरोग्याची बढाई मारतो त्याला वैद्याची गरज नसते तर ती आजारी माणसाला असते. देवाच्या शब्दाचा अर्थ समजून घ्या: मला प्रेम हवे आहे बळी नको. जे स्वतःला सनातनी समजतात त्यांची श्रद्धा बदलण्यासाठी मी शिकवीत नाही, परंतु जे स्वतःला नास्तिक समजतात त्यांच्यासाठी शिकवतो.

जेरुसलेमावरून काही सनातनी कायदेपंडित येशूकडे आले. आणि त्यांनी पाहिले की त्याचे शिष्य, आणि येशू स्वतः यांनी हात न धुताच भाकरी खाल्ल्या, आणि हे सनातनी त्यासाठी त्याला दोष देऊ लागले. कारण ते स्वतः ताट कसे धुवायचे आणि ते तसे धुतल्याशिवाय जेवायचे नाही ही चर्चची परंपरा काटेकोरपणे पाळीत होते. आणि ते आपले हात धुतल्याशिवाय बाजारांतून काहीही खात नसत.

आणि सनातनी कायद्याचे प्रचारक त्याला विचारतात: तू चर्चची परंपरा का पाळीत नाहीस भाकरी न धुतलेल्या हातात घेऊन खातोस? आणि त्याने त्यांना उत्तर दिले: तुम्ही तुमच्या चर्चच्या परंपरा पाळणारे देवाच्या आज्ञा मोडता हे कसे काय? देव तुम्हाला म्हणाला: 'तुमच्या माता पित्यांचा आदर करा. परंतु तुम्ही अशी मांडणी केली की कोणीही म्हणावे: 'मी माझ्या पालकांना द्यायला पाहिजे ते देवाला देतो', आणि मग त्याला आपल्या माता-पित्याला पोसण्याचे बंधन रहात नाही. म्हणजे तुम्ही चर्चच्या परंपरा पाळून देवाचा कायदा मोडता. खोटारड्यानो! तुमच्या बद्दल इसाईहा या प्रेषिताने बरोबर सांगू ठेवले आहे: कारण हे लोक माझ्यापुढे फक्त शब्दाने नतमस्तक होतात, आणि त्यांच्या वाणीने फक्त माझा आदर करतात, त्यावेळी त्यांचे हृदय माझ्यापासून फार दूर असते; आणि कारण त्यांची माझ्या बद्दलची भीती ही त्यांनी घोकलेल्या मानवी कायद्याची आहे. मी त्यांच्यात आश्चर्यकारक व असामान्य गोष्टी घडवून आणीन; त्यांच्या शहाण्या लोकांचे शहाणपण नाहीसे होईल, आणि त्यांच्या विचारवंतांची समज कमी होईल. श्रेष्ठांपासून आपल्या इच्छा लपवून आपली कामे अंधारात करणाऱ्यांचा धिक्कार असो. '

तर आता ते तुमच्या बरोबर आहे: तुम्ही कायदा-देवाच्या आज्ञा मध्ये जे महत्वाचे आहे त्याकडे दुर्लक्ष करता परंतु पेला धुण्यासारख्या तुमच्या परंपरा पाळता. आणि येशूने लोकांना आपल्या जवळ बोलावले आणि म्हणाला: तुमच्या पैकी सगळयांनी ऐका आणि समजून घ्या: जे माणसाच्या आत गेल्याने त्याला मलीन करील असे जगात काहीच नाही; परंतु जे त्याच्यातून बाहेर पडते ते त्याला मलीन करू शकते. प्रेम व दया तुमच्या हृदयात असू द्या, म्हणजे सर्व स्वच्छ होईल. हे समजून घेण्याचा प्रयत्न करा.

आणि जेव्हा तो घरी परत गेला तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले की त्याच्या त्या शब्दांचा अर्थ काय आहे. आणि तो म्हणाला: तुम्हालाही समजले नाही का? तुम्हाला हे समजले नाही का की जे बाह्य, शारीरिक, आहे ते माणसाला मलीन करू शकत नाही? कारण ते त्याच्या आत्म्यात नव्हे तर पोटात जाते आणि तेथून पुन्हा बाहेर पडते. फक्त जे त्याच्या आत्म्यातून बाहेर पडते ते माणसाला मलीन करू शकते. दृष्टावा, व्यभिचार, बीभत्सता, खुनीपणा, चौर्य, लोभ, राग, फसवणूक, दिवाळखोरी, असूया, निंदा, गर्व आणि

प्रत्येक प्रकारचा मुर्खपणा आणि हा द्रुष्टपणा मानवाच्या आत्म्यातून बाहेर येतो आणि तोच फक्त त्याला मलीन करू शकतो.

त्यानंतर पासोव्हर सण आला, आणि येशू जेरुसलेमला गेला व त्याने मंदिरात प्रवेश केला. मंदिराच्या अंगणात गाई, बैल, आणि मेंढया सारखी गुरे आणि कबुतरांची खुराडी होती; आणि पैसे बदलणारे त्यांच्या गल्ल्या मागे बसले होते. हे सर्व देवाला अर्पण करण्यासाठी पाहिजे होते. प्राणी मारून मंदिरात अर्पण केले जात होते. अशा प्रकारे ज्यू लोकांची प्रार्थना सनातनी कायद्याच्या प्रचारकांनी शिकवल्या प्रमाणे चाले. येशू मंदिरात गेला, एक चाबूक विणला, सर्व गुरे मंदिरा समोरच्या मंडपातून बाहेर काढली, सर्व कबुतरे उडवून लावली, आणि सर्व पैसे उधळून टाकले, आणि त्यांना अशा वस्तू मंदिरात न आणण्याची ताकीद दिली.

तो म्हणाला: प्रेषित इसाइहाने तुम्हाला सांगितले आहे: ‘देवाचे घर हे जेरुसलेम मधले मंदिर नाही, तर देवाच्या लोकांचे सपूर्ण जग हे देवाचे मंदिर आहे. ’आणि प्रेषित जरेमियाने सुद्धा तुम्हाला सांगितले आहे: देवाचे मंदिर येथे आहे या खोटेपणावर विश्वास ठेवू नका; यावर विश्वास ठेवू नका तर तुमच्या जीवनात परिवर्तन करा: खोट्या रितीने पारख करू नका, अनोळखी लोकांची, विधवांची, किंवा अनाथांची पिळवणूक करु नका, निरापराध रक्त सांडू नका, आणि देवाच्या मंदिरात येऊन असे म्हणू नका: आता आम्ही शांतपणे वाईट कामे करू शकतो. माझे घर चोरांचा अड्डा बनवू नका.

आणि ज्यूंनी त्याला हरकत घेतली आणि म्हणाले: तू म्हणतो की आमचा देवाची सेवा करायचा मार्ग चुकीचा आहे. तू ते कसे सिद्ध करणार? आणि येशू त्यांच्याकडे वळून म्हणाला: हे मंदिर पाडा आणि तीन दिवसात एक नवे जिवंत मंदिर मी उभे करीन. आणि ज्यू म्हणाले: तू अचानक नवीन मंदिर कसे बांधणार, जेथे हे मंदिर बांधायला चाळीस वर्षे लागली? आणि येशू त्यांना म्हणाला: मी तुमच्याशी मंदिरापेक्षा जे जास्त महत्वाचे आहे त्या विषयी बोलतो. जर प्रेषितांच्या शब्दांचा अर्थ तुम्हाला समजला असता तर तुम्ही आता बोलता तसे बोलला नसता: ‘मी, देव तुमच्या बलिदानाने नव्हे, तर तुमच्या एकमेकांतील

प्रेमाने आनंदित होतो. 'जेव्हा लोक एकमेकांवर प्रेम करतात ते संपूर्ण जग म्हणजे जिवंत मंदिर असते. '

आणि त्याने जे सांगितले त्यावर जेरुसलेमातील पुष्कळ लोकांनी विश्वास ठेवला. परंतु बाहेरच्या कोणत्याच गोष्टींवर त्याचा स्वतःचा विश्वास नव्हता कारण त्याला माहित होते की सर्व काही माणसाच्या आतमध्ये आहे. एखाद्याने माणसाची साक्ष द्यावी याची त्याला गरज नव्हती, कारण त्याला माहीत होते की माणसात आत्मा आहे. आणि येशूला एकदा समारीयातून जायचे होते. जाकोबने त्याचा मुलगा जोसेफ याला दिलेल्या जागेजवळ असलेल्या सामारीतनाच्या सिचर गावाजवळ तो आला. तेथे जाकोबची विहीर होती, आणि येशू प्रवासात थकला असल्याने तेथे बसला तेव्हा त्याचे शिष्य भाकरी आणण्यासाठी शहरात गेले.

आणि एक बाई पाणी काढण्यासाठी सिचर मधून आली, आणि येशूने तिच्याकडे पिण्यासाठी पाणी मागीतले. ती त्याला म्हणाली: तू माझ्याकडे पाणी कसा मागतोस? कारण तुम्ही ज्यू आम्हा समारीतनाशी काही संबंध ठेवीत नाही. परंतु तो तिला म्हणाला: जर तू मला ओळखत असतीस आणि मी काय शिकवतो ते तुला माहीत असते तर तू असे बोलली नसतीस, परंतु मला पिण्यासाठी पाणी दे आणि मी तुला जीवनाचे पाणी देईन. जो या विहिरीतील पाणी पितो त्याला पुन्हा तहान लागते, परंतु जो जीवनाचे पाणी प्राशन करील तो कायमचा तृप्त होईल, आणि ते त्याला सार्वकालिक जीवनाकडे नेईल.

त्या बाईला समजले की तो दैवी गोष्टींविषयी बोलत आहे, आणि त्याला म्हणाली: मला दिसते की तू प्रेषित आहेस आणि मला शिकवू इच्छितोस. परंतु तू एक ज्यू आहेस व मी एक सामारीतन आहे, तू मला दैवी गोष्टी कशा शिकवू शकतोस? आमचे लोक या पर्वतावरील देवाची प्रार्थना करतात. तर तुम्ही ज्यू म्हणता की देवाचे घर फक्त जेरुसलेमातच आहे. तू मला दैवी गोष्टी शिकवू शकत नाहीस, कारण तुमचा एक धर्म आहे आणि आमचा दुसरा. तेव्हा येशू तिला म्हणाला: बाई माझ्यावर विश्वास ठेव, अशी वेळ आली आहे, जेव्हा पित्याची प्रार्थना करण्यासाठी लोक या पर्वताजवळ किंवा जेरुसलेमला येणार नाहीत. ती वेळ आलेली आहे जेव्हा खरे देवाची उपासना करणारे, स्वर्गीय पित्याचा

आदर आत्म्याने आणि त्यांच्या कृत्याने करतील. पित्याला अशा उपासकांची गरज आहे. देव आत्मा आहे या त्याच्या म्हणण्याचा अर्थ त्या बाईला समजला नाही, आणि ती म्हणाली: मी ऐकले आहे की देवाचा संदेष्टा येणार आहे, ज्याला ते अभिषिक्त (anointed) म्हणतात. तो आम्हाला सर्वकाही सांगेल.

येशू तिला म्हणाला: मी हा आहे जो तुझ्याशी बोलत आहे. यापेक्षा जास्त काही अपेक्षा करू नकोस. त्यानंतर येशू ज्यूंच्या देशात आला आणि त्याच्या शिष्यांबरोबर राहिला व त्यांना त्याने शिकविले. त्यावेळी जॉन सालीर्ण जवळ उपदेश करीत होता, आणि लोकांना एनोन नदीत स्नान संस्कार देत होता, कारण अजून त्याला बंदिवासात टाकले नव्हते. आणि जॉनच्या व येशूच्या शिष्यात जॉनच्या स्नान संस्काराने स्वच्छ करणे किंवा येशूच्या शिकवणीत अधिक चांगले कोण यावर वाद उफाळून आला. आणि ते जॉनकडे आले आणि त्याला म्हणाले: तू पाण्याने स्वच्छ करतोस, परंतु येशू फक्त शिकवतो, आणि सर्वजण त्याच्याकडे जातात तू त्याच्याविषयी काय म्हणशील?

जॉन म्हणाला: देवाने शिकवल्या शिवाय माणूस स्वतः काही शिकवू शकत नाही. जो पृथ्वी विषयी बोलतो तो पृथ्वीचा असतो, परंतु जो देवा विषयी बोलतो तो देवाकडून आलेला असतो. बोललेले शब्द देवाकडून आलेले आहेत की नाहीत हे सिद्ध करता येणार नाही. देव आत्मा आहे; तो मोजता येणार नाही आणि सिद्ध करता येणार नाही. ज्याला आत्म्याचे शब्द समजतात तो आत्म्यापासून आहे हे सिद्ध होते. पुत्रावर प्रेम करणाऱ्या पित्याने त्याच्यावर सर्व काही सोपवले आहे. जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला जीवन प्राप्त होते, परंतु जो पुत्रावर विश्वास ठेवीत नाही त्याला जीवन नसते. देव हा माणसातील आत्मा आहे. त्यानंतर सनातन्यांपैकी एक येशूकडे आला आणि त्याला त्याने जेवणासाठी बोलावले. येशू आत गेला आणि टेबलाजवळ बसला. त्या सनातनी माणसाच्या लक्षात आले की येशूने जेवणापूर्वी हात धुतले नाहीत तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. येशू त्याला म्हणाला: तुम्ही सनातनी बाहेरून सर्व धुऊन ठेवता, पण तुमच्या आतून सर्व स्वच्छ आहे का? सर्व मानवावर दया करा आणि सर्व स्वच्छ होईल.

आणि तो सनातनी माणसाच्या घरात असतांनाच त्या शहरातील एक वाईट काम करणारी बाई तेथे आली. तिला कळले होते की येशू त्या घरात होता. आणि तेथे आली आणि

तिने अत्तराची एक बाटली आणली. आणि ती त्याच्या पायाशी गुडघे टेकून रडली, आणि आपल्या आसवांनी त्याचे पाय ओले करीत आपल्या केसांनी ते पुसले आणि त्यांच्यावर अत्तर ओतले.

त्या सनातनी माणसाने ते पाहिले आणि स्वतःशी म्हणाला: जवळजवळ तो प्रेषित असण्याची शक्यता नाही. तो जर खरेच प्रेषित असता तर त्याचे पाय धुणारी बाई कोणत्या प्रकारची आहे ते त्याला कळले असते: त्याला कळले असते की ती बाई वाईट काम करणारी आहे आणि तिला त्याने आपल्याला स्पर्श करू दिला नसता.

येशू, त्याच्या विचाराचा अंदाज घेऊन त्याच्या कडे वळला आणि म्हणाला: मला काय वाटते ते मी सांगू का? होय सांगा, त्याचा यजमान उत्तरला: मग येशू म्हणाला: एक धन्याचे दोन देणेकरी होते, एक पैशाच्या पाचशे नाण्यासाठी तर दुसरा पाच नाण्यासाठी. आणि दोघांकडेही परत करायला काहीच नव्हते. आणि धनकोने दोघांनाही माफ केले. त्या दोघापैकी कोण धनकोवर जास्त प्रेम करील व त्याची काळजी घेईल असे तुला वाटते? यजमान उत्तरला: अर्थातच ज्याच्याकडे जास्त पैसे द्यायचे होते तो. मग येशूने त्या बाईकडे बोट दाखवले आणि म्हटले: या स्त्रीचे आणि तुझे तसेच आहे. तू स्वतःला सनातनी समजतोस. आणि त्यामुळे लहान कर्जदार आहेस; आणि ती स्वतःला वाईट काम करणारी म्हणून मोठी कर्जदार समजते. मी तुझ्या घरात आलो आणि तू मला पाय धुण्यासाठी पाणी दिले नाहीस; तिने ते तिच्या अश्रुंनी धुतले व केसांनी पुसले. तू मला चुंबन घेतले नाहीस, परंतु ती माझ्या पायांची चुंबने घेत आहे. तू मला माझ्या केसाला लावण्यासाठी तेल दिले नाहीस परंतु तिने माझ्या पायावर मौल्यवान अत्तराने अभिषेक anointsकेला. जो स्वतःला सनातनी समजतो तो प्रेमाची कामे करू शकत नाही; फक्त जो स्वतःला वाईट कामे करणारा समजतो तोच ती करू शकतो. आणि प्रेमाच्या कामामुळे सर्व गोष्टींची क्षमा मिळू शकते. आणि तो तिला म्हणाला: तुझा दृष्ट्पणा तुला माफ करण्यात आला आहे. आणि येशू म्हणाला: माणूस स्वतःला काय आहे असे समजतो यावर सर्वकाही अवलंबून असते. जो स्वतःला चांगला समजतो तो चांगला नसतो, परंतु जो स्वतःला वाईट समजतो तो चांगला असतो.

आणि त्याने आणखी म्हटले: दोन माणसे देवळात प्रार्थनेसाठी आली. एक सनातनी होता, आणि दुसरा tax farmer जकातदार.

सनातनी माणसाने प्रार्थना केली: हे देवा मी तुझे आभार मानतो, कारण मी इतर माणसासारखा नाही, कंजूष नाही, किंवा स्वैराचारी नाही, किंवा फसवणारा नाही, किंवा त्या जकातदारा सारखा लबाड नाही. मी आठवड्यातून दोनदा उपवास करतो. आणि माझ्या संपत्तीतील दहावा हिस्सा दान करतो. परंतु तो जकातदार लांब उभा होता, त्याने स्वर्गाकडे वर पहायचे धाडस केले नाही पण आपली छाती बडवीत म्हणत होता, देवा माझ्या सारख्या पाप्याकडे पहा.

ही सनातनी माणसाच्या प्रार्थने पेक्षा अधिक चांगली प्रार्थना होती. कारण जो स्वतःला उच्च समजतो तो स्वतःला क्षुद्र करतो. आणि जो स्वतःला नम्र करतो तो स्वतःला मोठे बनवतो. मग जॉनचे काही शिष्य येशूकडे आले आणि म्हणाले: आम्ही आणि सनातनी पुष्कळ उपवास करतो तर तुझे शिष्य उपवास का करीत नाहीत? देवाचा कायदा उपवास करायची आज्ञा करतो. आणि येशू त्यांना म्हणाला: लग्नात नवरदेव असताना काणाला वाईट वाटत नाही. फक्त नवरदेव निघून गेल्यावर सर्व दुःखी होतात.

जिवंत असतांना एखाद्याने दुःख करू नये. देवाची बाह्य सेवा प्रेमाच्या कृत्यांशी जोडता येणार नाही. देवाच्या बाह्य सेवेची जुनी शिकवण आपल्या शेजाऱ्यावर कृतीने प्रेम करण्याच्या माझ्या नव्या शिकवणीशी जोडता येणार नाही. माझी शिकवण जुन्याशी जोडणे म्हणजे नव्या कपड्यातील तुकडा फाडून जुन्या कपड्याला शिवण्यासारखे आहे. नवीन फाटून जाईल आणि जुना (रफू) दुरुस्त होणार नाही. एकतर माझी सर्व शिकवण स्वीकारावीच लागेल किंवा सर्व जुनी, आणि माझी शिकवण स्वीकारल्यावर जुनी शुध्दीकरणाची, उपवासाची, आणि शनिवार पाळण्याची शिकवण पाळता येणे अशक्य आहे-जशी नवी वाईन जुन्या वाईनच्या चामडी पात्रात ओतता येणार नाही, किंवा जुने चामडे फाटेल आणि वाईन सांडून जाईल. नवी वाईन नव्या चामडी पात्रात ठेवल्यास दोन्ही टिकतील.

## ३

## जीवनाचे उगमस्थान

मानवाचे जीवन पित्याच्या आत्म्यापासून उत्पन्न होते.

‘तुझे नाव पवित्र होवो’

नंतर जॉनचे काही शिष्य येशूला विचारायला आले की जॉन ज्याच्याविषयी बोलला तो तूच आहेस का: जो देवाचे राज्य उघड करील आणि आत्म्याने मानवाचे नूतनीकरण करील. येशू उत्तर देत म्हणाला: तुम्ही स्वतःच पहा आणि शिकवण ऐका आणि जॉनला सांगा देवाचे राज्य सुरु झाले आहे की नाही आणि लोक आत्म्याने नवचैतन्य प्राप्त करतात की नाही. मी कोणत्या देवाच्या राज्याचा उपदेश करतो ते त्याला सांगा. प्रेषितांनी सांगीतले आहे, जेव्हा देवाचे राज्य येईल तेव्हा सर्व लोक सुखी होतील. त्याला सांगा की माझे देवाचे राज्य असे असेल की, गरीब आणि तसेच ज्याला शिकवण समजेल तो प्रत्येकजण सुखी होईल.

आणि जॉनच्या शिष्यांना जाऊ दिल्यानंतर, जॉनने जाहीर केलेल्या देवाच्या राज्या विषयी येशू लोकांशी बोलू लागला. तो म्हणाला: जेव्हा तुम्ही जॉनकडे बाप्तीज्मा घेण्यासाठी ओसाड प्रदेशात गेलात तेव्हा तेथे काय पहायला गेलात? सनातनी कायद्याचे गुरु देखील जॉनला पहायला गेले होते, परंतु तो कशाविषयी बोलतो ते त्यांना कळले नाही, आणि त्याला त्यांनी काहीच महत्व दिले नाही. ते सनातनी कायद्याचे गुरु त्यांनी शोधून काढलेले, आणि एकमेकांकडून ऐकलेले, किंवा त्यांनी तयार केलेले कायदे फक्त मानतात; परंतु जॉन

काय म्हणतो किंवा मी काय म्हणतो, ते ते ऐकत नाहीत आणि त्यांना समजत नाही. जॉन जे म्हणतो त्यापेक्षा तो अज्ञात प्रदेशात तो उपवास करतो एवढेच त्यांना समजले आहे आणि ते म्हणतात: ‘त्याच्यात सैतान आहे. मी जे म्हणतो त्यापेक्षा त्यांना एवढेच समजले आहे की मी उपवास करीत नाही. आणि ते म्हणतात: ‘तो जकातदार आणि पापी लोकांबरोबर जेवतो खातो-तो त्यांचा मित्र आहे. ’ते रस्त्यावरच्या मुलांसारखे आहेत जे एकमेकाशी बडबडतात आणि कोणी त्यांचे ऐकत नाही याचे त्यांना आश्चर्य वाटते. आणि तुम्ही त्यांचे शहाणपण ते काय करतात यावरून ठरवाल. जर तुम्ही जॉनकडे भारी कपड्यातील एखादा माणूस पहायला गेलात-का? अशी माणसे येथे महालात राहतात. मग अज्ञातात काय पहायला तुम्ही गेला होतात? जॉन इतर प्रेषितासारखा आहे म्हणून तुम्ही गेलात काय? तसा विचार करू नका. जॉन हा प्रेषित इतरा सारखा नाही. तो सर्व प्रेषितांपेक्षा अधिक आहे. इतरांनी पुढे काय घडेल त्याचे भविष्य केले. तो काय आहे ते जाहीर करतो की: जसे, देवाचे राज्य येथे पृथ्वीवर होते, आणि आहे. मी तुम्हाला खरोखर सांगतो: जॉन पेक्षा मोठा कोणी आज पर्यंत जन्माला आला नाही. त्याने देवाचे राज्य पृथ्वीवर जाहीर केले आणि म्हणून तो सर्वांच्या वर आहे. कायदा आणि प्रेषित यांची जॉन येईपर्यंत गरज होती, परंतु आता त्याने जाहीर केले आहे की देवाचे राज्य पृथ्वीवर आहे आणि जो प्रयत्न करील तो त्यात प्रवेश करू शकेल.

आणि काही सनातनी त्याच्याकडे आले आणि त्याला विचारले: कसे आणि कधी देवाचे राज्य येणार आहे? आणि त्याने त्यांना उत्तर दिले: ज्या देवाच्या राज्याचा मी उपदेश करतो ते पूर्वीच्या प्रेषितांनी सांगितलेले नाही. त्यांनी सांगितले होती की देव वेगवेगळी दृश्य चिन्हे घेऊन येईल, परंतु मी देवाच्या राज्याच्या येण्याचे बोलतो ते डोळ्याने पाहता येणारे नाही. आणि जर तुम्हाला कोणी सांगितले: पहा ते आले आहे, किंवा येत आहे; किंवा, पहा, ते येथे आहे, किंवा तेथे; त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. देवाचे राज्य एखाद्या ठराविक वेळी किंवा स्थळी नाही. ते विजेच्या प्रकाशा सारखे-येथे, तेथे आणि सर्व ठिकाणी आहे. आणि त्याला काळ किंवा वेळ नाही, कारण देवाचे राज्य जे मी सांगतो ते तुमच्यामध्ये आहे.

त्यानंतर, सनातन्यापैकी एक निकोदेमस नावाचा ज्यू सत्ताधारी, रात्री येशूकडे आला आणि म्हणाला: तू लोकाना शनिवार पवित्र पाळायला, किंवा स्वच्छता पाळायला, किंवा बळी अर्पण करायला, किंवा उपवास करायला मना करतोस, आणि तू मंदिर नष्ट करायला निघाला आहेस, आणि तू म्हणतोस की देव आत्मा आहे आणि देवाचे राज्य आपल्या मध्ये आहे.

देवाचे राज्य म्हणजे काय आहे?

आणि येशूने त्याला उत्तर दिले: हे जाणून घ्या की जर माणूस स्वर्गापासून जन्माला आला आहे त्याच्यामध्ये स्वर्गीय असे काहीतरी असलेच पाहिजे. तुम्ही पुन्हा जन्माला आलेच पाहिजे.

निकोदेमसला हे समजले नाही, आणि म्हणाला: शरीर घेऊन जन्माला आलेला व मोठा झालेला माणूस, परत आपल्या आईच्या गर्भाशयात जाऊन कसा नव्याने जन्म घेऊ शकेल? आणि येशूने त्याला उत्तर दिले: मी काय म्हणतो ते समजून घे: मी म्हणतो माणूस फक्त शरीरापासून जन्माला आलेला नाही परंतु आत्म्यापासून सुद्धा जन्माला आलेला आहे, म्हणून प्रत्येक माणूस शरीर आणि आत्म्यापासून जन्मला आहे, आणि म्हणून देवाचे राज्य त्याच्यामध्ये आहे. शरीराने तो शरीर आहे, शरीरातून आत्म्याचा जन्म होऊ शकत नाही; आत्मा हा आत्म्यापासूनच येऊ शकतो. आत्मा ही तुमच्यातील जिवंत गोष्ट आहे जी स्वातंत्र्य आणि विवेक या मध्ये जगते; ती अशी गोष्ट आहे तिला आदी किंवा अंत नाही हे तुम्हाला माहीत आहे आणि ती आपल्यामध्ये आहे हे प्रत्येक माणसाला जाणवते. मग आपण स्वर्गापासून जन्मलोच आहोत असे मी म्हणतो तेव्हा तुम्हाला आश्चर्य का वाटते?

निकोदेमस म्हणाला: अजूनही मला असे काही असेल असे वाटत नाही. तेव्हा येशू त्याला म्हणाला: जर तुला हे समजत नसेल तर तू कोणत्या प्रकारचा गुरु आहेस? समजून घे की मी कोणत्याही गुढ गोष्टीविषयी बोलत नाही; आपण सर्व जण जे जाणतो त्याविषयी मी बोलतो, आणि आपण सर्वजण पाहतो त्याची खात्री देतो. जे पृथ्वीवर आणि तुमच्यामध्ये

आहे त्यावर तुमचा विश्वास नसेल तर जे स्वर्गात आहे त्यावर कसा विश्वास ठेवणार? अजून कोणीही स्वर्गात गेलेला नाही आणि आपल्याकडे फक्त माणूस आहे जो स्वर्गातून आला आहे आणि तो स्वतः स्वर्गाचा आहे. हा स्वर्गीय मानवाचा पुत्र उंचावला पाहिजे, की सर्व त्याच्यावर विश्वास ठेवतील आणि नष्ट होणार नाहीत तर स्वर्गीय जीवन प्राप्त करतील. मानवाच्या विनाशासाठी नव्हे तर त्याच्या भल्यासाठी देवाने त्याचा पुत्र स्वतःप्रमाणे मानवात बिंबविला आहे. त्याने त्याला दिले आहे की प्रत्येकाने त्याच्यावर विश्वास ठेवावा आणि नाश पावू नये तर सार्वकालिक जीवन प्राप्त करावे. त्याने त्याचा हा पुत्र(हे आतले जीवन) मानवाच्या जगात त्याचा नाश करण्यासाठी आणला नाही, परंतु त्याचा पुत्र (हे आतले जीवन) अशासाठी पुढे आणले की मानवी जगाने त्याच्या सारखे जगावे.

जो आपले जीवन ह्या मानवाच्या पुत्राला वाहून घेतो तो मृत्यू पावत नाही, परंतु खरे जीवन काय आहे यावर विश्वास न ठेवल्याने जो आपले जीवन त्याला वाहून घेत नाही, तो स्वतःचा नाश करतो. मृत्यू याच्यात आहे की, जीवन या जगात आले आहे, पण माणसे त्या जीवनापासून दूर जात आहेत.

मानवाचे जीवन म्हणजे प्रकाश आहे; प्रकाश जगात आला, पण मानव प्रकाशाऐवजी अंधारालाच पसंत करतो, आणि प्रकाशाकडे जात नाही. जो वाईट कामे करतो तो आपली कृत्ये दिसू नयेत म्हणून प्रकाश टाळतो, आणि अशाप्रकारे स्वतःला जीवनापासून वंचित ठेवतो. परंतु जो सत्यात जगतो तो आपली कृत्ये दिसावी म्हणून प्रकाशाकडे जातो, आणि तो जीवन प्राप्त करतो आणि देवाशी एकरूप होतो.

जशी तुम्ही कल्पना करता-की देवाचे राज्य ठराविक वेळी आणि ठराविक ठिकाणी सर्व माणसांसाठी येणार आहे तसे स्वर्गाचे राज्य आहे असे समजूच नका-तर असे: सर्व जागात नेहमीच काही लोक असतात ते मानवाच्या स्वर्गीय पुत्रावर अवलंबून राहतात, आणि तेच या राज्याचे पुत्र होतात; जे इतर त्यावर अवलंबून रहात नाहीत ते नाश पावतात. मानवातील आत्म्याचा पिता हा आपल्याला त्याचे पुत्र मानणाऱ्यांनाच पिता असतो. आणि म्हणून तेच फक्त त्याच्या दृष्टीने अस्तित्वात आहेत ज्यांनी आपल्यामध्ये त्याने जे दिले आहे ते टिकवले आहे.

त्यानंतर येशूने देवाचे राज्य म्हणजे काय आहे हे लोकांना स्पष्ट करायला सुरुवात केली, आणि त्याने ते त्यांना बोधकथा द्वारे शिकविले.

तो म्हणाला: शेतकरी ज्या प्रमाणे आपल्या शेतात धान्य पेरतो त्याप्रमाणे पिता-जो आत्मा आहे तो आकलन शक्तीची पेरणी करतो. तो संपूर्ण शेतात कोणते बीज कोठे पडेल याचा विचार न करता पेरणी करतो. आणि काही बी रस्त्यावर पडते आणि पक्षी येतात व ते खाऊन टाकतात. दुसरे बी दगडामध्ये पडते आणि ते रुजले तरी त्याच्या मुळांना जागा नसल्याने मरून जाते. दुसरे पुन्हा कडू दवण्यावर पडते आणि कडू दवणा त्याला दाबून टाकतो त्यामुळे त्याला कणसे आली तरी ती भरत नाहीत. परंतु दुसरे बीज चांगल्या जमिनीवर पडते आणि वाढते आणि फुकट गेलेल्या बीजाची भरपाई करते, त्याला कणसे येतात जी भरतात, आणि जी तीसपट, किंवा साठपट किंवा शंभरपट उत्पन्न देतात. म्हणून देवानेही आत्म्याच्या प्रसारणाची पेरणी मानवात केली आहे: काहीमध्ये ती हरवून जाते परंतु इतरांमध्ये शंभरपट उत्पन्न देते. या शेवटच्यातून देवाचे राज्य साकार होते.

म्हणून देवाचे राज्य म्हणजे तुम्ही कल्पना करता तसे-की देव तुमच्यावर राज्य करण्यासाठी येईल असे नाही. देवाने आत्म्याची पेरणी केलेली आहे, आणि जे त्याला टिकवतील त्यांच्यामध्ये देवाचे राज्य असेल.

देव माणसांवर जबरदस्ती करीत नाही, परंतु पेरणी करणाऱ्या प्रमाणे, जमिनीवर बी पेरतो आणि त्याचा अधिक विचार करीत नाही. बी स्वतःच भिजून फुगते, अंकुरते, पल्लवीत होते, देठ काढते आणि कणसे धान्याने भरून जातात. जेव्हा पिकून तयार होते तेव्हा शेतकरी कापणाऱ्यांना पिक गोळा करण्यासाठी पाठवतो. त्याच प्रमाणे देवाने त्याचा पुत्र–आत्मा-जगाला दिला; आणि तो जगातच वाढत आहे, आणि त्या आत्म्याचे पुत्र देवाचे राज्य घडवीत आहेत.

एखादी बाई कणिक मळण्याच्या भांड्यात पीठामध्ये इस्ट टाकून मिसळून ठेवते. नंतर ती अधिक मिसळीत नाही तर त्या इस्ट आणि पावाला वर येऊ देते. जो पर्यंत माणसे जिवंत असतात तो पर्यंत देव त्यांच्या जीवनात ढवळाढवळ करीत नाही. त्याने जगाला आत्मा दिला आणि आत्मा माणसात वसतो, आणि जे त्या आत्म्याने जगतात ते देवाचे राज्य

स्थापन करतात. कारण आत्म्यासाठी पाप किंवा मृत्यू नाही. मृत्यू आणि पाप हे शरीराकरता अस्तित्वात आहेत आत्म्यासाठी नव्हे.

देवाच्या राज्याची तुलना पुढील गोष्टीशी करता येईल: एका शेतकऱ्याने चांगले बियाणे आपल्या शेतात पेरले. तो शेतकरी म्हणजे आत्मा, पिता; शेत म्हणजे जग; चांगले बियाणे म्हणजे देवाच्या राज्याचे पुत्र. नंतर तो शेतकरी झोपायला आडवा झाला आणि शत्रू येऊन त्याने गवत पेरले. तो शत्रू म्हणजे मोह आणि गवत हे त्याला बळी पडणाऱ्याचे प्रतिनिधी होय. मग कामकरी शेतकऱ्याकडे आले आणि म्हणाले: तुम्ही वाईट बियाणे पेरलेत काय? तुमच्या शेतात गवत वाढलेले आहे. आम्हाला ते निंदन काढण्यास पाठवा. आणि तो शेतकरी म्हणाला: नको, तसे करू नका, ते गवत निंदत असताना गहू पायाखाली तुडवाल. त्यांना एकत्र वाढू दे, जेव्हा पीक तयार होईल तेव्हा कापणाऱ्यांना मी गवत वेगळे जमा करून जाळायला सांगेन, परंतु गहू मी कोठारात साठवीन. पीक कापणी म्हणजे मानवी जीवनाचा अंत, पीक काढणारे म्हणजे स्वर्गातील शक्ती. त्या गवत जाळून टाकतील पण गहू चाळून एकत्र केला जाईल. तर जीवनाच्या शेवटी जे तात्पुरते भास आहेत ते नष्ट होतील, आणि आत्म्याचे सत्य जीवन फक्त बाकी राहील. पाप आत्म्यासाठी-पित्यासाठी अस्तित्वात नाही. आत्मा त्याला ज्याची गरज आहे तेच ठेवतो आणि जे त्याचे नाही ते त्याच्यासाठी आस्तित्वात नसते.

देवाचे राज्य कोळयाच्या जाळयासारखे असते. ते समुद्रात पसरल्यावर सगळया प्रकारचे मासे पकडते, आणि जेव्हा ते बाहेर काढले जाते तेव्हा, किंमतशून्य मासे वेगळे काढून परत समुद्रात फेकले जातात. तसेच युगाच्या शेवटी घडेल: स्वर्गीय शक्ती चांगले ते घेतील आणि वाईट लांब टाकण्यात येईल. आणि जेव्हा त्याने बोलून संपवले, तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला त्या बोधकथेचा अर्थ काय असे विचारले. आणि तो त्यांना म्हणाला: या बोधकथा दोन प्रकारे समजूनच घ्यायच्या आहेत. मी या कथा सांगतो कारण काही तुमच्यासारखे माझे शिष्य आहेत, जे जाणतात देवाचे राज्य कशाचे बनले आहे, आणि जाणतात की ते प्रत्येक माणसात आहे, आणि त्यात प्रवेश कसा करावा; परंतु इतर हे समजत नाहीत. ते बघतात पण त्यांना दिसत नाही, ते ऐकतात पण त्यांना समजत नाही, कारण

त्यांची हृदये मठ्ठ(gross) झाली आहेत. म्हणून या बोधकथा मी अशा दोन अर्थाने, या लोकांसाठी आणि त्या लोकांसाठी सांगतो. दुसऱ्यांसाठी मी देवाविषयी बोलतो, त्याचे राज्य त्याच्यासाठी काय आहे, आणि त्यांना ते समजेल. परंतु तुमच्यासाठी मी देवाचे राज्य तुमच्यासाठी काय आहे-जे राज्य तुमच्यामध्ये आहे त्या संबंधी बोलतो.

आणि पहा तुम्हाला पेरणाऱ्याची बोधकथा बरोबर समजली. तुमच्यासाठी त्या बोधकथेचा अर्थ असा आहे: सगळयांसाठी ज्यांना देवाच्या राज्याचा अर्थ समजलेला आहे, परंतु तो हृदया पासून स्वीकारलेला नाही, वाईट प्रवृत्ती येऊन जे पेरलेले आहे ते त्याच्याकडून लुटून नेतात; हे रस्त्यावर पडलेले बीज. जे खडकात पेरले जाते, तो पटकन आणि आनंदाने शिकवण स्वीकारतो पण तिला मुळे नसतात आणि थोड्या वेळासाठी स्वीकारतो, आणि दबाव आला आणि देवराज्याच्या अर्थावरून शिक्षा होऊ लागल्यास, तो ताबोडतोब नाकारतो. जे कडू धान्यात पेरलेले बीज आहे ते म्हणजे जो राज्याचा अर्थ समजतो, परतू जगातील काळज्या आणि श्रीमंतीचा हव्यास त्याच्यातील अर्थाला गुदमरवून टाकतात आणि तो फळ धरत नाही. आणि जे चांगल्या जमिनीवर पेरलेले बीज म्हणजे जो राज्याचा अर्थ समजतो आणि आपल्या हृदयात जपतो; त्याला फळ येते शंभरपट, साठपट, किंवा तीसपट. त्याच्यासाठी जो आत्म्याला ठेवून घेतो त्याला जास्त दिले जाते; परंतु जो त्याला ठेवीत नाही त्याचाकडून सर्वकाही काढून घेतले जाते. तर बघा तुम्ही या बोधकथा कशा समजून घेता. फसवणूक, वाईट-कृत्ये, आणि चिंता यांना शरण न जाता त्या अशा प्रकारे समजून घ्या की तीसपट, साठपट, किंवा शंभरपट उत्पन्न द्याल.

स्वर्गाचे राज्य आपल्या आत्म्यात शून्यातून निर्माण होते पण सर्वकाही देते. ते बर्च वृक्षाच्या बी सारखे असते, जे फारच लहान असते, परंतु जेव्हा वाढते तेव्हा त्याचा फार मोठा वृक्ष होतो व त्यावर आकाशातील पक्षी आपली घरटी बांधतात.

४

देवाचे राज्य

म्हणून जीवन आणि आम्ही सर्व मानव ही पित्याची इच्छा आहे.

“तुझे राज्य येवो”

येशू शहरात व गावात फिरून पित्याच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे सुख लोकांना शिकावित होता. आणि त्याला दुःख होत होते की लोक खरे जीवन काय असते हे माहीत नसल्याने त्रास सहन करीत होते. मेंढपाळ नसलेल्या इतस्ततः पांगलेल्या मेंढराप्रमाणे लोक, कारण माहीत असल्या शिवाय, दुःख सोसत होते व स्वतःला छळीत होते. एकदा येशूकडे पुष्कळ लोक त्याची शिकवण ऐकण्यासाठी आले आणि एका पर्वतावर गेले आणि बसले. त्याचे शिष्य त्याच्या सभोवती होते. आणि त्याने पित्याची इच्छा काय आहे ते लोकांना शिकवायला सुरुवात केली. तो म्हणाला: गरीब आणि बेघर लोक भाग्यवान आहेत, कारण ते देवाच्या इच्छेप्रमाणे जगतात. जर त्यांना भूक लागली तर ते तृप्त केले जातील, आणि ते दुःखी आणि रडत असतील तर त्यांचे सांत्वन केले जाईल. लोक त्यांचा तिरस्कार करीत असतील, बाजूला ढकलीत असतील, आणि हाकून लावत असतील, त्याचा त्यांना आनंद वाटू दे, कारण देवाचे लोक नेहमी असेच वागवले गेले आहेत आणि त्यांना स्वर्गीय पारितोषिक मिळेल. परंतु श्रीमंतानी दुःख करावे कारण त्यांना हवे ते अगोदरच मिळाले आहे. आणि आणखी काही मिळणार नाही. आता ते तृप्त आहेत पण त्यांना सुद्धा भूक लागेल. आता ते आनंदात आहेत, पण ते सुद्धा दुःखी होतील. ज्यांची सर्वजण स्तुती करतात त्यांनीही दुःख करावे कारण फक्त फसवणूक करणाऱ्यांची सर्वजन स्तुती करतात.

गरीब आणि बेघर लोक भाग्यवान आहेत; परंतु फक्त बाहेरून गरीब नव्हे तर आत्म्याने गरीब असतील तर ते भाग्यवान आहेत जसे मीठ खारट असेल तरच चांगले असते नुसते दिसायला मिठासारखे असून उपयोग नाही.

म्हणून तुम्ही गरीब आणि बेघर जगाचे शिक्षक आहात; जर तुम्हाला हे माहीत असेल की गरीब आणि बेघर असण्यात खरे सुख आहे तर तुम्ही भाग्यवान आहात. परंतु

तुम्ही फक्त बाहेरुन गरीब असाल, तर चव नसलेल्या मिठाप्रमाणे तुमचा काहीच उपयोग नाही. तुम्ही जगाचा प्रकाश आहात, म्हणून तुमचा प्रकाश लपवू नका तर लोकांना तो पाहू दे. जेव्हा एखादा माणूस मेणबत्ती पेटवतो तेव्हा ती बाकाखाली ठेवत नाही तर खोलीतील सर्वांना उजेड मिळावा म्हणून टेबलावर ठेवतो. म्हणून तुम्ही सुध्दा तुमचा प्रकाश झाकून ठेवू नका तर तुमच्या कृतीने दाखवून द्या, लोकांना दिसेल की तुमच्याजवळ सत्य आहे, आणि ते तुमची चांगली कामे पाहून तुमच्या स्वर्गीय पित्याला जाणतील.

आणि असे समजू नका की मी तुम्हाला कायद्यातून मुक्त केले आहे. मी कायद्यातून सुटके साठी नव्हे तर सार्वकालिक कायदा पूर्ण करण्यासाठी शिकवीत आहे. जो पर्यंत आकाशा खाली माणसे असतील तो पर्यंत सार्वकालिक कायदा राहील. माणसे जो पर्यंत सार्वकालिक कायदा पूर्णपणे स्वतःहून पूर्ण करीत नाहीत तो पर्यंत त्या कायाद्यांतून सुटका नाही. आणि आता मी तुम्हाला त्या सार्वकालिक कायद्याच्या आज्ञा देतो. जर कोणी स्वतःची या छोट्या आज्ञामधून सुटका करून घेतो आणि दुसऱ्यांनाही तसे करायला शिकवतो, तो स्वर्गाच्या राज्यात जाण्याची शक्यता सर्वात कमी आहे. परंतु जो त्या पूर्ण करतो व त्यावरून दुसऱ्याला तसे करायला शिकवितो तो स्वर्गाच्या राज्यात थोर असेल. कारण जर तुमचा गुण सनातनी कायदे पंडितापेक्षा जास्त चांगला नसेल तर तुम्ही स्वर्गाच्या राज्यापर्यंत पोहोचू शकत नाही.

या त्या आज्ञा आहेत:

पूर्वीच्या कायद्यामध्ये असे म्हटले होते: हत्त्या करु नका, आणि जर कोणी दुसऱ्याची हत्त्या करीत असेल तर त्याचा न्याय केलाच जाईल.

परंतु मी तुम्हाला सांगतो की प्रत्येकजण जो आपल्या भावावर-माणसावर रागावतो तो न्यायास पात्र आहे, आणि जो आपल्या भावाला-माणसाला वाईट बोलतो तो दोषास अधिक पात्र आहे. म्हणून तुम्हाला देवाची प्रार्थना करायची असेल तर, प्रथम विचार करा की तुमच्या विरुद्ध कोणाकडे काही आहे का. जर तुम्हाला आठवत असेल, की एक तरी माणूस विचार करीत असेल की तुम्ही त्याचे मन दुखावलेले आहे, तर तुमची प्रार्थना सोडा आणि प्रथम तुमच्या भावाकडे- माणसाकडे जाऊन शांतता करा आणि नंतर वाटल्यास

प्रार्थना करा. समजून घ्या की देवाला बलिदान किंवा प्रार्थना नको, परंतु फक्त शांतता, सुसंवाद, आणि माणसातील एकमेकांतील प्रेम हवे आहे; आणि जर एखाद्या देखील माणसाबद्दल तुम्हाला प्रेम वाटत नसेल तर तुम्ही प्रर्थना करू शकत नाही किंवा देवाचा विचार करू शकत नाही.

म्हणून पहिली आज्ञा ही आहे: रागावू नका, भांडू नका; आणि तुम्ही कोणाला कठोर शब्दाने बोलला असाल तर त्याच्याशी समेट करा आणि तो अशा प्रकारे करा की कोणालाही तुमच्या विरुद्ध आकस असणार नाही.

पूर्वीच्या कायद्यात असे म्हटले होते: व्यभिचार करू नका, आणि जर तुम्हाला तुमच्या पत्नीला सोडून द्यायचे असेल, तर तिला घटस्फोटाचे एक पत्र द्या. परंतु मी तुम्हाला सांगतो तुम्ही एखाद्या स्त्रीच्या सौंदर्याकडे कामेच्छेने पाहिले तर तुम्ही अगोदरच व्यभिचार केला आहे. सर्व विषयलोलुपता आत्म्याचा नाश करते, आणि म्हणूनच जीवनाचा नाश करण्यापेक्षा शरीराची सर्व सुखे नाकारणे तुमच्यासाठी अधिक चांगले आहे.

आणि तुम्ही तुमच्या पत्नीला सोडून दिलेत, तर तुम्ही स्वतः दुष्ट बनताच पण तिलाही स्वैराचारी बनण्यास भाग पाडता, तसेच ज्याच्याशी ती संधान बांधते त्यालाही. म्हणून दुसरी आज्ञा: स्त्रीचे प्रेम चांगले आहे असे समजू नका, स्त्रियांची इच्छा धरू नका, तर ज्या स्त्रीशी तुम्ही जोडले गेलात तिच्या सोबत रहा आणि तिला सोडू नका.

पूर्वीच्या कायद्यात असे म्हटले होते: प्रभू देवाचे नाव व्यर्थ घेऊ नका, खोटे बोलताना देवाला मध्ये आणू नका, आणि तुमच्या देवाच्या नावाचा अनादर करू नका. कोणत्याही असत्य गोष्टीची शपथ घेऊ नका आणि तुमच्या देवाला भ्रष्ट करू नका.

परंतु मी तुम्हाला सांगतो की प्रत्येक शपथ देवाला अपवित्र करते. म्हणून शपथ अजिबात घेऊ नका. माणूस कोणतेही वचन देऊ शकत नाही, कारण तो पूर्णपणे पित्याच्या आधीन(सत्तेखाली) आहे. तो एखादा पांढरा केस काळा करू शकत नाही. मग तो हे किंवा ते मी करीन असे अगोदरच आणि देवाच्या शपथेवर कसे सांगू शकतो? प्रत्येक शपथ ही देवाला

भ्रष्ट करणारी असते, कारण जर माणसाला शपथेच्या सक्तीखाली देवाच्या इच्छेविरुद्ध काही करावे लागले तर त्याने देवाच्या इच्छेविरुद्ध वागण्याचे वचन देले आहे असे होईल, आणि म्हणून प्रत्येक शपथ वाईट आहे. परंतु माणसे तुम्हाला एखाद्या गोष्टीविषयी विचारतील, होय असेल तर होय म्हणा, किंवा नाही असेल तर नाही म्हणा; त्यात काही वाढवणे वाईट आहे.

म्हणून तिसरी आज्ञा आहे: कोणासाठी कोणतीही शपथ कधीही घेऊ नका. होय असेल तर होय म्हणा, नाही असेल तर नाही म्हणा आणि समजून घ्या की प्रत्येक शपथ वाईट आहे. पूर्वीच्या कायद्यात म्हटले होते की जर एखादा माणूस दुसऱ्याची हत्त्या करतो तर त्याने जीवासाठी जीव दिला पाहिजे, डोळ्यासाठी डोळा, दातासाठी दात, हातासाठी हात, बैलासाठी बैल, गुलामासाठी गुलाम आणि इतर पुष्कळ. परंतु मी तुम्हाला सांगतो: दुष्टाशी दुष्ट्पणाने लढू नका, आणि बैलासाठी बैल, गुलामासाठी गुलाम, जीवासाठी जीव हा कायदा पाळूच नका, दुष्ट्पणाला अजिबात विरोध करू नका. जर एखादा तुमच्याकडून एक बैल घेऊ इच्छित असेल तर त्याला दुसरा बैल द्या; जर त्याला तुमचा कोट कायद्याने हवा असेल, त्याला तुम्ही तुमचे शर्ट देखील द्या. जर एखाद्याने तुमचा एक बाजूचा एक दात पाडला तर, दुसरी बाजू त्याच्या समोर धरा. जर त्याने तुम्हाला त्याच्यासाठी एक काम करायला लावले तर, दोन करा. जर लोकांना तुमची संपत्ती पाहिजे असेल तर त्यांना ती घेऊ दे. जर त्यांनी तुमचे पैसे द्यायचे असतील आणि ते परत देत नसतील तर, ते मागू नका. आणि म्हणून: कोणाचा न्याय करू नका किंवा कोर्टात जाऊ नका, शिक्षा करू नका, आणि तुमचा न्याय केला जाणार नाही किंवा तुम्हाला शिक्षा केली जाणार नाही. सगळ्यांना क्षमा करा आणि तुम्हाला क्षमा केली जाईल; परंतु तुम्ही दुसऱ्यांचा न्याय केलात तर ते देखील तुमचा न्याय करतील.

तुम्ही न्याय करू शकत नाही, कारण सर्व माणसे आंधळी आहेत आणि त्यांना सत्य दिसत नाही. तुमच्या स्वतःच्या डोळ्यात धूळ असेल तर तुम्हाला तुमच्या भावाच्या डोळ्यातील डाग कसा दिसणार? तुम्ही तुमचा स्वतःचा डोळा प्रथम स्वच्छ केला पाहिजे-

परंतु कोणाचे डोळे पूर्णपणे स्वच्छ आहेत? आंधळा माणूस आंधळयाला वाट दाखवू शकतो का? ते दोघे खड्ड्यात पडतील. आणि जे न्याय करतात व शिक्षा करतात ते आंधळयाला आंधळयाने रस्ता दाखवण्यासारखे करतात.

जे न्याय करतात, आणि हिंसक वागवण्याची शिक्षा दुसऱ्यांना सुनावतात, जखमा, अवयव तोडणे, किंवा फाशी देऊन त्यांना सुधारू पाहतात, पण त्यांच्या शिकवणीतून त्यांचे शिष्य त्यांच्यासारखेच होण्यापलीकडे काय होऊ शकते? जेव्हा ते हा धडा शिकतील तेव्हा ते काय करतील? जे त्यांच्या गुरूने केले तेच: हिंसा आणि खून. आणि न्यायालयात न्याय मिळण्याची अपेक्षा करू नका. माणसाचे न्यायाविषयी प्रेम माणसांच्या न्यायालयावर सोपविणे म्हणजे डुकरापुढे मौल्यवान मोती फेकण्या सारखे आहे: ते त्यांना पायाखाली तुडवतील आणि तुमच्या चिंध्या करतील. आणि म्हणून चवथी आज्ञा आहे: लोक तुम्हाला कसाही त्रास देवोत, दुष्टपणा परत करू नका, न्याय करू नका किंवा न्यायालयात जाऊ नका, केस करू नका, आणि शिक्षा करू नका.

पूर्वीच्या कायद्यात म्हटले होते: तुमच्या स्वतःच्या देशातील लोकांचे भले करा आणि परकीयांचे नुकसान करा.

परंतु मी तुम्हाला सांगतो: तुमच्या देश बांधवावरच फक्त नव्हे तर दुसऱ्या देशातील लोकांवरही प्रेम करा. दुसऱ्यांना तुमचा तिरस्कार करू दे, तुमच्यावर हल्ला करू दे, आणि तुमच्यावर अन्याय करू दे, परंतु तुम्ही त्यांच्याविषयी चांगले बोला आणि त्यांचे भले करा. जर तुम्ही तुमच्याच देशबांधवांशी फक्त प्रेम कराल तर, लक्षात ठेवा की सर्व माणसे त्यांच्या देश बांधवांवर प्रेम करतात, आणि युद्धे त्यामुळेच होतात. परंतु सर्व देशातील लोकांबरोबर सारखेच चांगले वागा, आणि तुम्ही पित्याचे पुत्र व्हाल. सर्व माणसे त्याचे पुत्र आहेत, म्हणजे ते सर्व तुमचे भाऊ आहेत.

आणि म्हणून ही पाचवी आज्ञा आहे: तुम्हाला मी एकमेकांशी जसे वागायला सांगितले आहे तसेच परदेशीयांशी वागा. सर्व लोकांच्या पित्यासाठी वेगवेगळे देश नाहीत

किंवा वेगवेगळी राज्ये नाहीत: सर्व बांधव आहेत, सर्व एकाच पित्याचे पुत्र आहेत. जसा देशांमध्ये आणि राज्यांमध्ये तसाच लोकांमध्ये भेदभाव करू नका.

आणि म्हणून:

१. रागावू नका, तर सर्व लोकांशी सलोखा ठेवा.

२. स्वैर लैंगिक आंनदात स्वतःला झोकून देऊ नका.

३. कोणालाही कोणत्याही गोष्टीचे शपथेवर वचन देऊ नका.

४. वाईटाचा प्रतिकार करू नका, न्याय करू नका आणि न्यायालयात जाऊ नका.

५. राष्ट्रीयत्वा वरून फरक करू नका, पण परदेशीयांवर आपल्या स्वतःच्या लोकांप्रमाणे प्रेम करा.

या सर्व आज्ञा एकाच आज्ञेत सामावलेल्या आहेत:

जे सर्व लोकांनी तुमच्यासाठी करावे असे तुम्हाला वाटते, ते तुम्ही त्यांच्यासाठी करा.

लोकांनी स्तुती करावी म्हणून या आज्ञा पाळू नका. जर माणसांसाठी ते कराल तर माणसांकडून तुम्हाला त्याचे बक्षीस मिळेल. पण तुम्ही माणसांसाठी ते केले नाहीत तर, तुमचे बक्षीस तुम्हाला तुमच्या स्वर्गीय पित्याकडून मिळेल. म्हणून तुम्ही दुसऱ्यासाठी चांगले केले असेल तर त्याची बढाई लोकांपुढे मारू नका. लोकांचे कौतुक मिळवण्यासाठी ढोंगी लोक तसे करतात. आणि त्यांना पाहिजे ते त्यांना मिळते. पण तुम्ही जर माणसाचे भले केलेत, तर असे करा की कोणी ते पाहणार नाही, आणि तुमचा उजवा हात काय करतो ते डाव्या हाताला कळू देऊ नका. आणि तुमचा पिता ते पाहील आणि तुम्हाला ज्याची गरज आहे ते देईल.

आणि जर तुम्हाला प्रार्थना करायची इच्छा असेल तर, ढोंग्याप्रमाणे करू नका. त्यांना चर्च मध्ये आणि लोकांसमोर प्रर्थना करायला आवडते. ते ती लोकांच्या स्तुती साठी करतात. आणि माणसांकडून त्यांना पाहिजे ते मिळते.

पण तुम्हाला प्रार्थना करायची इच्छा झाली तर, तुम्हाला कोणी पाहणार नाही अशा ठिकाणी जा, आणि तुमच्या आत्म्याच्या पित्याची प्रार्थना करा, आणि तो तुमच्या आत्म्यात काय आहे ते पाहील आणि तुमच्या आत्म्याला काय हवे आहे ते देईल. जेव्हा तुम्ही प्रार्थना कराल तेव्हा ढोंग्यासारखी जिभेची वटवट करु नका. तुम्हाला काय पाहिजे ते तुमच्या पित्याला तुम्ही तोंड उघडण्या पूर्वी माहीत असते.

फक्त अशी प्रर्थना करा:

स्वर्गाप्रमाणे आदी व अंत नसलेल्या आमच्या पित्या! तुझे असणे हेच फक्त पवित्र असो. सामर्थ्य तुझेच असो, असे की आदी व अंता शिवाय तुझ्या इच्छेप्रमाणे या पृथ्वीवर होवो.

जीवनाचे अन्न ह्या आजच्या दिवशी मला दे.

जशी मी माझ्या भावाने केलेल्या चुकांची त्याला क्षमा करतो व त्या पुसून टाकतो तशी, माझ्या पूर्वीच्या चुकांची क्षमा कर आणि त्या पुसून टाक; की मी मोहात पडू नये, पण वाईटापासून सुरक्षित असावे.

कारण सत्ता व सामर्थ्य तुझेच आहे, आणि निर्णय तुझा आहे.

जर तुम्ही प्रार्थना कराल तर, कोणा विरुद्ध तुम्हाला द्वेष असेल त्यातून सर्वात प्रथम स्वतःला मुक्त करा. कारण तुम्ही दुसऱ्यांना त्यांच्या चुकांची क्षमा केली नाही तर, तुमचा पिता तुम्हाला तुमच्या चुकांची क्षमा करणार नाही.

जर तुम्ही उपवास करणार असाल तर त्याचे दुसऱ्यांपुढे प्रदर्शन केल्याशिवाय करा. लोकांनी बघावे व स्तुती करावी म्हणून ढोंगी उपवास करतात आणि लोक त्यांची स्तुती करतात, म्हणजे त्यांना जे पाहिजे असते ते त्यांना मिळते. परंतु तुम्ही तसे करू नका; जर तुम्ही गरिबी भोगत असाल तर, ती लोकांना दिसू नये म्हणून आनंदी चेहऱ्याने वावरा, मग तुमचा पिता पाहिल आणि तुमची काय गरज आहे ते तुम्हाला देईल.

पृथ्वीवर तुमच्यासाठी साठवून ठेवू नका. पृथ्वीवर कसर संपवते, गंज खातो, आणि चोर चोरतात: परंतु तुमच्यासाठी स्वर्गीय संपत्ती जमा करा. स्वर्गीय संपत्तीला कसर लागत नाही, गंज खात नाही, चोर लुटून नेत नाही. जेथे तुमची संपत्ती असेल तेथे तुमचे हृद्य सुद्धा असते.

शरीराचा प्रकाश डोळा आहे, आणि आत्म्याचा प्रकाश हृद्य आहे. जर तुमचे डोळे अधू झाले तर तुमचे पूर्ण शरीर अंधारात जाते. आणि तुमच्या हृदयाचा प्रकाश अंधुक झाल्यास तुमचा पूर्ण आत्मा अंधारात पडतो. तुम्ही दोन धन्यांची सेवा एकाच वेळी करू शकत नाही. जर तुम्ही एकाला खुश केले तर दुसऱ्याला दुखवाल. तुम्ही देव व शरीर दोघांची सेवा करू शकत नाही. एकतर तुम्ही पृथ्वीवरील जीवनासाठी काम करू शकता किंवा देवासाठी. म्हणून काय खावे किंवा प्यावे याविषयी किंवा कसे कपडे करावेत याची चिंता करू नका. कारण जीवन हे अन्न आणि कपडे यापेक्षा जास्त आश्चर्यकारक आहे आणि देवाने हे तुम्हाला दिले आहे.

देवाच्या निर्मितीकडे पहा, पक्षी. ते पेरणी किंवा कापणी किंवा मळणी करीत नाहीत तरी देव त्यांचे पोषण करतो. देवाच्या दृष्टीने माणूस पक्षापेक्षा कमी नाही. जर देवाने माणसाला जीवन दिले आहे तर तो त्याला पोसण्यासाठी सुध्दा समर्थ असेल. आणि तुम्हाला माहीत आहे की तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी तुम्ही स्वतः काहीही करू शकत नाही. तुम्ही तुमचे आयुष्य एका तासाने वाढवू शकत नाही. आणि कपड्यांची काळजी का करता? शेतातील फुले काम करीत नाहीत आणि सुत कातीत नाहीत, तरी ती सालोमन आपल्या सर्व वैभवात कधीच सजला नसेल इतकी सजवली जातात.

आणि जर आज वाढणाऱ्या व उद्या कापल्या जाणाऱ्या गवताला देव इतके सजवतो तर, तो तुम्हाला कपडे देणार नाही का?

घाबरू नका आणि चिंता करू नका; असे म्हणू नका की काय खायचे आणि कसे कपडे करायचे याचा तुम्हाला विचार केलाच पाहिजे. सर्व माणसाना या गोष्टींची गरज आहे आणि तुम्हालाही त्यांची गरज आहे हे देवाला माहीत आहे. म्हणून भविष्याची चिंता करू नका. आजचा दिवस जगा. पित्याच्या इच्छेप्रमाणे राहण्याची काळजी घ्या. तीच इच्छा फक्त

महत्वाची आहे, बाकी गोष्टी स्वतःहून येतील. पित्याच्या इच्छेत रहायचा प्रयत्न करा, आणि भविष्याविषयी काळजी करू नका, कारण तो जेव्हा येईल तेव्हा त्याचे दुःख सुद्धा येईल, आतासाठी वर्तमानकाळातले दुःख पुरेसे आहे.

मागा आणि ते तुम्हाला दिले जाईल; शोधा आणि तुम्हाला सापडेल; ठोका म्हणजे तुमच्यासाठी उघडले जाईल. असा कोठे पिता असेल का की त्याच्या मुलाने भाकरी मागितल्यावर भाकरी ऐवजी दगड देईल, किंवा मासा मागितल्यावर साप देईल? मग तुम्ही असा विचार का करता जर आपण पापी माणसे आपल्या मुलांना त्याना हवे ते देतो तर तुमचा स्वर्गातील पिता जर तुम्ही त्याच्याकडे मागितले तर तुम्हाला पाहिजे ते देणार नाही का? मागा, आणि तो स्वर्गीय पिता जे त्याच्याकडे मागतील त्यांना जीवनाचा आत्मा देईल.

जीवनाकडे जाण्याचा मार्ग अरुंद आहे, परंतु त्या अरुंद वाटेने प्रवेश करा. जीवनासाठी एकच प्रवेश द्वार आहे-अडचणीचे आणि अरुंद. मोठा आणि रुंद प्रदेश सभोवताली आहे, पण तो विनाशाकडे नेणारा आहे. अरुंद मार्गच फक्त जीवनाकडे नेतो, आणि फारच थोड्यांना तो सापडतो. परंतु घाबरू नका, छोट्या लोकांनो! पित्याने तुमच्यासाठी राज्य तयार केले आहे. फक्त, खोट्या प्रेषितांपासून आणि गुरुंपासून सावध रहा; ते तुमच्याकडे मेंढ्यांच्या कपडयात येतील, परंतु आतून ते भुकेलेले लांडगे असतील. त्यांच्या फळांवरून-जे त्यांच्यातून येईल त्याच्यावरून-तुम्ही त्यांना ओळखाल. (burdock) काटेरी वेलावरून द्राक्षे गोळा करता येणार नाहीत की (aspen) पिंपळाच्या झाडाला सफरचंदे लागणार नाहीत. चांगले झाड चांगले आणि वाईट झाड वाईट फळ देते. म्हणून तुम्ही ही माणसे त्यांच्या शिवणीच्या फाळावरून ओळखा.

चांगल्या माणसाचे चांगले हृदय सर्व ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या पुढे आणते. परंतु वाईट माणसाच्या वाईट हृदयातून सर्व ज्या वाईट गोष्टी आहेत त्या पुढे येतात. कारण हृदय भरून येते तेव्हा ओठ बोलतात आणि म्हणून जर गुरु तुम्हाला स्वतःसाठी जे वाईट आहे ते दुसऱ्यांशी करायला सांगत असतील, जर ते हिसाचार, छळ, आणि युध्द शिकवीत असतील-तर तुम्हाला कळेल की ते खोटे गुरु आहेत.

म्हणून 'प्रभो, प्रभो! ' जे म्हणतात ते स्वर्गाच्या राज्यात जाणार नाहीत, परंतु जे स्वर्गीय पित्याची इच्छा पूर्ण करतील ते स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करतील. ते खोटे गुरु सांगतील: 'प्रभो प्रभो ! आम्ही तुझी श्रद्धा शिकवली, आणि तुझ्या शिकवणीने वाईट गोष्टी बाहेर काढल्या. परंतु मी त्यांना नाकारीन आणि म्हणेन: 'नाही, मी तुम्हाला कधीच ओळखत नव्हतो आणि आता ओळखत नाही, माझ्या पासून दूर जा; तुम्ही जे बेकायदेशीर आहे तेच करता. '

जो माझे हे शब्द ऐकतो आणि त्याप्रमाणे कृती करतो तो खडकावर आपले घर बांधणाऱ्या समंजस माणसासारखा आहे. आणि त्याचे घर सगळया वादळा विरुध्द टिकून राहील. परंतु जो माणूस माझे हे शब्द ऐकतो आणि त्याप्रमाणे कृती करीत नाही तो आपले घर वाळूवर बांधणाऱ्या मुर्ख माणसा सारखा आहे. जेव्हा एखादे वादळ येईल तेव्हा त्याचे घर कोसळेल आणि त्यात असलेल्या सर्वांचा नाश होईल.

आणि त्याच्या या शिकवणीने लोक आश्चर्यचकित झाले, कारण येशूची शिकवण सनातनी कायद्याच्या उपदेशकांपेक्षा अगदी वेगळी होती. ते शिकवीत असलेला कायदा पाळलाच पाहिजे असा होता, परंतु येशू शिकवीत होता की सर्व माणसे मुक्त आहेत. आणि येशू ख्रिस्तामध्ये इसाईआची सर्व भाकिते पूर्ण होत होती: की जे लोक अंधारात आणि मृत्युच्या छायेत जगत होते त्यांना जीवनाचा प्रकाश दिसला. ज्याने हा सत्याचा प्रकाश आणला त्याने माणसांना हिंसा किंवा इजा केली नाही, तर तो नम्र व सौम्य होता. या जगात सत्य आणण्यासाठी त्याने वाद केला नाही की आरडाओरड केली नाही, त्याचा आवाज चढला नाही, आणि त्याने गवताची एक काडी मोडली नाही की लहानसा दिवाही विझवला नाही, आणि मानवाची सर्व आशा त्याच्या शिकवणीत आहे.

५

# सत्य जीवन

वैयक्तिक इच्छांचे समाधान मृत्यूकडे नेते; पित्याच्या इच्छेचे समाधान सत्य जीवन देते.

“तुझ्या इच्छेप्रमाणे होवो”

आणि येशू आत्म्याच्या शक्तीने उल्हासित होऊन म्हणाला:

शहाण्या व विद्वान माणसांपासून लपून राहिलेले, स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा उगम असलेल्या पित्याच्या आत्म्याने सामान्यांसाठी उलगडले हे मी कबूल करतो, कारण त्यांनी त्यांना स्वतःला पित्याचे पुत्र म्हणून मान्य केले.

सर्व जे शरीराच्या सुखाची काळजी करतात त्यांनी त्यांच्यासाठी नसलेले जोखंड आपल्यावर घेतले आहे, आणि आपण ओढू शकत नसलेले ओझे ओढण्यास स्वतःला जुंपून घेतले आहे. माझी शिकवण समजून घ्या आणि ती अनुसरा आणि तुमच्या जीवनात शांती आणि आनंद येईल. मी तुम्हाला आध्यात्मिक जीवनाचे दुसरे जू आणि दुसरे ओझे देतो. हे जू स्वतःवर घ्या आणि माझ्याकडून शांती आणि सुख शिका.

स्थिरचित्त व नम्र-हृदयी व्हा आणि तुमच्या जीवनात परमसौख्य मिळवा. कारण माझी शिकवण हे तुमच्यासाठी बनवलेले जू आहे, आणि माझी शिकवण अनुसरणे म्हणजे तुम्हाला योग्य अशा जूच्या सहाय्याने हलके ओझे वाहणे होय.

एकदा त्याला जेवायची इच्छा आहे का विचारण्यात आले, तो उत्तरला: माझ्याकडे जे अन्न आहे त्याची तुम्हाला माहिती नाही त्यांना वाटले कोणीतरी त्याच्यासाठी अन्न आणले

होते, परंतु तो म्हणाला: माझे अन्न म्हणजे ज्याने मला जीवन दिले त्याची इच्छा पूर्ण करणे आणि त्याने माझ्यावर सोपवलेले काम तडीस नेणे. असे म्हणू नका: अजून वेळ आहे, जसा शेतकरी कापणीच्या हंगामाची वाट बघतांना म्हणतो. जो पित्याची इच्छा पूर्ण करतो तो नेहमीच तृप्त असेल आणि त्याला तहान किवा भूक ठाऊक नसेल. देवाच्या इच्छा पूर्ण करणे नेहमी समाधान देते आणि नेहमीच ते स्वतःच एक बक्षीस असते. तुम्ही असे म्हणूच नका: 'मी देवाची इच्छा नंतर पूर्ण करीन. 'जोपर्यंत तुमच्याकडे जीवन आहे तो पर्यंत तुम्ही पित्याची इच्छा नेहमीच पूर्ण करू शकाल आणि केलीच पाहिजे. आपले जीवन हे देवाने पेरणी केलेले शेत आहे, आणि आपले काम आहे त्याची फळे जमा करणे. जर आपण त्याची फळे जमा केली तर आपल्याला कालातीत जीवनाचे बक्षीस मिळेल. आपण स्वतःला जीवन देत नाही, कोणीतरी दुसरा आपल्याला ते देतो. आणि आपण जीवनात गोळा करण्याचे कष्ट घेतले, तर पिक कापणाऱ्या प्रमाणे आपल्याला एक बक्षीस मिळेल. पित्याने तुम्हाला दिलेल्या या जीवनात मी तुम्हाला जमा करायला शिकवतो.

एकदा येशू जेरुसलेमला गेला. त्या काळी तेथे शहरात एक स्नानगृह होते, त्याविषयी लोक असे सांगत की तेथे देवदूत येतो, त्यात उतरतो, आणि त्याच्या येण्याने पाणी ढवळले जाते आणि जो कोणी पहिला त्याच्या नंतर त्यात बुडी मारतो, तो त्याला असलेल्या कोणत्याही आजारातून बरा होतो. त्या तलावाच्या सभोवती निवाऱ्याची सोय केलेली होती, आणि त्या निवाऱ्यात आजारी माणसे पाण्यात बुडी मारण्यास त्या तलावातील पाण्यात बुडबुडे कधी येतात याची वाट बघत पडलेली असत.

आणि तेथे एक माणूस होता, जो तेथे अडतीस वर्षे होता, आणि अशक्त होता. येशूने त्याला तो दुःखी का आहे ते विचारले. आणि त्या माणसने त्याला सांगितले की तो अडतीस वर्षांपासून आजारी आहे आणि बरा होण्यासाठी पाण्यात बुडबुडे आल्यावर प्रथम बुडी मारण्याची वाट बघतो, परंतु या सर्व अडतीस वर्षात तो प्रथम जाऊ शकला नाही कारण कोणीतरी त्याच्या अगोदरच त्या तलावात शिरलेले असे. आणि येशूने पाहिले की तो माणूस म्हातारा आहे, आणि त्याला म्हणाला: तुला बरे व्हायचे आहे का? तो माणूस म्हणाला: होय,

माझी इच्छा आहे, परंतु तलावात वेळेवर पोहोचायला मला मदत करायला कोणी नाही. कोणीतरी माझ्या अगोदरच तेथे पोहोचतो.

आणि येशू त्याला म्हणाला: तू स्वतः उभा रहा, तुझा बिछांना उचल आणि जा. आणि त्या आजारी माणसाने आपला बिछांना उचलला आणि तो निघून गेला. आणि हे शनिवारी घडले. आणि सनातनी म्हणाले: तू तुझा बिछाना घेऊन जाऊ शकत नाहीस कारण आज शनिवार आहे.

तो म्हणाला: ज्याने मला उठवले आहे त्याने मला माझा बिछाना उचलायला सांगितले आहे.

आणि तो अशक्त माणूस सनातन्याकडे गेला आणि त्यांना सांगितले की येशूने त्याला बरे केले आहे. आणि त्यांना राग आला, आणि येशूवर आरोप केला कारण त्याने अशा गोष्टी शनिवारी केल्या होत्या.

आणि येशू म्हणाला: जे पिता नेहमी करतो, ते मी सुद्धा करतो. मी तुम्हाला खरोखर सांगतो: पुत्र स्वतःहून काहीही करू शकत नाही; जे त्याला पित्याकडून समजले आहे तेच तो करतो. जे पिता करतो, तो देखील तेच करतो. पिता पुत्रावर प्रेम करतो, आणि त्याने पुत्राला माहीत असण्याची गरज असलेल्या सर्व गोष्टी शिकवल्या आहेत.

जसा पिता मृताला जीवन देतो तसा पुत्र ज्याची इच्छा असेल त्याला जीवन देतो, कारण जसे पित्याचे काम जीवन आहे तसे पुत्राचे कामही जीवनच आहे. पित्याने मानवाला मृत्युची शिक्षा दिली नाही, तर आपल्या इच्छे प्रमाणे मरणे किंवा जगण्याची शक्ती दिली आहे. आणि ते जर पित्याप्रमाणे पुत्राचा आदर करतील तर ते जिवंत राहतील.

मी तुम्हाला खरोखर सांगतो की ज्याला माझी शिकवण समजली आहे आणि जो सर्व मानवाच्या सामाईक पित्यावर विश्वास ठेवतो, त्याला जीवन अगोदरच प्राप्त झाले आहे आणि त्यांची मृत्युपासून सुटका झाली आहे. ज्यांना मानवी जीवनाचा अर्थ समजला आहे ते अगोदरच मृत्युपासून बचावलेले आहेत आणि नेहमीच जिवंत राहतील. कारण पित्यामध्ये

जसे स्वतःचे जीवन आहे तसे पुत्रा मध्येही स्वतःमध्ये जीवन असावे असे त्याला दिले आहे, आणि त्याला स्वातंत्र्य दिले आहे. अशा प्रकारे तो मानवाचा पुत्र आहे.

यापुढे मर्त्य माणसे दोन प्रकारात विभागली जातील: जी चांगले काम करतील आणि जीवन प्राप्त करतील, आणि जी वाईट काम करतील आणि त्यामुळे नाश पावतील. आणि हा माझा निर्णय नाही, तर हे जे काही मला पित्याकडून समजले आहे ते आहे. माझा निर्णय योग्य आहे, कारण मी माझी इच्छा असेल ते ठरवीत नाही, तर सर्व मानवाच्या पित्याच्या इच्छेप्रमाणे सर्वांनी करावे म्हणून ठरवतो.

जर मी तुम्हाला माझ्या शिकवणीच्या सत्यतेची खात्री दिली तर, माझी शिकवण खरी असल्याचे पक्के होत नाही; मी तुम्हाला वागण्याची जी पद्धत शिकवतो तिच्यामुळे ती कायम होते. त्याच्यावरून दिसते की मी माझ्या जवळचे शिकवीत नाही तर सर्व मानवाच्या पित्याकडून आलेले शिकवतो. आणि माझा पिता तो ज्याने मला शिकवले, माझ्या आज्ञांची सत्यता सर्वांच्या आत्म्यात कायम करतो.

परंतु तुम्हाला त्याचा आवाज समजून घेण्याची किंवा जाणण्याची इच्छा नसेल. आणि त्या आवाजाने जाहीर केलेला अर्थ तुम्ही स्वीकारणार नसाल. तुमच्या स्वतः मध्ये स्वर्गातून अवतरलेल्या आत्म्याच्या आवाजावर विश्वास ठेवण्याची तुमची इच्छा नसेल.

तुमच्या (स्क्रीप्चर) बायबलचा अर्थ बघा. माझ्या शिकवणीत आहे तेच तुम्हाला तेथे मिळेल: केवळ तुमच्या स्वतःसाठीच जगण्यासाठी नव्हे तर मनावाचे भले करण्याच्या आज्ञा तेथे आहेत. मग सर्व मानवाला जीवन देणाऱ्या माझ्या आज्ञावर विश्वास ठेवण्याची तुमची इच्छा का नाही? मी तुम्हाला सर्व मानवाच्या सामाईक पित्याच्या नावाने शिकवतो, आणि तुम्ही माझी शिकवण स्वीकारीत नाही, पण जर एखादा तुम्हाला स्वतःच्या नावाने शिकवीत असेल तर तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवता.

लोक एकमेकांशी जे बोलतात त्यावर तुम्ही विश्वास ठेवू नये, तर प्रत्येक माणसात पित्यासारखाच पुत्र आहे यावरच फक्त विश्वास ठेवावा.

आणि माणसांनी असा विचार करू नये की स्वर्गाचे राज्य काही दृश्य गोष्ट आहे- परंतु हे समजून घ्यावे की ते पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेत आहे आणि ती पूर्तता प्रत्येक माणसाच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे आणि लोकांनी हे समजून घ्यावे की जीवन हे एखाद्याला स्वतः करता व्यक्तिगत दिलेले नाही परंतु पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेसाठी असून, जी फक्त आपल्याला मृत्यू पासून वाचवते आणि जीवन देते, येशूने एक बोधकथा सांगितली, आणि म्हणाला:

एक श्रीमंत माणूस होता त्याला घर सोडून जायचे होते. बाहेर जायला निघण्या पूर्वी त्याने आपल्या गुलामांना बोलावले आणि त्यांना प्रत्येकाला एक असे दहा पौंड दिले, आणि म्हणाला: मी बाहेर असतांना तुम्ही प्रत्येकाने मी तुम्हाला दिलेले काम करावे. आणि असे घडले जेव्हा तो निघून गेला, त्या शहरातील काही लोक म्हणाले: आम्ही त्याची आणखी काही सेवा करु इच्छित नाही. जेव्हा तो श्रीमंत माणूस परत आला, तेव्हा त्याने ज्या गुलामांना पैसे दिले होते त्यांना बोलावले, आणि त्यांनी त्या पैशाचे काय केले ते विचारले.

पहिला एक जण आला आणि म्हणाला: पहा, मालक तुमच्या एका पौंडाने मी दहा कमावले आहेत. आणि मालक त्याला म्हणाला: शाब्बास, चांगल्या गुलामा, तू एका लहान गोष्टीत विश्वासू राहिलास आणि मी तुला मोठी जबाबदारी देतो: माझ्या सर्व इस्टेटीत माझ्या बरोबर रहा. दुसरा गुलाम आला आणि म्हणाला: पहा मालक, तुमच्या पौंडाने मी पाच कमावले आहेत. आणि मालक त्याला म्हणाला: शाब्बास, चांगल्या गुलामा, माझ्या सर्व इस्टेटीत माझ्या सोबत रहा. तिसरा आला आणि म्हणाला: पहा, हा तुमचा पौंड. मी तो कापडात गुंडाळून गाडून ठेवला होता कारण मला तुमची भीती वाटत होती. तुम्ही कठोर माणूस आहात, तुम्ही साठवलेले नसेल तेथून काढून घेता आणि जेथे पेरले नसेल तेथून गोळा करता.

आणि मालक त्याला म्हणाला: मुर्ख गुलामा! मी तुला तुझ्या स्वतःच्या शब्दावरून ओळखले. तू म्हणतो की तू माझ्या भीतीने तो पौंड त्याचा उपयोग न करता लपवून ठेवलास. तुला ठावूक होते की मी कठोर आहे आणि जेथे दिलेले नाही तेथून मी काढून घेतो, तर मी

आज्ञा केल्या प्रमाणे तू का वागला नाहीस? तू माझा पौंड वापरला असतास तर संपत्तीत वाढ झाली असती आणि मी दिलेली आज्ञा तू पूर्ण केली असतीस. परंतु तुला ज्याच्यासाठी पौंड दिला होता ते आता तू केले नाहीस, म्हणून तो पौंडही तुला मिळणार नाही.

आणि ज्याने आपल्या पौंडाचा काहीच उपयोग केला नाही त्याचा पौंड धन्याने काढून घेतला व ज्याने सर्वात जास्त उपयोग केला होता त्याला दिला. इतर सर्व गुलामांनी त्या बद्दल निषेध केला व त्याला म्हणाले: मालक, त्याच्या जवळ अगोदरच पुष्कळ आहे. परंतु मालक म्हणाला: जो जास्त काम करील त्याला देण्यात येईल, कारण जो आपल्या जवळ आहे त्याची काळजी घेतो त्याला अधिक दिले जाईल. माझ्या सत्तेत ज्यांना राहायचे नाही त्यांना हाकून द्या, कोणालाही ठेवू नका. मालक म्हणजे जीवनाचा उगम, आत्मा, पिता आणि गुलाम म्हणजे माणसे.

ते पौंड म्हणजे आत्म्याचे जीवन. जसा मालक आपल्या शेतात काम करीत नाही तर गुलामांना प्रत्येकाला स्वतः काम करायला सांगतो, तसच माणसातील जीवनाच्या आत्म्याने त्यांना सर्व मानवासाठी काम करायला सांगितले आहे, आणि मग त्यांना एकटे सोडले आहे. जे असे म्हणतात की ते मालकाची सत्ता कबूल करीत नाहीत ते जीवनाच्या आत्म्याला मान्य करीत नाहीत. धन्याचे परत येणे म्हणजे आणि हिशोब मागणे म्हणजे शारीरिक जीवनाचा नाश आणि त्यांनी त्यांना दिलेल्या जीवनात वाढ केली की नाही याविषयी लोकांच्या भवितव्याचा निर्णय होय. काही, ज्या गुलामांनी मालकाची इच्छा पूर्ण केली, त्यांना दिलेले वापरले, आणि मोठ्या प्रमाणात त्यात वाढ केली. ते म्हणजे ज्यांना जीवन मिळाले, जीवन म्हणजे पित्याची इच्छा आहे आणि ते त्यांना दुसऱ्याच्या जीवनाची सेवा करण्यासाठी दिले आहे हे समजले. ज्या मुर्ख आणि विकृत गुलामाने आपला पौंड लपवून ठेवला आणि वापरला नाही, ते पित्याच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागणाऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात, आणि दुसऱ्यांच्या जीवनाची सेवा करीत नाहीत. जे गुलाम मालकाची इच्छा पूर्ण करतात आणि मालमत्तेत वाढ करतात ते मालकाच्या सर्व मालमत्तेचे भागीदार होतात, परंतु जे गुलाम मालकाची इच्छा पूर्ण करीत नाहीत आणि त्याच्यासाठी काम करीत नाहीत त्यांच्या कडून त्यांना दिलेले काढून घेतले जाते. जी माणसे पित्याची इच्छा पूर्ण करतील

आणि जीवानाची सेवा करतील ती पित्याच्या जीवनात भागीदार होतील आणि शरीराचा नाश झाला तरी अधिक जीवन प्राप्त करतील. जे इच्छा पूर्ण करणार नाहीत आणि जीवनाची सेवा करणार नाहीत त्यांच्या जवळ असलेले जीवन काढून घेतले जाते आणि त्यांचा नाश केला जातो. ज्यांना मालकांचा अधिकार मानण्याची इच्छा नाही ते त्याच्यासाठी अस्तित्वातच नाहीत: तो त्यांना हाकून देतो. जे स्वतःमध्ये जीवनाचा आत्मा-मानवाच्या पुत्राचे जीवन-मानीत नाहीत ते पित्यासाठी अस्तित्वात नाहीत.

त्यानंतर येशू एकांत स्थळी गेला आणि पुष्कळ लोक त्याच्या मागे गेले. तो एका टेकडीवर गेला आणि त्याच्या शिष्यांसह तेथे बसला. आणि त्याने पुष्कळ लोक येताना पाहिले आणि म्हणाला: या सर्व लोकांसाठी आपण भाकऱ्या कोठून आणणार? फिलीप म्हणाला: त्यांच्यापैकी प्रत्येकाला थोडे काही देण्यासाठी दोनशे पेनीखर्च सुद्धा पुरणार नाही. आपल्याकडे थोड्या भाकरी आणि मासे आहेत. आणि दुसरा शिष्य म्हणाला: त्यांच्यापैकी काही जणांकडे भाकरी असतील: तेथे एक मुलगा आहे त्याच्याकडे पाच भाकरी व दोन लहान मासे आहेत. आणि येशू म्हणाला: सर्वांना खाली गवतावर बसायला सांगा.

आणि येशूने त्याच्या जवळ असलेली भाकरी घेतली आणि त्याच्या शिष्यांना दिली आणि ती दुसऱ्या लोकांना द्यायची आज्ञा दिली. आणि त्या सर्वांनी आपल्या जवळ असलेले एकमेकांना द्यायला सुरवात केली, आणि त्या सर्वांना जेवायला पुरेसे होऊन पुष्कळ उरले.

दुसऱ्या दिवशी लोक पुन्हा येशूकडे आले, आणि तो त्यांना म्हणाला: तुम्ही चमत्कार पाहिले म्हणून माझ्याकडे आलेले नाही, परंतु तुम्ही भाकरी खाल्ली आणि तृप्त झालात. नाश पावणाऱ्या अन्नासाठी कष्ट करू नका, तर फक्त पित्याने मान्य केलेल्या अशा, मानव पुत्राच्या आत्म्याने तुम्हाला दिलेले अन्न जे चिरकाल टिकणारे आहे त्यासाठी कष्ट करा.

ज्यू म्हणाले: देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी आम्ही काय करावे?

आणि येशू म्हणाला: देवाच्या कामात त्याने तुम्हाला दिलेल्या जीवनावर विश्वास ठेवण्याचा समावेश होतो.

ते म्हणाले: आम्हाला पुरावा दे म्हणजे आम्ही विश्वास ठेवू. तू काय करतोस? आमच्या पूर्वजांनी त्यांच्या अज्ञातवासात देवाचा (mannaमेना) प्रसाद खाल्ला. देवाने त्यांना खायला अन्न दिले, असे लिहिलेले आहे.

येशूने त्याना उत्तर दिले: खरी स्वर्गीय भाकरी म्हणजे मानवाच्या पुत्राचा आत्मा, जो पिता देतो. कारण मानवाचे अन्न हे स्वर्गातून उतरलेला आत्मा होय. तो जो आहे जो जगाला जीवन देतो.

माझी शिकवण खरे पोषण देते. जो मला अनुसरेल त्याला भूक लागणार नाही, आणि जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवील त्याला तहान कधीच जाणवणार नाही. परंतु मी तुम्हाला अगोदरच सांगितले आहे की तुम्ही हे पाहिले आहे आणि तरीही विश्वास ठेवीत नाही.

सर्व जीवन जे पित्याने पुत्राला दिलेले आहे ते माझ्या शिकवणीमुळे साकार होईल, आणि प्रत्येकजण जो त्यावर विश्वास ठेवील तो त्या जीवनाचा भागीदार होईल. कारण माझी नाही तर मला जीवन देणाऱ्या पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी मी स्वर्गातून खाली आलो आहे. आणि ज्याने मला पाठवले त्या पित्याची इच्छा आहे की त्याने दिलेले सर्व जीवन मी सांभाळावे आणि त्यातील काहीही घालवू नये. म्हणून मला पाठवणाऱ्या पित्याची अशी इच्छा आहे, की प्रत्येक जण जो पुत्राला पाहतो व त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला चिरकालचे जीवन मिळेल. आणि माझी शिकवण (शरीराच्या) शेवटच्या दिवशी जीवन देते.

त्याची शिकवण स्वर्गातून आली आहे असे त्याने म्हटल्याने ज्यू लोक अस्वस्थ झाले. ते म्हणाले: काय, हा तर येशू जोसेफाचा मुलागा: आम्हाला त्याची आई आणि वडील माहीत आहेत. तो कसे म्हणू शकतो की त्याची शिकवण स्वर्गातून खाली अवतरली आहे?

आणि येशू म्हणाला: मी कोण आहे आणि मी कोठून आलो याची चर्चा करू नका. देव माझ्याशी सिनाई पर्वतावर बोलला आहे असे मोजेस प्रमाणे मी जाहीर करीत आहे म्हणून नव्हे, तर तुमच्यामध्ये सुद्धा ती अस्तित्वात आहे म्हणून माझी शिकवण सत्य आहे. प्रत्येकजण जो माझ्या आज्ञांवर विश्वास ठेवतो तो मी बोलतो म्हणून तसे करीत नाही, तर

कारण आपला सामाईक पिता त्याला स्वतःकडे ओढतो; आणि माझी शिकवण त्याला शेवटच्या दिवशी जीवन देईल. प्रेषितांनी लिहिले आहे की सर्व मानवाला देव शिकवील. प्रत्येकजण जो पित्याला जाणतो, आणि त्याची इच्छा जाणण्यासाठी शिकतो, तो स्वतः माझ्या शिकवणीला शरण जातो.

कोणीही पित्याला अजून पाहिले नाही, परंतु तो जो देवाचा आहे त्याने त्याला पाहिले आहे आणि पहात आहे. जो कोणी माझ्यावर(माझ्या शिकवणीवर) विश्वास ठेवील त्याला चिरकालीन जीवन प्राप्त होईल. माझी शिकवण हे जीवनाचे अन्न आहे. तुमच्या पूर्वजांनी देवाचे अन्न (manna) खाल्ले, स्वर्गातून पाठवलेले अन्न, आणि तरीही मरण पावले. परंतु खरे अन्न जे स्वर्गातून अवतरलेले असते ते असे असते की जो ते खातो तो मरणार नाही. आणि माझी शिकवण ही स्वर्गातून अवतरलेले हे अन्न आहे. जो त्याच्यावर पोषण करतो तो चिरकाल जिवंत राहतो. आणि हे अन्न जे मी शिकवतो ते माझे शरीर जे मी मानवतेच्या जीवना साठी देतो.

तो काय म्हणाला ते ज्यू लोकांना अजिबात समजले नाही, आणि एखाद्याचे शरीर मानवांच्या जीवनासाठी कसे, आणि का देता येईल यावर त्यांनी वाद-विवाद सुरु केला.

आणि येशू त्यांना म्हणाला: जर तुम्ही तुमच्या आत्म्याच्या जीवना साठी तुमचे शरीर दिले नाही तर तुमच्यात जीवनच असणार नाही. जो कोणी आपल्या आत्म्याच्या जीवनासाठी आपले शरीर देत नाही त्याला खरे जीवन नसते. फक्त जो माझ्यामध्ये आत्म्यासाठी शरीर सोडून देतो त्याला खरे जीवन मिळते. आणि म्हणून आपली शरीरे ही खरोखर खऱ्या जीवनाचे अन्न आहेत. फक्त माझ्यामध्ये जो आहे, जो माझ्या शरीराचे भक्षण करतो, जो खऱ्या जीवनासाठी शारीरिक जीवनाचा त्याग करतो तोच खरा मी आहे-तो माझ्यात आहे, मी त्याच्यात आहे. आणि जसा मी पित्याच्या इच्छेने शरीरात राहतो, तसा जो माझ्यात राहतो तो माझ्या इच्छेने राहतो.

आणि त्याच्या शिष्यांपैकी काहींनी जेव्हा हे ऐकले, तेव्हा ते म्हणाले: हे कठीण शब्द आहेत, आणि ते समजायला अवघड आहेत.

आणि येशू त्यांना म्हणाला: तुमची मने इतकी गोंधळलेली आहेत, की माणूस काय होता, आहे, आणि नेहमीच असेल, ह्या विषयी माझे बोलणे तुम्हाला अवघड वाटते. माणूस म्हणजे शरीरातील आत्मा आहे, आणि आत्माच एकटा जीवन देऊ शकतो- शरीर जीवन देत नाही. जे शब्द तुम्हाला एवढे अवघड वाटतात त्यात मी आत्मा हेच जीवन आहे यापेक्षा जास्त काही म्हटलेले नाही. त्यानंतर येशूने त्याच्या जवळ असलेल्या लोकांतून सत्तर लोक निवडले, आणि त्याला स्वतःला जेथे जायचे होते तेथे त्यांना पाठवले. तो त्यांना म्हणाला: पुष्कळ लोकांना खऱ्या जीवनाचे परमसौख्य कळलेले नाही. मला त्या सर्वांसाठी दुःख वाटते, आणि त्यांना शिकवण्याची इच्छा आहे. परंतु जसा शेतकरी आपले सर्व पिक स्वतः कापू शकत नाही, तसा, मी सुद्धा आवश्यक असलेले सर्व करू शकत नाही. वेगवेगळया नगरात जा आणि प्रत्येक ठिकाणी पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेची घोषणा करा.

असे म्हणा: पित्याची इच्छा अशी आहे: राग करू नका, लालसा धरू नका, शपथ घेऊ नका, वाईटाचा प्रतिकार करू नका, आणि लोकांमध्ये कोणताही भेदभाव करू नका. आणि त्याच प्रमाणे स्वतः तुम्ही सुध्दा हे नियम सर्व गोष्टींमध्ये पाळा.

मी तुम्हाला लांडग्यांमध्ये मेंढी प्रमाणे पाठवीत आहे. सापासारखे शहाणे आणि कबुतरा सारखे शुध्द रहा. आणि सर्वात महत्वाचे फक्त अंगावरील कपडे व पायातील पादत्राणा शिवाय तुमच्या जवळ पाकीट, भाकरी, पैसे यापैकी तुमचे असे काहीही ठेवू नका. लोकांमध्ये भेदभाव करू नका; ज्यांच्याबरोबर रहायचे त्या लोकांची निवड करू नका. परंतु तुम्हाला पहिले लागेल त्या कोणत्याही घरात रहा. जेव्हा तुम्ही घरात प्रवेश कराल, तेव्हा मालकाला नमस्कार करा. जर त्याने तुम्हाला आत घेतले, तर तेथे थांबा; जर घेतले नाही, तर दुसऱ्या घरी जा.

तुम्ही जे सांगाल त्यासाठी ते तुमचा द्वेष करतील आणि तुमच्यावर तुटून पडतील आणि तुम्हाला हाकून देतील. परंतु जेव्हा तुम्हाला हाकून लावले जाईल तेव्हा दुसऱ्या खेड्यात जा आणि जर तुम्हाला तेथून हाकलले, तर आणखी दुसऱ्यात जा. जसे लांडगे मेंढ्यांचा पाठलाग करतात तसा तुमचा पाठलाग केला जाईल, परंतु घाबरू नका, शेवटच्या घटके पर्यंत टिकून रहा. ते तुम्हाला कोर्टात खेचतील तुमच्यावर फिर्याद चालवतील, आणि

चाबकाने झोडपतील आणि तुम्हाला अधिकाऱ्यांसमोर तुमचे स्वतःचे समर्थन करण्यासाठी नेतील. परंतु कोर्टात नेले जात असतांना घाबरू नका, काय बोलायचे त्याची तयारी करू नका: तुमच्या मध्ये असलेला पित्याचा आत्मा काय बोलायचे ते तुम्हाला सांगेल. तुम्ही सर्व नगरातून निघून जाण्यापूर्वी काही लोक तुमची शिकवण समजतील आणि तिच्याकडे वळतील.

म्हणून भिऊ नका. माणसाच्या आत्म्यात जे लपलेले आहे ते बाहेर येईल. जे तुम्ही दोघा किंवा तिघांना सांगाल ते हजारोंमध्ये पसरेल. सर्वाच्या वर, तुमच्या शरीराची हत्त्या करणाऱ्यांना घाबरू नका. ते तुमच्या आत्म्याचे काहीही करू शकणार नाहीत, म्हणून त्यांना भिऊ नका. पित्याची इच्छा पूर्ण न करण्याने आपल्या शरीर व आत्म्याचा नाश जे करू शकेल त्याची अवश्य भीती बाळगा. एका पैशाला(फार्दिंग) पाच चिमण्या विकल्या जातात, परंतु पित्याच्या इच्छेशिवाय त्यासुद्धा मरत नाहीत. आणि एखादा केसही पित्याच्या इच्छे शिवाय डोक्यावरून गळत नाही. म्हणून तुम्हाला काय भीती जर तुम्ही त्याच्या इच्छे प्रमाणे राहिलात तर?

प्रत्येकजण माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवणार नाही. आणि जे विश्वास ठेवणार नाहीत ते तिचा द्वेष करतील कारण ती त्यांना आवडणाऱ्या गोष्टीपासून त्यांना वंचित ठेवील. म्हणून माझ्या शिकवणी वरून कलह निर्माण होतील. ती जगाला अग्नीप्रमाणे पेटवील, आणि तिच्यातून संघर्ष वर येईलच. प्रत्येक घरात कलह होईल, पुत्रा विरुद्ध पिता, मुली विरुद्ध आई. माझी शिकवण कुटुंबातील ज्या लोकांना कळेल त्यांचा त्यांचे कुटुंब द्वेष करील, आणि त्यांची हत्त्याही करतील. कारण ज्याला माझी शिकवण समजेल त्याला पिता, माता किंवा बायको किंवा मुले, किंवा मालमत्ता यांमध्ये काही अर्थ असणार नाही.

त्यानंतर ते विद्वान सनातनी जेरुसलेमात एकत्र जमले आणि येशूकडे गेले जो जवळच्या एका खेड्यात होता. लोकांच्या एका जमावाने तो असलेल्या घरात गर्दी केली आणि घरा भोवती उभे राहिले.

सनातन्यांनी लोकांशी बोलायला सुरवात केली, ते सांगत होते की येशूची शिकवण ऐकू नका. ते म्हणाले की तो सैतानाने ताब्यात घेतला आहे, आणि जर माणसे त्याच्या

आज्ञांप्रमाणे वागली तर आता आहेत त्यापेक्षा जास्त वाईट गोष्टी घडतील. ते म्हणाले की तो वाईट साधनाने वाईट बाहेर काढतो.

येशूने त्यांना त्याच्या जवळ बोलावले आणि म्हणाला: तुम्ही म्हणता की मी वाईटाने वाईट बाहेर काढतो. परंतु कोणतीही शक्ती स्वतःचा नाश करीत नाही जर तिने स्वतःचा नाश केला तर तिचे अस्तित्व नष्ट होईल. तुम्ही धमक्या, देहदंड, आणि खून करून वाईट बाहेर काढायचा प्रयत्न करता, परंतु वाईट तरीही अस्तित्वात आहे कारण ते अचूकपणे स्वतःशी लढू शकत नाही. तुम्ही जसा प्रयत्न करता तसे मी वाईट वाईटाने बाहेर काढीत नाही.

सर्व मानवाला जीवन देणाऱ्या पित्याच्या आत्म्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी लोकांना बोलावून मी वाईटाला बाहेर काढतो. पाच आज्ञा त्या आत्म्याची इच्छा व्यक्त करतात, जो सुख आणि जीवन देतो. आणि म्हणून त्या वाईटांचा नाश करतात हाच त्या सत्य असल्याचा एक पुरावा आहे.

जर माणसे एका आत्म्याचे पुत्र नसते तर, जसे दांडग्या माणसाच्या घरात घुसणे आणि ते लुटणे शक्य नसते, तसे वाईटावर विजय मिळविणे शक्य झाले नसते. दांडग्या माणसाचे घर लुटण्यासाठी त्याला प्रथम बांधावे लागेल. आणि मानव त्यांच्या जीवनाच्या आत्म्यातील एकात्मतेने बांधला गेलेला आहे.


आणि म्हणून मी तुम्हाला असे सांगतो की माणसाच्या सर्व चुका आणि चुकीची मते शिक्षेतून वाचतील, पण सर्वांना जीवन देणाऱ्या पवित्र आत्म्याचा चुकीचा अर्थ लावलेला क्षमा केला जाणार नाही.

जर एखादा एका माणसाविषयी वाईट बोलत असेल तर ते त्याच्या विरुद्ध मोजले जाणार नाही, पण जर एखादा माणसातील पवित्र आत्म्या विरुद्ध बोलेल तर, त्याला त्याचा त्रास झाल्याशिवाय राहणार नाही. माझी हवी तेवढी निंदा करा, परंतु मी तुम्हाला उघड केलेल्या जीवनाच्या आज्ञा कमी लेखू नका. एखादा माणूस चांगल्याला वाईट म्हणून सुखरूप पुढे जाऊ शकत नाही.

माणूस जीवनाच्या आत्म्याशी एकरूप असलाच पाहिजे. जो त्याच्याशी एकरूप नाही तो त्याच्या विरुद्ध आहे. माणसाने फक्त एकट्या स्वतः मधील नव्हे तर जीवनाच्या आत्म्याची आणि सर्व माणसातील भलेपणाची सेवा केलीच पाहिजे.

एकतर तुम्ही जीवन आणि सुख सर्व जगासाठी चांगले आहे यावर विश्वास ठेवता, आणि सर्व माणसांसाठी जीवन आणि सुखावर तुम्ही प्रेम करता, किंवा तुमचा विश्वास आहे की जीवन आणि सुख हे वाईट असून, त्यावर स्वतःसाठी देखील तुम्ही प्रेम करीत नाही. एकतर तुम्ही एखादे झाड चांगले मानता आणि त्याचे फळ चांगले असते, किंवा शिवाय झाड वाईट आणि त्याचे फळ वाईट मानता. कारण झाडाची किंमत त्याच्या फळावरून ठरते.





६

“असत्य जीवन”

सत्य जीवन मिळवण्यासाठी, पृथ्वीवरच शरीराचे खोटे जीवन माणसाने सोडून दिले पाहिजे आणि आत्म्याने जगले पाहिजे.

“जसे स्वर्गात तसेच पृथ्वीवर”

एकदा त्याची आई आणि भाऊ येशूकडे आले, आणि त्याच्या भोवती पुष्कळ लोक असल्याने त्याच्या जवळ जाऊ शकले नाहीत. एका माणसाने त्यांना पाहून येशूकडे गेला आणि म्हणाला: तुझे कुटुंब, तुझी आई आणि भाऊ, तुला भेटण्यासाठी बाहेर उभे आहेत. परंतु येशू म्हणाला: माझी आई आणि माझे भाऊ, जे पित्याची इच्छा जाणतील आणि त्याप्रमाणे वागतील, ते आहेत.

आणि एक बाई उद्गारली: ज्याने तुला जन्म दिला ते उदर आणि तू जे शोषून प्यालेस ते स्तन धन्य आहेत! आणि येशू उत्तरला: फक्त तेच धन्य आहेत ज्यांनी पित्याचा आत्मा समजून घेतला आहे आणि आपल्या जवळ ठेवला आहे.

आणि एक माणूस येशूला म्हणाला: तू जेथे जाशील तेथे मी तुझ्या मागे येईन.

येशूने त्याला उत्तर दिले: माझ्या मागे येण्यासाठी तुला कोठेही जायची गरज नाही: मला घर नाही किंवा राहण्यासाठी कोणतीही जागा नाही. पशुंना त्यांच्या गुहा आणि लपण्याच्या जागा आहेत, परंतु आत्म्याने जगत असेल तर माणूस सर्वत्र घरांतच असतो

एकदा असे घडले की येशू त्याच्या शिष्यांसह बोटीने प्रवास करीत होता. तो म्हणाला: आपण पैलतिरास जाऊ या. त्या सरोवरात एक वादळ उठले आणि बोटीत इतके पाणी शिरु लागले की बोट जवळजवळ बुडाली. पण येशू शांतपणे पडून होता आणि झोपला होता. त्यांनी त्याला उठवलं आणि म्हणाले: प्रभू आम्ही जर बुडालो तर तुला त्याचे काहीच नाही? आणि जेव्हा वादळ शांत झाले तेव्हा तो म्हणाला: तुम्ही इतके भित्रे का आहात? तुमचा आत्म्याच्या जीवनात विश्वास नाही.

एका माणसाला येशू म्हणाला: माझ्या मागे ये.

परंतु तो माणूस उत्तरला: माझा पिता आहे तो वृद्ध आहे; मला त्याला मेल्यावर प्रथम पुरू दे आणि मग मी तुझ्या मागे येईन.

आणि येशू त्याला म्हणाला: मरणारे आहेत त्यांना मेलेल्यांना पुरू दे, परंतु जर तुला खरोखर जगायची इच्छा असेल तर पित्याची इच्छा पूर्ण कर आणि ती जाहीर कर.

दुसरा माणूस म्हणाला: मला तुझा शिष्य व्हायची आणि तुझ्या आज्ञे प्रमाणे पित्याची इच्छा पूर्ण करावी असे वाटते, परंतु प्रथम मला माझ्या कुटुंबातील कामांची व्यवस्था दे.

आणि येशू त्याला म्हणाला: जर नांगरणी करणारा मागे पहात असेल तर तो नांगरणी करू शकत नाही. जो पर्यंत तू मागे पहातोस तो पर्यंत तू नांगरणी करू शकत नाहीस. तुम्ही ज्या चरातून नांगरीत आहात त्या व्यतिरिक्त सर्व गोष्टी विसरून गेल्या पाहिजेत आणि मग तरच फक्त तुम्ही नांगरणी करू शकता. जर तुमच्या शारीरिक जीवनात घडून येणाऱ्या गोष्टींचा तुम्ही विचार करीत असाल तर तुम्ही जगू शकणार नाही, कारण खरे जीवन तुम्हाला समजलेले नाही. त्यानंतर असे घडले की येशू त्याच्या शिष्यांसह एका खेड्यात गेला, आणि एका मार्था नावाच्या बाईने त्याला तिच्या घरात बोलावले. तिला एक बहीण होती, मेरी, जी येशूच्या पायाशी बसली आणि त्याची शिकवण ऐकू लागली, तेव्हा मार्था त्यांच्यासाठी चांगले जेवण तयार करण्यात गुंतली होती.

आणि मार्था येशूकडे गेली आणि म्हणाली: माझ्या बहिणीने सर्व काम माझ्यावर टाकले आहे हे तुम्हाला दिसत नाही काय? तिला त्यात मला मदत करायला सांगा.

येशूने तिला उत्तर देत म्हटले: मार्था, मार्था! तूं स्वतःला व्यस्त ठेवले आहेस आणि अनेक गोष्टींची काळजी करतेस, परंतु एकच गोष्ट आवश्यक आहे; मेरीने ती एक आवश्यक गोष्ट निवडली आहे जी तिच्यापासून कोणी हिरावून घेऊ शकणार नाही. आत्म्याचे अन्न ही एक गोष्ट जीवनासाठी आवश्यक आहे.

आणि येशू त्यांना सर्वांना म्हणाला:

जो माझ्या मागे येऊ इच्छित असेल, त्याने त्याची स्वतःची इच्छा बाजूस ठेवली पहिजे आणि आयुष्यभर शरीराच्या सर्व प्रकारच्या अडचणी आणि दुःख सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे; फक्त तेव्हा तो मला अनुसरू शकेल. जो आपल्या शारीरिक जीवनाची काळजी घेइल तो त्याच्या खऱ्या जीवनाचा नाश करील, परंतु जो पित्याची आज्ञा पाळील, तो आपले शारीरिक जीवन नष्ट करील तरीही, आपले खरे जीवन वाचवील. आणि आपले खरे जीवन गमावले किंवा त्याची हानी केली व सर्व जग मिळवले तर माणसाला त्याचा काय फायदा?

आणि तो म्हणाला: श्रीमंती पासून सावध रहा, कारण दुसऱ्यांपेक्षा जास्त संपत्ती असण्यावर तुमचे जीवन अवलंबून नाही.

एक श्रीमंत माणूस होता त्याचे खूप मोठे पीकपाणी होते. आणि त्याने स्वतःशी विचार केला, मी माझी कोठारे नव्याने आणि मोठी बांधीन आणि माझे सर्व धान्य त्यात ठेवीन, आणि माझ्या आत्म्याला म्हणेन: माझ्या आत्म्या तुझी इच्छा होती ते सर्व तुझ्याकडे आहे, विश्रांती घे, खा, पी आणि तुझ्या सुखासाठी जग. परंतु देव त्याला म्हणाला: मुर्ख माणसा, आज रात्री तुझा आत्मा काढून घेतला जाईल आणि जे सर्व तू साठवले आहे ते दुसऱ्यांकडे जाईल. म्हणून असे सर्वांसाठी होईल जे आपल्या शारीरिक जीवनाला पुरवठा करतील पण देवामध्ये राहणार नाहीत.

आणि येशू त्यांना म्हणाला: तुम्ही मला सांगा की पिलाताने गॅलीलीकरांना मारले. ते गॅलीलीकर त्यांच्यासाठी असे व्हावे इतके इतरांपेक्षा वाईट होते का? मुळीच नाही. आपण सर्व तसेच आहोत आणि मृत्युपासून मुक्ती मिळाल्याशिवाय आपण सर्व नाश पावणार

आहोत. किंवा जी अठरा माणसे कोसळणाऱ्या मनोऱ्याखाली चिरडली गेली ती, जेरुसलेमातील इतर लोकांपेक्षा अधिक वाईट होती का? मुळीच नाही. जर आपण स्वतःला मृत्युपासून वाचवले नाही तर, आज किंवा उद्या आपण सुध्दा नाश पावणार आहोत.

जर आता पर्यंत त्यांच्या प्रमाणे आपण मेलो नाही, आपण आपल्या स्थितीचा असा विचार केला पाहिजे:

एका माणसाचे एक सफरचंदाचे झाड त्याच्या बागेत आहे आणि तो झाड बघायला आला आणि त्याला झाडावर एकही फळ दिसले नाही. आणि तो माळयाला म्हणाला: मी येथे येण्याचे हे तिसरे वर्ष आणि हे सफरचंदाचे झाड नेहमीच फळाशिवाय दिसते. ते कापून टाकले पाहिजे, कारण त्याने निरुपयोगीपणे जागा अडवून ठेवली आहे. परंतु तो माळी म्हणाला: मालक थोडा काळ थांबूया. मी त्याच्या भोवती खोदतो, खत घालतो, आणि आपण पुढच्या उन्हाळयात बघू. कदाचित त्याला फळ येईल, जर आले नाही तर , कापून टाका.

म्हणून आम्ही सुद्धा तसेच जोपर्यंत शरीराने जिवंत आहोत, पण आत्म्याच्या जीवनाचे फळ धारण करीत नाही तोपर्यंत, आपण फळ न धरणारी सफरचंदाची झाडे आहोत. फक्त कोणाच्यातरी कृपेने आपल्याला एक वर्ष सुटका मिळालेली आहे. पण जर आम्ही फळ धारण केले नाही तर, कोठारे बांधणाऱ्या मालका प्रमाणे, गॅलेलीकरांप्रमाणे, कोसळणाऱ्या मनोऱ्याखाली चिरडलेल्या अठरा माणसांप्रमाणे मरून जाऊ आणि कायमचे मृत राहू.

हे समजण्यासाठी शहाणपणाची गरज नाही, प्रत्येकजण स्वतःच ते पाहू शकतो. फक्त घरगुती कामातच नव्हे तर जगात घडणाऱ्या आणि पुढे येतील असे तर्काने अनुमान काढता येणाऱ्या सर्व गोष्टी मध्ये पाहू शकतो. जर पश्चिमेकडून वारा असेल तर पाऊस येणार असे आपण म्हणतो आणि तसे घडते. परंतु दक्षिणेकडून वारा असेल तर चांगले वातावरण असते, आणि तसेच घडते. आपण हवामाना संबंधी जे सांगू शकतो पण आपण मरून नाश

पावणार आहोत आणि फक्त आत्म्याच्या जीवनात त्याच्या इच्छेच्या पूर्ततेत आपली मुक्ती आहे हे कसे पाहू शकत नाही?

आणि पुष्कळ लोक येशूच्या मागे गेले, आणि तो पुन्हा त्या सर्वांना म्हणाला:

माझा अनुयायी कोण असेल, जो आपले आई, वडील, पत्नी, मुले, भाऊ, बहिणी, आणि आपली सर्व संपत्ती, आपल्या मनातून काढून टाकील आणि तो सदैव कोणत्याही गोष्टीसाठी तयार असेल. तोच फक्त मी करतो ते करील आणि माझी शिकवण अनुसरून त्याला स्वतःला मृत्यूपासून वाचवू शकेल.

कारण प्रत्येक मनुष्य कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी हा विचार करतो की आपण करणार आहोत ते फायदेशीर आहे की नाही; जर फायदेशीर वाटत असेल तर तो ते करतो, परंतु जर फायद्याचे वाटत नसेल तर ते सोडून देतो. प्रत्येक माणूस जो घर बांधतो तो प्रथम बसतो आणि आपल्या जवळ किती आहेत, किती खर्च होईल याचा हिशोब करतो आणि तो ते पूर्ण करू शकेल की नाही हे पाहतो; असे होता कामा नये की घर बांधायला सुरुवात केल्या नंतर पूर्ण करता आले नाही, म्हणून आपण हास्यास्पद ठरु.

म्हणूनच जो कोणी शारीरिक जीवन जगू इच्छितो त्याने प्रथम विचार करावा की त्याने ठरवलेली कामे कशी पूर्ण होणार आहेत.

प्रत्येक राजा जो युध्दावर जायची इच्छा करतो तो प्रथम विचार करतो की तो वीस हजार लोकांविरुद्ध फक्त दहा हजार लोकांनीशी जाऊ शकेल की नाही. जर त्याला दिसले की त्याला शक्य नाही, तर तो तह करण्यासाठी एक वकील पाठवील, आणि युद्धावर जाणार नाही.

म्हणून प्रत्येक माणसाने, शारीरिक जीवनाला स्वतःला वाहून घेण्यापूर्वी, लक्षात घ्यावे की तो मृत्यूचा प्रतिकार करू शकतो की त्याच्यापेक्षा मृत्यू जास्त मजबूत आहे, आणि तो अधिक चांगला नसेल तर त्याने ताबोडतोब समेट करावा.

तुमच्यापैकी प्रत्येकाने प्रथम जे तुम्हाला आपले स्वतःचे वाटते त्याचा सर्वांचा हिशोब करावा: कुटुंब, पैसे, आणि मालमत्ता. जेव्हा यासर्व गोष्टींचा आपल्याला काय उपयोग आहे, आणि हे जाणतो की त्यांचा काहीच उपयोग नाही, तेव्हा फक्त मग तो माझा अनुयायी होऊ शकतो.

आणि हे ऐकून, एक माणूस म्हणाला: आत्म्याचे जीवन असेल तर चांगले आहे. परंतु आम्ही सर्व सोडून दिले आणि तसे काही जीवन नसेल तर?

त्यावर येशूने उत्तर दिले: तसे नाही. प्रत्येक जणाला आत्म्याच्या जीवनाविषयी माहीत आहे. तुम्हाला सर्वांना ते माहीत आहे. तुम्हाला जे माहीत आहे ते तुम्ही आचरणात आणीत नाही, तुम्हाला शंका आहे म्हणून नव्हे, तर तुम्हाला स्वतःला तुमच्या खोट्या चिंता आणि सबबीने खऱ्या जीवनापासून दूर नेले आहे. तुम्ही जे काही करता ते असे आहे: एका श्रीमंत माणसाने जेवण तयार केले आणि पाहुण्यांना बोलावणी पाठवली, परंतु त्यानी नकार द्यायला सुरुवात केली. एक म्हणाला; मी काही जमीन खरेदी केली आहे आणि मला ती पाहायला जावेच लागेल. दुसरा म्हणाला: मी काही बैल खरेदी केले आहेत आणि ते वापरून पहायचे आहेत. एक तिसरा म्हणाला: मी लग्न केले आहे आणि मला लग्नाची मेजवानी दिलीच पाहिजे. आणि नोकर परत आले आणि मालकाला सांगितले की कोणीही येणार नाही. नंतर मालकाने त्याच्या नोकरांना गरीब लोकाना बोलवायला पाठवले, आणि ते नकार न देता आले. आणि ते आल्यावर आणखी काही जागा रिकामी राहिली, म्हणून मालकाने दुसऱ्यांना बोलवायला पाठवले, म्हणाला: जा आणि तुम्हाला भेटेल त्याचे माझ्याकडे जेवणाला येण्यासाठी मन वळवा, म्हणजे आणखी काही पाहुणे मिळतील. परंतु ज्यांनी कामात असल्याचे सांगून नकार दिला त्यांचे जेवण हुकले.

सगळ्या लोकांना माहीत आहे की पित्याच्या इच्छेची पुर्तता जीवन देते, परंतु ते त्याचे आमंत्रण स्वीकारीत नाहीत कारण श्रीमंतीला फसून ते दूर लोटले जातात. जो क्षणभंगुर खोटी श्रीमंती पित्याच्या इच्छेला अनुसरून खऱ्या जीवनासाठी सोडून देतो, तो हुशार कारभाऱ्यासारखी कृती करतो.

एका श्रीमंत मालकाचा एक कारभारी होता. त्या कारभाऱ्याच्या लक्षात आले की त्याचा मालक त्याला लवकरच कामावरून काढून टाकणार आहे आणि त्याला अन्न व निवाऱ्या वाचून रहावे लागणार आहे. आणि त्याने स्वतःशी विचार केला. मी असे करीन. मी गुप्तपणे माझ्या मालकाचा काही माल गरीब शेतकऱ्यांना देईन आणि त्यांची कर्जे कमी करीन, आणि मग माझा मालक मला काढून टाकील तेव्हा गरीब लोक माझा दयाळूपणा लक्षात ठेवतील आणि मला मदत करतील. आणि त्याने तसे केले. त्याने ज्या गरीब लोकांची त्याच्या मालकाकडे कर्जे होती त्यांना बोलावले, आणि त्यांची सुटपत्रे पुन्हा लिहिली. ज्याने त्याचे शंभर द्यायचे होते त्याचे पन्नास केले; साठाच्या ऐवजी वीस केले, आणि इतरांसाठी तसेच केले. जेव्हा मालकाने हे ऐकले तेव्हा तो स्वतःशी म्हणाला: माझा कारभारी हुशारीने वागला आहे, कारण त्याला माहीत आहे की त्याच्याकडे काहीच राहणार नाही. त्याने माझा तोटा केला आहे, परंतु तो स्वतःसाठी हुशारीने वागला आहे. कारण शारीरिक जीवनात काय फायदेशीर आहे ते आपल्याला कळते, पण आत्म्याच्या जीवनात आपल्याला समजून घ्यायची इच्छा नसते. आपण या जीवनातील क्षणभंगुर व खोटी श्रीमंती आत्म्याचे जीवन मिळवण्यासाठी सोडून दिली पाहिजे. जर आपण आत्म्याच्या जीवनासाठी श्रीमंती सारख्या क्षुल्लक गोष्टी सोडण्यास नकार दिला, तर आपल्याला ते मिळणार नाही. जर आम्ही खोटे जीवन सोडून दिले नाही तर आपले खरे जीवन आम्हाला दिले जाणार नाही.

एकाच वेळी दोन धन्यांची सेवा करणे संभवनीय नाही-देव आणि श्रीमंती; पित्याची इच्छा आणि तुमची स्वतःची इच्छा. तुम्ही दोघांपैकी एकाचीच, पहिल्याची किंवा दुसऱ्याची सेवा कराल.

सनातन्यांनी ते ऐकले, आणि त्यांना संपत्तीचे प्रेम असल्याने त्यांनी त्याची चेष्टा केली.

परंतु तो त्यांना म्हणाला: तुमच्या संपत्तीमुळे लोक तुमचा आदर करतात म्हणून तुम्ही खरोखर आदरणीय आहात असे तुम्हाला वाटते. ते तसे नाही. देव बाह्य गोष्टीकडे नाही, तर हृदयात पाहतो. जे लोकांच्या दृष्टीने आदरणीय असते ते देवाच्या नजरेत तिरस्करणीय असते. आता सुद्धा देवाचे राज्य या पृथ्वीवर प्राप्त करणे शक्य आहे, आणि जे

त्यात प्रवेश करतात ते थोर आहेत. आणि त्या राज्यात प्रवेश करणारे श्रीमंत नव्हे, तर ज्यांच्याकडे काहीच नाही असे आहेत. तुमच्या आणि मोजेसच्या आणि प्रेषितांच्या कायद्या प्रमाणे हे नेहमी असेच होते. ऐका, गरीब आणि श्रीमंत, तुमच्या श्रद्धे प्रमाणे सुद्धा कसे ठरतात ते पहा.

एक श्रीमंत माणूस होता, जो चांगल्या कपड्यात सजे आणि स्वतःचे मनोरंजन करायला जाई आणि दररोज आनंदात रहात असे. आणि तेथे एक लाझारस नावाचा जखमांनी भरलेला भिकारी रहात होता, जो श्रीमंत माणसाच्या परसात त्याच्या मेजावानीतून काही उरलेले मिळेल म्हणून आला होता; परंतु लाझारसला तेही मिळाले नाही कारण श्रीमंत माणसाच्या कुत्र्यांनी ते खाऊन टाकले व त्याच्या जखमाही चाटल्या. आणि लाझारस आणि तो श्रीमंत माणूस दोघेही मरण पावले. आणि नरकात त्या श्रीमंत माणसाने पाहिले की दूरवर अब्राहम बरोबर भिकारी लाझारस बसलेला आहे. आणि तो श्रीमंत माणूस ओरडला: पित्या आब्राहमा, भिकारी लाझारस तुझ्या बरोबर बसला आहे, जो माझ्या कुंपणाच्या पलीकडे पडलेला असायचा. मी तुम्हाला त्रास द्यायची हिंमत करणार नाही; परंतु भिकारी लाझारसला माझ्याकडे पाठवा: तो त्याची बोटे पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करील, कारण मी आगीत जळत आहे. परंतु अब्राहम म्हणाला: मी लाझारसला आगीत तुझ्याकडे का पाठवू? पृथ्वीवर तुझ्या इच्छेप्रमाणे तुला मिळालेले आहे, परंतु लाझारसला फक्त दुःख मिळालेले आहे, आता त्याला सुख मिळालेच पाहिजे. आणि जरी मला तसे कारावेसे वाटले, तरी मी त्याला तुझ्याकडे पाठवू शकत नाही, कारण आमच्या आणि तुझ्या मध्ये मोठी दरी आहे ती ओलांडणे अशक्य आहे. आम्ही जिवंत आहोत आणि तू मृत आहेस. तेव्हा तो श्रीमंत माणूस म्हणाला: ठीक, पित्या आब्राहमा, लाझारसला किमान माझ्या घरी पाठवा. मला पाच भाऊ आहेत आणि मला त्यांच्यासाठी वाईट वाटते. त्याला त्यांना सर्व सांगू दे, आणि श्रीमंती किती त्रास दायक असते हे त्यांना दाखवू दे, किंवा ते सुद्धा या छळात पडतील. पण अब्राहम म्हणाला: त्यांना ते अगोदरच माहीत आहे की ते त्रासदायक आहे. मोजेस आणि सर्व प्रेषितांनी त्याना तसे सांगितले आहे. परंतु तो श्रीमंत माणूस म्हणाला: तरीही, एखादा मेलेल्यांतून उठून त्यांच्याकडे जाईल तर बरे होईल, ते त्यानंतर लक्षात

घेतील. परंतु अब्राहम म्हणाला: जर ते मोजेस आणि प्रेषितांचे ऐकत नसतील, तर ते मेलेल्यातून उठलेल्याचेही ऐकणार नाहीत.

माणसाने आपल्या भावाशी वाटून घेतलेच पाहिजे आणि सर्व माणसाचे भले करणे हे प्रत्येकाला माहीत असते. मोजेस आणि प्रेषितांचा सर्व कायदा तेच फक्त सांगतो. तुम्हालाही ते माहीत आहे, परंतु तुम्ही तो पाळत नाही कारण तुम्ही श्रीमंतीवर प्रेम करता.

आणि एक श्रीमंत सनातनी अधिकारी येशूकडे आला आणि त्याला म्हणाला: तुम्ही चांगले गुरु आहात. चिरकालीन जीवन मिळवण्यासाठी मी काय करावे? येशू त्याला म्हणाला: तू मला चांगला का म्हणतोस? फक्त पिताच चांगला आहे. जर तुला जीवन हवे असेल तर, आज्ञा पूर्ण कर.

तो अधिकारी म्हणाला: आज्ञा पुष्कळ आहेत मी कोणत्या पूर्ण कराव्यात?

आणि येशू म्हणाला: हत्त्या करू नको, लालसा बाळगू नको, खोटे बोलू नको, चोरी करू नको, आपल्या पित्याचा आदर कर आणि त्याची इच्छा सुद्धा पूर्ण कर, आणि स्वतःप्रमाणे आपल्या शेजाऱ्यावर प्रेम कर. आणि तो सनातनी अधिकारी म्हणाला: मी लहान असल्यापासून त्या सर्व आज्ञा पाळल्या आहेत: परंतु मी तुमच्या शिकवणी प्रमाणे आणखी काय करायला पाहिजे? येशूने त्याच्याकडे आणि त्याच्या कपड्यांकडे पाहिले, स्मित केले आणि म्हणाला: एक लहानशी गोष्ट तू अजून केली नाहीस. तू म्हणतोस तशा सर्व गोष्टी तू पूर्ण केल्या नाहीस. जर तुला आज्ञा पूर्ण करायच्या असतील: हत्त्या करू नको, मोह धरू नको, चोरी करू नको, खोटे बोलू नको, आणि मुख्य आज्ञा, स्वतःप्रमाणे तुझ्या शेजाऱ्यावर प्रेम कर- मग तुझी सर्व मालमत्ता ताबडतोब विक आणि गरिबांना देऊन टाक. तरच तू पित्याची इच्छा पूर्ण करशील.

हे ऐकून, तो अधिकारी रागावला आणि निघून गेला, कारण आपली मालमत्ता सोडून द्यायची ह्याचा तो तिरस्कार करीत होता. आणि येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: जसे तुम्ही पहात आहात, श्रीमंत असून पित्याची इच्छा पूर्ण करणे अगदीच असंभवनीय आहे.

त्या शब्दांनी शिष्य भयभीत झाले, परंतु येशूने त्याचा पुनरुचार केला, आणि म्हणाला: होय, मुलांनो, ज्याच्याकडे श्रीमंती आहे त्याला पित्याच्या इच्छेत राहणे असंभवनीय आहे. श्रीमंतीत विश्वास ठेवणारा पित्याची इच्छा पूर्ण करण्यापेक्षा एखादा उंट सुईच्या नेठ्यातून लवकर आरपार जाईल. आणि ते अजून अधिकच भयभीत झाले आणि म्हणाले: मग एखादा संपत्ती शिवाय आपले जीवन कसे जोपासू शकेल?

परंतु तो म्हणाला: माणसाला वाटते की तो संपत्ती शिवाय आपल्या जीवनाला आधार देऊ शकत नाही, परंतु देव संपत्ती शिवाय माणसाचे जीवन टिकवून ठेवतो.

एकदा येशू जेरीकोच्या शहरातून जात होता. आणि झाकाएस नावाचा एक श्रीमंत मोठा कर अधिकारी तेथे राहत होता, ज्याने येशूच्या शिकवणी बद्दल ऐकले होते, आणि त्याचा तिच्यावर विश्वास होता, आणि जेव्हा त्याला कळले की येशू जेरीकोमध्ये आला आहे त्याला येशूला भेटायची इच्छा झाली. परंतु येशूभोवती एवढा जमाव होता की त्यातून येशू पर्यंत पोहोचणे असंभव होते. झाकाएस हा बुटका माणूस होता, म्हणन तो धावत पुढे गेला आणि येशूला जातांना पाहता यावे म्हणून एका झाडावर चढला. जेव्हा त्या झाडाखालून जातांना येशूने त्याला पहिले, आणि त्याचा आपल्या शिकवणीवर विश्वास आहे हे जाणून म्हणाला: झाडावरून खाली ये आणि घरी जा. मी तुझ्याकडे येईन. झाकाएस खाली उतरला, घरी धावला, येशूचे स्वागत करायला तयार झाला, आणि त्याचे आनंदाने स्वागत केले.

लोकांना ते आवडले नाही आणि ते येशू विषयी म्हणाले: का, तो जकातदार, बदमाशाच्या घरी गेला!

त्याचवेळी झाकाएस येशूला सांगत होता: पहा, प्रभू, मी काय करणार आहे: मी माझी अर्धी संपत्ती गरिबांना देईन, आणि उरलेल्या मधून मी ज्यांचे नुकसान केले आहे त्या सर्वांची चारपट भरपाई करीन.

आणि येशू म्हणाला: तू स्वतःला वाचवले आहेस. तू मेला होतास पण जिवंत झाला आहेस; तू हरवला होतास पण, स्वतःला सापडला आहेस, कारण स्वतःच्या मुलाचा बळी

देण्याएवढा विश्वास दाखवणाऱ्या अब्राहमा प्रमाणे तू वागला आहेस. कारण आपाल्या आत्म्यातील जे नाश पावेल ते शोधून वाचवणे यातच माणसाचे सारे जीवन आहे. एखादे बलिदान त्याच्या आकारावरून मोजता येणे शक्य नाही.

एकदा असे घडले की येशू त्याच्या शिष्यांसह दानपेटी जवळ बसला होता. लोक देवाच्या सेवेसाठी पेटीत वर्गणी टाकीत होते. श्रीमंत माणसे पेटी पर्यंत गेली आणि खूप दान टाकले, आणि एक गरीब विधवा आली आणि तिने दोन पैसे(फार्दिंग) टाकले.

आणि येशू तिच्याकडे दाखवीत म्हणाला: पहा, ही गरीब विधवा, एक भिकारी बाई, तिने दोन पैसे टाकले आहेत, आणि तिने इतर सर्वांपेक्षा जास्त दिले आहे. कारण त्यांनी दिले त्याची त्यांना आवश्यकता नव्हती, परंतु तिने आपल्या जवळ असलेले सर्व दिले आहे; तिने आपली सर्व मिळकत त्यात टाकली आहे.

असे घडले की येशू सिमोन नावाच्या कुष्ठरोग्याच्या घरी गेला.

आणि एक बाई त्याच्या घरी आली आणि तिच्याकडे तीस पौंड किमतीची मौल्यवान तेलाची एक बरणी होती. येशू आपल्या शिष्यांना सांगत होता की त्याचा मृत्यू जवळ आला आहे, आणि त्या बाईने ते ऐकले आणि तिला त्याच्यासाठी दुःख वाटले, आणि त्याच्यावरील आपले प्रेम दाखवण्यासाठी तिने त्याच्या डोक्यावर तेल ओतले. आणि ती सर्व विसरून गेली, आणि तिची बरणी फुटली, आणि सर्व तेल ओतून त्याचे डोके आणि पाय या दोहोंवर तिने अभिषेक केला.

आणि शिष्यांनी त्यावर चर्चा सुरु केली. आणि म्हणाले की ती चुकीचे वागली. आणि ज्युदास, नंतर ज्याने नंतर येशूचा विश्वासघात केला, म्हणाला: पहा तिने किती अपव्यय केला आहे. ते तेल तीस पौंडांना विकले गेले असते, ज्याच्या मुळे अनेक गरीब लोकांना कपडे देणे शक्य झाले असते. आणि शिष्यांनी त्या बाईला दोष द्यायला सुरुवात केली, जी गोंधळून गेली आणि आपण चांगले केले की वाईट हे तिला कळले नाही.

तेव्हा येशू म्हणाला: तुम्ही त्या स्त्रीला त्रास देऊन चूक करीत आहात; तिने खरोखरच एक चांगले काम केले आहे, आणि तुम्ही गरिबांविषयी बोलून चूक करीत आहात.

जर तुम्हाला त्यांचे काही भले करायचे असेल तर, करा-ते नेहमी येथे आहेत. परंतु त्यांच्याविषयी आता का बोलता आहात? जर तुम्हाला गरिबांची दया येत असेल तर, तुमच्या दयेने जाऊन त्यांचे भले करा. परंतु या बाईने माझ्यावर दया केली आहे, आणि खरोखरच चांगले केले आहे, कारण तिच्याजवळ असलेले सर्व तिने दिले आहे. कशाची गरज आहे आणि कशाची नाही हे तुमच्यापैकी कोण सांगणार? माझा तेलाने अभिषेक करण्याची गरज नव्हती हे तुम्हाला कसे ठाऊक? माझे शरीर पुरायला तयार करण्यासाठी तिने ते माझ्यावर ओतले, आणि म्हणून ते पाहिजे होते. तिने स्वतःला विसरून आणि दुसऱ्यावर दया करून खरोखर पित्याची इच्छा पूर्ण केली आहे. ती तिचे प्रापंचिक काम विसरली आणि तिच्याजवळ असलेले सर्व देऊन बसली.

आणि येशू म्हणाला: माझी शिकवण ही पित्याच्या इच्छेप्रमाणे करण्याची आहे, आणि त्याची इच्छा फक्त कृतीनेच पूर्ण करणे शक्य आहे, आणि फक्त शब्दांनी नव्हे. जर एखाद्या माणसाचा मुलगा आपल्या बापाच्या मागण्याला सांगत असेल, ’मी करीन, मी करीन’, आणि बाप सांगत असलेले करीत नसेल, तर तो त्याच्या पित्याची इच्छा पूर्ण करीत नाही. परंतु दुसरा मुलगा सांगत असेल: ‘मला आज्ञा पाळायची इच्छा नाही’, परंतु नंतर जाऊन आपल्या पित्याची आज्ञा पाळीत असेल-तर तो खरोखरच पित्याची इच्छा पूर्ण करतो. तसेच माणसांचे आहे: जो फक्त म्हणतो मी पित्याच्या इच्छे प्रमाणे वागतो तो नव्हे तर जो पित्याची इच्छा पूर्ण करण्याची कृती करतो तो पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो.

मी आणि पिता एकच आहोत

पित्याची इच्छा पूर्ण करणे हे चिरकालीन जीवनाचे खरे अन्न आहे.

“दररोजची भाकर आम्हाला दे”

त्यानंतर येशूला मृत्युदंडाची शिक्षा द्यावी असे ज्यू लोकांना वाटले, आणि तो दूर गॅलीलीत गेला आणि त्याच्या नातेवाईकांसह राहिला.

ज्यू लोकांचा (टेबरनेकल) मंडपाचा सण जवळ आला, आणि येशूच्या भावांनी सणाला जायची तयारी केली, आणि त्याला आपल्या सोबत येण्यासाठी बोलावले. त्यांचा त्याच्या शिकवणीवर विश्वास नव्हता आणि ते त्याला म्हणत: तू म्हणतो ज्यूंची देवाची सेवा करण्याची पद्धत चुकीची आहे आणि तुला देवाची सेवा कृतीने करायचा खरा मार्ग माहीत आहे. जर तुला खरेच वाटत असेल की इतर कोणाला नाही तर तुलाच देवाची सेवा कशी करायची ते माहीत असेल तर आमच्या बरोबर सणाला ये. तेथे पुष्कळ लोक असतील आणि त्या सर्वांसमोर तू मोजेसची शिकवण चुकीची आहे असे जाहीर करू शकतोस. जर त्या सर्वांनी तुझ्यावर विश्वास ठेवला तर, तुझ्या शिष्यांना कळेल की तू बरोबर आहेस. स्वतःला लपवून का ठेवतोस? तू म्हणतो आमची सेवा चुकीची आहे, आणि तुला देवाची खरी सेवा माहीत आहे: ठीक मग, ती प्रत्येक जणाला दाखव.

आणि येशू म्हणाला: तुमच्यासाठी देवाची सेवा करायची विशेष वेळ आणि स्थळ आहे, परंतु माझ्यासाठी तसे काही नाही. मी देवासाठी सर्व ठिकाणी आणि नेहमी काम करतो. तेच मी जे मी लोकांना दाखवतो. मी त्यांना दाखवतो की त्यांची देवाची सेवा चुकीची आहे आणि म्हणूनच ते माझा द्वेष करतात. तुम्ही सणाला जा, आणि मी तयार होईन तेव्हा मी जाईन. आणि त्याचे भाऊ गेले, परंतु तो मागे राहिला, आणि फक्त सणाच्या मध्यावर तेथे गेला.

तो यायला उशीर करून त्यांच्या सणाचा आदर करीत नाही म्हणून ज्यूंना धक्का बसला, आणि त्यांनी त्याच्या शिकवणीविषयी वादविवाद केला. काही म्हणाले की तो बरोबर होता, तर दुसरे म्हणाले की तो फक्त लोकांना भडकावतो.

सणाच्या मध्यावर येशू देवळात गेला आणि त्याने त्यांची देवाची सेवा चुकीची आहे असे शिकवायला सुरुवात केली, आणि देवाची सेवा देवळात आणि बळी देऊन नव्हे , तर आत्म्याने आणि कृतीने करायची आहे.

त्या सर्वानी त्याचे ऐकले आणि त्यांना आश्चर्य वाटले की त्या, एका अनपढ माणसाला एवढे शहाणपण आहे. आणि येशू, त्याच्या शहाणपणाने सर्वांना आश्चर्य वाटले हे

जाणून, त्यांना म्हणाला: माझी शिकवण ही माझे स्वतःची नाही, तर ज्याने मला पाठवले त्याची आहे. जर एखाद्या माणसाला आपल्याला जीवनात पाठवणाऱ्या आत्म्याची इच्छा पूर्ण करायची असेल तर, त्याला कळेल की मी ही शिकवण शोधून काढली नसून ती देवाची आहे. कारण जो माणूस स्वतःमधून शोधून काढतो तो स्वतःच्या कल्पनाशक्तीनुसार वागतो, परंतु जो त्याला ज्याने पाठवले आहे त्याचे मन जाणण्यासाठी शोध घेतो तो खरा असतो आणि त्याच्यात खोटेपणा नसतो.

तुमचा माजेसचा कायदा हा पित्याचा कायदा नाही, आणि म्हणून जे त्याला अनुसरतात ते पित्याचा कायदा पाळीत नाहीत, तर वाईट करतात आणि खोटेपणा सांगतात. मी तुम्हाला फक्त पित्याच्या इच्छेची पूर्तता शिकवतो. माझ्या शिकवणीत विरोधाभास असू शकत नाहीत, परंतु तुमचा मोजेसचा लिखित कायदा विरोधाभासाने भरलेला आहे. बाह्य देखाव्यावरून नव्हे तर आत्म्यावरून पारख करा. आणि काही म्हणाले: ते म्हणाले तो बनावट प्रेषित होता, परंतु तो कायद्याचा निषेध करतो आणि कोणीही त्याला काहीही बोलत नाही. कदाचित तो खरोखर खरा प्रेषित असेल आणि राजकर्त्यांनी त्याला मान्यता दिली असावी. परंतु त्याच्यावर विश्वास न ठेवण्यासाठी एक कारण होते: असे लिखित होते की जेव्हा देवाचा संदेष्टा येईल तेव्हा तो कोठून आला हे कोणाला कळणार नाही, परंतु हा माणूस कोठे जन्माला ते आणि त्याचे सर्व कुटुंब आम्हाला ठाऊक आहे.

लोकांना अजूनही त्याची शिकवण समजली नाही, आणि अजून ते पुराव्यांचा शोध घेत होते.

तेव्हा येशू त्यांना म्हणाला: तुम्ही मला ओळखता, आणि शरीराने मी कोठून आलो ते तुम्हाला माहीत आहे, परंतु आत्म्याने मी कोठून आलो ते तुम्हाला ठाऊक नाही, आणि ती एक गोष्ट माहीत असणे आवश्यक आहे. जर मी म्हटले असते: ‘मी ख्रिस्त आहे’ तर तुम्ही माझ्यावर माणूस म्हणून, विश्वास ठेवला असता, पण तुम्ही माझ्यात आणि तुमच्यामध्ये असलेल्या पित्यावर विश्वास ठेवला नसता. तुम्ही फक्त पित्यावर विश्वास ठेवावा.

म्हणून माझ्या छोट्याशा जीवन काळात मी ज्या जीवनाच्या उगमातून आलो आहे त्याचा मार्ग तुम्हाला दाखवतो. पण तुम्ही माझ्याकडे पुरावा मागता, आणि माझा निषेध करण्याची इच्छा धरता. जर तुम्हाला तो मार्ग माहीत नसेल तर, जेव्हा मी येथे नसेन तेव्हा तो तुम्हाला सापडणार नाही. तुम्ही माझी पारख करू नका तर माझे अनुसरण करा. तो जो कोणी मी सांगितल्या प्रमाने करील त्याला कळेल की मी जे सांगतो ते सत्य आहे की नाही. ज्याच्यासाठी शरीराचे जीवन हे केवळ आत्म्याचे खाद्य बनलेले नाही, जो तहानलेला माणूस पाणी शोधतो तसा सत्याचा शोध घेत नसेल, तो मला समजू शकणार नाही. ज्याला सत्याची तहान आहे, त्याला माझ्याकडे येऊ दे आणि पिऊ दे. आणि जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो सत्य जीवन प्राप्त करील. त्याला आत्म्याचे जीवन मिळेल.

आणि पुष्कळ लोकांनी त्याच्या शिकवणीवर विश्वास ठेवला आणि म्हणाले: तो जे काही सांगतो ते सत्य आहे, आणि देवाचे आहे. इतरांना तो समजला नाही, आणि ते त्याच्या देवाकडून पाठवले जाण्याचा पुरावा भविष्यवाणीमध्ये शोधत राहिले. आणि पुष्कळांनी त्याच्याशी वाद घातला पण कोणीही त्याला विरोध करू शकले नाही. सनातनी गुरुंनी त्यांच्या मदतनीसांना त्याच्याशी भांडायला पाठवले, पण हे मदतनीस त्यांच्याकडे परत गेले आणि म्हणाले: आम्ही त्याच्याशी काहीही करू शकत नाही.

आणि मुख्य धर्मगुरू म्हणाला: तुम्ही त्याला दोषी ठरवले नाही हे कसे? ते म्हणाले: तो बोलतो तसे आजवर कोणीही बोलला नाही.

मग ते सनातनी म्हणाले: याला काही महत्व नाही की तुम्ही त्याचे खंडन करू शकले नाहीत आणि लोक त्याच्या शिकवणीवर विश्वास ठेवतात. आम्ही तिच्यावर विश्वास ठेवीत नाही आणि कोणीही सत्ताधारी तिच्यावर विश्वास ठेवणार नाही. लोक हे शापित असतात, ते नेहमीच मुर्ख आणि अज्ञानी असतात, आणि कोणावरही विश्वास ठेवतात.

पण निकोदेमस, ज्याला येशूने आपली शिकवण समजावून दिली होती, तो मुख्य धर्मगुरुंना म्हणाला: एखाद्या माणसाचे ऐकून घेतल्याशिवाय आणि तो काय शिकवतो ते समजून घेतल्याशिवाय त्याचा निषेध करता येणार नाही.

परंतु ते त्याला म्हणाले: त्यात ऐकण्यासारखे किंवा समजून घेण्यासारखे काही नाही. आम्हाला माहीत आहे की गॅलीलीतून कोणी प्रेषित होऊ शकत नाही.

दुसऱ्या वेळी येशू सनातन्याशी बोलला आणि म्हणाला: माझ्या शिकवणीच्या सत्यतेचा पुरावा असू शकत नाही, जसे तुम्ही प्रकाशाला प्रकाशित करू शकत नाही. माझी शिकवण हा खरा प्रकाश आहे, ज्याच्यामुळे लोक चांगले काय आणि वाईट काय ते पाहू शकतात, आणि म्हणून माझी शिकवण सिद्ध करणे असंभव आहे; इतर सर्व गोष्टी तिच्यामुळे सिद्ध करता येतात. जो मला अनुसरेल तो अंधारात राहणार नाही तर जीवन मिळवील. जीवन आणि (Enlightenment) विवेकजागृती एक आणि समान आहेत.

परंतु सनातनी म्हणाले: तूच फक्त हे म्हणतोस. आणि त्याने उत्तर दिले: जरी मी एकटा म्हणतो, तरी मी बरोबर आहे, कारण मी कोठून आलो व कोठे जाणार हे मला माहीत आहे. माझ्या शिकवणीत जीवनाला अर्थ आहे, पण तुमच्या शिकवणी प्रमाणे तसे काहीच नाही. त्याशिवाय, मी एकटाच हे शिकवीत नाही, तर माझा पिता, आत्मा, देखील ते शिकवतो.

ते म्हणाले: तुझा पिता कोठे आहे?

त्याने उत्तर दिले: तुम्हाला माझी शिकवण समजत नाही किंवा माझा पिता कळत नाही. तुम्हाला तुम्ही कोठून आलात किंवा कोठे जाणार हे माहीत नाही. मी तुम्हाला मार्ग दाखवतो, परंतु माझ्या मागे येण्या ऐवजी तुम्ही मी कोण आहे त्याची चर्चा करता; आणि म्हणून त्या तारण आणि जीवन ज्या पर्यंत मी तुम्हाला घेऊन जाऊ इच्छितो तेथे तुम्ही पोहोचू शकत नाही. आणि तुम्ही या गैरसमजात राहिलात आणि मला अनुसरले नाही तर नाश पावाल.

ज्यूंनी त्याला विचारले: तू कोण आहेस?

तो म्हणाला: मी प्रथम शिकवायला सुरुवात केली तेव्हा तुम्हाला सांगितले आहे: मी मानवाचा पुत्र आहे, आत्म्याला माझा पिता मानून, त्याच्याकडून काय कळले ते मी जगाला सांगत आहे. आणि जेव्हा तुम्ही तुमच्या स्वतःमधील मानवाच्या पुत्राला मोठ्या

पदावर पोहोचवाल तेव्हा तुम्हाला मी कोण आहे ते कळेल, कारण मी माझ्या तर्फे माणूस म्हणून नव्हे तर, पित्याने मला शिकविले त्याप्रमाणे मी करतो आणि बोलतो. ज्याने मला पाठविले तो सदैव माझ्यामध्ये असतो, आणि मला सोडून जाणार नाही, कारण मी त्याच्या इच्छे प्रमाणे करतो. जो माझी जीवनाची समज लक्षात घेतो आणि पित्याची इच्छा पूर्ण करतो तोच खऱ्या अर्थाने माझ्याकडून शिकतो. सत्य जाणण्यासाठी तुम्ही माणसांचे कल्याण केले पाहिजे. जो माणसांना दुखावतो तो अंधारावर प्रेम करतो आणि त्याच्या दिशेने जातो; जो लोकांचे कल्याण करतो तो प्रकाशाकडे जातो. म्हणून माझी शिकवण समजण्यासाठी तुम्ही लोकांचे कल्याण केले पाहिजे. जो कल्याण करील तो सत्य जाणील, आणि तो वाईटापासून आणि मृत्यू पासून मुक्त होईल. कारण प्रत्येकजण जो चुकतो तो त्याच्या चुकांचा गुलाम होतो.

आणि गुलाम आपल्या धन्याच्या घरात नेहमी रहात नाही तर धन्याचा पुत्र राहतो, तसे एखादा माणूस त्याच्या जीवनात चुकतो आणि त्याच्या चुकांचा गुलाम बनतो तो नेहमी जिवंत राहत नाही तर मृत्यू पावतो. फक्त जो सत्यात असतो तो नेहमी जिवंत राहतो. सत्य जाणण्यासाठी गुलाम नव्हे तर पुत्र झाले पाहिजे. जर तुम्ही चुकाल, तर तुम्ही गुलाम व्हाल आणि आणि मराल: परंतु तुम्ही सत्यात असाल तर तुम्ही मुक्त पुत्र व्हाल आणि जिवंत राहाल. तुम्ही स्वतःला अब्राहामाचे पुत्र आणि तुम्हाला सत्य ठाऊक आहे असे म्हणविता. तरीही तुम्ही मला ठार मारू इच्छिता कारण तुम्हाला माझी शिकवण समजत नाही. आणि हे येथवर आले की, मी बोलतो जे माझ्या पित्याकडून मी जाणले आहे तर तुम्ही तुमच्या पित्याकडून जे जाणले आहे ते करू इच्छिता.

ते म्हणाले: आमचा पिता आब्राहाम आहे.

येशू त्यांना म्हणाला: तुम्ही आब्राहामाचे पुत्र असतात तर तुम्ही त्याची कृत्ये केली असती. परंतु तुम्ही मला ठार मारू इच्छिता कारण मी तुम्हाला मी देवाकडून जे शिकलो ते सांगतो. अब्राहम त्याप्रमाणे वागला नाही. तुम्ही देवाची नव्हे तर दुसऱ्याच पित्याची सेवा करता. ते त्याला म्हणाले: आम्ही अनौरस पुत्र नाही, आम्ही सारे एकाच पित्याचे पुत्र आहोत, आम्ही सर्व देवाची मुले आहोत.

आणि येशू त्यांना म्हणाला: जर तुमचा पिता माझा पिता एकच असता तर तुम्ही माझ्यावर प्रेम केले असते, कारण मी पित्यापासून आलो आहे; मी स्वतः जन्म घेतला नाही. तुम्ही माझ्यासह एका पित्याची मुले नाही, म्हणून तुम्हाला माझे शब्द समजत नाहीत आणि माझ्या जीवना विषयीच्या जाणीवेसाठी तुमच्याजवळ जागा नाही. जर मी पित्याचा आहे आणि तुम्हीही त्याच पित्याचे असता, तर तुम्ही मला ठार मारण्याची इच्छा बाळगली नसती, जर तुम्ही मला ठार मारण्याची इच्छा धरता तर आपण समान पित्याचे नाही.

मी भलेपणाचा पिता देव त्याच्या पासून आलो आहे: पण तुम्ही वाईटाचा पिता, सैतान त्या पासून आहात. तुम्हाला तुमच्या पित्याची जो खुनी आणि खोटारडा आणि ज्याच्यात सत्य नाही त्याची लालसा भागवायची इच्छा आहे. जर ते, सैतान, काही सांगते, तर ते सर्वांना सामायिक असलेले काही नसते, पण त्याचे स्वतःचे असते, आणि तो खोटेपणाचा पिता आहे. म्हणून तुम्ही सैतानाचे सेवक आणि त्याची मुले आहात.

तुम्ही पाहता किती सहज तुम्ही चुकांचे दोषी ठरता. जर मी चुकत असेन, तर मला दोषी ठरवा; पण जर माझ्यात दोष नसेल तर माझ्यावर का विश्वास ठेवीत नाही.

आणि ज्यूंनी त्याला शिवीगाळ करायला सुरुवात केली आणि म्हणू लागले की तो पछाडला होता. तो म्हणाला: मी पछाडलेला नाही. मी माझ्या पित्याचा आदर करतो, आणि तुम्ही मला ठार मारण्याची इच्छा धरता, ज्यावरून दिसते की तुम्ही माझे भाऊ नाही पण दुसऱ्या पित्याचे पुत्र आहात. ही मी खात्री देत नाही की मी बरोबर आहे, तर सत्य माझ्यासाठी बोलते. आणि म्हणून मी तुम्हाला पुन्हा सांगतो: जो माझी शिकवण आत्मसात करतो आणि त्याप्रमाणे वागतो तो मृत्यूला पाहणार नाही.

आणि ज्यू म्हणाले: आता, आम्ही तुला शोमरोनी आणि सैतान असलेले म्हणतो ते बरोबर नाही का? तू स्वतःला दोषी ठरवतोस!

प्रेषित मरण पावले, त्याच प्रमाणे आब्राहामही, तरी तू म्हणतोस की तुझी शिकवण पूर्ण करतील ते मृत्यू पाहणार नाहीत. आब्राहाम मरण पावला, आणि तू मरणार नाहीस काय? किंवा तू आब्राहामा पेक्षा मोठा आहेस का?

ज्यू चर्चा करायला लागले की तो-गॅलीलीचा येशू-महत्वाचा आहे किंवा महत्वहीन प्रेषित आहे, आणि हे विसरले की त्याने त्यांना सांगितले होते की तो स्वतः बद्दल माणूस म्हणून काही सांगत नाही तर त्याच्यात असलेल्या आत्म्याविषयी बोलतो.

आणि येशू म्हणाला: मी माझ्यातर्फे काहीच करीत नाही. जर मी स्वतःच कल्पना करतो त्याच्यातून बोललो असतो, तर मी जे सर्व काही सांगतो त्याला काहीच महत्व नसते. परंतु सर्व गोष्टींचा उगम असलेला ज्याला तुम्ही देव म्हणता तो आहे. मी त्याच्या संबंधाने बोलतो. खरा देव तुम्हाला माहीत नव्हता, आणि माहीत नाही. मला तो माहीत आहे आणि जर मी म्हटले की मला तो माहीत नाही तर मी तुमच्यासारखा खोटारडा ठरेन. मी त्याला जाणतो आणि त्याची इच्छा पूर्ण करतो. मी जे जाणले ते तुमचा पिता आब्राहामने पहिले आणि त्याने तो आनंदित झाला.

ज्यू म्हणाले: तू अजून तिशीचाही नाही: आब्राहामाच्या दिवसात तू कसा काय जिवंत असशील? त्याने उत्तर दिले: मी तुम्हाला सांगतो त्या चांगल्या गोष्टीची माहिती आब्राहामाच्या अस्तीत्वा पूर्वी होती.

मग ज्यूंनी त्याच्यावर फेकण्यासाठी दगड उचलले, परंतु तो तेथून निसटला. आणि रस्त्यावर, येशूने एक माणूस पाहिला ज्याला त्याच्या जन्मा पासून आकलन क्षमता नव्हती.

आणि त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले: या माणसाला त्याच्या जन्मापासून आकलन क्षमता नाही हा कोणाचा दोष आहे? तो, किंवा त्याचे पालक ज्यांनी त्याला शिकवले नाही त्यांचा?

आणि येशू म्हणाला: त्याचे पालक किंवा खोटेपणा यापैकी कोणाचाही दोष नाही. ही देवाची करणी आहे, की जेथे अंधार होता तेथे प्रकाश व्हावा. जर माझ्याकडे शिकवण आहे, तर ती जगाचा प्रकाश आहे.

आणि येशूने त्या अज्ञानी माणसाला समजावून दिले की तो आत्म्याने देवाचा पुत्र होता, आणि ही शिकवण मिळाल्यावर त्या अज्ञानी माणसाला प्रकाशाची जाणीव झाली. जे त्याला पूर्वी ओळखत होते त्यांनी त्याला ओळखले नाही. जरी तो होता तसाच दिसत असला तरी आता तो दुसरा माणूस झाला होता. पण तो म्हणाला: मी तो होतो, आणि येशूने मला दाखवले की मी देवाचा एक पुत्र आहे, आणि प्रकाश माझ्यापर्यंत पोहोचला, त्यामुळे पूर्वी जे मला दिसत नव्हते आता ते मला दिसते.

या माणसाला सनातनी गुरुंकडे नेण्यात आले; आणि तो शनिवार होता. सनातन्यांनी त्याला विचारले की पूर्वी तू पाहू शकत नव्हतास ते तुला आता कसे कळायला लागले.

तो म्हणाला: कसे ते मला माहीत नाही; मला फक्त एवढेच कळते की मला आता सर्व समजते. ते म्हणाले: तुला देवाच्या मार्गाने समजत नाही, कारण येशूने हे शनिवारी केलेले आहे, आणि त्याशिवाय सामान्य मनुष्य लोकांना ज्ञानी बनवू शकत नाही, आणि त्यांनी वाद करायला सुरुवात केली, आणि त्या विवेक जागृत झालेल्या माणसाला विचारले: तुला येशूविषयी काय वाटते?

तो म्हणाला: मला वाटते तो प्रेषित आहे.

परंतु तो अज्ञानी होता आणि आता ज्ञानी झालाय याच्यावर ज्यूंनी विश्वास ठेवला नाही, म्हणून त्यांनी त्याच्या पालकांना बोलावले आणि त्यांना विचारले: हा तुमचा मुलगा आहे का जो जन्मापासून अज्ञानी होता? तो ज्ञानी कसा झाला? त्याचे पालक म्हणाले: आम्हाला माहीत आहे की तो आमचा मुलगा आहे आणि तो त्याच्या जन्मापासून अज्ञानी

होता, परंतु तो ज्ञानी कसा झाला ते आम्हाला माहीत नाही. तो वयात आलेला आहे, त्याला तुम्ही विचारा.

सनातन्यांनी त्या माणसाला दुसऱ्यावेळी बोलावले, आणि म्हणाले: आपल्या देवाची, खऱ्या देवाची प्रार्थना कर. ज्या माणसाने तुझे अज्ञान दूर केले तो एक सामान्य माणूस आहे, आणि देवाने पाठवलेला नाही. आम्हाला त्याची खात्री आहे.

आणि जो माणूस ज्ञानी झाला होता तो म्हणाला: तो देवापासून आहे किंवा नाही ते मला माहीत नाही. पण माला ठाऊक आहे की मी प्रकाश पाहू शकत नव्हतो आणि आता मी पाहू शकतो. सनातन्यांनी त्याला पुन्हा विचारले: त्याने तुझे अज्ञान दूर केले तेव्हा तुला काय केले? तो म्हणाला: मी तुम्हाला अगोदर सांगितले आहे, पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही. जर तुम्ही त्याचे शिष्य होऊ इच्छित असाल तर मी तुम्हाला पुन्हा सांगेन.

त्यांनी त्याची निंदा नालस्ती करायला सुरुवात केली आणि म्हणाले: तुम्ही त्याचे शिष्य आहात, परंतु आम्ही मोजेसचे शिष्य आहोत. देव स्वतः मोजेसशी बोलला, पण आम्हाला हा माणूस कुठचा आहे आहे हेही माहीत नाही. आणि तो माणूस उत्तरला: त्याने माझे अज्ञान दूर केले आहे आणि तरीही तुम्ही त्याला तो कुठचा आहे हे ओळखत नाही हे विचित्र आहे. देव पाप्यांचे ऐकत नाही तर जे त्याचा आदर करतात आणि त्याच्या इच्छेप्रमाणे वागतात त्यांचे ऐकतो. एखादा जो देवापासून नाही तो एखाद्या अज्ञानी माणसाला ज्ञानी करू शकेल असे कधीच असू शकत नाही. जर तो देवा पासून नसता तर तो काहीच करू शकला नसता.

त्यावर सनातनी रागावले, आणि म्हणाले: तू पूर्णपणे भ्रमात बुडालेला आहेस आणि तरीही तू आम्हाला शिकवू इच्छितो. आणि त्यानी त्याला दूर हाकून दिले. आणि येशू म्हणाला: माझी शिकवण जीवनात जागृती आणणारी आहे. जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवील, तो जरी शरीराने मरण पावला, तरी जिवंत राहील, आणि प्रत्येकजन जो माझ्यात जगतो आणि विश्वास ठेवतो तो मरणार नाही.

आणि तिसऱ्यावेळी येशूने लोकांना शिकविले. तो म्हणाला: माणसे माझी शिकवण मी स्वतः सिद्ध करतो या कारणाने स्वीकारीत नाहीत. सत्य सिद्ध करणे असंभवनीय असते.

सत्य स्वतःच इतर सर्व सिद्ध करते. परंतु माणसे माझी शिकवण स्वीकारतात कारण त्यांच्या जवळ राहणारा आणि जीवनाचे वचन देतो असा दुसरा कोणीही नाही.

मेंढरांना मेंढपाळाच्या ओळखीच्या आवाजा सारखी माझी शिकवण लोकांना वाटते, जेव्हा तो दरवाजातून त्यांच्याकडे येतो आणि त्यांना कुरणात नेण्यासाठी एकत्र करतो. तुमच्या शिकवणीवर कोणीही विश्वास ठेवीत नाही, कारण ती त्यांना परकी आहे, आणि तिच्यामध्ये त्यांना तुमची स्वतःची लालसा दिसते. कोणी दरवाजातून प्रवेश करणारा नव्हे तर कुंपणावरून आलेल्याला पाहून जसे मेंढरांना वाटते तसे लोकांना तुम्ही वाटता: मेंढरे त्याला ओळखत नाहीत, आणि तो लुटारू आहे असे त्यांना वाटते. जसे मेंढरांसाठी एकच दार असते तशी माझी शिकवण ही एक सत्य शिकवण आहे, मेंढरांना जसे चोर आणि लुटारू तसे मोजेसच्या कायद्याच्या तुमच्या सर्व शिकवणी खोट्या आहेत. जो माझ्या शिकवणीला शरण जातो तो खरे जीवन प्राप्त करील-ज्या प्रमाणे मेंढ्या जर मेंढपाळाच्या मागे जातील तर त्यांना अन्न मिळते. एक चोर फक्त चोरी करणे, लुटणे, आणि नाश करण्यासाठी येतो परंतु मेंढपाळ जीवन देण्यासाठी येतो. आणि माझी शिकवण फक्त खरे जीवन देण्याचे वचन देते.

असे मेंढपाळ आहेत की ज्यांच्यासाठी त्यांच्या मेंढ्या त्यांचे जीवन आहे आणि जे त्यांच्या मेंढ्यांसाठी आपला जीव द्यायला तयार आहेत. तेच खरे मेंढपाळ. परंतु भाडोत्री मजूर मेंढरांची काहीही काळजी घेत नाहीत, कारण ते भाडोत्री असतात आणि मेंढ्यां त्यांच्या नसतात. जर लांडगा आला तर ते मेंढ्यांना सोडून पळ काढतात, आणि लांडगा त्यांना अधाशीपणे खाऊन टाकतो. ते खोटे मेंढपाळ होत. त्याच प्रमाणे खोटे गुरु असतात जे लोकांच्या जीवनाची काहीही काळजी करीत नाहीत, परंतु खरे गुरु लोकांच्या जीवासाठी आपला जीव देतात.

मी असाच एक गुरु आहे. माझी शिकवण ही आहे की-माणसांच्या जीवनासाठी एखाद्याचे जीवन सोडून द्यावे. माझ्यासाठी माझे जीवन कोणीही माझ्यापासून घेणार नाही, परंतु माणसांना खरे जीवन प्राप्त व्हावे म्हणून मी स्वतः ते मुक्तपणे देत आहे. ती आज्ञा मला माझ्या पित्याकडून मिळाली आहे. जसा माझा पिता मला ओळखतो तसा मी त्याला

ओळखतो, आणि म्हणून मी माझे जीवन माणसांसाठी देत आहे. आणि माझा पिता माझ्यावर प्रेम करतो कारण मी त्याची आज्ञा पाळतो.

आणि सर्व माणसे, फक्त आता येथे असलेलीच नव्हे, तर सर्व माणसे, माझा विवेक जाणतील; आणि ती सर्व माझ्यात एकत्र येतील आणि सर्व मानव एक होतील आणि त्यांची शिकवण एक असेल.

आणि ज्यू त्याच्याभोवती जमले आणि म्हणाले: तू जे सांगतोस ते समजायला कठीण आहे आणि आमच्या धर्म ग्रंथाशी जुळत नाही. आम्हाला सतावू नकोस, पण आम्हाला साध्या आणि सोप्या पद्धतीने सांग तू तारणारा आहेस का जो आमच्या धर्म ग्रंथाप्रमाणे जगात येणार आहे.

येशूने त्यांना उत्तर दिले: मी तुम्हाला अगोदरच सांगितले आहे मी कोण आहे, पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही. जर तुम्ही माझ्या शब्दांवर विश्वास ठेवीत नसाल तर माझ्या कृत्यांवर विश्वास ठेवा; त्यांच्यावरून तुम्हाला समजेल मी कोण आहे आणि कशासाठी आलो आहे.

तुम्ही विश्वास ठेवीत नाही कारण तुम्ही मला अनुसरत नाही. तो जो मला अनुसरतो आणि मी जे सांगतो ते करतो तो माझे समजतो. आणि ज्यांना माझी शिकवण समजते आणि ती पाळतात, त्यांना खरे जीवन प्राप्त होते. माझ्या पित्याने त्यांना माझ्याशी एकरूप केले आहे, आणि कोणीही आम्हाला वेगळे करू शकणार नाही. मी आणि पिता एकच आहोत.

आणि त्यावर ज्यू दुखावले आणि त्याला ठार मारण्यासाठी दगड उचलले. परंतु तो त्यांना म्हणाला: मी तुम्हाला अनेक चांगली कामे दाखवली आहेत आणि माझ्या पित्याची शिकवण जाहीर केली आहे. त्या चांगल्या कामांसाठी तुम्ही मला दगडाने मारू इच्छिता का? ते म्हणाले: तुझ्या चांगल्या कामासाठी नाही, तर एक माणूस, तू स्वतःला देव म्हणवतोस म्हणून आम्ही तुला दगडाने मारू इच्छितो.

आणि येशू त्यांना उत्तर देतो: तुमच्या धर्म ग्रंथात हेच लिहून ठेवले आहे जेथे असे म्हटले आहे की देव स्वतः विकृत शासकांना म्हणाला: 'तुम्ही देव आहात'. जर त्याने विकृत

माणसांना देखील देव म्हटले असेल, तर देवाने आपल्या प्रेमाने या जगात पाठवलेल्यांना 'देवाचा पुत्र' असे म्हणणे तुम्ही देवनिंदा का मानता प्रत्येक माणूस आत्म्याने देवाचा पुत्र आहे. जर मी देवाच्या मार्गाने जगत नसेन तर मी देवाचा एक पुत्र आहे असा विश्वास ठेऊ नका. पण जर मी देवाच्या मार्गाने जात असेन तर माझ्या जीवनावरून मी पित्याबरोबर आहे असा विश्वास ठेवा आणि जाणून घ्या की पिता माझ्यात आहे आणि मी त्याच्यामध्ये आहे.

आणि ज्यू वाद करु लागले. काही म्हणाले की तो पछाडलेला होता आणि दुसरे म्हणाले: एखादा माणूस जो पछाडलेला आहे तो माणसांना ज्ञानी बनवू शकत नाही.

आणि त्याना त्याच्याशी कसे वागावे हे कळले नाही आणि त्याचा निषेध करू शकले नाहीत. आणि तो पुन्हा जॉर्डनच्या पलीकडे गेला आणि तेथे राहिला. आणि अनेकांनी त्याच्या शिकवणीवर विश्वास ठेवला आणि म्हणाले की ती जॉनच्या शिकवणी प्रमाणेच सत्य आहे. म्हणून पुष्कळांनी तिच्यावर विश्वास ठेवला.

आणि येशूने एकदा त्याच्या शिष्यांना विचारले: मला सांगा, देवाचा पुत्र आणि माणसाचा पुत्र याविषयी माझी शिकवण लोकांना कशी समजते?

ते म्हणाले: काही ती जॉनच्या शिकवणी प्रमाणे समजतात: दुसरे इसायाच्या भाकीतांप्रमाणे: दुसरे काही पुन्हा म्हणतात ती जरेमियाच्या शिकवणी प्रमाणे आहे. त्यांचा समज आहे की तुम्ही एक प्रेषित आहात.

आणि त्याने त्यांना विचारले: परंतु तुम्ही माझी शिकवण कशी समजता? आणि सिमोन पीटर त्याला म्हणाला: मला वाटते तुमची शिकवण अशी आहे की तुम्ही जीवनाच्या देवाचे निवडलेले पुत्र आहात. तुम्ही शिकवता की देव हा माणसातील जीवन आहे.

आणि येशू त्याला म्हणाला: तू सुखी आहेस, सिमोन, कारण तुला हे समजले आहे. कोणीही माणूस तुला हे उघड करू शकणार नाही: तुला ते समजले कारण तुझ्यातील दैवी आत्म्याने तुला ते उघड केले आहे. मानवी समजशक्तीने आणि मी माझ्या शब्दांनी ते तुला उघड केले नाही, तर देव, माझा पिता, त्याने प्रत्यक्ष तुला उघड केले आहे. आणि यावरच ज्यांना मृत्यू नसेल असा माणसांचा समाज उभा राहील.

८

जीवन क्षणिक नाही

म्हणून खरे जीवन वर्तमानातच जगले पाहिजे.

“प्रत्येक दिवस”

येशू म्हणाला: जो शारीरिक दुःख आणि हानी सहन करायला तयार नसेल त्याला माझी शिकवण समजलेली नाही. जो आपल्या शारीरिक जीवनासाठी सर्वोत्कृष्ट असे प्राप्त करतो तो त्याच्या खऱ्या जीवनाचा नाश करतो. परंतु जो माझी शिकवण पूर्ण करण्यासाठी आपल्या शारीरिक जीवनाचा त्याग करतो त्याला खरे जीवन प्राप्त होईल.

आणि त्या शब्दांवर, पीटर त्याला म्हणाला: पहा, आम्ही तुमची आज्ञा पाळली, सगळे संबंध व संपत्ती फेकून दिली, आणि तुमच्या मागे आलो. यासाठी आम्हाला काय बक्षीस मिळेल?

येशू त्याला म्हणाला: प्रत्येकजण ज्याने घर, बहिणी , भाऊ, वडील, आई, पत्नी, मुले, किंवा शेते माझ्या शिकवणी साठी सोडून दिली असतील, तो बहिणी , भाऊ, आणि शेते, आणि या जीवनात आवश्यक सर्व याच्या पेक्षा शंभरपट जास्त आणि त्यापलीकडे काळाच्या पलीकडचे जीवन सुद्धा प्राप्त करील. स्वर्गाच्या राज्यात बक्षीसे नाहीत, स्वर्गाचे राज्य हेच त्याचे स्वतःचे प्रयोजन आणि बक्षीस आहे. स्वर्गाच्या राज्यात सगळे सारखे आहेत, तेथे कोणी पहिला नाही की शेवटचा. कारण स्वर्गाचे राज्य पुढील प्रमाणे आहे: घराचा

मालक सकाळी आपल्या बागेसाठी कामगार मजुरीवर आणायला गेला. त्याने दिवसाला एक पेनी या दराने त्यांची मजुरी ठरवली, आणि त्यांना कामाला लावले. मध्यान्ही तो पुन्हा गेला आणि आणखी कामगार मजुरीवर ठेवले आणि त्यांना बागेत कामासाठी पाठवले; संध्याकाळ होत असतांना त्याने आणखी काही कामगार मजुरीवर ठेवले आणि त्याना काम करायला पाठवले.

आणि त्याने त्या सर्वांशी एक पेनीचा ठराव केला होता. जेव्हा मजुरी देण्याची वेळ आली, तेव्हा मालकाने सर्वांना ज्यांना शेवटी मजुरीवर ठेवले त्यांना प्रथम, आणि ज्यांना प्रथम मजुरीवर ठेवले त्यांना त्यानंतर सारखीच मजुरी दिली: जेव्हा प्रथम मजुरीवर ठेवलेल्यांनी पाहिले की शेवटी ठेवलेल्यांना प्रत्येकी एक पेनी मिळाली, त्यांनी विचार केला की, त्यांना जास्त मिळतील, परंतु त्यांनाही एक पेनी दिली गेली. त्यांनी ती घेतली आणि म्हणाले: ज्यांनी एक पाळी काम केले त्याना आणि आम्ही चार पाळी काम केले त्यांना सारखेच मिळाले हे कसे काय? हे न्याय नाही. परंतु मालक आला आणि म्हणाला: तुम्ही असमाधानी का आहात? मी तुमच्याशी चुकीचे वागलो का? मी तुम्हाला ठरल्या प्रमाणे दिले आहे. आपला ठराव एका पेनीचा होता. तुमची मजुरी घ्या आणि जा. जर मी ह्या शेवटी आलेल्यांना तुमच्या इतकेच दिले, तर माझे स्वतःचे आहे ते माझ्या इच्छे प्रमाणे करण्याचा मला अधिकार नाही का? किंवा मी चांगला आहे असे दिसल्यामुळे तुम्ही मत्सरी झालात का?

स्वर्गाच्या राज्यात कोणी पहिले आणि शेवटचे नाहीत-ते सर्वांसाठी सारखे आहे. त्यानंतर, त्याचे दोन शिष्य, जेम्स आणि जॉन, येशूकडे आले आणि म्हणाले: गुरुजी, आम्हाला वचन द्या की आम्ही जे मागू ते तुम्ही आम्हाला द्याल.

तो म्हणाला: तुम्हाला काय पाहिजे?

ते म्हणाले: आम्हाला पाहिजे की आम्ही तुझ्यासारखे व्हावे.

येशू त्यांना म्हणाला: तुम्हाला ठाऊक नाही तुम्ही काय मागत आहात. तुम्ही माझ्यासारखे जगू शकाल आणि शारीरिक जीवनापासून स्वतःला माझ्यासारखे स्वच्छ करू

शकाल, परंतु माझ्यासारखे बनवणे माझ्या सामर्थ्यात नाही. पित्याला शरण जाऊन आणि त्याची इच्छा पूर्ण करून प्रत्येक माणूस स्वतःच्या प्रयत्नाने पित्याच्या राज्यात प्रवेश करू शकतो.

हे ऐकून आपल्या गुरुची बरोबरी करायची, आणि शिष्यात प्रमुख बनण्याची इच्छा केल्याबद्दल इतर शिष्य त्या दोघा भावावर रागावले.

परंतु येशूने त्याना बोलावले, आणि म्हणाला: जर तुम्ही भाऊ, जॉन आणि जेम्स, मला तुम्ही माझ्यासारखे बनवण्यासाठी विचारले ते माझ्या शिष्यांमध्ये प्रमुख होण्यासाठी असेल, तर तुम्ही चूक केली आहे; आणि तुम्ही, माझ्या इतर शिष्यांनो, त्यांच्या तुमच्यावर वरचढ होण्याच्या इच्छेने तुम्ही त्यांच्यावर रागावला असाल, मग तुम्हीही चूक केली आहे. या जगात, राजे आणि राजपाल लोकांवर राज्य कारण्यास त्यांच्या ज्येष्ठतेने नेमले जातात; परंतु तुमच्यामध्ये कोणी ज्येष्ठ किंवा कोणी कनिष्ठ नाही.

तुम्हा सर्वात, दुसऱ्यापेक्षा मोठे असण्यासाठी तुम्हीच तुमच्यापैकी सर्वांचे सेवक असले पाहिजे. तुम्हा सर्वात, ज्याला पहिले व्हायचे असेल त्याने स्वतःला शेवटचे समजले पाहिजे. कारण पित्याची इच्छा अशी आहे की मानवाच्या पुत्राने सेवा करून घेण्यासाठी नव्हे तर सर्वांची सेवा करण्यासाठी जगावे आणि त्याचे शारीरिक जीवन आत्म्याच्या जीवनासाठी खंडनी म्हणून द्यावे.

येशू लोकांना म्हणाला: जे नाश पावत आहे त्याला वाचवण्याचा प्रयत्न पिता करतो, हरवलेले मेंढरू सापडल्यावर मेंढपाळाला जसा आनंद होतो तसा त्याला त्यामुळे आनंद होतो. जर एक मेंढरू हरवले तर मेंढपाळ नव्या नऊ सोडून एका हरवलेल्याला वाचवायला जातो. आणि एखादी स्त्री एक पेनी हरवते, तेव्हा सर्व झोपडी झाडून काढते आणि ती सापडेपर्यंत शोधते. पिता पुत्रावर प्रेम करतो आणि त्याला स्वतःकडे बोलावतो.

आणि त्याने त्यांना देवाच्या इच्छेप्रमाणे राहणाऱ्याने आपल्या स्वतःला मोठे समजू नये हे दाखवणारी दुसरी बोधकथा सांगितली. तो म्हणाला: जर तुम्हाला एखाद्या मेजवानीला बोलावले असेल, तुम्ही स्वतः पुढच्या जागेवर बसू नका, किंवा कोणीतरी

तुमच्या पेक्षा जास्त महत्वाचा येईल आणि यजमान तुम्हाला म्हणेल: 'तुमची जागा खाली करा आणि तुमच्या पेक्षा मोठ्या माणसाला तेथे बसू दे', आणि तुम्हाला शरम होईल. सर्वात मागची जागा घ्या: यजमान तुम्हाला पाहिल तेव्हा पुढच्या जागेवर बोलावील, आणि तुमचा सन्मान होईल.

तसेच स्वर्गाच्या राज्यात देखील गर्वाला जागा नाही. जो स्वतःला मोठा समजतो तो, तसे करून स्वतःला खाली आणतो; पण जो स्वतः लीन होतो आणि स्वतःला अपात्र समजतो, तो देवाच्या राज्यात स्वतःला उंचावतो.

एका माणसाला दोन मुले होती. लहान मुलगा वडिलाना म्हणाला: बाबा, मला माझ्या वाट्याची मालमत्ता द्या.

आणि बापाने त्याला त्याच्या वाटणीची संपत्ती दिली. लहान मुलाने ती घेतली, दुरच्या देशात गेला, सर्व संपत्ती उधळली, आणि दरिद्री झाला. त्या दुरच्या देशात डुकरे पाळायला लागला, आणि इतका भुकेला झाला की डुकराचे खाद्य असलेली ओकची फळे खायला लागला. आणि त्याने त्याच्या स्वतःशी आपल्या जीवनाचा विचार केला, आणि म्हणाला; मी माझा वाटा घेऊन माझ्या बापाला का सोडले? त्याचाकडे सर्वकाही भरपूर आहे, त्याचे कामगारही पोटभर जेवतात. पण मी येथे डुकरे खातात ते खाद्य खात आहे. मी माझ्या बापाकडे जाईन, त्यांच्या पायावर पडेन, आणि म्हणेन: बाबा, मी चुकीचे वागलो आहे, आणि तुमचा मुलगा असण्यास मी अपात्र आहे. मला एक कामगार म्हणून घ्या. असा विचार करून तो त्याच्या पित्याकडे गेला. आणि जसा तो जवळ पोहोचला, त्याच्या बापाने त्याला दूरवरून ओळखले, आणि त्याला भेटायला धावत गेला आणि त्याला मिठी मारून त्याची चुंबने घेऊ लागला. आणि मुलगा म्हणाला: बाबा मी तुमच्या पुढे दोषी आहे, आणि तुमचा मुलगा असण्यास अपात्र आहे. परंतु बापाने ते ऐकलेही नाही, आणि सेवकांना म्हणाला: लवकर, सर्वात चांगले कपडे आणि बुट घेऊन या, आणि त्याच्या अंगावर घाला. आणि जा आणि सर्वात मोठे वासरू पकडा आणि मारा, आणि आपण मौज-मजा करू या

कारण माझा मुलगा मेला होता तो आता जिवंत झाला आहे, हरवला होता तो आता सापडला आहे.

नंतर मोठा मुलगा शेतावरून आला, आणि तो जसा जवळ आला त्याने घरात संगीताचा आवाज ऐकला आणि एका मुलाला बोलावले आणि म्हणाला: ते मजा का करीत आहेत? आणि तो मुलगा म्हणाला: तुझा भाऊ परत आलेला आहे ते तू ऐकले नाहीस का?

तुमचा बाप आनंदी झाला आहे, आणि आपला मुलगा परत आला आहे म्हणून त्या आनंदात मोठे वासरू कापले आहे. पण मोठा मुलगा संतापला आणि घरात गेला नाही . त्याचा बाप बाहेर आला आणि त्याला बोलावले, पण तो त्याच्या बापाला म्हणाला: बाबा मी तुमच्यासाठी अनेक वर्षे काम केले, आणि तुमच्या आज्ञा कधी मोडल्या नाहीत, पण तुम्ही कधीही माझ्यासाठी मोठे वासरू मारले नाही. माझा लहान भाऊ घर सोडून गेला आणि त्याची सर्व संपत्ती दारुड्यांबरोबर उधळून टाकली, आणि त्याच्यासाठी तुम्ही एक वासरू कापले. आणि त्याचा बाप म्हणाला: तू नेहमीच माझ्यासोबत आहेस आणि माझे जे आहे ते सर्व तुझेच आहे; तू संतापू नकोस तर आनंदी हो कारण तुझा भाऊ जो मेला होता तो पुन्हा जिवंत झाला आहे-हरवला होता तो सापडला आहे.

एका मालकाने एक बाग लावली, ती जोपासली, आणि जास्तीत जास्त फळे यावीत म्हणून सर्वकाही केले. आणि त्याने बागेत काम करण्यासाठी कामगार पाठवले, त्याना ठरवल्या प्रमाणे पगार दिला, आणि फळे गोळा केली. (मालक म्हणजे पिता; बाग म्हणजे जग; कामगार माणसे. पित्याने त्याच्या पुत्राला-मानवाच्या पुत्राला-या जगात अशासाठी पाठवले की त्याने माणसात वसवलेली जीवनाची समज परत यावी. ) वेळ आल्यावर मालकाने एका सेवकाला पैसे घेण्यासाठी पाठवले. (पित्याने माणसांना नेहमीच सांगितले आहे की त्यांनी पित्याची इच्छा पूर्ण करावी. ) कामगारांनी मालकाच्या सेवकाला रिकाम्या हाताने हाकून दिले आणि ती बाग आपली स्वतःचीच आहे अशी कल्पना करीत बागेत थांबून राहिले, आणि त्यांच्या स्वतःच्या इच्छेने त्यांनी तेथे वस्ती केली. (माणसे देवाच्या इच्छेची आठवण नाकारतात, आणि शरीराची सेवा करणे हाच जीवनाचा उद्देश

आहे अशी कल्पना करून स्वतःसाठी जगत राहतात. ) मग मालकाने त्याचे निवडलेले, एका मागे एक पाठवले आणि शेवटी आपला पुत्र, कामगारांना त्यांच्या ॠणाची आठवण करून देण्यासाठी पाठवला. परंतु त्यांनी त्यांची तर्कशक्ती गमावली होती आणि त्यांनी कल्पना केली की जर आपण मालकाच्या पुत्राला जो त्यांना बाग त्यांची नाही याची आठवण देत होता त्याला फक्त ठार मारले तर त्यांना सर्व मिळेल. म्हणून त्यानी त्याला ठार मारले.

(लोकांना त्यांच्यात असणाऱ्या आत्म्याची आणि जो त्यांना दाखवतो की तो शाश्वत आहे आणि ते तसे नाहीत त्याची आठवण देखील आवडत नाही; आणि जेवढे त्यांना शक्य असेल तेवढी आत्म्याची जाणीव त्यांनी मारून टाकली आहे: त्यांनी बुद्धिमत्ता कापडात गुंडाळून गाडून टाकली आहे. ) मग तो मालक काय करील? सरळ त्या कामगारांना हाकून लावील आणि दुसरे कामगार पाठवील.

पित्याने काय करावे? फळे येईपर्यंत पेरत रहावे. आणि तो तेच करीत आहे. माणसाला त्यांच्यात असलेल्या आत्म्याची जाणीव समजलेली नव्हती आणि समजत नाही, आणि जिला ते झाकून ठेवतात कारण ती त्याना त्रास देते, त्यांच्यात जीवन आणते. ज्याच्यावर सर्व विसावलेले आहे त्या पायाच्या दगडालाच ते नाकारतात. आणि जे आत्म्याचे जीवन त्यांचा पाया मानीत नाहीत ते स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत आणि त्यांना जीवन मिळणार नाही. विश्वास ठेवण्यासाठी आणि जीवन प्राप्त करण्यासाठी बक्षिसाची अपेक्षा न करणे आणि तुमची स्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

मग शिष्य येशूला म्हणाले: आमचा आमच्यावरील विश्वास वाढवा; आत्म्याच्या जीवनात अधिक दृढपणे विश्वास ठेवायला लावील असे काय आहे ते आम्हाला सांगा, ज्यामुळे आम्ही शारीरिक जीवनाचे वाईट वाटून घेणार नाही. पहा आत्म्याच्या जीवनासाठी किती त्याग करायचा आहे, आणि सतत त्याग करीत राहायचे आहे. तरीही तुम्ही स्वतः सांगता की त्यासाठी बक्षीस मिळणार नाही.

यावर येशूने उत्तर दिले: इवल्याशा बी मधून महान वृक्ष वाढतो यावर तुम्ही सहजगत्या विश्वास ठेवता-जर तुमच्यामध्ये असलेल्या आत्म्याच्या बीजावर आणि जेथून खरे

जीवन उगम पावते त्यावर तेवढा तुमचा विश्वास असेल, तर तुम्ही मला तुमचा विश्वास वाढवायला सांगणार नाही. विश्वासामध्ये एखादी आश्चर्यकारक गोष्ट खरी मानणे येत नाही, तर तुमची स्थिती आणि तारण कशात आहे हे समजणे येते. जर तुम्हाला तुमची स्थिती समजली तर तुम्ही बक्षिसाची अपेक्षा करणार नाही. पण तुमच्यावर सोपवलेल्या गोष्टी खऱ्या मानाल.

जेव्हा मालक शेतावरून आपल्या कामगारासह परत येतो, तो त्यांना जेवायला बसवीत नाही तर गुराकडे लक्ष द्यायला सांगतो, आणि जेवण तयार करून घेतो, आणि फक्त त्यानंतर त्यांना म्हणतो: बसा आणि खा आणि प्या. मालक कामगाराने करायलाच पाहिजे ते काम केल्याबद्दल आभार मानीत नाही. आणि कामगारांना आपण कामगार आहोत हे समजले असेल, तर त्याला त्याचे वाईट वाटत नाही तर आपले आहे ते आपल्याला मिळेल हे खरे मानून तो आपले काम करतो.

म्हणून तुम्हीही पित्याची इच्छा पूर्ण करा आणि लक्षात ठेवा की आपण जे करायलाच पाहिजे ते करणारे, आणि बक्षिसाची अपेक्षा न करता आपल्याला मिळणार आहे ते मिळणारच याचे समाधान मानून काम करणारे, फायद्याची अपेक्षा नसणारे, सेवक आहोत. बक्षीस आणि जीवन असेल याची याची चिंता करू नका, त्यापेक्षा वेगळे काही असणार नाही, पण ह्या जीवनाचा नाश होणार नाही याची काळजी घ्या आणि विसरू नका की ते आपल्याला त्याची फळे मिळवण्यासाठी आणि पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी दिलेले आहे.

म्हणून मालक आल्याबरोबर ताबडतोब त्याला उत्तर देण्यासाठी मालकाची वाट पाहणाऱ्या सेवकांप्रमाणे सतत तयार रहा. सेवकांना हे माहीत नसते की तो लवकर येईल की उशिरा, पण त्यानी नेहमी तयार राहिले पाहिजे. आणि जर त्यांना त्यांचा मालक भेटला तर त्यांनी त्याची इच्छा पूर्ण करावी आणि ते त्यांच्यासाठी चांगले आहे.

म्हणून हे या जीवनात. नेहमी वर्तमान काळाच्या प्रत्येक मिनिटाला, भूतकाळ किंवा भविष्यकाळाचा विचार न करता आणि मग किंवा नंतर मी हे किंवा ते करीन असे न म्हणता, तुम्ही आत्म्याचे जीवन जगले पाहिजे.

जर मालकाला माहीत असेल की चोर कधी येणार आहे, तर तो झोपणार नाही, तसेच तुम्ही सुद्धा कधीच झोपू नये; कारण मानवाच्या पुत्राच्या जीवनासाठी वेळ हा काहीच नाही; तो वर्तमानात जगतो आणि त्याचे जीवन कधी सुरु झाले किंवा संपणार आहे हे त्याला माहीत नसते. आपले जीवन त्या गुलामाच्या जीवनासारखे आहे ज्याला त्याच्या मालकाने त्याचे घर सांभाळण्यासाठी ठेवले होते. आपल्या मालकाच्या इच्छेप्रमाणे नेहमी वागणे त्या गुलामासाठी चांगलेच होते. परंतु जर तो म्हणेल: मालक काही अजून ताबडतोब येत नाही, आणि त्याच्या कामाकडे दुर्लक्ष करतो, त्याचा मालक अचानक येईल आणि त्याला हाकून देईल.

खिन्न होऊ नका, पण नेहमी वर्तमानकाळात, आत्म्याने जगा. कारण आत्म्याच्या जीवनासाठी काळ नाही. याच्याकडे लक्ष द्या की चिंतेने तुम्ही खालावून जाणार नाही, आणि दारूच्या नशेत किंवा खादाडपणाने गोंधळून जाणार नाही, आणि तारणाचा वेळ निघून जाऊ देणार नाही. तारणाची वेळ-सर्वांवर टाकलेल्या जाळयासारखी-ही येथे नेहमीच आहे. म्हणून नेहमी मानवाच्या पुत्राचे जीवन जगा. आपण स्वर्गाच्या राज्याची तुलना याच्याशी करू शकतो: दहा कुमारिका दिवे घेऊन वराला भेटायला गेल्या. त्यापैकी पाच शहाण्या होत्या आणि पाच मुर्ख. मुर्ख होत्या त्यांनी जादा तेल घेतल्या शिवाय दिवे घेतले, पण शहाण्या होत्या त्यांनी दिवे घेतले आणि सोबत तेलाचा साठा घेतला. त्या वरासाठी थांबल्या असतांना त्याना झोप लागली. जेव्हा वर येत होता तेव्हा मुर्ख कुमारिकांना दिसले की त्यांच्या जवळ थोडेच तेल उरले आहे आणि त्या थोडे तेल विकत आणायला गेल्या, पण त्या गेलेल्या असतांना वर आला. आणि शहाण्या कुमारिका ज्यांच्याकडे तेल होते त्या त्याच्या सोबत आत गेल्या आणि दरवाजे बंद झाले. त्यांचे काम फक्त एवढेच होते: वराला दिव्यासह भेटणे. पण मुर्ख होत्या ते हे विसरल्या की हे महत्वाचे होते की दिवे पेटलेले पाहिजेत एवढेच नव्हे, तर ते योग्यवेळी पेटत राहिले पाहिजेत. आणि वर येणार तेव्हा पेटत राहण्यासाठी, हे आवश्यक होते की ते सर्ववेळ पेटत राहिले पाहिजेत. जीवन एवढ्यासाठीच आहे: मानवाच्या पुत्राला मोठे करण्यासाठी, आणि मानवाचा पुत्र नेहमीच येथे असेल, तो कोणत्याही विशिष्ट काळाचा भाग नाही, आणि म्हणून त्याची सेवा करण्यासाठी आपण कालातीत जगले पाहिजे-फक्त वर्तमान काळात.

म्हणून आता आत्म्याच्या जीवनात प्रवेश करण्यासाठी पराकाष्ठा करा. जर तुम्ही प्रयत्न केला नाही तर तुमचा तेथे प्रवेश होणार नाही. तुम्ही म्हणाल: आम्ही असे असे म्हणालो. पण दाखवायला चांगले काम नसेल, आणि जीवनही नसेल. मानवाच्या पुत्रासाठी-जीवनाचा एक खरा आत्मा-प्रत्येक माणसामध्ये त्याच्या कृत्यांप्रमाने साकार होईल.

माणूस ज्या पद्धतीने मानवाच्या पुत्राची सेवा करतो त्यानुसार मानव जात विभागलेली आहे. आणि जशा कळपात शेळया पासून मेंढ्या वेगळया ठेवतात त्याप्रमाणे माणसे त्यांच्या कामांवरून, दोन गटात विभागली जातील. एक गट जिवंत राहील दुसरा नाश पावेल.

जे मानवाच्या पुत्राची सेवा करतील ते जगाच्या सुरुवाती पासून त्यांचे जे काही आहे-जे जीवन त्यांनी टिकवून ठेवले आहे ते मिळवतील. मानवाच्या पुत्राची सेवा करून त्यांनी जीवन टिकवून ठेवले आहे. त्यांनी भुकेल्यांना जेवू घातले, वस्त्रहिनांना वस्त्र दिले, अनोळखी लोकांचे स्वागत केले, तुरुंगात असलेल्यांना भेटले. ते मानवाच्या पुत्रात जगले, तो सर्व माणसात सारखाच आहे हे जाणले, आणि म्हणून त्यांच्या शेजाऱ्यांवर प्रेम केले. जे मानवाच्या पुत्रामध्ये जगले नाहीत, त्यांची सेवा केली नाही, सर्व माणसात तो एकच आहे हे जाणले नाही, आणि म्हणून त्याच्याशी एकरूप झाले नाहीत, ते त्यांच्यात असलेले जीवन गमावून बसतील आणि नाश पावतील.



९ मोह

ऐहिक जीवनाचा भ्रम माणसापासून वर्तमान काळातील खरे जीवन लपवून ठेवतो.

“आणि आम्ही जशी आमच्या अपराध्यांना क्षमा करतो तशी तू आमच्या अपराधांची क्षमा कर”

काही मुले येशूकडे आणण्यात आली आणि त्याने पाहिले की त्याचे शिष्य त्यांना दूर पाठवीत आहेत. त्याला त्याचे दुःख झाले. आणि तो म्हणाला: मुलांना दूर पाठवणे चूक आहे. ती कोणाही पेक्षा चांगली आहेत, कारण ती पित्याच्या इच्छे प्रमाणे जगतात: ती खरोखर स्वर्गाच्या राज्यात असतात. त्यांना दूर पाठवण्या ऐवजी त्यांच्यापासून तुम्ही शिकावे, कारण पित्याच्या इच्छेप्रमाणे जगण्यासाठी तुम्ही मुले जगतात तसे जगले पाहिजे.

ती कोणाची नालस्ती करीत नाहीत, वाईट इच्छा धरीत नाहीत, कसली लालसा ठेवीत नाहीत, शपथ घेऊन स्वतःला बांधून घेत नाहीत, वाईटाचा प्रतिकार करीत नाहीत, कोणाविरुद्ध न्यायालयात जात नाहीत, आपल्या आणि परक्या देशात फरक मानीत नाहीत; आणि म्हणून ती मोठ्या माणसांपेक्षा चांगली आहेत आणि स्वर्गाच्या राज्यात आहेत. जर तुम्ही बालाकांप्रमाने झाला नाहीत आणि शरीराचे सर्व पाश टाळले नाहीत तर तुम्ही स्वर्गाच्या राज्यात जाणार नाही.

फक्त ज्याला माझी शिकवण समजते तो ओळखतो की मुले आपल्यापेक्षा चांगली आहेत, कारण ती पित्याच्या इछेचे उल्लघन करीत नाहीत.

फक्त ज्याला माझी शिकवण समजते त्यालाच पित्याची इच्छा कळते. आपण मुलांचा तिरस्कार करू नये. ती आमच्यापेक्षा चांगली आहेत, आणि त्यांची हृदये नेहमीच पित्यासह असतात आणि त्याच्या दृष्टीने निर्मळ आहेत.

एकही मूल पित्याच्या इच्छेने नाश पावत नाही. माणसे त्यांना मोहात पाडतात आणि सत्यापासून दूर नेतात म्हणून ती नाश पावतात. म्हणून एखाद्या मुलाला पित्यापासून आणि खऱ्या जीवना पासून दूर न नेण्याची काळजी घ्या; कारण जो मुलाला निर्मळते पासून दूर नेतो तो वाईट काम करतो. मुलाला भलेपणा पासून दूर नेणे, मोहात पाडणे, हे त्याच्या गळयात जात्याचा दगड बांधून त्याला पाण्यात टाकण्या इतके वाईट आहे; त्याला त्यातून बाहेर पडणे कठीण असते, आणि तो बुडून जाण्याची जास्त शक्यता असते. मोठ्या माणसाने त्याला पाडलेल्या मोहातून निसटणे त्या मुलाला तितकेच कठीण असते.

फक्त मोहांमुळे माणसांचे जग दुःखी आहे. जगात सर्वत्र मोह आहेत; ते नेहमीच होते आणि असणार, आणि माणसाचा नाश त्यांच्यामुळेच होतो.

मोहात पडण्याचे टाळण्यासाठी म्हणून सगळे सोडून द्या, सगळयाचा त्याग करा. जर एखादा कोल्हा सापळयात सापडला तर तो निसटण्यासाठी आपला पंजा पिळवटून टाकतो, आणि तो पंजा बरा होतो आणि कोल्हा जीवंत राहतो. मोहात पडू नये म्हणून तुम्ही सुध्दा सर्व गोष्टी सोडून द्यायला तयार राहिले पाहिजे.

पहिली आज्ञा मोडण्याच्या मोहापासून सावध रहा: लोक तुम्हाला जेव्हा इजा करतील आणि तुम्हाला सूड घ्यावासा वाटेल तेव्हा रागावू नका.

जर एखाद्या माणसाने तुम्हाला जखमी केले तर हे विसरू नका की तो त्याच पित्याचा पुत्र असून तुमचा भाऊ आहे. जर त्याने तुमचा अपराध केला असेल तर त्याच्याकडे जा आणि त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीला सामोरासमोर आवाहन करा. जर त्याने तुमचे ऐकले, तर तुम्ही जिंकलेले आहे आणि तुम्हाला एक नवा भाऊ मिळाला आहे. जर तो तुमचे ऐकत नसेल, तर इतर दोघा किंवा तिघांना एकत्र घेऊन त्याचे मन वळवा, आणि जर त्याला पश्चात्ताप झाला तर त्याला क्षमा करा. त्याने तुमचा सात वेळा अपराध केला आणि सात

वेळा क्षमा मागितली तरी सुद्धा, नेहमीच त्याला क्षमा करा. जर तो तुमचे ऐकणार नसेल तर माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवणाऱ्या मंडळीला हे सांगा, आणि त्याने त्यांचे ऐकले नाही, तरीही त्याला क्षमा करा, आणि त्याच्याबरोबर आणखी काहीही जास्त करू नका.

कारण देवाच्या राज्याची याच्याशी तुलना करता येईल: एका राजाला त्याच्या कुळांना निकालात काढायचे होते. ज्याने त्याचे दशलक्ष द्यायचे होते आणि त्याच्याकडे द्यायला काहीच नव्हते अशा माणसाला त्याच्याकडे आणले गेले. आणि राज्याला त्या कुळाची जमीन, बायको, मुले आणि तो माणूस स्वतः विकावा लागला असता. परंतु त्याकुळाने राजाकडे दयेची याचना केली, आणि राजाने त्याच्यावर दया केली आणि त्याला त्याचे सर्व कर्ज माफ केले. आता हा तोच माणूस घरी गेला आणि ज्याच्याकडे त्याचे पन्नास पेनीचे कर्ज होते तो एक गरीब शेतकरी त्याला भेटला. आणि त्याने त्या गरीब शेतकऱ्याला पकडले आणि त्याचा गळा दाबायला सुरुवात केली, आणि म्हणाला: माझे काय देणे आहे ते देऊन टाक. आणि तो शेतकरी त्याच्या पायाशी पडून म्हणाला: मला थोडा वेळ द्या आणि मी तुमचे सर्व पैसे देईन. पण त्याने त्याला दया दाखवली नाही आणि त्याने त्याला सर्व परतफेड करी पर्यंत तुरुंगात डांबून टाकले. इतर शेतकऱ्यांनी ते पाहिले आणि ते राजाकडे गेले आणि त्या कुळाने काय केले ते सांगितले. नंतर राजाने त्या कुळाला बोलावून घेतले आणि त्याला संगितले: विकृत माणसा, तू याचना केली म्हणून तुला मी तुझे सर्व कर्ज माफ केले, आणि मी जसे तुला माफ केले तसे तू तुझ्या कर्जदाराला माफ करायला पाहिजे होते. आणि राजा संतापला आणि त्याकुळाला त्याने त्याचे सर्व कर्ज फिटे पर्यंत छळण्याची शिक्षा दिली.

आणि जर तुमच्या दृष्टीने दोषी असणाऱ्यांना तुम्ही तुमच्या पूर्ण मनापासून क्षमा केली नाही तर पिता तुमच्याशी तशाच पद्धतीने वागेल.

तुम्हाला माहीत आहे की तुमचे एका माणसाशी भांडण आहे, कोर्टात न जाता ते मिटवणे चांगले आहे. तुम्हाला ते माहीत आहे आणि त्याप्रमाणे तुम्ही वागता, कारण तुम्हाला माहीत आहे की कोर्टात गेल्यास तुमचा जास्त तोटा होईल. म्हणून सर्व संतापासाठी तसेच आहे. जर तुम्हाला माहीत असेल की राग ही वाईट आणि पित्यापासून वेगळे करणारी गोष्ट आहे, मग शक्य तेवढ्या लवकर रागाला संपवून टाका आणि समेट करा.

तुम्हाला माहीत आहे की जसे तुम्ही जगात बांधलेले राहाल तसे पित्यासमोर बांधलेले राहाल. आणि जसे जगात स्वतःला मुक्त कराल तसे पित्यासमोर मुक्त असाल.

समजा की दोघे किंवा तिघे जर माझ्या शिकवणीने जगात एकत्र जमले असतील, तर त्यांची इच्छा असेल ते सर्वकाही अगोदरच माझ्या पित्यापासून त्यांना प्राप्त झाले असेल. कारण जेथे दोघे किंवा तिघे माणसातील आत्म्याच्या नावाने एकत्र जमले असतील, तो माणसाचा आत्मा अगोदरच त्यांच्यात वसत असतो.

दुसऱ्या आज्ञेत येणाऱ्या मोहापासूनही सावध रहा: आपल्या बायका बदलणाऱ्या माणसाविषयी.

काही सनातनी गुरु एकदा येशूकडे आले, आणि त्याला सतावण्यासाठी, म्हणाले: एखाद्या माणसाने आपली पत्नी दूर करावी काय?

तो उत्तरला: सुरवातीपासून मानव हा पुरुष आणि स्त्री असा बनवला आहे: तीच पित्याची इच्छा आहे.

म्हणून माणूस त्याच्या माता पित्याला सोडून त्याच्या बायकोला चिकटतो आणि पती आणि पत्नी एक शरीर होतात. म्हणून पतीसाठी त्याची पत्नी त्याच्या स्वतःच्या शरीरासारखीच असते. म्हणून देवाचा सामान्य नियम माणसाने मोडू नये आणि जे जोडलेले आहे ते तोडू नये. तुमच्या मोजेसच्या कायद्यात म्हटले आहे की तुम्ही आपल्या पत्नीला दूर करावे आणि दुसरीला घ्यावे, पण ते चूक आहे. पित्याच्या इच्छे प्रमाणे ते तसे नाही. आणि मी तुम्हाला सांगतो की जो आपल्या पत्नीला सोडतो तो तिला आणि ज्याने तिला जोडले त्या दोघांना दुराचरणात ढकलतो. आणि आपल्या पत्नीला टाकून देऊन एखादा माणूस सर्वत्र दुराचार पसरवतो.

आणि त्याचे शिष्य येशूला म्हणाले: एकाच पत्नीला बांधून राहणे फारच कठीण आहे. जर तसेच असायला पाहिजे असेल तर, अजिबात लग्न न केलेलेच बरे. तो त्यांना म्हणाला: तुम्ही स्वतःला लग्नापासून परावृत्त कराल पण त्याचा अर्थ काय होतो हे तुम्हाला समजलेच पाहिजे. जर एखादा माणूस पत्नी शिवाय राहू इच्छित असेल, तर त्याने पूर्ण शुद्ध

रहावे आणि स्त्रियांजवळ जाऊ नये: परंतु जो स्त्रियांवर प्रेम करतो त्याने एकीशी जोडून घ्यावे आणि तिला टाकू नये किंवा दुसऱ्या स्त्रियांकडे पाहू नये.

तिसऱ्या आज्ञेविरुद्ध मोहापासूनही सावध रहा: शपथ घेतल्याचा परिणाम म्हणून बंधने पाळण्याच्या सक्ती विषयी. कर जमा करणारा एकदा पीटर कडे आला आणि त्याला म्हणाला: तुझ्या गुरुचे काय-तो कर भरतो का? पीटर म्हणला: नाही, तो भरीत नाही. आणि पीटर गेला आणि येशूला सांगितले की कर जमा करणाऱ्याने त्याला थांबवले आहे आणि म्हणाला की प्रत्येकाने कर भरणे बंधनकारक आहे.

तेव्हा येशू त्याला म्हणाला: एखादा राजा त्याच्या मुलांकडून कर घेत नाही. किंवा त्याला आणखी दुसऱ्या कोणाला पैसे द्यावे लागत नाहीत. हे तसेच नाही का? म्हणून आपल्यासाठीही तसेच आहे. जर आपण देवाचे पुत्र आहोत तर आपण देवाशिवाय कोणाशी बांधलेले नाही, आणि सर्व बंधनापासून मुक्त आहोत. पण जर ते तुमच्याकडून कर मागत असतील, तर द्या: तुमच्यावर तसे करण्याचे बंधन आहे म्हणून नव्हे तर तुम्ही वाईटाचा प्रतिकारच करू नये म्हणून द्या. नाहीतर वाईटाच्या प्रतिकारामुळे अधिक वाईट निर्माण होईल.

दुसऱ्यावेळी सनातनी सीझरच्या अधिकाऱ्यासह येशूला त्याच्या शब्दात पकडण्यासाठी त्याच्याकडे गेले. ते त्याला म्हणाले: सत्याला धरून तू सर्वांना शिकवतोस. मग, आम्हाला सांग, आम्हाला सीझरला कर देणे बंधनकारक आहे की नाही? येशूच्या लक्षात आले की सीझरप्रती असलेले कर्तव्य पार न पाडण्याच्या अपराधाखाली त्यांना त्याला अडकवायचे होते. आणि तो त्यांना म्हणाला: सीझरचा कर कशाने भरता ते मला दाखवा. त्यानी त्याच्याकडे एक नाणे दिले. त्याने ते पाहिले आणि म्हणाला: याच्यावर हे काय आहे? कोणाचे चित्र आणि शब्द कोरले आहेत? ते म्हणाले : सीझरचे. आणि तो म्हणाला: मग सीझरचे आहे ते सीझरला परत द्या, पण जे देवाचे आहे-तुमचा आत्मा-देवाशिवाय कोणाला देऊ नका. पैसे, मालमत्ता, तुमचे श्रम जो तुमच्याकडे मागेल त्याला द्या. पण तुमचा आत्मा देवा शिवाय कोणाला देऊ नका.

तुमचे सनातनी गुरु सर्वत्र जाऊन लोकांना शपथा आणि प्रतिज्ञा घ्यायला लावतात की ते कायद्याचे पालन करतील. पण त्यामुळे ते लोकांना फक्त विकृत आणि पूर्वी पेक्षा अधिक वाईट बनवतात. शरीराने आत्म्याला बंधनात ठेवणे असंभवनीय आहे. तुमच्या आत्म्यात देव आहे; आणि तुम्ही देवाच्या वतीने दुसऱ्या माणसांना वचने देऊ शकत नाही. लोकांचा न्याय करणे आणि शिक्षा करणे तसेच दुसऱ्यांना असे न्याय आणि शिक्षा करण्यासाठी बोलावणे ह्या चवथी आज्ञा मोडण्याच्या मोहापासून सावध रहा.

एकदा येशूचे शिष्य एका खेड्यात गेले आणि रात्रीच्या मुक्कामा साठी विनंती केली पण त्यांना प्रवेश नाकारला गेला. मग ते येशूकडे तक्रार करायला गेले, आणि म्हणाले: या लोकांवर वीज पडून त्यांचा नाश करो!

येशूने उत्तर दिले: अजूनही आत्म्याने तुम्ही काय आहात ते तुम्ही समजला नाहीत. मी लोकांचा नाश करायला नाहीतर त्यांना वाचवायला शिकवतो.

एकदा एक माणूस येशू जवळ आला आणि म्हणाला: माझा वारसा मला देण्यासाठी माझ्या भावाला आज्ञा करा. येशू त्याला म्हणाला: मला कोणी तुझ्यावर न्यायाधीश नेमले नाही, आणि मी कोणाचा न्याय करणार नाही. तू देखील कोणाला शिक्षा करू नयेस.

एकदा सनातन्यांनी एका बाईला येशूजवळ आणले आणि म्हणाले: पहा, या बाईने व्यभिचार केला आहे. आता कायद्या प्रमाणे तिला दगडांनी मृत्यू पर्यंत मारले पाहिजे, परंतु तुला याविषयी काय म्हणायचे आहे?

येशूने काही उत्तर दिले नाही, आणि त्यांनी स्वतः विचार करावा म्हणून त्याने वाट पाहिली. पण त्यांनी त्याच्यावर दबाव आणला, आणि विचारले तो या स्त्रीच्या बाबतीत काय निर्णय देईल? नंतर तो म्हणाला: तुमच्यापैकी ज्याने कोणताही अपराध केलेला नाही त्याने तिच्यावर पहिला दगड मारावा. आणि तो जास्त काहीही बोलला नाही.

मग त्या सनातन्यांनी आपल्या स्वतःमध्ये पाहिले आणि त्यांच्या सद्सदविवेकाने त्यांना पराभूत केले, आणि जे पुढे होते ते इतरांच्या मागे गेले आणि ते सर्व निघून गेले. येशू

एकटाच त्या स्त्री सोबत राहिला. त्याने सभोवती पाहिले, तेथे इतर कोणीच दिसले नाही, आणि तिला म्हणाला: कोणीही तुला दोषी ठरवले नाही?

ती म्हणाली: कोणीही नाही! तेव्हा तो म्हणाला: मी देखील तुला दोषी ठरवीत नाही. जा आणि भविष्यात पाप करू नको.

माणसांनी फक्त आपल्या देशांतील लोकांचे भले करावे आणि इतर देशांना शत्रू समजावे हे कर्तव्य मानण्याच्या पाचव्या आज्ञेविरुद्धच्या मोहा पासून सावध रहा.

एक कायद्याचा गुरु येशूची परीक्षा पाहू इच्छित होता आणि त्याला म्हणाला: जीवन मिळवण्यासाठी मी काय केलेच पाहिजे?

येशूने उत्तर दिले: तुम्हाला स्वतःला काय करावे ते माहीत आहे: तुमचा पिता, देव, आणि तुमचे भाऊ, त्याचे पुत्र, ते तुमच्या देशातील असोत किंवा नसोत. त्यांच्यावर प्रेमकरा.

आणि कायद्याचा गुरु म्हणाला: वेगवेगळे देश नसते तर चांगले झाले असते, पण माझ्या स्वतःच्या लोकांच्या शत्रूंवर मी कसे प्रेम करू?

आणि येशू म्हणाला: एक ज्यू होता तो संकटात सापडला. त्याला मारझोड करून लुटले व रस्त्यावर टाकून दिले. एक ज्यू धर्मगुरू बाजूने निघून जातांना, त्या जखमी माणसाकडे पाहिले आणि पुढे गेला. नंतर एक ज्यू लेवी(धर्मगुरू सहाय्यक) बाजूने निघून गेला. जखमी माणसाकडे पाहिले आणि पुढे गेला. नंतर एक माणूस आला, शत्रू राष्ट्राचा, एक सामारीतन. ह्या सामारीतनाने त्या ज्युला पाहिले आणि, ज्यूंचा समारीताना विषयी तिरस्कार विचारात न घेता त्याला त्याची द्या आली. त्याने त्याच्या जखमा धुतल्या आणि बांधल्या, आणि आपल्या स्वतःच्या गाढवावर बसवून एका खानावळीत नेले, खानावळ मालकाला त्याच्यासाठी पैसे दिले आणि वचन दिले की आणखी पैसे देण्यासाठी पुन्हा येईल.

पहा तुम्ही सुद्धा जे तुमचा तितस्कार करतात आणि तुमचा विध्वंस करतात त्या परदेशी लोकांशी असेच वागले पाहिजे. तर तुम्हाला खरे जीवन प्राप्त होईल.

येशू म्हणाला: जग त्याच्या स्वतःच्या लोकांवर प्रेम करते पण देवाच्या लोकांचा द्वेष करते. म्हणून धर्मगुरू, प्रवचनकार, अधिकारी या जागांवरची माणसे पित्याची इच्छा पूर्ण करणाऱ्यांना त्रास देतील. मी जेरुसलेमास जात आहे आणि ते मला छळतील आणि ठार मारतील, पण माझा आत्मा मारू शकणार नाहीत आणि तो जिवंत राहील.

जेरुसलेमात येशूचा छळ होणार आणि ठार मारले जाणार हे ऐकून, पीटर दुःखी झाला आणि त्याने येशूचे हात हातात घेतले आणि त्याला म्हणाला: ते तसे असेल तर तुम्ही जेरुसलेमात न जाणे चांगले.

तेव्हा येशू पीटरला म्हणाला: असे म्हणू नको. तू बोलतो तो मोह आहे. जर तुला माझ्या छळ आणि मरणाची भीती वाटत असेल तर त्याचा अर्थ तू जे देवाचे-आत्म्याचे आहे त्याचा विचार करीत नाहीस तर जे मानवी आहे त्याचा विचार करतोस.

आणि लोकांना आणि आपल्या शिष्यांना आपल्या जवळ बोलावून येशू म्हणाला: ज्याला माझ्या शिकवणी प्रमाणे जगायची इच्छा असेल त्याने आपल्या शारीरिक जीवनाचा त्याग केला पाहिजे आणि सर्व प्रकारच्या शारीरिक व्यथांसाठी तयार राहिले पाहिजे: जो आपल्या शारीरिक जीवनासाठी भीत असेल तो खरे जीवन उध्वस्त करील, परंतु तो जो आपल्या शारीरिक जीवनाकडे दुर्लक्ष करतो तो आपले खरे जीवन वाचवील.

परंतु त्यांना हे समजले नाही, आणि मग काही जडवादी त्याच्याकडे आले, आणि खरे जीवन आणि मृत्युपासून जागे होणे याचा अर्थ काय ते त्याने सर्वांना स्पष्ट केले. ह्या जडवाद्यांचा विश्वास होता की शरीराच्या मृत्युनंतर दुसरे जीवन नाही. ते म्हणाले: एखादा मेलेल्यांतून कसा उठू शकेल? जर प्रत्येकजण उठला, तर ते एकत्र राहू शकणार नाहीत. समजा, आमच्यात सात भाऊ आहेत. पहिल्याचे लग्न झाले व तो मरण पावला. त्याच्या बायकोने दुसऱ्या भावाशी लग्न केले, आणि तो मरण पावला; आणि तिने तिसऱ्याशी लग्न केले, तो सुद्धा मरण पावला, अशाप्रकारे सातव्या पर्यंत तिने लग्ने केली. आता ते सर्व मरणातून उठले तर सातही भाऊ एका बायको बरोबर कसे राहू शकतील?

येशूने त्यांना उत्तर दिले: एकतर तुम्ही मुद्दाम गोंधळ करीत आहात किंवा तुम्हाला जीवनासाठी जागे होणे म्हणजे काय ते समजलेले नाही. या जीवनात लोक लग्न करतात.

परंतु ज्यांना चिरकालीन जीवन प्राप्त होते आणि मरणातून जागृत होतात ते लग्न करीत नाहीत आणि मरत नाहीत, कारण ते पित्याशी एकरूप झालेले असतात. तुमच्या धर्मग्रंथात लिहिले आहे की देव म्हणाला: मी अब्राहम आणि जाकोबाचा देव आहे. आणि हे सांगितले तेव्हा अब्राहम आणि जाकोब माणसातून मरण पावले होते. म्हणून जे माणसातून मेलेले आहेत ते देवाला जिवंत आहेत. जर देव आहे, आणि देवाला मृत्यू नाही, मग जे देवासह आहेत ते नेहमीच जिवंत राहातील. मृत्यूमधून जागे होणे म्हणजे पित्याच्या इच्छेत जगणे होय. कारण पित्यासाठी काळ नाही, आणि म्हणून पित्याची इच्छा पूर्ण करून आणि त्याच्याशी एकरूप होऊन माणूस काळ आणि मृत्यू यापासून दूर जातो.

सनातन्यांनी जेव्हा हे ऐकले तेव्हा येशूला गप्प करण्यासाठी काय युक्ती करावी हे त्यांना कळले नाही, आणि त्यांनी सर्वांनी मिळून त्याला प्रश्न विचारायला सुरुवात केली. आणि त्यांच्या पैकी एक म्हणाला: गुरुजी, तुमच्या मताने सर्व कायद्यात मुख्य आज्ञा कोणती?

त्यांना वाटले की येशू कायद्याविषयी उत्तर देतांना गोंधळून जाईल.

परंतु येशू म्हणाला: मुख्य आज्ञा ही आहे की तुम्ही तुमच्या पूर्ण आत्म्याने ज्याच्या सामर्थ्यात तुम्ही आहात त्या प्रभू तुमच्या देवावर प्रेम करावे. आणि दुसरी आज्ञा जी तिच्यातून येते ती म्हणजे तुमच्या शेजाऱ्यावर प्रेम करावे, कारण तोच प्रभू देव त्यांच्यामध्येही आहे. ह्यामध्ये तुमच्या धर्मग्रंथात लिहिलेल्या सर्वाचे सार आहे.

आणि पुढे म्हणाला: तुमच्या मताने ख्रिस्त कोण आहे? तो कोणाचातरी पुत्र आहे का?

ते म्हणाले: आमच्यामते ख्रिस्त दाविदाचा पुत्र आहे.

त्याने उत्तर दिले: मग दाविद ख्रिस्ताला आपला प्रभू कसे म्हणतो? ख्रिस्त हा दाविदाचा पुत्र नाही की शरीराने कोणा एकाचा पुत्र नाही, तर ख्रिस्त तो प्रभू आहे, आपला शासक, ज्याला आपण आमच्या स्वतःमधील जीवन म्हणून ओळखतो. ख्रिस्त म्हणजे ती जाणीव जी आपल्यामध्ये आहे.

आणि येशू म्हणाला: सनातनी गुरुंच्या बिघडविण्या पासून सावध रहा. जडवादी आणि शासक यांच्या बिघडविण्या पासून सावध रहा. पण सर्वात जास्त, स्वयंनियुक्त सनातन्यांपासून सावध रहा, कारण त्यांच्यामध्ये मुख्य अडथळा आहे. आणि जेव्हा तो कशा विषयी सांगत होता ते लोक समजले, तेव्हा त्याने पुन्हा सांगितले: सर्वात जास्त, स्वयंनियुक्त सनातनी, विद्वान गुरुंच्या शिकवणी पासून सावध रहा. त्यांच्यापासून सावध रहा, कारण देवाची इच्छा लोकांना जाहीर करणाऱ्या प्रेषितांची जागा ते घेतात. त्यांनी स्वतःच देवाची इच्छा लोकांना उपदेश करण्याचा अधिकार घेतलेला आहे. ते शब्दाने उपदेश करतात पण कृती काहीच करीत नाहीत. ते फक्त म्हणतात: हे करा आणि ते करा. परंतु करण्यासारखे काहीच नसते, कारण ते काहीच चांगले करीत नाहीत, फक्त बोलतात. जे करता येणे शक्य नाही ते लोकांना करायला सांगतात, आणि स्वतः काही करीत नाहीत. ते शिकवण फक्त आपल्या स्वतःच्या हातात ठेवण्याचा प्रयत्न करतात, त्यासाठी ते उदात्त दिसण्याची पराकाष्ठा करतात; ते स्वतः खास पोशाख घालतात आणि स्वतःचा मोठेपणा दाखवतात. म्हणून समजून घ्या की कोणीही स्वतःला नेता आणि गुरु म्हणू नये.

आत्मनियुक्त सनातनी स्वतःला गुरु म्हणवितात, आणि असे करून तुम्हाला स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करण्यापासून थोपवतात, आणि स्वतःही प्रवेश करीत नाहीत. या सनातन्यांना वाटते की लोकांना बाहेरच्या समारंभ आणि शपथांनी देवाकडे आणणे शक्य होईल. आंधळया माणसा प्रमाणे त्यांना हे कळत नाही की बाह्य देखावा महत्वाचा नाही आणि सर्व गोष्टी आत्म्यावर अवलंबून आहेत. ते स्वतः जे सोपे आणि बाहेरचे आहे ते करतात, पण जे आवश्यक व कठीण आहे –प्रेम, दया, आणि सत्य- याकडे दुर्लक्ष करतात. आपण कायद्या प्रमाणे चालतो असे दिसण्याची आणि इतरांना बाह्यरूपात कायद्या पर्यंत आणण्याची त्यांची इच्छा असते. म्हणून ते रंगवलेल्या थडग्याप्रमाने आहेत, बाहेरून स्वछ परंतु आतून गलिच्छ. ते बाहेरून पवित्र हुतात्म्यांचा आदर करतात, पण वास्तवात तेच नेमके लोक असतात जे संतांचा छळ करून त्यांची हत्त्या करतात. ते सर्व चांगल्या गोष्टींचे शत्रू होते आणि आहेत. जगात सर्व वाईट गोष्टी त्यांच्यामधून येतात, कारण ते चांगल्या गोष्टी लपवतात आणि त्या जागी वाईट गोष्टी पुढे करतात. म्हणून या आत्मनियुक्त गुरुंची सर्वात

जास्त भीती बाळगावी. तुम्हाला स्वतःला ठाऊक आहे की दुसरी कोणतीही चूक सुधारता येईल, पण जर लोकांची चांगले काय आहे याविषयी चूक झाली तर ती सुधारता येणार नाही, आणि या आत्मनियुक्त नेत्यांची बाब अशीच आहे.

आणि येशू म्हणाला: माझी इच्छा आहे की येथे जेरुसलेमात खऱ्या सुखाच्या एका आकलनाने सर्व माणसांनी एकत्र यावे, पण येथले लोक चांगले शिकवणाऱ्या गुरुंची हत्त्या करण्यासाठीच फक्त समर्थ आहेत. म्हणून ते होते तसेच देवाशिवाय राहतील, आणि त्याचे आकलन प्रेमाने स्वीकारीपर्यंत त्यांना खरा देव कळणार नाही.

आणि येशू देवळापासून दूर गेला.

तेव्हा त्याचे शिष्य त्याला म्हणाले: पण देवाच्या देवळाचे, लोकांनी देवाला देण्यासाठी आणलेल्या सर्व शोभेच्या वस्तूंसह काय होईल?

आणि येशू म्हणाला: मी तुम्हाला खरोखर सांगतो की हे सर्व देऊळ त्याचा सर्व शोभेच्या वस्तूंसह नाश पावेल, आणि त्याचे काहीच उरणार नाही. देवाचे खरे देऊळ एकच आहे-माणसांची हृदये-जेव्हा ती एकमेकांशी प्रेम करतील.

आणि त्यांनी त्याला विचारले: ते देऊळ कधी होईल?

आणि येशू त्यांना म्हणाला: ते अजून तरी नाही. लोक पुष्कळ काळ माझ्या शिकवणीच्या नावाने फसवले जातील, आणि त्यामुळे युद्धे आणि बंडाळया होतील. खूप दुष्कृत्ये आणि थोडेसे प्रेम असेल. परंतु जेव्हा खरी शिकवण सर्वत्र सर्व लोकांमध्ये पसरेल, तेव्हा वाईट गोष्टी आणि मोहांचा अंत होईल.

१०

## मोहाशी संघर्ष

म्हणून, मोहात पडू नये यासाठी, आम्ही प्रत्येक क्षणालाच आपले जीवन पित्याशी एक ठेवले पाहिजे.

“आणि आम्हाला मोहात पडू देऊ नकोस”

त्यानंतर, येशूला जाळयात पकडण्यासाठी सनातनी मुख्य धर्मगुरुंनी त्यांना शक्य होते ते करण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून या किंवा त्या मार्गाने त्याचा नाश करता येईल. ते सल्लागार मंडळात जमले आणि विचार करायला लागले.

ते म्हणाले: या माणसाला कसेही करून संपवले पाहिजे. तो त्याची शिकवण अशी सिद्ध करतो की त्याला आपण असेच सोडले तर, सगळे आपल्या श्रद्धा सोडतील आणि त्याच्यावर विश्वास ठेवतील. आता अगोदरच अर्धे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात. परंतु जर ज्यू लोक त्याच्या शिकवणीवर विश्वास ठेवायला लागले की सर्व माणसे एकाच पित्याची लेकरे आहेत आणि भाऊ आहेत, आणि आपले हिब्रू लोक इतरांहून वेगळे नाहीत, तर मग रोमन पूर्णपणे आपल्यापेक्षा वरचढ होतील आणि आपले हिब्रू राज्य कधीच होणार नाही.

आणि सनातनी मुख्य धर्मगुरू आणि विद्वानांनी एकत्र पुष्कळवेळ सल्लामसलत केली आणि त्याचे काय करावे हे ते ठरवू शकले नाहीत, कारण त्याला ठार मारण्यास ते मनाचा निर्धार करू शकले नाहीत.

मग त्यांच्यापैकी एक, कैफास, जो त्या वर्षी उच्च धर्मगुरू होता, त्यांना म्हणाला: सगळया लोकांचा नाश होण्यापेक्षा एका माणसाला ठार मारणे योग्य होईल, जर आपण या

माणसाला एकटे सोडले तर लोकांचा नाश होईल. मी तुम्हाला धोक्याची सूचना देतो की, म्हणून येशूला ठार मारणे अधिक चांगले आहे. अगदी जरी लोक नाश पावले नाहीत तरी सुद्धा, या माणसाला ठार मारले नाही तर ते विखुरतील आणि एका श्रध्दे पासून भटकतील. म्हणून त्याला ठार करणे अधिक चांगले.

आणि जेव्हा कैफास हे म्हणाला तेव्हा ते सर्व येशूला निश्चित ठार करणे आवश्यक होते यावर ठाम राहाण्यास सहमत झाले.

त्यांनी त्याला एकदम ताब्यात घेतले असते आणि ठार मारले असते, पण तो त्यांच्या पासून निर्जन जागी निघून गेला. पण त्यानंतर लगेच पासोव्हरचा सण आला, तेव्हा पुष्कळ लोक जेरुसलेमात सुट्टीसाठी जमले; आणि सनातनी मुख्य धर्मगुरू येशू लोकांबरोबर सणाला येण्याची वाट बघू लागले. म्हणून त्यांनी लोकाना कळवून ठेवले की जर कोणी येशूला पाहिले तर त्याने त्याला त्यांच्याकडे घेऊन यावे.

आणि असे घडले की पासोव्हरच्या सहा दिवस अगोदर येशू आपल्या शिष्यांना म्हणाला: आपण जेरुसलेमाला जाऊ या.

परंतु शिष्य त्याला म्हणाले: जाऊ नका. तुम्हाला दगडांनी ठार मारण्याचे मुख्य धर्मगुरुंनी ठरवले आहे. जर तुम्ही तेथे गेलात तर ते तुम्हाला ठार मारतील.

येशू त्यांना म्हणाला: मी कशालाही भिऊ शकत नाही कारण मी (Understanding) अंतर्दृष्टीच्या प्रकाशात जगतो. आणि प्रत्येक माणूस अडखळू नये म्हणून, दिवसा चालतो आणि रात्री नाही, म्हणून माणसाने, त्याला शंका किंवा भीती वाटू नये म्हणून, या अंतर्दृष्टीने जगले पाहिजे. जो शरीराने जगतो तो माणूसच फक्त शंका आणि भीती बाळगतो. जो अंतर्दृष्टीने जगतो त्याला कशाचीही शंका किंवा भय नसते.

आणि येशू जेरुसलेम जवळच्या बेथनीच्या खेड्यात, मार्था आणि मेरीच्या घरी आला, आणि जेव्हा तो जेवणासाठी बसला तेव्हा मार्था त्याच्यासाठी थांबली. पण मेरीने एक पौंड ताजे सुगंधी तेल घेऊन, त्याच्या पायांवर ओतले आणि ते आपल्या केसांनी पुसले.

जेव्हा तेलाच्या वासाने सगळी खोली भरून गेली, तेव्हा ज्युदास इस्कारीअत म्हणाला: मेरीने हे महागडे तेल वाया घालवून चूक केली आहे; ते तीनशे पेन्सला विकले गेले असते आणि ते पैसे गरिबांना दिले असते तर बरे झाले असते.

पण येशू म्हणाला: तुमच्यासाठी गरीब तुमच्यासह नेहमीच असतील, पण मी लवकरच दूर निघून जाणार आहे. तिने चांगले केले! तिने माझे शरीर त्याचे दफन करण्यासाठी तयार केले आहे. सकाळी येशू जेरुसलेमात गेला जेथे सणासाठी पुष्कळ लोक आले होते, आणि जेव्हा त्यांनी येशूला ओळखले तेव्हा ते त्याच्या भोवती जमले, झाडांच्या फांद्या मोडून घेतल्या, आणि आपले कपडे काढून त्याच्या पुढे पायाखाली रस्त्यावर टाकले, आणि सर्व ओरडले: तो आमचा खरा राजा आहे, त्याने आम्हाला खरा देव ओळखायला शिकवले.

येशू एका गाढवाच्या पिल्लाच्या पाठीवर बसून चालला होता, आणि लोक त्याच्या पुढे धावत होते आणि ओरडत होते. तसाच त्याने जेरुसलेमात प्रवेश केला. आणि जेव्हा अशा तऱ्हेने नगरात आला तेव्हा सर्व लोक उत्तेजित झाले आणि विचारायला लागले: तो कोण आहे? आणि जे त्याला ओळखत होते त्यांनी उत्तर दिले: येशू, गॅलीलीमधील नाझरेथचा प्रेषित.

आणि येशू मंदिरात गेला आणि पुन्हा त्याने तेथे खरेदी आणि विक्री करणारे हाकून लावले.

जेव्हा सनातनी मुख्य धर्मगुरुंनी हे सर्व पहिले तेव्हा ते एकमेकांना म्हणाले: पहा हा माणूस काय करीत आहे? सर्व लोक त्याच्या मागे जात आहेत. आणि सरळ लोकांमधून त्याला घेऊन जाण्याची त्यांना हिंमत झाली नाही, कारण त्यांना दिसत होते की लोक त्याच्या बाजूने होते. आणि त्याला कपटाने कसे पकडावे याचा त्यांनी विचार केला.

मधल्या काळात येशू मंदिरात होता आणि लोकांना शिकवीत होता, त्यामध्ये ज्यूंच्या शिवाय अधार्मिक असलेले ग्रीक लोक होते. ग्रीकांनी येशूच्या शिकवणी विषयी ऐकले होते आणि त्यांना समजले होते की तो फक्त ज्यूंनाच नव्हे तर सगळया माणसांना सत्य

शिकवीत होता; म्हणून त्यांनी सुद्धा त्याचे शिष्य होण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याविषयी फिलीपशी बोलले. आणि फिलिपने ते एंड्रयूला सांगितले.

त्या दोघांना येशू आणि ग्रीकांना एकत्र आणण्याची भीती वाटली. त्यांना भीती वाटली की हिब्रू आणि इतर देशातील लोक यांच्यात फरक न केल्यामुळे लोक येशूवर रागावतील, आणि त्यांनी त्याला सांगायला बराच काळ घुटमळले, त्यानंतर त्यांनी दोघांनी एकत्र त्याला सांगितले, आणि हे ऐकून की ग्रीकांना त्याचे शिष्य व्हायचे आहे येशू अस्वस्थ झाला. त्याला माहीत होते की हिब्रू आणि अधार्मिक यात फरक न केल्यास लोक त्याचा द्वेष करतील, आणि तरीही त्याने अधार्मिकांसह एक होण्याचे मान्य केले.

तो म्हणाला: मी 'मानवाचा पुत्र' म्हणजे काय समजतो ते स्पष्ट करण्याची वेळ आली आहे. आणि जरी हे स्पष्ट करतांना मला मरण येणार कारण मी ज्यू आणि अधार्मिक लोकांमधील फरक नष्ट करीत आहे, तरीही मी सत्य बोलणार आहे. एक गव्हाचा दाणा जेव्हा तो स्वतः नष्ट होतो तेव्हा फक्त फलधारण करतो. जो आपल्या शारीरिक जीवनावर प्रेम करतो तो त्याचे खरे जीवन घालवून बसतो, परंतु जो शारीरिक जीवनाकडे दुर्लक्ष करतो तो चिरकालीन जीवन टिकवून ठेवतो. जो माझ्या शिकवणी प्रमाणे चालू इच्छितो त्याला मी जे करतो ते करू दे. आणि जो मी करतो ते करील त्याला माझ्या पित्याकडून पारितोषिक मिळेल. माझा आत्मा आता क्षुब्ध आहे: आता या घटकेला मी मझ्या क्षणिक जीवनाच्या विचाराला शरण जावे किंवा पित्याची इच्छा पूर्ण करावी? ते आता शक्य आहे का, जेव्हा ती घटका जिच्यात मी जगतो ती आलेली आहे, मी म्हणेन: बापा, मला जे केलेच पाहिजे त्यातून मला मुक्त करता येईल का? मी असे म्हणू शकणार नाही, कारण मी आता जिवंत आहे.

म्हणून मी म्हणेन: बापा, माझ्यामध्ये तू स्वतःला दाखव.

आणि येशू म्हणाला: येथून पुढे सध्याच्या माणसांच्या समाजाच्या नशिबात विनाश आहे. या वेळेपासून जे जगावर राज्य करील ते नाश पावेल. आणि जेव्हा मानवाचा पुत्र पार्थिव जीवनाच्या वर उंचावला जाईल तेव्हा तो सर्वांना एकत्र आणील.

मग ते ज्यू त्याला म्हणाले: आम्हाला धर्मग्रंथातून माहीत आहे की एक शाश्वत ख्रिस्त आहे. मग तू असे कसे म्हणतोस की मानवाचा पुत्र उंचावला जाईल? मानवाचा पुत्र उंचावणे याचा अर्थ काय?

याला येशूने उत्तर दिले: मानवाचा पुत्र उंचावणे म्हणजे तुमच्यामध्ये असलेल्या अंतर्दृष्टीच्या प्रकाशात जगणे. पार्थिव जीवनाच्या वर मानवाचा पुत्र उंचावणे म्हणजे अंतर्दृष्टीचा पुत्र होण्यासाठी, प्रकाशात असतांना प्रकाशावर विश्वास ठेवणे.

जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो माझ्यावर विश्वास ठेवीत नाही तर जगाला जीवन देणाऱ्या आत्म्यावर विश्वास ठेवतो. आणि जो माझी शिकवण समजतो तो जगाला जीवन देणाऱ्या आत्म्याला समजतो. जर एखादा माझे शब्द ऐकतो पण ते पाळीत नाही, तर मी त्याला दोष देणार नाही, कारण मी दोष द्यायला नाही तर तारण करायला आलो आहे. जो माझी शिकवण स्वीकारीत नाही, त्याला माझी शिकवण दोष देत नाही तर, त्याच्या स्वतःमध्ये असलेली अंतर्दृष्टी त्याला दोष देते. तीच आहे की जी त्याला दोष देते. मी स्वतः माझ्यातर्फे बोलत नाही, तर माझा पिता-माझ्यामधील जिवंत आत्मा-मला सुचवतो ते मी बोलतो. की जे मी म्हणतो ते मला अंतर्दृष्टीच्या आत्म्याने सांगितलेले आहे, आणि जे मी शिकवतो ते खरे जीवन आहे. असे बोलल्या नंतर , येशू दूर गेला आणि मुख्य धर्मगुरुंच्या पुन्हा दृष्टिआड झाला.

आणि हे येशूचे शब्द ज्यांनी ऐकले त्यापैकी अनेक शक्तीशाली आणि श्रीमंत लोक होते ज्यांचा त्याच्या शिकवणीवर विश्वास होता पण ते मुख्य धर्मगुरूंकडे कबूल करायला घाबरत होते. मुख्य धर्मगुरुंपैकी एकही मान्य करायला तयार नव्हता की तो शिकवणीवर विश्वास ठेवतो, कारण त्यांना देवाच्या नाही तर माणसाच्या मापानी पारखण्याची सवय होती.

येशूने स्वतःला दृष्टिआड केल्यावर, मुख्य धर्मगुरू आणि प्रौढ पुन्हा कैफासाच्या राजवाड्यात एकत्र जमले. आणि येशूला लोकांच्या नकळत कसे पकडावे याचा विचार करू लागले, कारण त्याला उघडपणे पकडण्याची त्यांना भीती वाटत होती.

आणि येशूच्या पहिल्या बारा शिष्यांपैकी एक, जुदास इस्कारीएत, त्यांच्या सल्लागार मंडळात आला आणि म्हणाला: जर तुम्हाला येशूला गुप्तपणे असे पकडायचे असेल की लोकांना दिसू नये, तर मी अशी वेळ शोधीन की जेव्हा त्याच्यासोबत थोडेसे लोक असतील, आणि मी तुम्हाला तो कोठे आहे ते दाखवीन आणि मग तुम्ही त्याला पकडा. पण त्यासाठी तुम्ही मला काय द्याल? त्यांनी त्याला चांदीची तीस नाणी द्यायचे वचन दिले. त्याने ते मान्य केले; आणि त्यावेळेपासून येशूला पकडण्यासाठी मुख्य धर्म गुरुंना नेण्याची तो संधी शोधू लागला.

मधल्या काळात येशू लोकांपासून दूर गेला आणि फक्त त्याचे शिष्य त्याच्या सोबत होते. जेव्हा न आंबवलेल्या पावाचा(भाकरीचा) सण जवळ आला होता शिष्य येशूला म्हणाले: आम्ही व्हलांडनाचा सण कोठे पाळावा? आणि येशू म्हणाला: खेड्यात जा, एखाद्या घरात प्रवेश करा, सणाची तयारी करायला तुम्हाला वेळ नव्हता असे सांगा, आणि व्हलांडनाचा सण साजरा करायला आम्हाला घ्या अशी तेथे राहणाऱ्या लोकांना विनंती करा.

शिष्यांनी तसे केले: त्यांनी खेड्यातील एका माणसाला विचारले आणि त्याने त्यांना आत बोलावले. म्हणून ते आले आणि येशू आणि बारा शिष्य, जेवायला बसले, ज्युदास त्यांच्यात होता. येशूला माहीत होते की जुदास इस्कारीएतने त्याला ठार मारण्यासाठी विश्वासघात करण्याचे वचन दिले होते: पण त्याने त्याला दोष दिला नाही आणि त्याने स्वतः बदला घेतला नाही, पण जसे सर्व जीवन भर त्याने त्याच्या शिष्यांना प्रेम करायला शिकवले, तसे त्याने जुदासची प्रेमाने कानउघाडनी केली. जेव्हा ते सर्व बाराजण टेबलाजवळ बसले, त्याने त्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाला: तुमच्यामध्ये माझा विश्वासघात करणारा बसलेला आहे. होय, जो माझ्या बरोबर खातो आणि पितो तो माझा नाश करील. आणि तो जास्त काहीच बोलला नाही, त्यामुळे त्यांना तो कोणाविषयी बोलतो ते कळले नाही, आणि त्यांनी जेवायला सुरुवात केली.

जेव्हा त्यांनी जेवायला सुरुवात केली, तेव्हा येशूने एक भाकरी घेतली, ती बारा तुकड्यात मोडली, प्रत्येक शिष्याला एक तुकडा दिला, आणि म्हणाला: हे घ्या आणि खा--हे माझे शरीर आहे. आणि त्याने एक पेला वाइनने भरला, तो शिष्यांच्या हातात दिला आणि म्हटले: या पेल्यातून तुम्ही सर्व प्या. आणि जेव्हा त्या सर्वांनी पिऊन घेतले तेव्हा तो म्हणाला: हे माझे रक्त आहे. मी ते अशासाठी सांडणार आहे की लोकांना ही माझी इच्छा कळावी की त्यांनी एकमेकांना त्यांच्या अपराधांची क्षमा करावी. कारण मी लवकरच मरणार आहे आणि यापुढे या जगात तुमच्यासह असणार नाही, पण फक्त स्वर्गाच्या राज्यात तुम्हाला भेटेन. त्यानंतर येशू टेबलावरून उठला, स्वतः भोवती एक टॉवेल गुंडाळला, पाण्याचे एक भांडे घेतले, आणि सर्व शिष्यांचे पाय धुवायला सुरुवात केली. जेव्हा तो पीटर जवळ गेला तेव्हा, पीटरने त्याला विरोध केला आणि म्हणाला: तुम्ही माझे पाय का धुता? येशू त्याला म्हणाला: मी तुझे पाय धुणे तुला विचित्र दिसते, पण मी हे का करतो हे तुला लवकरच समजेल. जरी तू स्वच्छ असलास तरी, तुमच्यापैकी सर्व तसे नाहीत: तुमच्यामध्ये माझा विश्वास घात करणारा आहे, ज्याला मी माझ्या स्वतःच्या हाताने भाकरी व वाईन दिली आणि ज्याचे पाय धुण्याची माझी इच्छा आहे आणि जेव्हा येशूने आपल्या सर्व शिष्यांचे पाय धुतले, तो पुन्हा बसला आणि म्हणाला: मी ही का केले हे तुम्हाला समजले का? मी हे अशासाठी केले की तुम्ही एकमेकाशी असेच वागावे. मी, तुमचा गुरु, हे अशासाठी करतो की तुम्हाला कळावे की तुम्हाला इजा करणाऱ्याशी तुम्ही कसे वागावे. जर तुम्हाला हे समजले असेल आणि तसे कराल, तर तुम्ही सुखी व्हाल. जेव्हा म्हणालो की तुमच्यापैकी एक माझा विश्वास घात करणार आहे मी तुम्हा सर्वांबद्दल बोलत नाही, तुमच्यापैकी फक्त एक, ज्याचे पाय मी धुतले आणि ज्याने माझ्या बरोबर भाकरी खाल्ली, तो माझा नाश करील.

आणि हे म्हटल्यावर येशू आत्म्याने क्षुब्ध झाला आणि पुन्हा म्हणाला: होय, होय, तुमच्या पैकी एक माझा विश्वासघात करील.

आणि पुन्हा त्याचे शिष्य तो कोणा विषयी बोलतो हे न कळून, एकमेकांकडे पहायला लागले. त्या पैकी एक सिमोन जो येशूच्या शेजारी बसला होता. त्याला पीटरने

खूण करून सांगितले की तो विश्वास घातकी कोण ते त्याने येशूला विचारावे. आणि त्याने तसे केले.

येशू म्हणाला: मी भाकरीचा एक तुकडा भिजवीन आणि त्याला देईन आणि तो ज्याला मी तो देईन तो माझा विश्वास घात करणारा असेल. आणि त्याने ती भाकरी जुदास इस्कारीएतला दिली आणि त्याला म्हणाला: तुला जे करायचे आहे, ते लवकर कर.

आणि जुदास समजला की त्याला तेथून दूर गेले पाहिजे, आणि त्याने ती भिजलेली भाकरी घेतल्या बरोबर बाहेर पडला. आणि त्याचा पाठलाग करता आला नाही कारण त्यावेळी रात्र होती.

जेव्हा जुदास निघून गेला तेव्हा, येशू म्हणाला: आता तुम्हाला स्पष्ट झाले असेल मानवाचा पुत्र काय आहे की त्याला स्वतः देवाएवढे आशीर्वादित करण्यासाठी त्याच्यात देव आहे.

मुलांनो! मी तुमच्यासह फार वेळ नाही. माझ्या शिकवणीवर वादविवाद करु नका, जसे मी सनातन्यांना सांगितले आहे, पण मी करतो ते करा. मी तुम्हाला नवी आज्ञा देतो: मी जसे नेहमी आणि अंतापर्यंत तुमच्यावर प्रेम केले; तसे तुम्ही नेहमी आणि अंतापर्यंत एकमेकांवर प्रेम करा. त्यामुळेच फक्त तुम्ही प्रसिद्ध व्हाल. इतर लोकांपासून वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी एकमेकांवर प्रेम करा.

आणि त्यानंतर ते ऑलीव्हच्या पर्वतावर गेले.

तेथे रस्त्यात येशू त्यांना म्हणाला: आता ती वेळ येत आहे जेव्हा धर्म ग्रंथात जे म्हटले आहे ते घडेल: मेंढपाळ ठार मारला जाईल आणि मेंढरे सर्व विखुरतील. ते आज रात्रीच घडेल. मला पकडतील आणि तुम्ही सर्व मला सोडून जाल आणि विखरून जाल.

आणि पीटर त्याला म्हणाला: जरी दुसरे सर्व घाबरले आणि विखुरले, तरी मी तुला नाकारणार नाही. मी तुझ्याबरोबर कैदेत जायला आणि मरायला तयार आहे.

आणि येशू त्याला म्हणाला: मी तुला सांगतो की आज रात्री, मला पकडल्या नंतर, कोंबडा आरवण्यापूर्वी, तू मला एकदा नव्हे तर तीनदा नाकारशील.

पीटरने उत्तर दिले की तो त्याला कधीच नाकारणार नाही; आणि दुसरे सर्व शिष्य तसेच म्हणाले. तेव्हा येशू त्यांना म्हणाला: पूर्वी तुम्हाला किंवा मला कशाचीही कमतरता नव्हती. मी आज्ञा केल्याप्रमाणे तुम्ही पाकीटाशिवाय आणि बुटे न बदलता गेलात. पण आता मला बेकायदा ठरवल्या नंतर आपण यापुढे असे करू शकणार नाही, तर रसद खरेदी केली पाहिजे आणि सुरे मिळवले पाहिजेत कारण आपण विनाकारण नाश पावू नये.

शिष्य म्हणाले: पहा, आमच्याकडे दोन सुरे आहेत आणि येशूने उत्तर दिले: हे ठीक आहे.

हे म्हटल्या नंतर, येशू शिष्यांसह जेस्थिमनीच्या बागेत गेला. आणि बागेत पोहोचल्यावर तो म्हणाला: तुम्ही येथे थांबा मला प्रार्थना करायची इच्छा आहे.

आणि तो दुःखी आणि यातनेत पीटर आणि झुबेदिच्या दोन मुलांजवळ आला आणि त्यांना म्हणाला: हे मला खूप कठीण होत आहे-माझ्या मरणा पूर्वी मी दुःखात आहे. येथे थांबा, आणि माझ्या सारखेच दुःखी होऊ नका.

आणि तो थोडा पुढे गेला, जमिनीवर उपडा (डोके खाली करून) झोपला, आणि असे म्हणत प्रार्थना करू लागला: माझ्या पित्या, आत्म्या! माझी इच्छा जी अशी आहे की मी मरू नये, त्या प्रमाणे नव्हे तर तुझ्या इच्छे प्रमाणे होवो. मला मृत्यू येऊ दे. परंतु एक आत्मा म्हणून तुझ्यासाठी सर्व शक्य आहे-मी मृत्यूला भिऊ नये आणि शरीराच्या मोहात पडू नये म्हणून मला साहाय्य कर.


मग तो उठला, शिष्यांकडे गेला, आणि त्याला दिसले की ते दुःखी झाले आहेत. आणि तो त्यांना म्हणाला: तुम्ही एक तासभर माझ्या सारखे आत्म्यात जगू शकला नाहीत हे कसे? तुमच्या आत्म्याला उंच उठवा, असे की तुम्ही शरीराच्या मोहाला बळी पडणार नाही. आत्मा सामर्थ्यवान आहे, पण शरीर दुबळे आहे.

आणि पुन्हा येशू त्यांच्यापासून दूर गेला, आणि पुन्हा असे म्हणत प्रार्थना करू लागला: पित्या! जर मला दुःख सहन करूनच आणि मेले पाहिजे, तर मला मरू दे, आणि

तुझ्या इच्छे प्रमाणे होऊ दे! हे म्हटल्यानंतर, तो पुन्हा शिष्यांजवळ आला, आणि त्याला दिसले की ते अजून अधिक हताश झाले आहेत आणि रडण्याच्या तयारीत आहेत.

आणि तो पुन्हा त्यांच्यापासून दूर गेला आणि तिसऱ्या वेळी म्हणाला: पित्या, तुझ्या प्रमाणे होवो.

मग तो त्याच्या शिष्यांकडे आला आणि त्यांना म्हणाला: आता स्वतःला शांत करा आणि विश्रांती घ्या, कारण आता हे ठरले आहे की मी मला स्वतःला सांसारिक(पृथ्वीवरील) लोकांच्या स्वाधीन करावे.



११

## निरोपाचे प्रवचन

वैयक्तिक जीवन हा शरीराचा एक भ्रम आहे, एक वाईट गोष्ट. खरे जीवन हे सर्व मानवाचे सामाईक जीवन आहे.

पण वाईटापासून आम्हाला सोडव

आणि पीटर येशूला म्हणाला: तुम्ही कोठे जात आहात? येशूने उत्तर दिले: मी जेथे जात आहे तेथे आता तू येऊ शकत नाहीस, पण नंतर तू सुद्धा तेथे जाशील.

आणि पीटर म्हणाला: तू जेथे जात आहेस तेथे आता जाण्याची शक्ती माझ्यात नाही असे तुला का वाटते? मी तुझ्यासाठी माझे जीवन देईन.

येशू म्हणाला: तू म्हणतोस तुझे जीवन माझ्यासाठी देशील: असे पहा की कोंबडा आरवण्या पूर्वी मला तीन वेळा नाकारणार नाहीस.

आणि तो शिष्यांकडे वळला आणि म्हणाला: क्षुब्ध होऊ नका किंवा घाबरू नका, पण जीवनाच्या खऱ्या देवावर आणि माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवा.

पित्याचे जीवन हे फक्त येथील पृथ्वीवरील जीवन नाही, दुसरेही जीवन आहे. जर पित्याचे जीवन हे फक्त ह्या जीवना सारखे असते, तर मी तुम्हाला वचन दिले असते की जेव्हा मी मरेण तेव्हा मी आब्राहामाच्या हृदया जवळ असेन आणि तेथे तुमच्यासाठी जागा तयार करीन आणि मी येईन आणि तुम्हाला घेऊन जाईन आणि आपण एकत्र आब्राहामाच्या हृदयाजवळ सुखात असू. परंतु मी तुम्हाला दुसऱ्या जीवनाचा मार्ग दाखवतो.

थॉमस म्हणाला: पण तू कोठे चाललास ते आम्हाला ठाऊक नाही आणि त्यामुळे आम्हाला मार्ग कळू शकणार नाही. मृत्युनंतर काय आहे ते आम्हाला कळले पाहिजे.

येशू म्हणाला: मी तेथे काय असेल ते दाखवू शकत नाही; माझी शिकवण ही मार्ग आणि सत्य आणि जीवन आहे. माझ्या शिकवणी शिवाय जीवनाच्या पित्याशी जोडून घेणे असंभव आहे. जर तुम्ही माझी शिकवण पाळली तर तुम्ही पित्याला जाणाल. फिलीप म्हणाला: पण पिता कोण आहे?

येशूने उत्तर दिले: पिता तो आहे जो जीवन देतो. मी पित्याची इच्छा पूर्ण केली आहे आणि त्यामुळे माझ्या जीवना वरून तुम्ही पित्याची इच्छा ओळखू शकाल. मी पित्यामध्ये राहतो आणि पिता माझ्यामध्ये. जे सर्व मी बोलतो आणि करतो, ते पित्याच्या इच्छेने करतो. माझी शिकवण ही आहे की मी पित्यामध्ये आहे आणि पिता माझ्यामध्ये. जरी तुम्हाला माझी शिकवण समजत नसेल, तरी अजून तुम्ही मला आणि मी काय करतो ते पाहता: आणि त्याच्यावरून तुम्हाला कळेल पिता काय आहे. तुम्हाला ठाऊक आहे की जो माझी शिकवण अनुसरेल तो मी करतो तेच करील, आणि जास्त सुद्धा, कारण मी मरणार आहे, जेव्हा तो अजूनही जिवंत असेल. जो माझ्या शिकवणी प्रमाणे जगेल त्याची इच्छा असेल ते सर्व त्याला मिळेल, कारण पुत्र पित्याशी एकरूप असेल. माझ्या शिकवणीला धरून तुमची कोणतीही इच्छा असेल ती पूर्ण केली जाईल. पण त्यासाठी तुम्ही माझ्या शिकवणीवर प्रेम केले पाहिजे. माझी शिकवण माझ्या जागी तुमची मध्यस्थी करील आणि आराम देईल. ती आराम देणारी सत्याची जाणीव सांसारिक माणसांना समजणार नाही, पण ती तुमच्या स्वतःमध्ये तुम्हाला कळेल. तुम्ही एकटे असणार नाही, कारण माझ्या शिकवणीचा आत्मा तुमच्यामध्ये असेल. मी मरेण आणि सांसारिक माणसे मला पाहणार नाहीत, पण तुम्ही मला पहाल कारण माझी शिकवण जिवंत असेल आणि तुम्ही तिच्याप्रमाणे जगाल. आणि मग जर माझी शिकवण तुमच्यामध्ये असेल तर, तुम्हाला समजेल की मी पित्यामध्ये आहे आणि पिता माझ्यामध्ये. जो माझी शिकवण पूर्ण करील तो पित्याला आपल्यात जाणील आणि माझा आत्मा त्याच्यात असेल.

मग ज्युदास(इस्कारीएत नव्हे) त्याला म्हणाला: पण सर्व माणसे सत्याच्या आत्म्याने का जगू शकत नाहीत?

आणि येशूने उत्तर दिले: माझी शिकवण जो पूर्ण करतो फक्त त्याच्यावर पिता प्रेम करतो आणि फक्त त्याच्यातच माझा आत्मा वस्ती करणे शक्य आहे. माझी शिकवण पूर्ण न करणाऱ्यावर माझा पिता प्रेम करु शकणार नाही, कारण ती शिकवण माझी नसून पित्याची आहे. हे इतकेच आता तुम्हाला सांगू शकतो. परंतु माझा आत्मा, सत्याचा आत्मा जो मी गेल्यानंतर तुमच्या मध्ये वस्ती करील, तुम्हाला सर्व गोष्टी प्रकट करील, आणि तुम्हाला आठवेल आणि मी सांगितले आहे त्यातील बरेचसे तुम्हाला समजेल. त्यामुळे तुमच्याकडे नेहमीच एक शांतता प्रिय आत्मा असेल, या जागातील लोक शोधतात ती शांतता नव्हे, तर अशी मनाची शांतात की तुम्हाला कोणाची भीती वाटणार नाही. जर तुम्ही माझी शिकवण पूर्ण केलीत तर तुम्हाला माझ्या मृत्यूचे दुःख करण्याची गरज लागणार नाही.

मी, सत्याचा आत्मा म्हणून, तुमच्याकडे येईन आणि तुमच्या हृदयात पित्याच्या ज्ञानासह वस्ती करीन. जर माझी शिकवण तुम्ही पूर्ण केलीत तर आनंदी व्हा, कारण मी शरीराने तुमच्यासोबत असण्या ऐवजी, तुमच्या हृदयात पिता तुमच्यासोबत असेल, आणि ते तुमच्यासाठी जास्त चांगले असेल.

माझी शिकवण हे जीवनाचे झाड आहे. पिता त्या झाडाची काळजी घेतो. तो छाटणी करतो आणि ज्या फांद्यांना फळे आहेत त्यांची काळजी घेतो, की त्यांनी अधिक उत्पन्न द्यावे. माझ्या जीवनाच्या शिकवणीला धरून ठेवा आणि तुम्हाला अधिक जीवन मिळेल. जसा कोंब तो स्वतः जिवंत रहात नाही तर तो झाडाचा भाग म्हणून असतो, तसेच तुम्ही माझ्या शिकवणीवर जिवंत रहावे. माझी शिकवण झाड असून तुम्ही कोंब आहात. जो माझ्या जीवनाच्या शिकवणी प्रमाणे जगतो त्याला पुष्कळ फळ येईल, कारण माझ्या शिकवणी शिवाय जीवन नाही. जो माझ्या शिकवणी प्रमाणे जगत नाही तो मेलेल्या फांद्या कापून जाळतात तसा निस्तेज होतो आणि नष्ट होतो.

जर तुम्ही माझ्या शिकवणी प्रमाणे जगलात आणि ती पूर्ण केलीत तर तुम्हाला हवे असलेले सर्व तुम्हाला मिळेल. कारण ही पित्याची इच्छा आहे की तुम्ही खरे जीवन जागावे आणि तुम्हाला तुम्ही इच्छा कराल ते मिळावे. जसे माझ्या पित्याने मला जे चांगले आहे ते दिले आहे, तसे तेच मी तुम्हाला देतो. हे चांगले आहे ते धरून ठेवा. मला जीवन मिळाले आहे

कारण पिता माझ्यावर प्रेम करतो आणि मी पित्यावर प्रेम करतो. तुम्ही सुद्धा त्याच प्रेमाने जगले पाहिजे, तुम्ही त्याच्याने जगलात तर तुम्ही परमसुखी व्हाल. माझी आज्ञा आहे की मी जसे तुमच्यावर प्रेम केले तसे तुम्ही एकमेकांवर प्रेम करावे. जसा मी केला तसा दुसऱ्यासाठी आपल्या जीवनाचा त्याग करणे यापेक्षा जास्त प्रेम असू शकत नाही.

जर मी तुम्हाला शिकवले त्याप्रमाणे वागलात तर तुम्ही माझ्यासारखेच आहात. मी तुम्हाला ज्यांना हुकुम कारावा असे गुलाम समजत नाही, तर समान समजतो, म्हणून पित्यापासून मला जे समजले आहे ते मी तुम्हाला स्पष्ट करून सांगितले. तुम्ही माझी शिकवण तुमच्या स्वतःच्या इच्छेने निवडली नाही, तुम्ही ती निवडली आहे कारण ज्याच्यामुळे जगू शकाल असे सत्य मी तुम्हाला दाखवले आहे, आणि ज्याच्यापासून तुम्हाला तुमची इच्छा असेल ते मिळणार आहे.

सर्व शिकवण ही आहे-एकमेकांवर प्रेम करा.

जर जग तुमचा द्वेष करीत असेल, तर आश्चर्यचकित होऊ नका: ते माझ्या शिकवणीचा द्वेष करते. जर तुम्ही जगाबरोबर एक असाल तर ते तुमच्यावर प्रेम करील. परंतु मी तुम्हाला या जगांतून बाहेर काढले आहे, आणि त्यासाठी ते तुमचा द्वेष करील.

जर त्यांनी माझा छळ केला, तर ते तुमचाही छळ करतील, आणि ते हे सर्व करतील कारण ते खऱ्या देवाला ओळखत नाहीत. मी त्यांना समजावून सांगितले, पण त्यांना माझे ऐकण्याची इच्छा नव्हती. त्यांना माझी शिकवण समजली नाही कारण त्यांना पिता समजला नाही. त्यांनी माझे जीवन पाहिले आणि माझ्या जीवनाने त्यांना त्यांच्या चुका दाखवल्या, आणि त्यामुळे त्यांनी माझा अधिकच द्वेष केला.

सत्याचा आत्मा जो तुमच्यामध्ये येईल तो ह्याची तुम्हाला खात्री करून देईल. पण तुम्ही स्वतः खात्री करून घ्या. मी तुम्हाला हे अगोदरच सांगतो, कारण ते तुमचा छळ करतील तेव्हा तुम्ही फसू नये. ते तुम्हाला वाळीत टाकतील; तुम्हाला ठार मारून देव प्रसन्न होईल असे त्यांना वाटेल. आणि ते हे सर्व करतील कारण त्याना माझी शिकवण किंवा खरा

देव समजलेला नसेल. मी तुम्हाला हे अगोदरच सांगतो कारण ते घडून येईल तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटू नये.

तर आता मी ज्याने मला पाठवले त्या आत्म्याकडे जात आहे, आणि आता तुम्हाला समजलेले आहे, मी कोठे जातो आहे ते तुम्ही विचारण्याची गरज नाही. मी कोठे जातो हे सांगितले नव्हते म्हणून यापूर्वी तुम्ही दुःखी होतात.

पण मी तुम्हाला खरे सांगतो की मी जातो हे तुमच्यासाठी चांगले आहे. जर मी मेलो नसतो तर सत्याचा आत्मा तुमच्या कडे आला नसता, पण मी मेलो तर तो तुमच्यामध्ये वस्ती करील. तो आत्मा तुमच्यात राहील आणि तुम्हाला काय सत्य, काय असत्य, आणि निर्णय कसा घ्यावा ते स्पष्ट होईल. खोटेपणा हा आहे की, लोक आत्म्याच्या जीवनात विश्वास ठेवीत नाहीत: सत्य हे आहे की, मी पित्याशी एकरूप आहे: आणि निर्णय हा आहे, शारीरिक जीवनाचे सामर्थ्य नष्ट व्हावे. मी तुम्हाला पुष्कळ सांगू शकेन, पण ते तुम्हाला समजायला कठीण जाईल. पण जेव्हा सत्याचा आत्मा तुमच्यात राहील तेव्हा तो तुम्हाला सर्व सत्य दाखवील कारण तो तुम्हाला त्याची स्वतःची नवीन गोष्ट नाही तर देवाकडून जे आहे ते सांगेल; आणि जीवनाच्या सर्व परिस्थितीत तो तुम्हाला मार्ग दाखवील. जसा मी पित्याकडून आलेलो आहे, तसा तो सुद्धा पित्याकडून आलेला असेल आणि म्हणून मी सांगतो तेच तो तुम्हाला सांगेल.

परंतु जेव्हा मी, सत्याचा आत्मा म्हणून, तुमच्यात असेन, मी तेथे आहे हे तुम्हाला नेहमीच कळणार नाही. काही वेळा तुम्ही माझे ऐकाल, काही वेळा ऐकणार नाही.

आणि शिष्य एकमेकांना म्हणाले: याचा अर्थ काय? ते म्हणतात: काहीवेळा तुम्ही माझे ऐकाल आणि काहीवेळा नाही. काहीवेळा तुम्ही ऐकाल काहीवेळा नाही याचा अर्थ काय?

येशू त्याना म्हणाला: तुम्ही काही वेळा ऐकाल, आणि काही वेळा नाही याचा अर्थ काय हे तुम्हाला समजले नाही? तुम्हाला ठाऊक आहे जगात कसे असते: काही दुःखी

असतात आणि शोक करतात त्याच वेळी दुसरे आंनदोत्सव करतात. तुम्ही सुध्दा दुःखात असाल, पण तुमचे दुःख आनंदात बदलेल. एखादी स्त्री प्रसुतीत वेदना सहन करते, पण जेव्हा ते घडून जाते तेव्हा तिला ते दुःख आठवत नाही, कारण तिने बाळाला जागात आणलेले असते त्याचा आनंद झालेला असतो. म्हणून तुम्ही दुःखी व्हाल आणि मग अचानक माझी उपस्थिती जाणवेल: सत्याचा आत्मा तुमच्यात प्रवेश करील आणि तुमचे दुःख आनंदात बदलेल. मग तुम्ही मला काही विचारणार नाही, कारण तुम्ही इच्छा केलेल सर्व तुम्हाला मिळालेले असेल. मग तुमच्यापैकी कोणीएक आत्म्यामध्ये जी इच्छा करील ती त्याच्या पित्याकडून पूर्ण होईल.

तुम्ही पूर्वी आत्म्याकडून काही मागितले नसेल, पण मग तुमची इच्छा असेल ते मागाल आणि ते सर्व तुमचे होईल जेणे करून तुमचा आनंद पूर्ण होईल. आता, एक माणूस म्हणून, मी हे तुम्हाला स्पष्ट शब्दात सांगू शकत नाही, परंतु मग जेव्हा सत्याचा आत्मा म्हणून तुमच्या मध्ये वस्ती करीन तेव्हा-मी पित्याविषयी स्पष्टपणे घोषणा करीन. मग जे सर्व तुम्ही पित्याकडे आत्म्याच्या नावाने मागाल ते तुम्हाला माझ्याकडून नव्हे तर पित्याकडून दिले जाईल, कारण माझी शिकवण स्वीकारली आणि समजून घेतले की आत्मा जागात पित्याकडून येतो आणि जगातून परत पित्याकडे जातो म्हणून तो तुमच्यावर प्रेम करतो.

मग शिष्य येशूला म्हणाले: आता आम्हाला सर्व समजले आहे आणि आणखी काही विचारायचे नाही. आमचा विश्वास आहे की तुम्ही देवाकडून आलेले आहात.

आणि येशू म्हणाला: मी जे सर्व तुम्हाला सांगितले आहे ते तुम्हाला शांती मिळावी आणि माझ्या शिकवणीत आत्मविश्वास वाटावा म्हणून. या जगात जे काही वाईट तुमच्या बाबत घडून येईल, त्याला कशाला भिऊ नका: माझी शिकवण जगावर विजय मिळवील.

त्यानंतर येशूने आपले डोळे आकाशाकडे लावले आणि म्हणाला: माझ्या पित्या! तू तुझ्या पुत्राला सत्य जीवन प्राप्त करण्याच्या हेतूने जीवनाचे स्वातंत्र्य दिले आहेस. जीवन म्हणजे आकलन शक्तीच्या खऱ्या देवाचे मी प्रकट केलेले ज्ञान होय. मी तुला पृथ्वीवरील माणसांसाठी प्रकट केले आहे. तू आज्ञा केली ते मी केले आहे. मी पृथ्वीवरील माणसांना

दाखवून दिले आहे की तू अस्तित्वात आहेस. ते पूर्वी तुझे होते, पण तुझ्या इच्छेने मी ते सत्य त्यांना प्रकट केले आहे आणि त्यांनी तुला ओळखले आहे. त्यांना समजले आहे की सर्व त्यांच्याकडे आहे, खुद्द त्यांचे जीवन, हे फक्त तुझ्याकडून आहे आणि मी त्यांना माझ्या स्वतः विषयी नाही, तर मी त्यांच्याप्रमाणेच तुझ्या कडून आलेलो आहे हे शिकवले. जे तुला मान्य करतात त्यांच्यासाठी मी तुझ्याकडे प्रार्थना करतो. त्यांना समजले आहे की जे माझ्याकडे आहे ते तुझे आहे आणि जे तुझे ते माझे आहे. मी यांमध्ये या जगाचा नाही, कारण मी तुझ्याकडे परत येत आहे; परंतु ते या जगात आहेत, आणि म्हणून, पित्या, मी तुला प्रार्थना करतो, त्यांच्या मध्ये तुझी आकलनक्षमता टिकवून ठेव. या जगातून त्यांना घेऊन जा असे मी मागणार नाही, पण त्यांना जगातील वाईट गोष्टींपासून वाचव आणि तुझ्या सत्यात त्यांना दृढ कर. तुझे आकलन हेच सत्य आहे. माझ्या पित्या! माझी इच्छा आहे की ते माझ्या प्रमाणे व्हावेत, माझ्या प्रमाणे समजावेत की खरे जीवन जगाच्या आरंभा पूर्वी सुरु झाले आहे: असे की ते सर्व एक व्हावे, जसा तू, पित्या, माझ्यामध्ये आणि मी तुझ्यामध्ये, आणि ते आपल्यामध्ये-मी त्यांच्यामध्ये आणि तू माझ्यामध्ये एक व्हावे, असे की सर्व एक व्हावे: आणि मानवाला समजावे की त्यांनी स्वतःला उत्पन्न केलेले नाही, तर त्यांना तू प्रेमाने या जगात पाठवले आहे, जसे तू मला पाठवले आहेस. सत्याच्या पित्या! जगाला तू माहीत नव्हतास, पण मला तू माहीत होतास आणि माणसांना तू माझ्या मधून कळलास. तू काय आहेस ते मी त्यांना सरळ स्पष्ट केले आहे. तू माझ्यामध्ये असा आहेस की ज्या प्रेमाने तू माझ्यावर प्रेम केलेस तो तू त्यांच्यामध्ये देखील असावास. तू त्यांना जीवन दिले आहेस, जो याचा पुरावा आहे की तू त्यांच्यावर प्रेम करतोस. मी त्याना हे समजून घ्यायला आणि तुझ्यावर प्रेम करायला शिकवले आहे, जेणेकरून तुझे प्रेम त्यांच्याकडून तुला परत मिळेल.

## १२

## आत्म्याचा भौतिकावर विजय

आणि जो माणूस वैयक्तिक जीवन नव्हे तर पित्याच्या इच्छेने सामुहिक जीवन जगतो, तेथे मृत्यू नाही. ऐहिक मृत्यू म्हणजे पित्याशी एक होणे.

“कारण राज्य, सत्ता आणि वैभव तुझेच आहे”

त्यानंतर येशू म्हणाला: आता चला, आपण निघूया: माझा विश्वासघात करणारा जवळ आला आहे.

हे बोलल्या बरोबर ज्युदास, बारा शिष्यांपैकी एक, दिसला, आणि त्याच्यासोबत एक मोठा जमाव काठ्या व तरवारी घेऊन होता. ज्युदास त्यांना म्हणाला: तो त्याच्या शिष्यासोबत कोठे आहे ते मी तुम्हाला दाखवीन, आणि त्या सर्वांमध्ये तो तुम्हाला कळेल की, ज्याला मी प्रथम चुंबन घेईन तोच तो आहे. आणि तो एकदम येशूकडे गेला आणि म्हणाला:

नमस्कार, गुरुजी! आणि त्याचे चुंबन घेतले.

आणि येशू त्याला म्हणाला: मित्रा, तू येथे का आहेस?

मग पहारेकऱ्यांनी त्याला वेढले आणि त्याला घेऊन जाण्याच्या बेतात होते.

आणि उच्च धर्मगुरुच्या एका सेवका कडून पीटरने तलवार खेचली आणि त्या माणसाचा कान छाटला.

परंतु येशूने त्याला दोष दिला आणि म्हणाला: तुम्ही वाईटाचा प्रतिकार करूच नये. असे वागू नका. ती तलवार ज्याच्याकडून घेतलीस त्याला परत दे, कारण जो तलवार घेतो तो तलवारीने नाश पावतो.

नंतर तो जमावाकडे वळला. आणि म्हणाला: मी लुटारू असल्यासारखे तुम्ही माझ्या विरुद्ध शस्त्रे घेऊन का आला आहात? मी दररोज तुमच्यामध्ये देवळात शिकवीत होतो आणि तुम्ही मला पकडले नाही. पण आता तुमची वेळ आणि अंधाराची शक्ती आहे. आणि त्याला पकडलेले बघून शिष्य पळून गेले.

तेव्हा अधिकाऱ्याने शिपायांना येशूला पकडून बांधायला सांगितले. त्यानी त्याप्रमाणे केले आणि त्याला प्रथम अनास कडे नेले. हा कैफासाचा सासरा, जो त्यावर्षी उच्च धर्मगुरु होता आणि अनासाबरोबर त्याच महालात रहात होता. तो तोच कैफास होता ज्याने येशूचा कसा नाश करावा याची योजना बनवली होती, त्याचे असे म्हणणे होते की येशूला ठार मारणे लोकांसाठी चांगले आहे. आणि तसे केले नाही तर ते सर्व लोकांसाठी सर्वात जास्त वाईट होते. म्हणून येशूला जेथे हा उच्च धर्मगुरु राहात होता त्या महालात नेले.

जेव्हा येशू तेथे आला तेव्हा त्याच्या शिष्यांपैकी एक, पीटर, त्याला कोठे नेत आहेत ते पाहण्यासाठी त्याच्या पासून दूर अंतरावरून त्याच्या मागे गेला, आणि जेव्हा येशूला उच्च धर्मगुरूच्या न्यायालयासमोर नेले, तेव्हा पीटर देखील त्या प्रकरणाचा शेवट काय होतो हे पाहण्या साठी आत गेला. आणि एका मुलीने पीटरला आवारात पाहिले आणि त्याला म्हणाली: गॅलीलीच्या येशुसोबत तू सुद्धा होतास! परंतु पीटर दोषी ठरवला जाईल म्हणून घाबरला, आणि सगळ्या लोकांसमोर मोठ्याने म्हणाला: तू कशाबद्दल बोलतेस हे मला माहीत नाही! त्यानंतर जेव्हा येशूला घरात घेतले गेले, पीटर लोकांसह त्या रस्त्यावर गेला. एक स्त्री शेकोटी जवळ स्वतःला उबदार ठेवीत होती, आणि पीटर तेथे गेला. तिने पीटरकडे पाहिले आणि दुसऱ्यांना म्हणाली: पहा, नाझरेथच्या येशू बरोबर जो एक माणूस होता त्याच्या सारखा हा माणूस आहे. पीटर अजून अधिकच घाबरला, आणि शपथ घेतली की तो येशूबरोबर कधीच नव्हता आणि त्याला अजिबात ओळखत नाही. थोड्या वेळाने लोक पीटरकडे गेले आणि म्हणाले: हे सहज दिसते की तू देखील या गोंधळ घालणाऱ्यांपैकी एक

होतास. तुझ्या बोलण्यावरून आम्ही सांगू शकतो की तू गॅलीलीमधला आहेस. नंतर पीटर जाहीर करु लागला आणि शपथ घेतली की तो येशूला कधीच ओळखत नव्हता किंवा त्याला त्याने पाहिलेही नाही.

आणि जेमेतेम त्याने हे म्हटले असेल त्यापूर्वी कोंबड्याने बांग दिली. आणि येशूने सांगितलेले शब्द त्याला आठवले, जेव्हा येशूला त्याने खात्री दिली होती की सर्व सोडून गेले तरीही तो त्याला नाकारणार नाही: ‘आजच्या रात्री कोंबड्याच्या आरवण्या पूर्वी तू मला तीनदा नाकारशील. ’आणि पीटर बाहेर आवारात गेला आणि अतिदुःखाने रडला. तो रडला कारण तो मोहाला बळी पडला होता: तो स्वार्थाच्या, एका मोहाला बळी पडला होता, जेव्हा त्याने येशूचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला, आणि मृत्युच्या भीतीच्या, दुसऱ्या मोहाला बळी पडला, जेव्हा त्याने येशूला नाकारले.

आणि सनातनी प्रमुख धर्मगुरु, नियमशास्त्री, आणि अधिकारी, उच्च धर्म गुरुकडे एकत्र जमा झाले आणि ते सर्व जमले असतांना, त्यांनी येशूला आत आणले, आणि उच्च धर्मगुरुने त्याला विचारले, त्याची शिकवण काय होती आणि त्याचे शिष्य कोण होते. आणि येशूने उत्तर दिले: मी लोकांसमोर नेहमी उघड बोललो आहे आणि काहीही आज्ञा केली नाही, आणि कोणापासून काहीही लपवले नाही. तुम्ही मला का विचारता? ज्यांनी माझी शिकवण ऐकली आहे आणि ज्यांना ती समजली आहे त्यांना विचारा. ते तुम्हाला सांगतील.

जेव्हा येशू असे म्हणाला तेव्हा, उच्च धर्म गुरुच्या एका सेवकाने त्याच्या थोबाडीत मारली आणि म्हणाला: तू कोणाशी बोलतो आहेस? उच्च धर्मगुरूला उत्तर देण्याची ही पद्धत आहे का? येशू म्हणाला: जर मी वाईट बोललो असेन तर मी चुकीचे काय बोललो ते सांगा. पण मी काहीही वाईट बोललो नसेन तर मला का मारता?

सनातनी प्रमुख धर्मगुरुंनी येशूला दोषी ठरवण्याचा प्रयत्न केला, पण ज्या मुळे त्याला शिक्षा करता येईल असा काहीच पुरावा प्रथम त्यांना सापडला नाही. नंतर त्यांना दोन साक्षीदार मिळाले जे त्याच्या विषयी म्हणाले: आम्ही स्वतः या माणसाला म्हणतांना

ऐकले आहे: 'मी हे तुमचे हाताने बांधलेले मंदिर नष्ट करीन आणि तीन दिवसात हाताने न बांधलेले देवाचे मंदिर बांधीन'. परंतु हा पुरावा सुद्धा त्याला दोषी ठरवण्यास पुरेसा नव्हता. आणि म्हणून उच्च धर्म गुरूने येशूला वर बोलावले आणि म्हणाला: तू त्यांच्या पुराव्याला उत्तर का देत नाहीस?

येशू शांत राहिला.

मग उच्च धर्मगुरु त्याला म्हणाला: मला सांग, तू ख्रिस्त, देवाचा एक पुत्र आहेस का? येशूने त्याला उत्तर दिले आणि म्हणाला: होय, मी ख्रिस्त आहे, देवाचा एक पुत्र. आणि तुम्ही आता पहाल की मानवाचा पुत्र देवासमान आहे.

मग तो उच्च धर्मगुरु किंचाळला: तू धर्म निंदका! आता आम्हाला आणखी काही पुराव्याची गरज नाही. आम्ही सर्वांनी ऐकले आहे की तू धर्म निंदक आहेस! आणि उच्च धर्मगुरू धर्म सभेकडे वळला आणि म्हणाला: तुम्ही स्वतः ऐकले आहे की तो देवाची निंदा करतो. तुम्ही त्याला त्यासाठी काय शिक्षा कराल?

आणि त्यांनी उत्तर दिले: आम्ही त्याला मृत्यूची शिक्षा सुनावतो.

नंतर सर्व लोक आणि पहारेकरी येशूवर तुटून पडले आणि त्याच्या तोंडावर थुंकले आणि त्याला मारले आणि त्याला धक्का-बुक्की केली. त्यांनी त्याचे डोळे बांधले, आणि त्याच्या गालावर मारले आणि विचारले: आता, प्रेषिता, तुला मारले तो कोण होता? येशू शांत राहिला.

त्याची निंदा नालस्ती केल्यावर, त्यांनी त्याला बांधून पोन्तिअस पिलाताकडे नेले, आणि त्याला न्यायदानाच्या दालनात नेले.

राजपाल पिलात त्यांच्याकडे बाहेर आला आणि त्याने विचारले: तुम्ही या माणसाला कशासाठी दोषी ठरवले आहे?

ते म्हणाले: तो वाईट कामे करणारा आहे, म्हणून त्याला तुमच्याकडे आणले आहे.

पिलात त्यांना म्हणाला: परंतु जर तो तुम्हाला दुखापत करतो, तर तुमच्या कायद्या प्रमाणे त्याचा न्याय करा.

पण त्यांनी उत्तर दिले: आम्ही त्याला तुमच्या जवळ आणले आहे कारण की तुम्ही त्याला शिक्षा करावी, कारण कायदा आम्हाला कोणाला ठार माऱण्याची परवानगी देत नाही.

आणि म्हणून येशू ज्याची अपेक्षा करीत होता ते घडून आले. त्याने म्हटले होते की नैसर्गिक मृत्यू येणे किंवा ज्यूंच्या हातून नाश पावण्या ऐवजी रोमनांच्या हातून क्रुसावरच मारायला त्याने तयार राहिले पाहिजे.

आणि जेव्हा पिलाताने विचाराले की ते त्याला कोणत्या कारणासाठी दोषी ठरवतात, ते म्हणाले लोकांत अशांतता निर्माण करणे, सीझरला खंडणी देण्यास मना करणे, आणि स्वतःला ख्रिस्त आणि एक राजा म्हणवणे यासाठी तो दोषी आहे.

त्यांना काय म्हणायचे होते ते पिलाताने ऐकून घेतले, आणि येशूला त्याच्यापुढे न्यायासना समोर आणण्याची आज्ञा केली. जेव्हा तो आत आला, पिलात म्हणाला: तर तू ज्यूंचा राजा आहेस का?

येशूने उत्तर दिले, तुम्हाला खरोखर वाटते का मी एक राजा आहे, की तुम्हाला सांगितले गेले आहे ते तुम्ही पुन्हा बोलत आहात?

पिलात म्हणाला: मी एक ज्यू नाही म्हणून तू माझा राजा असू शकत नाही, परंतु तुझ्या स्वतःच्या लोकांनी तुला माझ्याकडे आणले आहे. तू कोणत्या प्रकारचा माणूस आहेस?

येशूने उत्तर दिले: मी एक राजा आहे, पण माझे राज्य हे पृथ्वीचे नाही. जर मी पृथ्वीवरचा राजा असतो तर माझी प्रजा माझ्यासाठी लढली असती आणि मला प्रमुख धर्मगुरुंच्या ताब्यात दिले नसते. परंतु, जसे तुम्ही पहात आहात, माझे राज्य पृथ्वीवरचे नाही.

पिलाताने उत्तर दिले: तरीही तू तुला स्वतःला राजा समजतोस काय? येशू म्हणाला: मीच फक्त नाही तर, तुम्ही सुद्धा, मला राजा मानणे शक्य नाही. सर्व लोकांना स्वर्गाच्या राज्याचे सत्य उघड करण्यासाठी मी फक्त शिकवीत असतो. आणि जो सत्यानुसार जगतो तो एक राजा असतो.

पिलात म्हणाला: तू सत्या विषयी बोलतोस पण सत्य काय आहे? आणि हे म्हटल्यानंतर तो दूर वळला आणि मुख्य धर्मगुरुंकडे गेला आणि त्यांना म्हणाला: मला या माणसाने काही चुकीचे केल्याचे आढळले नाही.

परंतु मुख्य धर्मगुरुंनी आग्रह धरला, आणि म्हणाले की त्याने खूप वाईट केले आहे आणि लोकांना अशांत केले आहे आणि अगदी गॅलीलीपासून, सर्व ज्युडेयात उठाव केला आहे.

मग पिलाताने पुन्हा मुख्य धर्मगुरुंच्या पुढे येशूला प्रश्न विचारायला सुरुवात केली, पण येशूने उत्तर दिले नाही. पिलात तेव्हा त्याला म्हणाला: ते तुझ्यावर कसे आरोप करतात ते तुला ऐकू येत नाही का? तू स्वतःचा बचाव का करीत नाहीस?

परंतु येशू तरीही शांत होता आणि दुसरा शब्दही बोलला नाही, त्यामुळे पिलाताला त्याचे आश्चर्य वाटले.

त्यानंतर पिलाताला आठवले की गॅलेली हेरोद राज्याच्या अधिकार क्षेत्रात येते, आणि त्याने विचारले: तो गॅलीली मधला नाही का?

त्यांनी त्याला सांगितले: होय.

तेव्हा तो म्हणाला: जर तो गॅलीलीमधला असेल तर तो हेरोदाच्या अधिकारात येतो. आणि मी त्याला त्याच्याकडे पाठवतो.

हेरोद त्यावेळी जेरुसलेमात होता, आणि पिलाताने स्वतःची येशूच्या खटल्यापासून सुटका व्हावी म्हणून, त्याला हेरोदाकडे पाठवले.

जेव्हा येशूला हेरोदाकडे आणले तेव्हा हेरोदाला खूप आनंद झाला. त्याने त्याच्याविषयी खूप ऐकले होते आणि तो कोणत्या प्रकारचा माणूस होता हे जाणून घ्यायची त्याची इच्छा होती. म्हणून त्याने त्याला त्याच्या समोर बोलावले आणि त्याला जे जाणून घ्यायची इच्छा होती त्याविषयी प्रश्न विचारायला सुरुवात केली. परंतु येशूने त्याला उत्तर दिले नाही. आणि मुख्य धर्मगुरू आणि नियम शास्त्र्यांनी, जसे त्यांनी पूर्वी पिलाता समोर केले होते तसे त्याच्यावर जोरजोरात आरोप केले, आणि म्हणाले की तो दंगेखोर आहे. आणि हेरोदाला येशू एक निरर्थक माणूस वाटला, आणि त्याची चेष्टा करण्यासाठी त्याने त्याला एक किरमिझी झगा घालायला लावला, आणि त्याला परत पिलाताकडे पाठवले. हेरोदाला आनंद झाला की येशूला त्याचा न्याय करण्यासाठी त्याच्याकडे पाठवून पिलाताने त्याला आदराने वागवले, आणि म्हणून पूर्वीचे वितुष्ट असूनही त्यांच्यात समेट झाला.

आता, जेव्हा परत येशूला पिलाताकडे आणले, तेव्हा पिलाताने मुख्य धर्मगुरु आणि ज्यूंच्या राजकर्त्यांना बोलावले आणि त्यांना म्हणाला. लोकांमध्ये गोंधळ माजवतो म्हणून, तुम्ही या माणसाला माझ्याकडे आणले आहे, आणि मी तुमच्या समोर त्याची तपासणी केलेली आहे आणि तो मला दंगेखोर आढळला नाही. मी त्याला तुमच्या बरोबर हेरोदाकडे पाठवले, आणि तुम्ही पाहिले की पुन्हा तो काही वाईट कृत्य केल्याचा दोषी ठरवला गेला नाही. त्याला मृत्युची शिक्षा द्यावी असे काही कारण मला दिसत नाही: त्याला कडक शिक्षा करून सोडून देणे योग्य होणार नाही का? परंतु जेव्हा मुख्य धर्मगुरुंनी हे ऐकले तेव्हा, ते सर्व मोठ्याने ओरडले: नाही, त्याला रोमन पद्धतीने शिक्षा करा! त्याला क्रुसावर चढवा!

पिलाताने प्रमुख धर्मगुरूंचे ऐकून घेतले आणि त्यांना म्हणाला: ठीक आहे! पण एका कैद्याला क्षमा करण्याची तुमची व्हलांडनाच्या सणाची एक परंपरा आहे. बरे, माझ्याकडे कैदेत बाराब्बास एक खुनी आणि लुटारू आहे. या दोघांपैकी कोणाला सोडावे: येशूला की बाराब्बासला?

पिलाताला अशाप्रकारे येशूला वाचवायची इच्छा होती, पण मुख्य धर्मगुरुंनी लोकांना इतके प्रभावित केले होते की ते सर्व मोठ्याने ओरडले: बाराब्बास! बाराब्बास!

आणि पिलात म्हणाला: पण येशूचे काय करावे? ते पुन्हा ओरडले: त्याला रोमन पद्धतीने क्रुसावर चढवा, त्याला क्रुसावर चढवा!

पिलाताने त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला, आणि म्हणाला: तुम्ही त्याच्या बाबतीत एवढे कठोर का आहात? मृत्यू देण्यायोग्य त्याने काही केलेले नाही आणि तुम्हाला त्याने कोणतीही इजा केलेली नाही. मी त्याला सोडून देणार, कारण मला त्याच्यात कोणताही दोष आढळला नाही.

मुख्य धर्मगुरू आणि त्यांचे नोकर ओरडले: त्याला क्रुसावर चढवा! क्रुसावर चढवा! आणि पिलात त्याना म्हणाला: मग तुम्ही त्याला घेऊन जा आणि तुम्ही स्वतः त्याला क्रुसावर चढवा, कारण मला त्याच्यात काही दोष दिसत नाही.

मुख्य धर्मगुरुंनी उत्तर दिले: फक्त आमचा कायदा जी आज्ञा करतो तेच आम्ही मागतो. आमच्या कायद्याप्रमाणे स्वतःला देवाचा पुत्र बनवल्यामुळे त्याला मेलेच पाहिजे.

जेव्हा पिलाताने हे शब्द ऐकले तेव्हा तो क्षुब्ध झाला, कारण देवाचा पुत्र या शब्दांचा अर्थ काय होतो ते त्याला माहीत नव्हते. आणि न्यायदानाच्या दालनात येऊन त्याने पुन्हा येशूला बोलावले आणि त्याला विचारले: तू कोण आहेस आणि कोठून आलास?

परंतु येशूने त्याला उत्तर दिले नाही.

तेव्हा पिलात त्याला म्हणाला: तू मला उत्तर का देत नाहीस? तुला हे दिसत नाही का की तू माझ्या अधिकारात आहेस आणि मी तुला क्रुसावर चढवू शकतो किंवा मोकळा सोडू शकतो?

येशूने त्याला उत्तर दिले: तुमच्याकडे कोणताच अधिकार नाही. सर्व अधिकार वर आहेत.

तरीही पिलाताला येशूला सोडून द्यायची इच्छा होती, आणि तो ज्यूंना म्हणाला: तुम्ही तुमच्या राजाला कसे क्रुसावर चढवू शकता?

परंतु ते त्याला म्हणाले: जर तुम्ही येशूला सोडले तर तुम्ही स्वतः सीझरचे बेईमान सेवक आहात असे सिद्ध होईल, कारण जो स्वतःला राजा म्हणून स्थापित करतो तो सीझरचा शत्रू आहे. आमचा राजा सीझर आहे; पण या माणसाला क्रुसावर चढविले जावे!

जेव्हा पिलाताने हे शब्द ऐकले तेव्हा त्याला कळले की येशूला शिक्षा देण्याचे तो नाकारू शकत नाही. आणि तो ज्युकडे बाहेर गेला, थोडे पाणी घेतले, आपले हात धुतले, आणि म्हणाला: मी या प्रामाणिक माणसाच्या रक्ताचा दोषी नाही.

आणि सर्व लोक ओरडले: त्याचे रक्त आमच्यावर आणि आमच्या मुलाबाळांवर येवो! अशा प्रकारे मुख्य धर्मगुरूंचा विजय झाला. आणि पिलात त्याच्या न्यायासनावर बसला आणि त्याने येशूला प्रथम चाबकाने फटके देण्याची आज्ञा दिली.

चाबकाचे फटके देण्याची शिक्षा दिल्यावर त्यांनी त्याच्या डोक्यावर एक काटेरी मुकुट घातला आणि एक दण्ड त्याच्या हातात दिला आणि त्याच्यावर एक लाल झगा टाकला आणि त्याची चेष्टा करायला सुरुवात केली, चेष्टेने त्याच्यापुढे वाकून आणि म्हणतात: नमस्कार, ज्यूंच्या राजे! आणि त्यांनी त्याच्या गालावर आणि डोक्यावर मारले, आणि त्याच्या चेहऱ्यावर थुंकले.

परंतु मुख्य धर्मगुरू ओरडले: त्याला क्रुसावर खिळा! आमचा राजा सीझर आहे! त्याला क्रुसावर खिळा! म्हणून पिलाताने त्याला क्रुसावर खिळावे अशा आज्ञा दिल्या.

त्यांनी येशूचा लाल झागा फाडला आणि त्याचे स्वतःचे कपडे त्याला घातले, आणि त्याला गोलगोथा नावाच्या जागेपर्यंत क्रूस वाहून नेण्याची आज्ञा दिली, तेथे क्रुसावर खिळले जाणार होते. आणि त्याने त्याचा क्रूस वाहिला आणि गोलगोथा येथे पोहोचला. आणि तेथे त्यांनी त्याला इतर दोन माणसांमध्ये क्रुसावर चढवले.

जेव्हा ते त्याला क्रुसावर खिळे ठोकीत होते तेव्हा येशू म्हणाला: पित्या, त्यांना क्षमा कर: ते काय करतात ते त्यांना माहीत नाही.

आणि जेव्हा येशू क्रुसावर टांगलेला होता लोक त्याच्या भोवती जमले आणि त्यांनी त्याची चेष्टा केली. ते वर चढले, त्यांनी त्यांची डोकी चेष्टेने डोलवली आणि म्हणाले: म्हणजे

तू जेरुसलेमाचे मंदिर नष्ट करणार होतास आणि तीन दिवसात बांधणार होतास! ठीक आता, स्वतःला वाचव आणि क्रुसावरून खाली ये! आणि मुख्य धर्मगुरू आणि नेते सुध्दा तेथे उभे राहिले आणि त्याची असे म्हणत चेष्टा केली: त्याने इतरांना वाचवले, पण स्वतःला वाचवू शकत नाही. आता आम्हाला दाखव की तू ख्रिस्त आहेस. क्रूसावरून खाली ये आणि आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू. तो म्हणाला होता की तो देवाचा पुत्र आहे आणि देव त्याचा त्याग करणार नाही! देवाने त्याचा त्याग केला नाही का? आणि लोक आणि मुख्य धर्मगुरू आणि सैनिक यांनी त्याची चेष्टा केली, आणि त्याच्या सोबत क्रुसावर खिळलेल्या चोरांपैकी एकाने सुध्दा त्याची चेष्टा केली. ह्या चोराने, त्याची चेष्टा केली आणि म्हणाला: जर तू ख्रिस्त असशील, तर स्वतःला आणि आम्हाला वाचव! परंतु दुसऱ्या चोराने ते ऐकले आणि म्हणाला: तुला देवाची भीती वाटत नाही का? तू स्वतः क्रुसावर आहेस आणि तरीही एका निष्पाप माणसाची चेष्टा करतोस. तुला आणि मला आपल्या लायकीनुसार शिक्षा झाली आहे, परंतु या माणसाने कोणतीही हानी केली नाही.

आणि येशूकडे वळून तो म्हणाला: प्रभू, तुमच्या राज्यात माझी आठवण ठेवा!

आणि येशू त्याला म्हणाला: आता सुध्दा तू माझ्यासह धन्य झाला आहेस!

आणि नवव्या तासाला, येशू, थकलेला, मोठ्याने ओरडला: एली, एली, लामा साबाक्लीथानी! ज्याचा अर्थ: माझ्या देवा, माझ्या देवा! तू माझा त्याग का केलास?

आणि जेव्हा लोकांनी ते ऐकले, त्यानी उपहास करायला सुरुवात केली आणि म्हणाले: तो प्रेषित एलीयास यास बोलावीत आहे! आपण पाहुया इलियास येतो का ते!

नंतर येशू म्हणाला: मला तहान लागली आहे! आणि एक माणूस तेथे उभा होता त्याने स्पंज घेतला, विनेगर मध्ये बुडवला, आणि येशूला एका वेळूवर दिला.

आणि जेव्हा येशूने तो स्पंज शोषून घेतला तो मोठ्या आवाजात ओरडला: ते संपले आहे! पित्या, तुझ्या हातात माझा आत्मा सोपवतो! आणि मान टाकून त्याने आत्मा सोडला.

# सर्व प्रकरणांचा सारांश

येशू त्याच्या बालपणात देवाला त्याचा पिता म्हणत असे, ज्युडेयामध्ये एक जॉन नावाचा प्रेषित त्या काळात होता, जो देवाच्या पृथ्वीवर येण्याविषयी प्रवचन देत असे. तो म्हाणायचा की लोकांनी त्यांच्या जगण्याचा मार्ग बदलला, सर्व माणसांना समान लेखले, आणि अपाय करण्या ऐवजी, एकमेकांना मदत केली, तर देव अवतरेल आणि त्याचे राज्य पृथ्वीवर स्थापन होईल.

हे प्रवचन ऐकून, मानवाच्या जीवनाचा आणि सर्वांचा उगम असलेल्या अनंताशी, ज्याला देव म्हणतात त्याच्याशी त्याचे नाते यावर विचार करण्यासाठी येशू अज्ञात स्थळी गेला. येशूने ओळखले की त्याचा पिता अस्तित्वाचा अनंत उगम ज्याला जॉन देव म्हणतो तो आहे.

अज्ञात स्थळी काही दिवस अन्नाशिवाय राहिल्या नंतर, येशूने भुकेचा अनुभव घेतला आणि स्वतःशी विचार केला.

सर्व समर्थ देवाचा पुत्र म्हणून तो आहे तसाच मी सर्व समर्थ असलो पाहिजे, पण आता मला खावेसे वाटते आणि माझी भूक भागवण्यासाठी भाकरी तयार करू शकत नाही, मला दिसते की मी सर्व समर्थ नाही. पण या मननावर त्याने उत्तर तयार केले: मी दगडांतून भाकरी तयार करू शकत नाही, पण मी खाण्यापासून परावृत्त होऊ शकतो, आणि म्हणून, जरी मी शरीराने सर्व समर्थ नसलो तरी आत्म्याने सर्व समर्थ आहे आणि शरीराला दाबू शकतो. म्हणून मी शरीराने नव्हे तर आत्म्याने देवाचा पुत्र आहे.

नंतर तो स्वतःशी म्हणाला: मी एक आत्म्याचा पुत्र आहे. म्हणून मला शरीराला नाकारून ते नाहीसे करू दे. परंतु त्यावर त्याने उत्तर दिले: मी शरीरात वसलेल्या आत्म्याने जन्म घेतला आहे. तशी माझ्या पित्याची इच्छा आहे आणि मी त्याच्या इच्छेला विरोध करूच नये. पण तो विचार करीत गेला-जर मी माझ्या शरीराच्या गरजा पूर्ण करू शकत नाही किंवा मला स्वतःला त्यापासून मुक्तही करू शकत नाही, तर मी स्वतःला शरीराला वाहून घेतलेच पाहिजे आणि त्याकडून मिळू शकणारी सर्व सुखे उपभोगली पाहिजेत. परंतु त्यावर त्याने उत्तर दिले: मी माझ्या शरीराच्या गरजांचे समाधान करू शकत नाही, आणि त्याच्या पासून स्वतःची सुटकाही करून घेऊ शकत नाही; पण माझे जीवन त्यामध्ये माझ्या पित्याचा आत्मा असल्याने सर्व समर्थ आहे. म्हणून माझ्या शरीरात मी माझ्या आत्म्याची, माझ्या पित्याची सेवा केली पाहिजे, आणि फक्त त्याच्यासाठीच काम केले पाहिजे.

आणि माणसाचे खरे जीवन पित्याच्या आत्म्यामध्ये असल्याची त्याची खात्री झाल्यावर, येशूने एकांतस्थळ सोडले आणि लोकांना ही शिकवण जाहीर कण्यास सुरुवात केली. तो म्हणाला की त्याच्यामध्ये आत्मा राहतो, यापुढे स्वर्ग खुले झाले आहेत आणि स्वर्गाच्या शक्ती माणसाकडे आणल्या आहेत, आणि एक मुक्त आणि अमर्याद जीवन माणसासाठी सुरु झाले आहे, आणि शरीराने कितीही दुर्दैवी असलेली, सर्व माणसे, सुखी होतील.

२.

ज्यू जे स्वतःला सनातनी समजत होते एका बाहेरच्या देवाची पूजा करीत होते, ज्याला ते विश्वाचा निर्माता आणि शास्ता समजत होते. त्यांच्या शिकवणी प्रमाणे ह्या बाहेरच्या देवाने त्यांच्याशी एक करार केला आहे. ज्यानुसार त्यांनी त्याची पूजा केली तर त्यांना मदत करण्याचे त्याने वचन दिले आहे. शनिवार, साब्बाथ पाळणे ही या कराराची मुख्य अट होती.

पण येशू म्हणाला: साब्बाथ ही मानवी प्रथा आहे. माणूस आत्म्याने जगला तर ते सर्व बाह्य विधीपेक्षा जास्त आहे. धर्माच्या सर्व बाह्य प्रकारा प्रमाणेच साब्बाथ पाळणे ह्यात एक भ्रम आहे. तुम्हाला साब्बथच्या दिवशी काहीही करायला मनाई केली आहे, परंतु चांगली कामे नेहमीच करायला पाहिजेत आणि साब्बथ पाळण्याने चांगल्या कामात अडथळा येत असेल तर साब्बाथ पाळणे ही एक चूक आहे.

सनातननी ज्यूंच्यामते देवा बरोबरच्या या कराराची दुसरी अट म्हणजे अविश्वासू लोकांशी परस्पर संबंध टाळणे. या विषयी येशू म्हणाला की देव त्याच्या स्वतः साठी बळीची नव्हे तर, माणसांनी एकमेकांशी प्रेम करावे अशी इच्छा करतो.

कराराच्या आणखी दुसऱ्या अटी धुलाई आणि शुध्दिकरणा संबंधी आहेत, त्यांच्यासाठी येशू म्हणाला की देवाला बाहेरची स्वच्छता नव्हे, तर माणसावरील दया आणि प्रेम पाहिजे आहे. तो आणखी म्हणाला की बाह्य नियम हे हानिकारक आहेत, आणि चर्चची परंपरा ही स्वतःच वाईट आहे. त्यांची चर्च परंपरा स्वतःच्या आई आणि वडिलावरील प्रेमासारख्या सर्वात महत्वाच्या गोष्टींना बाजूला ठेवते आणि परंपरांच्या कुंपणात त्याचे समर्थन करते.

जुन्या कायद्याच्या सर्व बाह्य नियमाने ठरवून दिलेल्या बाबी ज्यामुळे माणूस स्वतः अपवित्र होतो असे तो समजत होता, येशू म्हणाला: तुम्ही सगळे जाणून घ्या की, माणूस बाहेरच्या कोणत्याही गोष्टीने नाही, तर फक्त तो काय विचार करतो आणि काय करतो ते त्याला अपवित्र करू शकते.

त्यानंतर येशू जेरुसलेमात गेला, जे शहर पवित्र समजले जात असे, आणि त्याने मंदिरात प्रवेश केला जेथे सनातन्यांच्या मते देव स्वतः राहतो, तेथे तो म्हणाला की देवाला बळी देणे हे निरुपयोगी आहे, एखाद्या देवळांपेक्षा माणूस अधिक महत्वाचा आहे, आणि आपले फक्त कर्तव्य आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम करणे आणि त्याला मदत करणे आहे. पुढे जाऊन येशूने असे शिकविले की देवाची पूजा एखाद्या विशिष्ट ठिकाणी करण्याची गरज नाही, तर पित्याची सेवा आत्म्याने आणि कृतीने करावी. आत्मा दिसत नाही किंवा दाखवता येत नाही. आत्मा म्हणजे अनंत आत्म्याचे पुत्रत्व असल्याची माणसाची जाणीव होय. मंदिराची गरज नाही. खरे मंदिर म्हणजे प्रेमाने एकत्र राहणाऱ्या माणसांचा समाज होय. तो म्हणाला देवाची सर्व बाह्य पूजा फक्त खोटी आणि अपायकारक नाही तर ती वाईट कृत्ये करण्यास प्रवृत्त करते-जशी ज्यूंच्या पूजेमध्ये शिक्षा म्हणून हत्त्या सांगितली आहे-आणि पालकांकडे दुर्लक्ष करण्याची परवानगी-पण सुद्धा कारण एखादा माणूस बाहेरचे विधी पूर्ण करून स्वतःला सदाचरणी समजतो आणि प्रेमाने करायच्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्या गरजे पासून मुक्त समजतो. तो म्हणाला की जो आपले स्वतःचे दोष जाणतो, तो फक्त जे चांगले आहे त्याचा शोध घेतो आणि चांगली कृत्ये करतो. चांगली कामे करण्यासाठी माणसाला आपल्या स्वतः च्या दोषांची जाणीव असली पाहिजे, पण बाह्य पूजा खोटे स्वयंसमाधान देते. सर्व बाह्य पूजा अनावश्यक आहे, आणि बाजूला फेकून दिली जाहिजे.

प्रेमाची कामे ही सोहळयाच्या समारंभाशी विसंवादी आहेत, आणि चांगले त्या मार्गाने करता येणे शक्य नाही. माणूस हा देवाचा आत्मिक पुत्र आहे आणि म्हणून पित्याची सेवा आत्म्यानेच केली पाहिजे.

३

जॉनच्या शिष्यांनी येशूला विचारले की त्याच्या स्वर्गाच्या राज्याचा तो काय अर्थ करतो आणि त्याने त्यांना उत्तर दिले: मी ज्या स्वर्गाचे प्रवचन देतो ते आणि जॉन सांगतो ते एकच आहे-असे की सर्व माणसे, कितीही गरीब असली, तरीही सुखी होतील.

आणि येशू लोकांना म्हणाला: जॉन हा पहिला प्रेषित आहे ज्याने हे प्रतिपादन केले की स्वर्गाचे राज्य बाहेरच्या जगाचे नाही, तर माणसाच्या आत्म्यात आहे. सनातनी जॉनचे ऐकायला गेले, पण त्यांना काही समजले नाही कारण त्यानी स्वतः शोधलेले बाह्य देवासंबंधीच फक्त त्यांना माहीत होते; ते त्यांचा शोध शिकवीत आणि त्यांना आश्चर्य वाटत होते की त्यांच्यावर कोणीही लक्ष देत नव्हते. परंतु जॉनने आपल्यामधील देवाच्या राज्याच्या सत्याचा उपदेश केला, आणि म्हणून त्याने त्याच्या पूर्वीच्या कोणाही पेक्षा जास्त काम केले आहे. त्याच्या शिकवणीने कायदे आणि प्रेषित, आणि सर्व बाह्य पूजाअर्चा, यांची जागा घेतली आहे. त्याने शिकवल्या पासून, हे स्पष्ट झाले आहे की स्वर्गाचे राज्य माणसाच्या आत्म्यात आहे.

सर्व गोष्टींचा आरंभ व अंत माणसाचा आत्मा आहे. जरी प्रत्येक माणसाला वाटते की त्याला त्याच्या शारीरिक पित्याने त्याच्या आईच्या उदरात जन्म दिला आहे, तरी त्याला जाणीव सुद्धा असते की एक स्वतंत्र, बुद्धिमान, आणि शरीरावर अवलंबून नसलेला आत्मा त्याच्यामध्ये आहे.

तो अनंताकडून येणारा शाश्वत आत्मा, आणि ज्याला आम्ही देव म्हणतो तो सर्वांचा उगम आहे. आम्हाला तो माहित आहे जसा आम्ही त्याला फक्त आमच्यामध्ये असलेला ओळखतो. तो आत्मा आपल्या जीवनाचा उगम आहे; त्याला आपण सर्व गोष्टींच्या वर दर्जा दिला पाहिजे आणि आम्ही त्याच्यातच जगले पाहिजे. त्याला आपल्या जीवनाचा पाया करून आम्ही खरे आणि शाश्वत जीवन प्राप्त करतो. पिता-आत्मा ज्याने माणसाला तो आत्मा दिलेला आहे तो माणसाला-ज्याला शाश्वत जीवनाची जाणीव त्यांच्या स्वतः मध्ये असतांना ती तो घालवून टाकून फसवण्यासाठी पाठवला असणे शक्य नाही. हा माणसातील अनंत आत्मा माणसाला अशासाठीच दिलेला असला पाहिजे की त्याच्या मधून माणसाला अनंत काळचे जीवन प्राप्त व्हावे. म्हणून जो माणूस आपला आत्मा हाच आपले जीवन मानतो तो सार्वकालिक जीवन जगतो, तर जो तसा विचार करीत नाही त्याला खरे जीवन नसते. माणसे जीवन किंवा मृत्यू ते स्वतः निवडू शकतात: आत्म्यामध्ये जीवन, किंवा शरीरात मृत्यू. आत्म्यातील जीवन म्हणजे भलेपणा आणि प्रकाश: शरीरातील जीवन म्हणजे बुरेपणा आणि अंधार. आत्म्यात विश्वास ठेवणे म्हणजे चांगली कामे करणे; अविश्वास ठेवणे म्हणजे वाईट कामे करणे. भलेपणा म्हणजे जीवन, बुरेपणा म्हणजे मृत्यू. देव-एक बाह्य निर्माता, सर्वांच्या सुरुवातीची सुरुवात-आम्हाला माहीत नाही. आमची त्याच्याविषयी कल्पना फक्त अशी शक्य आहे: की त्याने माणसात आत्मा पेरलेला आहे जसा एखादा पेरणी करणारा सर्वत्र, शेताच्या कोणत्याही भागात भेदभाव न करता बी पेरतो; आणि जे बी चांगल्या जमिनीवर पडते ते वाढते, पण जे वाईट जमिनीवर पडते ते नष्ट होते. आत्माच फक्त माणसाला जीवन देऊ शकतो, आणि ते टिकवायचे की घालवायचे हे त्यांच्यावर अवलंबून आहे. आत्म्यासाठी वाईट आस्तित्वात नसते. वाईट हा जीवनाचा भ्रम आहे. येथे फक्त जे जिवंत राहणारे आणि जे जिवंत न राहणारे असतात.

अशाप्रकारे जग स्वतःला सर्व माणसांपुढे सादर करते, आणि प्रत्येक माणसाला त्याच्या आत्म्यात स्वर्गाच्या राज्याची जाणीव असते. प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या स्वतंत्र इच्छेने त्या राज्यात प्रवेश करावा किवा नाही हे ठरवू शकतो. तेथे प्रवेश करण्यासाठी त्याने आत्म्याच्या जीवनावर विश्वास ठेवला पाहिजे, कारण जो त्या जीवनावर विश्वास ठेवतो त्यालाच शाश्वत जीवन मिळते.

४

येशूला लोकांसाठी दुःख वाटत होते कारण त्यांना खरे सुख माहीत नव्हते, म्हणून तो त्यांना शिकवित होता. तो म्हणाला: ज्यांच्याकडे संपत्ती किंवा कीर्ती नाही आणि त्यांची त्यांना काळजीही नाही ते सुखी होत, आणि जे कीर्ती आणि संपत्ती

मिळवितात ते दुःखी; कारण अनाथ आणि पिळवणूक झालेले पित्याच्या इच्छेत असतात, पण श्रीमंत आणि प्रसिद्ध या क्षणभंगुर जीवनात फक्त माणसांकडून बक्षिसे मिळवीत असतात.

पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी गरीब आणि तिरस्कृत व्हायला घाबरू नका, पण आनंदी व्हा कारण तुम्ही लोकांना दाखवू शकता खरे सुख काय आहे.

पित्याची इच्छा जी सर्व मानवाला जीवन आणि स्वास्थ्य देते ती अमलात आणण्या साठी, पाच आज्ञा पाळल्याच पाहिजेत:

पहिली आज्ञा आहे कोणाचे काही वाईट करु नका ज्यामुळे राग येईल, कारण वाईटाने वाईट निर्माण होते.

दुसरी आज्ञा आहे बायकांच्या मागे लागू नका आणि जिच्याशी एकदा लग्न केले असेल तिला सोडू नका; कारण बायकांना सोडून देणे आणि बायका बदलणे यातून जागातील सर्व दुराचार आलेला आहे.

तिसरी आज्ञा आहे कोणत्याही प्रकारची शपथ घेऊ नका. एखादा माणूस कोणतेही वचन देऊ शकत नाही कारण तो पूर्णपणे पित्याच्या अधिकारात असतो; आणि शपथा वाईट उद्देशाने घेतल्या जातात.

चवथी आज्ञा आहे वाईटाचा विरोध करू नका, निषेध करू नका, आणि कोर्टात जाऊ नका; परंतु अन्याय सहन करा आणि लोक मागतात त्यापेक्षा जास्त करा, कारण प्रत्येक माणूस दोषांनी भरलेला आहे आणि दुसऱ्याला मार्गदर्शन कारायला असमर्थ आहे. सूड घेऊन आम्ही दुसऱ्यांना तसेच करायला शिकवतो.

पाचवी आज्ञा आहे आपले देशावासी बांधव आणि परदेशी यामध्ये भेदभाव करू नका, कारण सर्व एकाच पित्याची मुले आहोत.

या पाच आज्ञा लोकांनी स्तुती करावी म्हणून नाही तर, तुमच्या स्वतःच्या भल्यासाठी पाळाव्यात; म्हणून लोकासमक्ष प्रार्थना, किंवा उपवास करू नका.

लोकांना काय पाहिजे ते पित्याला माहीत आहे, आणि कशासाठीही प्रार्थना करण्याची गरज नाही; जे सर्व मिळवणे गरजेचे आहे ते पित्याच्या इच्छेने होते. आणि त्याची इच्छा आहे की आम्ही कोणाशी शत्रुत्व भाव ठेवू नये. उपवास करणे अनावश्यक आहे, कारण माणसे लोकांकडून केवळ स्तुती मिळवण्यासाठी उपवास करतात आणि त्यांची स्तुती टाळली पाहिजे. फक्त पित्याच्या इच्छेत जगण्याची काळजी घेणे आवश्यक आहे, आणि बाकीचे सर्व स्वतःहून घडून येईल. एखादा माणूस शारीरिक गोष्टींची चिंता करीत असेल तर तो स्वर्गाच्या राज्यात लक्ष घालू शकणार नाही. एखाद्या माणसाने अन्न आणि वस्त्र यांची देखील काळजी केली नाही, तरी तो जिवंत राहू शकेल: पिता जीवन देईल. याक्षणाला जे आवश्यक ते सर्व पित्याच्या इच्छेत आहे, कारण पिता त्याच्या मुलांना कशाची गरज आहे ते देतो. जे पिता देतो त्या आत्म्याच्या सामर्थ्याची इच्छा करा. पाच आज्ञा स्वर्गाच्या राज्याचा मार्ग दाखवतात, आणि ही अरुंद वाटच फक्त शाश्वत जीवणाकडे नेते. मेंढ्या असल्याचे दाखवून खोटे शिक्षक-लांडगे नेहमीच लोकांना या मार्गा पासून भलतीकडे नेतात. त्यांच्यापासून सावध रहा! चांगल्याच्या नावाखाली वाईट शिकवण्यावरून खोटे शिक्षक नेहमीच ओळखले जातात. जर ते हिंसा आणि जुलूम शिकवीत असतील तर ते खोटे शिक्षक आहेत. ते जे शिकवतात त्यावरून ते ओळखले जातात. जो देवाचे नाव घेतो तो नाही तर, जो चांगले ते करतो तो देवाची इच्छा पूर्ण करतो. जो या पाच आज्ञा पूर्ण करतो त्याला सुरक्षित आणि खरे जीवन प्राप्त होते, त्यांच्यापैकी काहीही त्याच्याकडून हिरावून

घेतले जाणार नाही: पण जो त्या पूर्ण करीत नाही त्याला एक असुरक्षित जीवन मिळते जे त्याच्यासाठी काहीही न सोडता त्याच्याकडून घेतले जाते.

सर्व मानवाला मुक्ततेला मान्यता देणाऱ्या येशूच्या शिकवणीच्या वस्तुस्थितीने लोक आश्चर्यचकित आणि आकर्षित होतात. ती इसाऐहाच्या भविष्यवाणीची पूर्तता होती की, देवाचे निवडलेले मानवासाठी प्रकाश आणतील, जुलुमाने नव्हे, तर सभ्यता, नम्रता, आणि दयाळूपणाने वाईटावर विजय मिळवतील आणि सत्याची पुनर्स्थापना करतील.

५

पित्याच्या आत्म्याचे अपत्य म्हणजे जीवन आहे हे ओळखण्यात शहाणपणा आहे. लोक आपल्या स्वतःपुढे शारीरिक जीवनाची ध्येये ठेवतात, आणि ती ध्येये साध्य करण्यासाठी स्वतःचा आणि दुसऱ्यांचा छळ करतात. पण त्यांच्या जीवनात जर त्यांनी आत्मिक जीवनाची शिकवण स्वीकारली आणि शरीर ताब्यात आणि नियंत्रणात ठेवले तर त्यांच्यासाठी असलेल्या जीवनात त्यांना पूर्ण समाधान मिळेल.

एकदा असे घडले की येशुने दुसऱ्या धर्माच्या एका स्त्रीकडे पिण्यासाठी थोडे पाणी मागितले. आपण वेगळ्या धर्माचे आहोत या सबाबीने त्या विनंतीला तिने नकार दिला. तेव्हा येशू तिला म्हणाला: जर तुला समजले असते की जो तुझ्याकडे पिण्यासाठी पाणी मागत आहे तो जिवंत माणूस असून ज्याच्यामध्ये पित्याचा आत्मा जिवंत आहे, तर तू त्याला नाकारले नसतेस, पण दयाळूपणा करून तू स्वतः पित्याशी आत्म्याने एकरूप होण्याचा प्रयत्न केला असतास, आणि त्या आत्म्याने तुला या पाण्यासारखे नव्हे-जे प्याल्यावर माणसाला पुन्हा तहान लागते-पण जे पाणी शाश्वत जीवन देते असे पाणी दिले असते. एखाद्याने विशेष जागी, देवाची प्रार्थना करायची गरज नाही, पण ज्यांच्या मध्ये त्याचा आत्मा वास करतो त्यांची प्रेमाच्या कृत्यांनी सेवा करून, त्याची सेवा करावी.

आणि येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: माणसाचे खरे अन्न हे पिताआत्म्याची इच्छा पूर्ण करणे आहे, आणि हे पूर्ण करणे नेहमीच संभवनीय आहे. आमचे सर्व आयुष्य म्हणजे पित्याने आमच्यामध्ये पेरलेल्या आत्म्याला आलेली फळे जमा करणे होय. ती फळे म्हणजे आम्ही माणसा साठी केलेले चांगले काम होय. आम्ही माणसांचे अविरत आणि बक्षिसाची अपेक्षा न करता चांगले केले पाहिजे.

त्यानंतर येशू जेरुशालेमात असतांना तो स्नानगृहाच्या जागी आला ज्याच्या बाजूला एक आजारी माणूस त्याला बरे करणाऱ्या चमत्काराची वाट पहात पडला होता. येशू त्याला असे म्हणाला: चमत्काराने बरे होण्याची अपेक्षा करू नको, परंतु तुझ्या शक्तीने जिवंत रहा आणि जीवनाचा चुकीचा अर्थ घेऊ नको. त्या विकलांगाने येशूची आज्ञा पाळली, तो उठला, आणि दूर निघून गेला. हे पाहून, त्याने साब्बाथच्या दिवशी विकलांगाला बरे केले म्हणून, सनातनी येशूची निर्भर्त्सना करायला लागले. येशू त्यांना म्हणाला: मी काहीही नवीन केलेले नाही. आपला सामाईक पिताआत्मा जे करतो तेच मी केलेले आहे. तो जगतो आणि माणसाला जीवन देतो, मी तसेच केले आहे. हे असे करणे प्रत्येक माणसाचे काम आहे. प्रत्येकाला जीवन निवडण्याचे किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य आहे. जीवन निवडणे म्हणजे दुसऱ्यांचे भले करून पित्याची इच्छा पूर्ण करणे; ते नाकारणे म्हणजे दुसऱ्याचे भले नकरता एखाद्याने आपल्या स्वतःच्या इच्छे प्रमाने करणे होय. हे कारावे की ते: जीवन मिळवायचे की नष्ट करायचे हा प्रत्येकाचा अधिकार आहे.

माणसाच्या खऱ्या जीवनाची तुलना अशी करणे शक्य आहे: एका मालकाने आपल्या गुलामांकडे मौल्यवान संपत्तीचा भाग दिला आणि जे त्याला दिलेले आहे त्यावर कमाई करायला सांगितले. काहींनी कमाई केली, दुसऱ्यांनी त्याना दिलेले तसेच

ठेवून दिले. मालकाने जेव्हा त्यांनी काय केले आहे त्याचा हिशोब मागितला, आणि ज्यांनी कमाई केली होती त्यांना अजून अधिक आपल्या संपत्तीतून दिले, तर ज्यांनी काहीच केले नाही त्यांच्याकडून त्यांच्याजवळ असलेले काढून घेतले.

मालकाच्या मौल्यवान संपत्तीचा भाग म्हणजे माणसात असलेल्या जीवनाचा आत्मा, जो पिता आत्म्याचा पुत्र आहे. जो ह्या जीवनात आत्म्याच्या जीवनासाठी काम करतो तो अनंत जीवन प्राप्त करतो, जो त्यासाठी काम करीत नाही त्याला जे दिलेले आहे तेही घालवतो.

फक्त खरे जीवन हे सर्वांचे सामाईक जीवन आहे, आणि वैयक्तिक जीवन नाही. प्रत्येकाने दुसऱ्याच्या जीवनासाठी काम केले पाहिजे.

त्यानंतर येशू अज्ञात स्थळी गेला आणि पुष्कळ लोक त्याच्या मागे गेले. संध्याकाळच्या सुमारास त्याचे शिष्य आले आणि म्हणाले: आम्ही एवढ्या सर्व लोकांना जेवायला कसे देऊ?

जमावातील काही जणांकडे अन्न नव्हते, आणि काही जणांकडे भाकरी आणि मासे होते. येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: तुमच्याकडे असलेली जी असेल ती भाकरी मला द्या. आणि त्याने भाकरीचे तुकडे घेतले आणि त्याने ते भाकरतुकडे आपल्या शिष्यांना दिले, आणि त्यांनी ते दुसऱ्यांना दिले, ज्यांनी तसेच करायला सुरुवात केली. अशाप्रकारे जे वाटले गेले त्याने प्रत्येकाने खाल्ले, आणि तेथे असलेले सर्व अन्न खाऊन न संपता त्याना पुरेसे झाले. आणि येशू म्हाणाला: अशा प्रकारे तुम्ही नेहामी वागा. प्रत्येकाने स्वतःसाठी अन्न मिळविणे आवश्यक नाही परंतु माणसातील आत्म्याला पाहिजे ते करणे गरजेचे आहे, म्हणजे जे काही असेल ते दुसऱ्या बरोबर वाटणे.

माणसाचे खरे अन्न पित्याचा आत्मा आहे. माणूस फक्त आत्म्याने जगतो. आम्ही ज्याच्यात जीवन आहे त्या सर्वांची सेवा केली पाहिजे, कारण जीवन एखाद्याची स्वतःची इच्छा पूर्ण करण्यात नसून जीवनाच्या पित्याची इच्छा पूर्ण करण्यात आहे. आणि ती इच्छा जी आत्म्याचे जीवन आहे, जे प्रत्येकाकडे आहे, ते त्याच्याकडे राहिले पाहिजे आणि मृत्युच्या घटके पर्यंत जीवनाच्या आत्म्याची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे. पिता, सर्व जीवनाचा उगम, आत्मा आहे. जीवन हे पित्याच्या इच्छा पूर्तीत सामावले आहे, आणि ती आत्म्याची इच्छापूर्ती करण्यासाठी शरीराचा त्याग केला पाहिजे. शरीर हे आत्म्याच्या जीवनाकरता अन्न आहे. फक्त शरीराचा त्याग करूनच आत्मा जिवंत राहतो.

त्यांतर येशूने काही शिष्य निवडले आणि त्यांना आत्म्याच्या जीवनाची शिकवण देण्यासाठी पाठवले. त्यांना पाठवतांना तो म्हणाला: तुम्ही आत्म्याच्या जीवनाचा उपदेश करायला जात आहात, म्हणून सर्व शारीरिक इच्छांचा त्याग करा आणि तुमचे स्वतःचे असे काही ठेवू नका. छळ, उपासमार आणि दुःख सहन करण्याची तयारी ठेवा. जे शरीराच्या जीवनावर प्रेम करतात ते तुमचा द्वेष करतील, तुम्हाला छळतील, आणि तुम्हाला ठार मारतील; पण घाबरू नका. जर तुम्ही पित्याची इच्छा पूर्ण केलीत तर तुमच्या जवळ आत्म्याचे जीवन असेल, जे कोणीही तुमच्या कडून हिरावून घेऊ शकत नाही.

शिष्य बाहेर पडले आणि जेव्हा ते परत आले तेव्हा त्यांनी जाहीर केले की त्यांनी सर्वत्र वाईटाच्या शिकवणीवर विजय मिळवला आहे.

तेव्हा सनातनी येशूला म्हणाले की त्याची शिकवण, जरी ती वाईटावर विजय मिळविते, तरी ती स्वतः एक वाईट गोष्ट आहे, कारण ज्यांना ती अमलात आणावी लागते त्यांना दुःख भोगावेच लागते. त्यावर येशू म्हणाला: वाईट वाईटावर विजय मिळवू शकत नाही. वाईटावर भलेपणाने फक्त प्रभुत्व मिळवता येते, आणि तो भलेपणा ही सर्वानां सामाईक असलेली पिता

आत्म्याची इच्छा आहे. प्रत्येक माणसाला स्वतःसाठी चांगले काय आहे ते कळते, आणि ते त्याने दुसऱ्यासाठी केले-जर त्याने ते केले जी पित्याची इच्छा आहे-तर तो चांगले करतो. आणि म्हणून जरी सुद्धा त्याच्या बरोबर ती इच्छा पाळणाऱ्यावर दुःख भोगणे आणि मृत्यू येतो तरी पिता आत्म्याची इच्छा पाळणे हे चांगले आहे.

६

येशू म्हणाला की, फक्त जे त्याचे कधीच नव्हते पण ज्यांनी त्यांच्या सामाईक पित्याची इच्छा पूर्ण केली आहे त्यांच्यापेक्षा, त्याची आई आणि भाऊ यांचा त्याच्यावर असा काही पहिला अधिकार नाही. एखाद्या माणसाचे जीवन आणि सौख्य त्याच्या कौटुंबिक नात्यांवर नव्हे, तर आत्म्याच्या जीवनावर अवलंबून असते. येशू म्हणाला: जे पित्याचे आकलन टिकवून ठेवतात ते धन्य होत. आत्म्यात राहणाऱ्या माणसाचे घर नसते-आत्म्याच्या मालकीचे घर असू शकत नाही. तो म्हणाला की त्याचे स्वतःचे असे निश्चित निवास्थान नाही. पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी विशेष जागेची गरज नसते, कारण ते नेहमी आणि प्रत्येक ठिकाणी शक्य आहे. पित्याच्या इच्छेला शरण गेलेल्या माणसाला शरीराचा मृत्यूची भीती नसते, कारण आत्म्याचे जीवन शरीरावर अवलंबून नसते. येशू म्हणतो की जो आत्म्याच्या जीवनावर विश्वास ठेवतो तो कशालाही भिऊ शकत नाही.

कोणतीही खबरदारी घेतली नाही तर माणसाला आत्म्यामध्ये जीवन जगणे असंभव आहे. एकजण जो म्हणाला की तो प्रथम त्याच्या वडिलांना मुठमाती देऊनच, नंतर येशूची शिकवण पाळील, त्याला येशूने उत्तर दिले: फक्त मरणारे आहेत ते मेलेल्यांना गाडण्याची चिंता करतात, जिवंत नेहमीच पित्याची इच्छा पूर्ण करीत जगतात. कुटुंब आणि घरगुती चिंतामुळे आत्म्याचे जीवन अडवलेच जाऊ नये. पित्याची इच्छा पूर्ण केल्याने आपल्या शारीरिक जीवनावर काय परिणाम होईल याची चिंता जो करतो तो, एका नांगरणी करणाऱ्या माणसा प्रमाणे असतो जो नांगर चालवतांना त्याच्या पुढे बघण्या ऐवजी मागे बघतो.

शारीरिक जीवनाच्या सुखाच्या चिंता, ज्या माणसांना खूप महत्वाच्या वाटतात, त्या भ्रम आहेत. फक्त खरे जीवनाचे काम हे पित्याची इच्छा जाहीर करणे, तिच्याकडे लक्ष देणे, आणि ती पूर्ण करणे हे आहे. जेव्हा मार्थाने तक्रार केली की रात्रीच्या जेवणाची तयारी करण्यासाठी तिला एकटीला काम करावे लागत आहे, त्यावेळी तिची बहीण मेरी तिला मदत करण्या ऐवजी त्याची शिकवण ऐकत आहे, येशूने उत्तर दिले: तू तिला अन्यायाने दोष देत आहेस. तुला तुझ्या कामात फळ पाहिजे असेल तर तू स्वतः त्यात व्यस्त रहा, पण ज्यांना शारीरिक सुखाची गरज नसेल त्यांना जीवनासाठी एका अत्यावश्यक असलेल्या गोष्टीकडे लक्ष देऊ दे.

येशू म्हणाला: जो पित्याच्या इच्छा पूर्तीचे खरे जीवन मिळवायची इच्छा करतो, त्याने सर्वात प्रथम त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक इच्छा सोडूनच दिल्या पाहिजेत. त्याने त्याच्या जीवनाच्या योजना त्याच्या स्वतःच्या इच्छेनुसार ठरवू नयेत, तर त्याने कोणत्याही क्षणी उपासमार आणि दुःख सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

जो आपल्या शारीरिक जीवनाची व्यवस्था आपल्या स्वतःच्या इच्छानुसार करतो तो पित्याच्या इच्छापूर्तीच्या खऱ्या जीवनाचा नाश करतो. आणि जर आत्मिक जीवनाचा नाश करणारे शारीरिक जीवनासाठी मिळवले तर त्यात फायदा नाही.

आत्म्याच्या वाईटासाठी सर्वांत अधिक विनाशकारी, श्रीमंत होण्यासाठी मिळवण्याची लालसा आहे. माणसे विसरतात की कितीही संपत्ती किंवा मालमत्ता त्यांनी मिळवली तरी ते कोणत्याही क्षणी मरणार आहेत, आणि ती संपदा जीवनासाठी आवश्यक नाही. मृत्यू आपल्या प्रत्येकावर टांगता आहे. आजार, खून किंवा अपघात कोणत्याही क्षणी आपल्या जीवनाचा अंत करील. आमच्या जीवनाच्या प्रत्येक सेकंदाला शारीरिक मृत्यू ही अटळ स्थिती आहे. एखाद्या माणसाने जिवंत

असतांना समजले पाहिजे की आपल्या जीवनाचा प्रत्येक तास म्हणजे कोणाच्या तरी दयेच्या दानाने आपल्या मृत्युला मिळालेली तहकुबी असते. आम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे, आणि आम्हाला ते माहीत नव्हते असे म्हणू नये. आम्हाला पृथ्वीवर आणि आकाशात जे घडते ते ठाऊक असते आणि आगाऊ कळते, पण मृत्यूला विसरतो, जो आपल्यासाठी कोणत्याही क्षणी थांबलेला असतो. जर आम्ही मृत्युला विसरलो नाही तर आमच्या स्वतःच्या शारीरिक जीवनाला बळी पडणार नाही; कारण आम्ही त्याच्यावर अवलंबून राहू शकत नाही. ख्रिस्ताची शिकवण अनुसरण्यासाठी आम्ही आमच्या शारीरिक जीवनाच्या सेवेचे आणि आमच्या स्वतःच्या इच्छेच्या अनुसरणाचे फायदे, आणि पित्याच्या इच्छा पूर्तीचे फायदे यांचा हिशोब केला पाहिजे. ज्याने स्पष्टपणे याचा हिशोब केलेला आहे तोच फक्त ख्रिस्ताचा शिष्य असू शकतो. परंतु ज्याने हे गणित केले आहे त्याला चांगले आणि खरे जीवन मिळवण्यासाठी खोटे सुख आणि खोटे जीवन सोडून दिल्याचा पश्चाताप वाटणार नाही. खरे जीवन माणसांना देण्यात आले आहे आणि ते त्यांना ठावूक आहे आणि त्याची हाक ऐकू येते, पण क्षणाच्या चिंतेने सतत विचलित होऊन ते स्वतःला त्यापासून वंचित ठेवतात. खरे जीवन हे एका श्रीमंत माणसाने ठेवलेल्या मेजवानी सारखे आहे, आणि ज्यांना त्याने पाहुणे म्हणून आमंत्रण केले होते. त्याने त्यांना बोलावले–जसा पिता-आत्म्याचा आवाज सर्व माणसांना त्याच्याकडे बोलावीत असतो. परंतु आमंत्रण दिलेल्यांपैकी काही व्यापारात, दुसरे त्यांच्या शेतीत, दुसरे पुन्हा त्यांच्या कौटुंबिक कामात व्यस्त होते. आणि ते मेजवानीला गेले नाहीत. फक्त गरीब ज्यांना संसारिक चिंता नव्हत्या ते मेजवानीला गेले आणि त्यांना सुख मिळाले. म्हणून शारीरिक जीवनाच्या चिंतेमुळे विचलित झालेली माणसे स्वतःला खऱ्या जीवनापासून वंचित ठेवतात. जो शारीरिक जीवनाच्या चिंता आणि मिळकत पूर्णपणे नाकारत नाही तो पित्याची इच्छा पूर्ण करू शकत नाही, कारण कोणीही माणूस थोडी स्वतःची आणि थोडी पित्याची सेवा करू शकत नाही: त्याने हा विचार केला पाहिजे की आपल्या शरीराची सेवा करणे चांगले आहे का आणि स्वतःच्या इच्छे प्रमाने आपल्या जीवनाची व्यवस्था लावणे संभव आहे का. एखाद्या माणसाला घर बांधायची इच्छा असेल, किंवा युद्धाची तयारी करायची असेल तो जे करील तसेच त्याने केले पाहिजे. तो माणूस प्रथम विचार करतो की घर पूर्ण करणे, किंवा शत्रूला जिंकण्या इतकी साधने त्याच्याकडे आहेत का. आणि त्याला असे दिसले की त्याच्याकडे नाहीत, तर तो त्याचे श्रम किंवा सैन्य विनाकारण वाया घालवणार आणि आपल्या शेजाऱ्यांपुढे स्वतःला हास्यास्पद ठरवणार नाही. जर एखादा माणूस त्याच्या शारीरिक जीवनाची व्यवस्था त्याच्या स्वतःच्या इच्छे प्रमाणे करू शकत असेल, तर शारीरिक जीवनाची सेवा करणे ठीक आहे, पण ते असंभव आहे, शारीरिक गोष्टींचा त्याग करणे आणि आत्म्याची सेवा करणे अधिक चांगले आहे. नाही तर तुम्हाला ही गोष्ट मिळणार नाही आणि तीही मिळणार नाही. तुम्ही शारीरिक जीवनाची व्यवस्था सामाधानकारकपणे करणार नाही, आणि आत्म्याचे जीवन घालवून बसाल. म्हणून पित्याची इच्छा पूर्ण करण्या साठी शारीरिक जीवनाचा त्याग करण्याची गरज आहे.

शारीरिक जीवन ही आपल्यावर दुसऱ्याने सोपवलेली संपत्ती आहे, जी आम्ही आपले खरे धन मिळवण्यासाठी वापरली पाहिजे.

जर एका श्रीमंत माणसाकडे एक कारभारी आहे ज्याला ठाऊक आहे की त्याने त्याच्या मालकाची कितीही चांगली सेवा केली, तरी तो मालक त्याला त्याच्यासाठी काहीही न ठेवता कामावरून काढून टाकील, जर तो कारभारी शहाणा असेल तर आपल्या मालकाचे काम करीत असतांना तो इतर लोकांचा फायदा करून देईल. मग जेव्हा मालक त्याला काढून टाकील तेव्हा, ज्यांना त्याने मदत केली होती ते त्याचे स्वागत करतील आणि त्याला आधार देतील. अशा प्रकारे माणसाने त्याच्या शारीरिक जीवनात वागले पाहिजे. शारीरिक जीवन ही अशी संपत्ती आहे, ती आपली स्वतःची नाही, जी आपल्याकडे काही काळापुरता सोपवलेली आहे. जर आम्ही त्या संपत्तीचा चांगला उपयोग केला जी संपत्ती आपली स्वतःची नाही, तर मग आम्हाला खरी संपत्ती मिळेल जी आमची स्वतःची असेल.

जर आम्ही आपली स्वतःची नसलेली संपत्ती सोडून दिली नाही, तर आम्हाला आमची खरी संपत्ती मिळणार नाही. आम्ही शारीराचे भ्रामक जीवन आणि आत्म्याचे जीवन दोघांची सेवा करू शकत नाही; आम्ही दोघांपैकी कोणत्यातरी एकाचीच सेवा केली पाहिजे. माणूस मालमत्ता आणि देव यांची सेवा करू शकत नाही. जे मानवामध्ये आदरणीय असते ते देवासमोर निंद्य असते. देवाच्या दृष्टीने संपत्ती वाईट आहे. श्रीमंत माणूस हा अशा साठी अपराधी आहे की तो भरपूर आणि विलासात खातो, जेव्हा त्याच्या दरवाजात गरीब भुकेलेले असतात. आणि प्रत्येकाला माहीत आहे की जी मालमत्ता दुसऱ्या बरोबर वाटली जात नाही ती पित्याची इच्छा पूर्ण न केल्याने राखून ठेवली जाते.

एक श्रीमंत, सनातनी शासक एकादा येशूकडे आला आणि बढाया मारू लागला की त्याने कायद्यातील सर्व आज्ञा पाळल्या आहेत. येशूने त्याला आठवण करून दिली, अशी एक आज्ञा आहे की तुम्ही दुसऱ्यावर स्वतः प्रमाणे प्रेम करावे आणि ती पित्याची इच्छा आहे. शासक म्हणाला तो ती आज्ञाही पाळतो. तेव्हा येशू त्याला म्हणाला: ते खरे नाही; जर तुला खरोखर पित्याची इच्छा पूर्ण करायची इच्छा असती तर तुझ्याकडे मालमत्ता नसती. जर तुमची स्वतःची संपत्ती तुम्ही दुसऱ्यांना दिली नाही तर तुम्ही पित्याची इच्छा पूर्ण करू शकत नाही. आणि येशू आपल्या शिष्यांना म्हणाला: माणसांना संपत्ती शिवाय जगणे अशक्य वाटते, पण मी तुम्हाला सांगतो आपल्या जवळ असलेले दुसऱ्यांना देण्यात खरे जीवन आहे.

झाकाएस नावाच्या एका माणसाने येशूची शिकवण ऐकली आणि तिच्यावर विश्वास ठेवला, आणि येशूला त्याच्या घरी आमंत्रण देऊन तो म्हणाला: मी माझी निम्मे संपत्ती गरिबांना देत आहे आणि ज्यांचे नुकसान केलेले आहे त्यांना चारपट भरपाई देईन. आणि येशू म्हणाला: हाच एक माणूस आहे जो पित्याची इच्छा पूर्ण करतो, कारण माणसाचे सारे जीवनच ती इच्छा पूर्ण करण्यात गेले पाहिजे, आणि त्यासाठी दुसरी कोणतीही परिस्थिती नाही जिच्यात तो म्हणू शकेल: 'मी पित्याची इच्छा पूर्ण केली आहे. '

चांगले काम मोजता येत नाही; कोणी जास्त किंवा कमी केले हे सांगणे असंभव आहे. एक विधवा जी आपल्या जवळचा शेवटचा पैसा देते ती हजारो देणाऱ्या एका श्रीमंत माणसापेक्षा जास्त देते. चांगलेपणा त्याच्या उपयोगीते वरूनही मोजता येणार नाही.

त्या स्त्रीची बाब जिला येशूची द्या आली तिने येऊन कित्येक पौंड किमतीचे तेल बेपर्वाईने त्याच्या पायावर ओतले ते एक उदाहरण आहे. ज्युदास म्हणाला ती मूर्खपणाने वागली कारण त्या तेलाच्या किमतीत अनेक लोकांना जेवण देता आले असते. पण ज्युदास हा एक चोर आणि खोटारडा होता, आणि जेव्हा तो भौतिक फायद्या विषयी बोलला तेव्हा तो गरिबांचा विचार करीत नव्हता. अत्यावश्यक गोष्ट एखाद्या कृतीच्या उपयोगात किंवा देणगीच्या मोठेपणात असत नाही, तर आवश्यक हे आहे की नेहमी, प्रत्येक क्षणाला, दुसऱ्यांवर प्रेम करणे आणि आपल्या जवळ असलेले त्यांना देणे.

७

त्याच्या शिकवणीच्या सत्यतेच्या पुराव्यांच्या ज्यूंच्या मागणीला उत्तर देताना येशू म्हणाला: माझ्या शिकवणीची सत्यता या वस्तुस्थित आहे की माझ्या स्वतःचे काही नाही, तर जे आपल्या सर्वांच्या सामाईक पित्याकडून येते ते मी शिकवतो. जे सर्वांच्या पित्यासाठी चांगले आहे आणि म्हणून सर्व मानवांसाठी चांगले आहे ते मी शिकवतो.

मी सांगतो ते करा, पाच आज्ञा पाळा, आणि तुम्हाला दिसेल की मी जे सांगतो ते सत्य आहे. या पाच आज्ञाचे पालन जगातून सर्व वाईट दूर घालवून देईल, आणि म्हणून त्या निश्चितपणे सत्य आहेत. हे स्पष्ट आहे की जो त्याला ज्याने पाठवले त्याची इच्छा शिकवतो, आणि त्याची स्वतःची इच्छा नव्हे, तो सत्य शिकवतो. मोजेसचा कायदा मानवी इच्छांची पूर्तता

शिकवतो आणि म्हणून तो विरोधाभासाने भरलेला आहे; माझी शिकवण पित्याच्या इच्छेच्या पूर्णतेची आहे आणि म्हणून ती सुसंगत आहे.

ज्यूंना त्याची शिकवण समजली नाही आणि भाकीतांमधून उल्लेख केलेला ख्रिस्त तो तोच आहे का याचे बाह्य पुरावे ते शोधू लागले. यावर तो त्यांना म्हणाला: मी कोण आहे आणि माझ्याविषयीच तुमची भाकिते सांगतात का म्हणून प्रश्न विचारू नका, पण माझ्या शिकवणीकडे आणि मी आपल्या सामाईक पित्याविषयी काय सांगतो त्यावर लक्ष द्या. तुम्ही माणूस म्हणून माझ्यावर विश्वास ठेवण्याची गरज नाही, पण मी तुम्हाला आपल्या सर्वांच्या सामाईक पित्याच्या नावाने जे सांगतो त्यावर तुम्ही विश्वास ठेवावा. मी कोठून आलो या बाह्य गोष्टींविषयी चौकशी करणे आवश्यक नाही, तर माझी शिकवण अनुसरणे आवश्यक आहे. जो ती अनुसरेल त्याला खरे जीवन प्राप्त होईल. माझ्या शिकवणीच्या सत्यतेचे पुरावे असू शकत नाहीत. ती स्वतः प्रकाश आहे, आणि जसा प्रकाश प्रकाशित करता येऊ शकत नाही, तसेच सत्याची सत्यता सिद्ध करता येऊ शकत नाही. माझी शिकवण हा प्रकाश आहे. जो ती पाहतो त्याला प्रकाश आणि जीवन प्राप्त होते आणि पुराव्याची गरज लागत नाही, परंतु जो अंधारात आहे त्याने प्रकाशात आलेच पाहिजे.

परंतु ज्यूंनी त्याला पुन्हा तो त्याच्या शारीरिक व्यक्तिमत्त्वात कोण आहे म्हणून विचारले. तो त्यांना म्हणाला: जसे मी तुम्हाला पहिल्या पासून सांगतो, मी एक माणूस, जीवनाच्या पित्याचा पुत्र आहे. फक्त जो स्वतःला तसे मानतो (हेच सत्य मी शिकवतो) तो सामाईक पित्याची इच्छा पूर्ण करील; फक्त तो गुलाम असणे संपवील आणि मुक्त मानव होईल. आम्ही चुकीने शरीराचे जीवन खरे मानल्यामुळे गुलाम बनले आहोत. जो सत्य समजून घेतो-की पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेतच फक्त जीवन आहे-तो मुक्त आणि अमर होतो. जसा गुलाम त्याच्या मालकाच्या घरात नेहमी राहात नाही, परंतु मुलगा राहतो; म्हणून तसेच एखादा माणूस जो शरीराचा गुलाम होऊन राहतो तो कायमचा जिवंत राहू शकत नाही, तर जो आपला आत्मा पित्याच्या इच्छेने भरून घेतो त्याला शाश्वत जीवन प्राप्त होईल. मला समजून घेण्यासाठी तुम्हाला हे समजले पाहिजे की माझा पिता आणि तुमचा पिता ज्याला तुम्ही देव म्हणता तो एकच नाही. तुमचा पिता हा शरीराचा देव आहे, पण माझा पिता हा जीवनाचा आत्मा आहे. तुमचा पिता, तुमाचा देव, हा मत्सरी देव आहे, मानवी हत्त्या करणारा, जो माणसांना शिक्षा करतो. माझा पिता जीवन देतो, आणि म्हणून आम्ही वेगळया पित्यांची मुले आहोत. मी सत्याचा शोध घेतो, आणि तुम्ही मला त्यासाठी, तुमच्यादेवाला प्रसन्न करण्यासाठी ठार मारू इच्छिता. तुमचा देव सैतान आहे, वाईटांचा उगम, आणि त्याची सेवा करतांना तुम्ही सैतानाची सेवा करता. माझी शिकवण ही आहे की आम्ही जीवनाच्या पित्याचे पुत्र आहोत, आणि जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो मृत्यू पहात नाही. ज्यूंनी विचारले: हे कसे शक्य आहे की माणूस मरणार नाही, ज्या सर्वांनी देवाला सर्वाधिक प्रसन्न केले–अब्राहम सुद्धा-ते मरण पावले? मग तू असे कसे म्हणू शकतो की, तू आणि तुझ्या शिकवणीवर विश्वास ठेवणारे, मरणार नाहीत?

त्यावर येशूने उत्तर दिले: मी माझ्या स्वतःच्या अधिकाराने बोलत नाही. मी माणसात राहणाऱ्या जीवनाच्या एकाच उगामाविषयी ज्याला तुम्ही देव म्हणता त्याच्याविषयी बोलतो. तो उगम मला ठाऊक आहे आणि त्याला जाणून घेणे टाळू शकत नाही, आणि मी त्याची इच्छा जाणतो आणि ती पूर्ण करतो, आणि तो जीवनाचा उगम ज्याच्याविषयी मी बोलतो तो होता, आहे आणि असेल आणि त्याला मृत्यू नाही. माझ्या शिकवणीच्या सत्यतेचे पुरावे मागणे म्हणजे जणू काही एखाद्या जन्मांधाला, दृष्टी मिळाल्यावर विचारण्यासारखे आहे की तो का आणि कसे पाहू शकतो त्याचे पुरावे द्यावेत.

आंधळा माणूस ज्याची दृष्टी परत मिळालेली आहे, तो तोच माणूस असला तरी, फक्त एवढेच म्हणू शकतो की तो आंधळा होता पण आता पाहतो. आणि ज्याला पूर्वी जीवनाचा अर्थ कळत नव्हता पण आता त्याला तो समजतो, तो फक्त तसेच म्हणू शकेल, आणि दुसरे काही नाही.

असा माणूस फक्त एवढेच म्हणू शकेल की पूर्वी त्याला जीवनातील खरे चांगले माहीत नव्हते पण आता त्याला ते माहीत आहे. एखादा आंधळा माणूस ज्याला दृष्टी परत मिळाली आहे, जर त्याला सांगितले की त्याला योग्य रीतीने बरे केलेले नाही आणि तो ज्याने त्याची दृष्टी परत दिली तो एक दुष्कृत्ये करणारा आहे, आणि त्याला वेगळया प्रकारे बरे करायला पाहिजे होते, तर फक्त उत्तर देऊ शकेल: मला माझ्या बरे होण्याच्या अचूकते बद्दल किंवा ज्याने मला बरे केले आहे त्याच्या पापीपणाबद्दल, किंवा बरे करण्याच्या अधिक चांगल्या पद्धतीबद्दल काहीच माहीत नाही; मी फक्त जाणतो की जेथे मी आंधळा होतो, आता पाहतो. आणि अशाच पद्धतीने एखादा ज्याला खऱ्या कल्याणाची आणि पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेची शिकवण समजली आहे, तो त्या शिकवणीच्या नियमितपणा विषयी किंवा ज्याने ती उघड केली तो पापी होता, किंवा अधिक मोठ्या सुखाची संभाव्यता होती, परंतु तो फक्त एवढेच म्हणेल: पूर्वी मला जीवनाचा अर्थ दिसत नव्हता, पण आता तो दिसतो आणि एवढेच सर्व मला माहीत आहे.

आणि येशू म्हणाला: माझी शिकवण आतापार्यंत झोपेत असणाऱ्यांना जीवनाला जागे करण्याची आहे: जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो शाश्वत जीवनासाठी जागा होतो आणि मृत्युनंतर जिवंत राहतो. माझी शिकवण कोणत्याही पद्धतीने सिद्ध करता येणार नाही: माणसे तिला शरण जातात कारण त्या एकीतच सर्व माणसांसाठी जीवनाचे वचन आहे.

ज्या प्रमाणे मेंढ्या मेंढपाळाच्या मागे जातात जो त्यांना अन्न देतो आणि त्यांच्या जीवाचे रक्षण करतो, त्याप्रमाणे माणसे माझी शिकवण स्वीकारतात कारण ती सर्वांना जीवन देते. आणि ज्या प्रमाणे मेंढ्या चोराच्या मागे जात नाहीत जो मेंढवाड्यात बाहेरून चढून येतो, पण त्याच्या पासून बुजून दूर जातात, म्हणून हिंसा आणि देहदंड शिकवणाऱ्या तत्वप्रणालीवर माणसे विश्वास ठेवू शकत नाहीत. माझी शिकवण ही मेंढ्यासाठी असलेल्या एका दरवाजा सारखी आहे, आणि जे माझ्या मागे येतील त्यांना खरे जीवन सापडेल. जसे फक्त ते मेंढपाळ चांगले असतात जे मेंढ्यांचे मालक असतात आणि त्यांच्यावर प्रेम करतात आणि आपले जीवन त्यांच्यासाठी देतात, तर भाडोत्री जे मेंढ्यांवर प्रेम करीत नाहीत ते वाईट मेंढपाळ असतात, म्हणूनच फक्त तो शिक्षक सुद्धा खरा असतो जो स्वतःला वाचवीत नाही, आणि जो फक्त स्वतःचीच काळजी घेतो तो नालायक असतो. माझी शिकवण ही आहे की एखाद्या माणसाने स्वतःला वाचवू नये, तर आत्म्याच्या जीवनासाठी शरीराच्या जीवनाचा त्याग करावा. हे मी शिकवतो आणि पूर्ण करतो.

तरीही ज्यूंना समजले नाही आणि अजूनही येशू हा ख्रिस्त(अभिषिक्त) आहे की नाही, आणि म्हणून त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा की नाही याचा त्यांना पुरावा पाहिजे होता. ते म्हणाले: आम्हाला सतावू नको, पण आम्हाला सोप्या पद्धतीने सांग, तू ख्रिस्त आहेस की नाहीस? आणि त्यावर येशूने उत्तर दिले: विश्वास शब्दांवर नाही तर कृतींवर ठेवावाच लागतो. मी जे आदर्श घालून दिले आहेत, त्यावरून तुम्हाला कळेल की मी सत्य शिकवतो की नाही. मी जे करतो ते करा, आणि शब्दांची चर्चा करू नका. पित्याची इच्छा पूर्ण करा, आणि मग तुम्ही सर्व माझ्यासह आणि पित्यासह जोडले जाल; कारण मी, मानवाचा पुत्र, पित्याशी एक आहे आणि तुम्ही ज्याला देव म्हणता आणि मी ज्याला पिता म्हणतो त्याच्याशी एक आहे. तुमच्या स्वतःच्या धर्मग्रंथात देखील म्हटले आहे की देव माणसांना म्हणाला: 'तुम्ही देव आहात'. प्रत्येक माणूस त्याच्या आत्म्याने ह्या पित्याचा पुत्र आहे. आणि जर एखादा माणूस पित्याची इच्छा पूर्ण करीत जगला तर तो पित्याशी एक होतो. जर मी त्याची इच्छा पूर्ण करीन तर, पिता माझ्यात असेल आणि मी पित्यात असेन.

त्यानंतर येशूने त्याच्या शिष्यांना विचारले माणसाच्या पुत्रा विषयी त्याची शिकवण त्यांना कशी समजली आहे. सायमन पिटरने त्याला उत्तर दिले: तुझी शिकवण अशी आहे की तू जीवनाच्या देवाचा पुत्र आहेस, आणि देव म्हणजे माणसात असलेला आत्म्याचे जीवन आहे. आणि येशू त्याला म्हणाला: सायमन, ते समजल्याने, तू सुखी आहेस. माणूस हे तुला उघड करू शकला नसता, पण तुला ते समजले आहे कारण तुझ्यामधील देवाने तुला ते प्रकट केले आहे. या समजण्यावर मानवाचे खरे जीवन आधारलेले आहे. त्या जीवना करता मृत्यू नाही.

८

त्याच्या शिष्यांनी व्यक्त केलेल्या शारीरिक जीवनाचा त्याग करण्यामुळे मिळणाऱ्या बक्षिसाच्या शंकांना उत्तर देताना, येशू म्हणाला: ज्याला माझ्या शिकवणीचा अर्थ समजतो त्याच्यासाठी बक्षिसाचा प्रश्न नसतो, कारण प्रथम एखादा माणूस जो तिच्यासाठी आपले कुटुंब, मित्र, आणि मालमत्ता सोडून देतो तो शंभरपट जास्त मित्र आणि जास्त मालमत्ता मिळवतो, आणि दुसरे, कारण एखादा माणूस जो बक्षीस मिळवण्याचा प्रयत्न करतो त्याला दुसऱ्यांकडे आहे त्यापेक्षा जास्त पाहिजे असते, आणि ते पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेच्या बरोबर विरुद्ध आहे. स्वर्गाच्या राज्यात कोणी मोठा किंवा लहान नाही, सगळे सारखे आहेत. जे भलेपणासाठी बक्षिसाची अपेक्षा करतात ते त्या मजुरांप्रमाने आहेत, कारण त्यांच्या मताने ते इतरांपेक्षा जास्त योग्यतेचे होते, त्यांच्या काम देणाऱ्यांकडून त्यांनी ठरलेल्यापेक्षा जास्त पागाराची मागणी केली. येशूच्या शिकवणी प्रमाणे कोणीही दुसऱ्यांपेक्षा जास्त उच्च किंवा जास्त महत्वाचा नाही.

सर्वजण पित्याची इच्छा पूर्ण करू शकतात, परंतु ते करतांना कोणीही दुसऱ्यापेक्षा अधिक उच्च किंवा अधिक महत्वाचा किंवा अधिक चांगला होत नाही. फक्त राजे आणि त्यांची जे सेवा करतात ते त्या पद्धतीने मानले जातात. माझ्या शिकवणी प्रमाणे, येशू म्हणाला, उच्च दर्जा असू शकत नाही. ज्याला अधिक चांगले व्हायचे आहे त्याने सर्वांचे सेवक झाले पाहिजे. माझी शिकवण ही आहे की, दुसऱ्यांनी त्याची सेवा करावी म्हणून नव्हे तर त्याने आपले सर्व जीवन दुसऱ्यांची सेवा करावी म्हणून माणसाला जीवन देण्यात आले आहे. असे करण्याऐवजी जो स्वतःला उंचावतो, तो होता त्या पेक्षा खालच्या पातळीवर जाईल.

माणसाने स्वतःला मोठे करण्याच्या विचाराना सोडून देणे शक्य व्हावे म्हणून जीवनाचा अर्थ आणि उद्देश समजून घेतलाच पाहिजे. जीवनाचा अर्थ पित्याची इच्छा पूर्ण करण्यात आहे, आणि त्याची इच्छा ही आहे की त्याने जे आपल्याला दिले आहे ते त्याला परत द्यावे. जसा मेंढपाळ आपला सर्व कळप सोडून हरवलेली मेंढी शोधायला जातो, आणि एखादी स्त्री तिची हरवलेली पेनी(पैसा) मिळवण्यासाठी सगळीकडे शोधते, म्हणून पित्याचे सातत्यपूर्ण कार्य आपल्याला खरोखर यावरून कळते की तो त्याच्याशी संबंधित गोष्टी त्याच्यास्वतःकडे ओढून घेतो.

आम्ही हे समजून घेतली पाहिजे की खरे जीवन कशात आहे. हरवलेल्यांना त्यांच्या योग्य जागी परत आणण्यात खरे जीवन आहे, आणि जे झोपलेले आहेत त्यांना जागे करण्यात आहे. ज्या लोकांकडे खरे जीवन आहे आणि त्यांच्या असण्याच्या उगमाशी परत आलेले आहेत, ते सांसारिक माणसांप्रमाणे दुसऱ्याना चांगले किंवा वाईट समजणार नाहीत, तर पित्याच्या जीवनात भागीदार होतील आणि पित्यापासून हरवलेले परत आले म्हणून आनंदी होतील. जर एखादा बहकलेला मुलगा त्याला पश्चाताप होतो आणि ज्या पित्याला त्याने सोडले होते त्याचाकडे परत येतो, तर त्याच पित्याच्या इतर पुत्रांना पित्याचा आनंदाचा मत्सर कसा वाटेल, किंवा त्यांच्या भावाच्या परतण्याने आनंदी होणार नाहीत का?

शिकवणीवर विश्वास ठेवण्यासाठी आणि आमच्या जीवनाचा मार्ग बदलण्यासाठी आणि शिकवण पूर्ण करण्यासाठी, ज्याची गरज आहे ते बाह्य पुरावे किंवा बक्षिसांची वचने नाही तर, खरे जीवन काय आहे याची स्पष्ट समज होय. जर आपण

आपल्या जीवनाचे पूर्णपणे मालक आहोत आणि शारीरिक आनंदासाठी त्यांना जीवन मिळालेले आहे, असा विचार माणसे स्वतःशी करतील तर मग स्पष्टपणे त्यांनी दुसऱ्यासाठी केलेल्या प्रत्येक त्यागाचे कृत्य त्याना बक्षीस पात्र वाटेल, आणि अशा बक्षिसाशिवाय ते काहीही देणार नाहीत. जर कुळ हे विसरले की बाग त्यांच्याकडे या अटीवर दिलेली आहे की त्यांनी फळे मालकाला परत करावीत, आणि त्यांच्याकडून पुन्हा पुन्हा सारा मागितला जाईल, ते वसुली करणाऱ्याला ठार मारतील. म्हणून जे त्यांच्या स्वतःच्या जीवनाचे मालक समजतात आणि हे समजत नाहीत की जीवन त्यांना एका करारानुसार देण्यात आले आहे ज्यामध्ये त्याच्या इच्छा पूर्तीची मागणी आहे. विश्वास ठेवण्यासाठी आणि कृती करण्यासाठी, हे समजणे आवश्यक आहे की माणूस स्वतः काही करू शकत नाही, आणि जर तो आपले शारीरिक जीवन चांगल्याच्या सेवेसाठी देतो तर तो त्यासाठी आभार किंवा बक्षिसास पात्र नसतो. आम्ही हे समजले पाहिजे की चांगले करण्यात माणूस आपले कर्तव्य करतो आणि जे त्याने करणे आवश्यकच असते. फक्त जेव्हा तो जीवन अशा प्रकारे समजून घेईल तेव्हा त्याच्यामध्ये चांगली कामे करण्यासाठी सक्षम करणारा विश्वास असेल.

जीवनाच्या त्या समजून घेण्यातच स्वर्गाचे राज्य सामावलेले आहे. ते दृश्य राज्य नाही की जे ह्या किंवा त्या जागी दाखवता येऊ शकेल. स्वर्गाचे राज्य माणसाच्या आकलन शक्ती मध्ये आहे. सर्व जग जुन्या पद्धतीने जगत आहे: माणसे खातात आणि पितात, लग्न करतात, व्यापार करतात आणि मरतात, आणि या बरोबरच माणसांच्या आत्म्यात वसणारे स्वर्गाचे राज्य-जीवनाचे आकलन एखाद्या वृक्षाप्रमाणे वाढते जो वसंतात स्वतःमधून पालवी बाहेर काढतो.

खरे जीवन हे पित्याची इच्छा पूर्ती आहे, ते भूतकाळात नाही किंवा भविष्यकाळात नाही, तर आता आहे; जे या वर्तमान क्षणाला आपल्या पैकी प्रत्येक जणाने करायलाच पाहिजे. आणि म्हणून खरे जीवन जगण्यासाठी आम्ही कधीच आराम करता कामा नये. माणसे जीवनाचे रक्षण करण्यासाठी आहेत, भूतकाळात किंवा भविष्यकाळात नाही, तर आता जगत असलेले जीवन, आणि त्यामध्ये सर्व माणसांच्या पित्याची इच्छा पूर्ण करणे होय. जर त्यांनी हे जीवन पित्याची इच्छा पूर्ण नकरता त्यांच्याकडून निसटू दिले तर, त्यांना ते पुन्हा परत मिळणार नाही. एखादा पहारेकरी सर्व रात्रभर पहारा करायला नेमला असेल त्याने जर क्षणभर झोप घेतली तरीही त्याने त्याचे कर्तव्य पार पाडले नाही, कारण चोर त्या क्षणालाच येईल. म्हणून माणसाने आपली सारी शक्ती चालू घटकेला लावली पाहिजे, कारण फक्त तरच तो पित्याची इच्छा पूर्ण करू शकतो; आणि ती इच्छा हीच सर्व माणसांचे जीवन आणि सुख आहे. जे चांगले करतात तेच फक्त जगतात. आता चालू काळात माणसाचे चांगले करणे, हेच जीवन जे आपल्याला सामायिक पित्याशी जोडते.

९

माणूस खऱ्या जीवनाचे ज्ञान घेऊन जन्माला येतो जे पित्याची इच्छा पूर्ण करण्याचे आहे. मुले त्या ज्ञानाने जगतात: त्यांच्यामध्ये पित्याची इच्छा दिसते. येशूची शिकवण समजण्यासाठी एखाद्याने मुलांचे जीवन समजूनच घेतले पाहिजे आणि त्यांच्याप्रमाणे झाले पाहिजे.

मुले पाच आज्ञांचा भंग न करता, पित्याच्या इच्छेत जगतात, आणि त्यांना मोठ्या माणसांनी चुकीचा मार्ग दाखवला नाही तर ती कधीच त्यांचा भंग करणार नाहीत. ह्या आज्ञा मोडायला लावून माणसे मुलांना बिघडवतात. आणि हे करीत असतांना ते अशी कृती करतात की जणू काही एखाद्या माणसाच्या गळयात जात्याचा दगड बांधून त्याला नदीत फेकावे. जग दुःखी आहे कारण फक्त लोक मोहाला बळी पडतात, पण त्याच्या शिवाय जग सुखी असते. त्यांच्या क्षणभंगुर जीवनात काल्पनिक फायद्यासाठी वाईट वागण्यासाठी लोकांना मोह आकर्षित करतो. मोहाला बळी पडल्याने माणसांचा नाश होतो, आणि म्हणून मोहात पडण्या पेक्षा सर्वकाही सोडून देणे अधिक चांगले. ते स्वतः दुसऱ्यासाठी बरोबर, आणि दुसरे त्यांच्यासाठी चुकीचे आहेत असे मानण्यातून पहिली आज्ञा मोडण्याचा मोह माणसांना होतो. त्या मोहात पडणे टाळण्यासाठी आपण लक्षात ठेवले पाहिजे की

माणसे नेहमीच पित्याच्या अनंत ऋणात असतात आणि त्यांच्या मानव भावाला क्षमा करून त्या ऋणातून ते स्वतःला मुक्त करु शकतात.

म्हणून माणसांनी जखमांची क्षमाच केली पाहिजे, आणि गुन्हेगाराने त्यांना पुन्हा पुन्हा जखमी केले तरी नाउमेद होऊ नये. कसेही कितीही वेळा एखाद्या मणसाने चूक केली तरी चुका लक्षात न घेता त्याला क्षमाच केली पाहिजे, कारण फक्त क्षमेनेच स्वर्गाचे राज्य मिळवणे शक्य आहे. जर आम्ही दुसऱ्यांना क्षमा केली नाही, तर आम्ही त्या ठराविक ऋणको सारखे वागतो, जेव्हा तो माठ्या कर्जात असतो, तेव्हा त्याच्या धनको कडे जातो आणि दया करण्यासाठी विनवितो. त्याचा धनको त्याला सर्व गोष्टींची क्षमा करतो, परंतु तो ऋणको दूर जातो आणि ज्या माणसाने त्याच्या कडून थोडी रक्कम घेतलेली असते तो भेटल्यावर, त्याचा गळा दाबायला सुरुवात करतो. जीवन मिळवण्यासाठी आपण पित्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. आम्ही त्याची इच्छा पूर्ण करण्यात अयशस्वी होतो म्हणून त्याच्या कडे क्षमा मागतो, आणि क्षमा मिळण्याची आशा करतो. मग जर आम्ही स्वतः दुसऱ्यांना क्षमा करीत नाही तेव्हा आम्ही काय करतो? ज्याची आम्हाला स्वतःला भीती आहे तेच आम्ही त्यांच्यासाठी करतो.

पित्याची इच्छा म्हणजे कल्याण; आणि वाईट आपल्याला पित्यापासून वेगळे करते. मग शक्य तेवढ्या लवकर वाईटचा, जे आमच्या जीवनाचा नाश करते आणि लुटते त्याचा नाश करणे आम्हाला कसे संभवनीय होत नाही? वाईट आम्हाला शारीरिक नाशाच्या जाळयात अडकवते. आम्ही जेवढे त्या जाळयातून निसटू तेवढे आम्हाला जीवन प्राप्त होईल आणि आम्ही इच्छा करू ते आम्हाला मिळेल. आम्ही वाईटामुळे एकमेकांपासून वेगळे नाही तर प्रेमामुळे एक आहोत.

स्त्री ही शारीरिक सुखासाठी निर्माण केली आहे असा विचार केल्याने माणसांना दुसऱ्या आज्ञेचा भंग करण्याचा मोह होतो, आणि एक पत्नी सोडली आणि दुसरी घेतली तर त्यांना जास्त सुख मिळेल असा त्यांचा समज असतो. या मोहात पडायचे टाळण्यासाठी आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की पित्याची इच्छा अशी आहे की, माणसाने स्त्रीच्या सौदर्याने स्वतः आनंदी होऊ नये, तर प्रत्येक माणसाने एक स्त्री निवडली आहे तिच्याशी एक व्हावे. पित्याची इच्छा आहे की प्रत्येक माणसाला एक पत्नी आणि प्रत्येक पत्नीला एक पती असावा. जर प्रत्येक माणूस एक पत्नीसह राहतो, तर प्रत्येकाला एक पत्नी आणि प्रत्येक स्त्रीला एक पती असेल. जो आपली पत्नी बदलतो तिला तिच्या पती पासून वंचित करतो आणि दुसऱ्या माणसाला आपली पत्नी सोडणे आणि या सोडून दिलेलीला घेण्याची संधी देतो. माणसाला विवाह करण्याची अजिबात गरजच नाही, पण एकापेक्षा जास्त बायका असूच नयेत, कारण जर तो तसे करतो तर ते पित्याच्या इच्छे विरुद्ध करतो जी अशी आहे की एका पुरुषाने एका स्त्री बरोबर एक व्हावे.

माणसांना त्यांच्या ऐहिक जीवनाच्या फायद्यासाठी निर्माण कलेल्या, अधिकारांची स्थापना, आणि त्या अधिकाराची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या शपथा घेऊन एकमेकाशी बांधून घेतात त्यातून तिसरी आज्ञा मोडण्याचा मोह होतो. ह्या मोहाला बळी पडणे टाळण्यासाठी माणसांनी लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्या जीवनासाठी कोणत्याही सत्तेचे नाही तर ते देवाचे ऋणी आहेत. अधिकाऱ्यांची मागणी म्हणजे हिंसा समजली पाहिजे पण, वाईटाचा प्रतिकार न करण्याच्या आज्ञे अनुसार, सत्तेने मागितलेली मालमत्ता आणि श्रम माणसानी घेऊ द्यावे. पण त्यांनी त्यांच्या वागण्या विषयी प्रतिज्ञा करून शपथ घेऊ नये, कारण लादलेली शपथ वाईटाकडे नेते. जो आपले जीवन पित्याच्या इच्छेतच असण्यात आहे हे ओळखतो तो आपले वागणे प्रतिज्ञामध्ये बांधून टाकणे शक्य नाही, कारण असा माणूस आपले जीवन सर्वात जास्त पवित्र मानतो.

माणसांना चवथी आज्ञा मोडण्याचा मोह होतो असा विचार करून की ते स्वतः राग आणि सूड उगवून दुसऱ्यांना सुधारू शकतील. जर एखादा माणूस दुसऱ्याचा अपराध करतो, तर लोकांना वाटते की त्याला शिक्षा केली पाहिजे आणि मानवी न्याय निःपक्षपाती असतो.

या मोहात पडण्याचे टाळण्यासाठी आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की माणसांना एकमेकांचा न्याय करण्यासाठी नव्हे तर एकमेकांना वाचवण्यासाठी निर्माण केले आहे, आणि ते एकमेकांच्या अपराधांचा न्याय करू शकत नाहीत कारण ते स्वतः दुष्टपणाने भरलेले आहेत. ते एक गोष्ट करू शकतात ती म्हणजे आपल्या शुद्धता, क्षमाशीलता, आणि प्रेमाच्या उदाहरणाने दुसऱ्यांना शिकवू शकतात.

माणसांना पाचवी आज्ञा मोडण्याचा मोह असा विचार करून होतो की आपले स्वतःचे देशवासी आणि दुसऱ्या देशाचे लोक यामध्ये फरक आहे, आणि म्हणून हे आवश्यक आहे की त्यांनी स्वतःचे दुसऱ्या राष्ट्रा विरुद्ध संरक्षण केले पाहिजे आणि त्यांची हानी केली पाहिजे. या मोहात पडण्यापासून वाचण्यासाठी हे कळणे आवश्यक आहे की सर्व आज्ञांचा सारांश असा आहे: कोणताही भेदभाव न करता सर्व माणसाचे भले करणे, आणि अशा प्रकारे ज्याने जीवन आणि सर्वांना सुख दिले आहे त्या पित्याची इच्छा पूर्ण करणे. जरी दुसरे सुद्धा असा भेदभाव करीत असतील, आणि जरी राष्ट्रे, एकमेकांना परकीय समजून, युद्धावर जात असतील, तरीही पित्याची इच्छा पूर्ण करण्या साठी, प्रत्येक माणसाने सर्वांचे आपल्या देशाशी युध्द करीत असलेल्या देशातील लोकांचे देखील भले केले पाहिजे.

मानवी भ्रमात सापडू नये म्हणून आम्ही भौतिक नव्हे तर आत्मिक जीवनाचा विचार केला पाहिजे. जर माणसाला समजले की जीवन फक्त आता पित्याच्या इच्छेतच असण्यात आहे, तर उपासमार, किंवा दुःख सोसणे, किंवा मरण, त्याला भीतीदायक वाटणे शक्य नाही. फक्त तो माणूसच खरे जीवन प्राप्त करतो जो प्रत्येक क्षणाला पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपले भौतिक जीवन सोडून द्यायला तयार असतो. आणि प्रत्येकाला हे समजून येईल की खरे जीवन असे आहे की त्यात मृत्यू नाही, येशू म्हणाला: शाश्वत जीवन आताच्या जीवना प्रमाणे आहे असे समजू नये. कारण पित्याच्या इच्छेमधील खऱ्या जीवनाला स्थळ नाही किंवा काळ नाही.

जे पित्याच्या इच्छे मधील जगण्याच्या खऱ्या जीवनासाठी जागे झालेले आहेत त्यांच्यासाठी स्थळ नाही किंवा काळ नाही. ते पित्यासह राहतात. जर आपल्यासाठी ते मेले असतील, तर पित्यासाठी जिवंत आहेत. म्हणून एक आज्ञा तिच्यामध्ये सर्व सामावते: ज्या प्रत्येकामध्ये जीवनाचा उगम आहे त्या सर्व माणसांवर प्रेम करा.

आणि येशू म्हणाला: ज्याची तुम्ही वाट बघता आहात तो जीवनाचा उगम ख्रिस्त आहे. त्या जीवनाच्या उगमाचे आकलन, ज्याच्यासाठी माणसात फरक नाही आणि काळ नाही किंवा स्थळ नाही, तो मानवाचा पुत्र आहे ज्याला मी शिकवतो. जो माणसांपासून त्या जीवनाच्या उगामाला सर्व झाकून टाकतो तो मोह आहे. तो मोह-लेख लिहिणाऱ्यांचा, पुस्तकी माणसांचा, आणि भौतिकतावाद्याचा-त्याला बळी पडू नका. सत्तेचा मोह असतो, त्याला बळी पडू नका, आणि सर्वात जास्त भयानक मोह, स्वतःला सनातनी म्हणविणाऱ्या धार्मिक गुरुंचा असतो. या शेवटच्या मोहापासून इतर सर्वापेक्षा जास्त सावध रहा. कारण हे स्वअभिषिक्त गुरु, तेच फक्त, खोट्या देवाची पूजा रचून तुम्हाला खऱ्या देवासून आमिष दाखवून जाळयात ओढतात. जीवनाच्या पित्याची कृतीने सेवा करण्या ऐवजी, ते शब्दांचा वापर करतात, आणि आपण स्वतः काहीही न करता शब्द शिकवतात. तुम्ही त्यांच्याकडून फक्त शब्दांशिवाय काही शिकू शकत नाही, आणि पित्याला कृती पाहिजे असते. ते काहीही शिकवू शकत नाहीत कारण त्यांना स्वतःलाच काही माहीत नाही, आणि फक्त स्वतःच्या फायद्या साठी स्वतःला गुरु म्हणून स्थापण्याची इच्छा ठेवतात. परंतु तुम्हाला ठाऊक आहे की कोणीही माणूस दुसऱ्याचा गुरु असू शकत नाही. सर्व मानवाचा एकच गुरु आहे-जीवनाचा प्रभू ती आकलनशक्ती. परंतु हे स्वयंशैलीचे गुरु, दुसऱ्यांना शिकवतात असे समजून, स्वतःला खऱ्या जीवनापासून वंचित ठेवतात आणि दुस=यांना ते समजून घेण्यापासून अडवतात. ते लोकांना शिकवतात की त्यांचा देव बाह्य विधींनी प्रसन्न होईल, आणि त्यांना वाटते की ते लोकांना व्रत-वैकल्याने देवाकडे आणू शकतील. त्यांना बाह्य गोष्टींची चिंता आहे. धर्माचा बाह्य अंगीकार त्याना समाधान देतो, पण लोकांच्या हृदयात काय चालले आहे याचा ते विचार करीत नाहीत. आणि म्हणून ते बाहेरून सुंदर पण

आतून किळसवाण्या, सुशोभित थडग्यांसारखे आहेत. शब्दात ते संतांचा आणि हुतात्म्यांचा आदर करतात, पण अगदी तेच लोक आहेत ज्यांनी संतांना पूर्वी छळले आणि ठार मारले आणि आताही संतांना छळतात आणि ठार करतात. त्यांच्याकडूनच जगाचे सर्व मोह येतात कारण चांगल्याच्या मिषाने ते वाईट शिकवतात.

त्यांनी निर्माण केलेले वाईट हे दुसऱ्या सर्वांचे मूळ आहे, कारण ते जगातील सर्वात पवित्र गोष्टीचे विडंबन करतात. ते त्यांची लबाडी करीत राहतील आणि जगातील वाईट वाढवतील, आणि ते बदलण्यासाठी पुष्कळ काळ जावा लागेल. परंतु अशी वेळ येईल की जेव्हा सर्व चर्चेस आणि देवाची बाह्य पूजा नष्ट होईल, आणि जीवनाच्या एकाच देवाची सेवा करण्यासाठी आणि त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी माणसे जाणतील, आणि प्रेमाने एक होतील.

१०

ज्यूंनी पाहिले की येशूची शिकवण त्यांचा राष्ट्रीय धर्म आणि त्यांचे राष्ट्रीयत्व नष्ट करील, आणि त्याच वेळी दिसले की ते तिचे खंडन करू शकत नव्हते, म्हणून त्यांनी त्याला ठार मारायचे ठरवले. त्याचा निष्पापपणा आणि प्रामाणीकपणा त्यांना आडवा येत होता पण येशू कोणत्याही प्रकारे दोषी नसतांना त्याला ठार मारण्यासाठी उच्च याजक कैफासाने एक देखावा तयार केला. कैफास म्हणाला: हा माणूस निष्पाप किंवा दोषी आहे की नाही याची चर्चा करण्याची आम्हाला गरज नाही; आम्ही आपले लोक वेगळे ज्यू राष्ट्र म्हणून राहावे की तुटून जावे आणि विखरून जावे अशी आमची इच्छा आहे याचा विचार करायला पाहिजे. जर आम्ही या माणसाला एकटे सोडले आणि त्याला ठार मारले नाही तर राष्ट्र नाश पावेल आणि लोकांची पांगापांग होईल. या युक्तिवादाने निर्णय ठरला, आणि येशूला ठार मारावेच यासाठी सनातनी सहमत झाले; आणि तो जेरुसालेमात दिसताच त्याला पकडण्याचा हुकूम त्यांनी लोकांना दिला.

जरी त्याला हे माहीत होते तरी सुद्धा, येशू पासोव्हरच्या सणासाठी जेरुसालेमात गेला. त्याच्या शिष्यांनी त्याला न जाण्यासाठी विनविले, पण तो म्हणाला: सनातन्यांना माझे जे करायची इच्छा आहे, आणि कोणीही माणूस जे सर्वकाही करील, त्यामुळे माझ्यासाठी सत्य बदलू शकणार नाही. जर मला प्रकाश दिसतो तर मी कोठे आहे व कोठे चाललो हे मला माहीत आहे. फक्त ज्याला सत्य कळलेले नसते त्याला कशाची तरी भीती किंवा कशाचीतरी शंका वाटू शकते. फक्त ज्याला दिसत नाही, तो अडखळतो. आणि तो जेरुसालेमात गेला, रस्त्यात बेथानीला थांबला. तेथे मेरीने मौल्यवान तेलाचा बुन्दला त्याच्यावर रिकामी केला, आणि जेव्हा एवढे मौल्यवान तेल वाया घालवल्या बद्दल, शिष्य तिला दोष देऊ लागले, तेव्हा येशू, त्याचा शारीरिक मृत्यू जवळ आलेला आहे हे जाणून, म्हणाला की तिने जे केलेले आहे ती त्याच्या दफनाची तयारी आहे. जेव्हा त्याने बेथानी सोडले आणि जेरुसलेमला गेला तेव्हा जमाव त्याला भेटला आणि त्याच्या सोबत निघाला, आणि ह्यामुळे त्याला ठार मारण्याच्या गरजेची सनातनी लोकांची अजून अधिकच खात्री पटली. त्यांना त्याला पकडण्याची एक संधी फक्त पाहिजे होती. त्याला माहिती होते की, आता कायद्या विरुद्ध, त्याच्याकडून आलेला किमान अविचारी शब्द त्याच्या देहदंडासाठी वापरला जाणार होता; परंतु असे असूनही तो देवळात गेला आणि पुन्हा त्याने ज्यूंची बळी देण्याची आणि मद्याचा नैवेद्य दाखवण्याची देवपूजा खोटी आहे असे जाहीर केले, आणि त्याने पुन्हा त्याच्या शिकवणीची घोषणा केली. परंतु त्याची शिकवण, प्रेषितांच्यावर आधारीत, अशी होती की सनातनी त्याला मृत्युदंड देण्यासाठी, विशेष म्हणजे पुष्कळ सामान्य लोक त्याच्या बाजूला असतांना उघड त्याने कायदा मोडल्याचा शोध घेऊ शकले नाहीत. परंतु सणाला तेथे काही परधर्मी लोक आले होते ज्यांनी येशूच्या शिकवणी विषयी ऐकले होते, त्याच्या बरोबर त्यावर चर्चा करायची त्यांची इच्छा होती. हे ऐकून शिष्य भयभीत झाले. त्यांना भीती वाटली की येशू परधर्मियांशी बोलून स्वतःचा घात करील आणि लोकांना भडकावील. प्रथम त्यांना परधर्मियांना येशूच्या संपर्कात येऊ द्यायचे नव्हते, पण नंतर त्यांनी ठरवले की हे त्याला सांगावे या माणसांना त्याच्याशी बोलायचे आहे. हे ऐकल्यावर, येशू अस्वस्थ झाला.

त्याला समजले की त्याचे परधर्मीयांशी बोलणे त्याने संपूर्ण ज्यू कायदा नकाराल्याचे स्पष्ट करील, जे जमावाला त्याच्यापासून दूर नेईल, आणि तिरस्करणीय परधर्मीयांशी संबंध ठेवल्याने तो सनातन्यांना त्याला दोष देण्याची संधी देईल; आणि हे जाणून तो क्षुब्ध झाला. परंतु त्याला हेही माहीत होते की त्याचे जीवित कार्य माणसांना एकाच पित्याचे पुत्र, त्यांची श्रद्धेच्या फरकांशिवाय एकी हे स्पष्ट करण्यासाठी होते. त्याला माहित होते की असे करण्याची किमंत म्हणून त्याला त्याचे शारीरिक जीवन द्यावे लागेल परंतु तो तोटा माणसांना जीवनाची खरी समज देईल, आणि म्हणून तो म्हणाला: जसा गव्हाचा दाणा फळ येण्यासाठी नाश पावतो तसा मी, आत्मिक फळ मिळवण्यासाठी माझे शारीरिक जीवन दिलेच पाहिजे. जो आपले शारीरिक जीवन घट्ट धरून ठेवतो तो त्याचे खरे जीवन गमावतो, परंतु जो आपले शारीरिक जीवन देण्यास नाखुश असत नाही तो खरे जीवन प्राप्त करतो. माझ्यापुढे जे वाट बघते आहे त्यामुळे मी क्षुब्ध झालो आहे, पण आता पर्यंत या घटकेची तयारी करण्याकरता मी जिवंत राहिलो, मग जे करायलाच पाहिजे ते मी करण्याचे कसे टाळू? म्हणून आता पित्याची इच्छा माझ्यामधून व्यक्त होऊ दे.

आणि परधर्मीय आणि ज्यू, लोकांकडे वळून, येशूने उघडपणे जाहीर केले जे त्याने खाजगीमध्ये फक्त निकोदेमसला सांगितले होते. तो म्हणाला: माणसाची जीवने त्यांचे वेगवेगळे पंथ आणि सरकारे यांच्यासह सर्व बदललीच पाहिजेत. सर्व मानवी सत्ताधारी नाहीसेच झाले पाहिजेत. जीवनाच्या पित्याचा पुत्र म्हणून माणसाचा (गुणधर्म) स्वभाव समजने फक्त गरजेचे आहे, आणि ही समज माणसांची सर्व विभागणी आणि सत्ताधारी नष्ट करते आणि सर्व माणसांना एक करते. ज्यू म्हणाले: तू आमचा संपूर्ण पंथ नष्ट करीत आहेस. आमचा कायदा एका ख्रिस्ताविषयी सांगतो, पण तू फक्त माणसाच्या पुत्राविषयी बोलतोस आणि म्हणतोस की त्याला उंचावले जाईल. त्याचा अर्थ काय? त्याने उत्तर दिले: माणसाच्या पुत्राला उंचावणे म्हणजे जे माणसात अस्तित्वात असते त्या आकलनाच्या प्रकाशाने जगणे, आणि जोपर्यंत प्रकाश आहे, त्या प्रकाशात जगणे. मी नवीन श्रद्धा शिकवीत नाही तर फक्त जे प्रत्येक माणसात त्याच्या स्वतः मध्ये आहे ते त्याला माहीत असते. प्रत्येक माणूस त्याच्या स्वतः मधील जीवन जाणून असतो, आणि प्रत्येक माणसाला माहीत असते की जीवनाच्या पित्याने त्याला आणि सर्व माणसांना जीवन दिले आहे. माझी शिकवण फक्त एवढीच आहे पिता आम्हाला सर्वांना देत असलेल्या जीवनावर माणसाने प्रेम करावे. पुष्कळ अनधिकृत लोक येशूवर विश्वास ठेवीत होते; पण प्रसिद्ध आणि अधिकृत वर्गातील लोक त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते, कारण त्यांना जे त्याने सांगितले त्याचा वैश्विक आशय मानायची इच्छा नव्हती, आणि त्याची तात्पुरती वर्तणूक काय आहे याचा विचार ते करीत होते. त्यांना दिसले की त्याने लोकांना त्यांच्यापासून वळवले आणि त्याला ठार मारायची त्यांची इच्छा होती; परंतु त्याला उघडपणे पकडायची त्यांना भीती वाटत होती, आणि ते त्यांना गुप्तपणे करायचे होते-पण जेरुसलेमात आणि दिवसा नाही. आणि त्याच्या बारा शिष्यांपैकी एक, जुदास इस्कारीअत, त्यांच्याकडे आला, आणि जेव्हा तो लोकांपासून लांब असेल तेव्हा त्यांच्या गुप्तहेरांना येशूकडे नेण्यासाठी त्यांनी त्याला लाच दिली. जुदासाने ते करण्याचे वचन दिले, आणि परत येशूकडे गेला, त्याचा विश्वासघात करण्याच्या योग्य संधीची वाट बघत राहिला. सणाच्या पहिल्या दिवशी येशूने त्याच्या शिष्यांसह पासोव्हर पाळला, आणि असा विचार करीत की येशूला त्याच्या दागाबाजीची जाणीव नाही, त्याचा विश्वासघात करण्याच्या संधीची वाट पहात ज्युदास त्यांच्या सोबत राहिला. परंतु येशूला माहीत होते की ज्युदासाने त्याला विकले होते, आणि जसे ते सर्व मेजावर बसले त्याने भाकर घेतली, ती बारा तुकड्यात मोडली, आणि प्रत्येक शिष्याला एक तुकडा दिला, इतरांप्रमाणे ज्युदासालाही दिला, आणि कोणाचे नाव न घेता, म्हणाला: घ्या, खा माझे शरीर. नंतर त्याने वाईनने भरलेला पेला घेतला, ज्युदासासह, तो त्याने, पिण्यासाठी सर्वांना दिला. आणि म्हणाला: तुमच्या पैकी एकजण माझे रक्त सांडील. माझे रक्त प्राशन करा. नंतर तो उठला आणि सर्व शिष्यांचे पाय धुतले, आणि जेव्हा त्याने हे केले तेव्हा तो म्हणाला: मला ठाऊक आहे की तुमच्यापैकी एकजण ठार मारण्यासाठी माझा विश्वासघात करणार आहे आणि माझे रक्त सांडणार आहे, तरी मी त्याला खाऊ घातले आणि त्याला प्यायला

दिले आणि त्याचे पाय धुतले. जे तुम्हाला इजा करतात त्यांच्याशी कसे वागावे हे दाखवण्यासाठी मी हे केले. जर तुम्ही असे वागलात तर तुम्ही सुखी व्हाल. आणि त्यांच्या पैकी विश्वास घातकी कोण आहे हे सर्व शिष्य विचारायला लागले. पण येशूने त्याचे नाव सांगितले नाही, यासाठी की ते त्याच्या विरुद्ध जाऊ नयेत. तथापि जेव्हा अंधार वाढला, येशूने ज्युदासकडे निर्देश केला आणि त्याचवेळी त्याला दूर जायाला सांगितले, आणि ज्युदास मेजावरून उठला आणि दूर गेला आणि कोणीही त्याला थांबवले नाही. नंतर येशू म्हणाला: मी मानवाच्या पुत्राला उंचावणे असे म्हणतो त्याचा हाच अर्थ आहे. माणसाच्या पुत्राला उंचावणे म्हणजे त्याच्यावर पित्यासारखी द्या करणे जे आपल्यावर प्रेम करतात त्यांच्यावरच नाही तर सर्व माणसांवर, जे आपल्याला इजा करतात त्यांच्यावर सुद्धा. म्हणून माझ्या शिकवणीवर वाद करू नका, सनातनी करतात तसे त्यातील तुकडे उचलू नका, तर मी करतो तसे करा आणि आता मी तुमच्या डोळ्यासमोर केले तसे करा. ही एक आज्ञा मी तुम्हाला देतो: माणसांवर प्रेम करा. माझी सर्व शिकवण ही आहे की माणसांवर नेहमी प्रेम करा आणि शेवट पर्यंत करा. त्यानंतर, येशूला भीती वाटली, आणि तो त्याच्या शिष्यांसह अंधारात असलेल्या बागेत आडरस्त्याला गेला. आणि रस्त्यात तो त्यांना म्हणाला: तुम्ही सर्व चंचल आणि भित्रे आहात; जर ते मला पकडण्यासाठी आले तर तुम्ही सर्व दूर पळून जाल. त्यावर पीटरने उत्तर दिले: नाही, मी तुम्हाला कधीच सोडणार नाही आणि मृत्यूपर्यंत सुद्धा तुमचे रक्षण करीन. आणि दुसरे शिष्यही सर्व तसेच म्हणाले.

तेव्हा येशू म्हणाला: जर तसे आहे, तर मग रक्षणाची तयारी करा, तुमचे स्वतःचे रक्षण करायला शस्त्र घ्या आणि अन्न पुरवठा जमा करा, कारण आम्हाला भूमिगत व्हायचे आहे. शिष्यांनी उत्तर दिले की त्यांच्याजवळ दोन सुरे आहेत. जेव्हा येशूने सुऱ्यांचा उल्लेख ऐकला, तेव्हा त्याला अतिशय दुखः झाले. आणि एकांत जागी जाऊन त्याने प्रार्थना करायला सुरुवात केली आणि शिष्यांनी तसेच करावे अशी तीव्र इच्छा व्यक्त केली, परंतु त्यांना त्याचे समजले नाही. येशू म्हणाला: माझ्या पित्या-आत्म्या! माझ्यामधील हा मोहाबरोबरचा झगडा संपव. तुझी इछा पूर्ण करण्यासाठी मला दृढ कर. माझ्या शारीरिक जीवनाचे रक्षण करण्याच्या माझ्या स्वतःच्या इच्छेवर मात, आणि वाईटाचा विरोध न करण्याच्या-तुझ्या इच्छे प्रमाण मला केले पाहिजे. शिष्यांना तरीही समजले नाही. आणि तो त्यांना म्हणाला: शरीराचा विचार करू नका, तर तुमच्यामधील आत्म्याला उंचावा; आत्म्यामध्ये शक्ती आहे, पण शरीर दुर्बल आहे. आणि पुन्हा तो म्हणाला: माझ्या पित्या! जर दुखः सहन करायचेच आहे, तर ते येऊ दे: पण दुखः सहन करण्यात मला एकच गोष्ट फक्त पाहिजे, ती म्हणजे माझ्या मध्ये माझी नव्हे, तर तुझी इच्छा पूर्ण व्हावी. शिष्यांना समजले नाही. आणि पुन्हा तो मोहाशी झगडला आणि शेवटी त्याच्यावर मात केली; आणि त्याच्या शिष्यांजवळ येत तो म्हणाला: आता हे ठरले आहे, तुम्ही विश्रांती घेऊ शकता. मी लढणार नाही, तर या जगातील लोकांच्या हवाली मला स्वतःला करणार आहे.

११

आणि येशू, स्वतः मृत्यूसाठी तयार आहोत असे वाटल्यावर, स्वतःचा त्याग करण्यास निघाला, परंतु पीटरने त्याला थांबवले आणि तो कोठे जात आहे म्हणून विचारले. येशूने उत्तर दिले: मी जेथे जात आहे तेथे तू जाऊ शकत नाहीस. मी मृत्यूसाठी तयार झालो आहे, परंतु तू त्यासाठी अजून तयार नाहीस. पीटर म्हणाला: मी तुमच्या साठी आता माझा जीव द्यायला तयार आहे. येशूने उत्तर दिले: एखादा माणूस कोणतीही प्रतिज्ञा करू शकत नाही. आणि तो त्याच्या सर्व शिष्यांना म्हणाला: मला माहीत आहे की मृत्यू माझी वाट बघत आहे, परंतु मी पित्याच्या जीवानात विश्वास ठेवतो आणि त्यामुळे त्याची मला भीती वाटत नाही. माझ्या मृत्यूने विचलित होऊ नका, पण खऱ्या देवावर आणि जीवनाच्या पित्यावर विश्वास ठेवा, आणि मग माझा मृत्यू तुम्हाला भीतीदायक वाटणार नाही. जर मी जीवनाच्या पित्याशी एकरूप असेन, तर मग मला जीवनापासून वंचित केले जाऊ शकणार नाही. हे खरे आहे की मृत्यू नंतर माझे जीवन कोठे आणि काय असेल ते तुम्हाला मी सांगणार नाही, परंतु मी

तुम्हाला खऱ्या जीवनाचा मार्ग दाखवतो. माझी शिकवण ते जीवन काय असेल ते तुम्हाला सांगणार नाही, पण ती त्या जीवनाची फक्त खरी वाट उघड करते, जी पित्याशी एकरूपते मध्ये आहे. पिता हा जीवनाचा उगम आहे. माझी शिकवण ही आहे की माणसाने पित्याच्या इच्छेत जगावे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी आणि जीवनासाठी त्याची इच्छा पूर्ण करावी. जेव्हा मी निघून जाईन तेव्हा तुमचे सत्याचे ज्ञान हाच तुमचा गुरु असेल. माझी शिकवण आचरणात आणतांना तुम्ही पित्यामध्ये आणि तुम्ही सत्यामध्ये आहात असे नेहमी वाटेल. जो पिता तुमच्यामध्ये आहे. आणि जीवनाचा पिता तुमच्या स्वतःमध्ये आहे हे कळल्यावर, तुमच्यापासून काहीही हिरावून घेऊ शकणार नाही अशा शांतीचा तुम्हाला अनुभव येईल. आणि म्हणून तुम्हाला जर सत्य माहीत असेल आणि त्याप्रमाणे जगत असाल, तर माझा मृत्यू किंवा तुमचा स्वतःचा मृत्यू तुम्हाला भीतीदायक वाटणार नाही.

माणसे त्यांना स्वतःला वेगवेगळे मानव, प्रत्येक जण त्याची स्वतःची जगण्याची वेगळी इच्छा असलेले समजतात, पण तो फक्त एक भ्रम आहे. फक्त खरे जीवन हे आहे की जे पित्याची इच्छा हा जीवनाचा उगम आहे हे जाणते. माझी शिकवण ही जीवनाची एकरूपता उघड करते, आणि जीवन वेगवेगळे वाढलेले नव्हे तर एकच झाड ज्याच्यावर सर्व फांद्या वाढतात असे जीवन सादर करते. जो पित्याच्या इच्छेप्रमाणे मुख्य झाडाच्या फांदी प्रमाणे जगतो तो फक्त जिवंत राहतो; जो स्वतःच्या इच्छे प्रमाणे जगण्याची इच्छा धरतो तो झाडापासून तुटलेल्या फांदी प्रमाणे मरून जाईल. पित्याने मला चांगले करण्यासाठी जीवन दिले आहे, आणि मी तुम्हाला चांगले करण्यासाठी जगायला शिकवले आहे. जर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर तुम्ही सुखी व्हाल, आणि माझ्या सर्व शिकवणीचे सार जी सांगते ती साधी आज्ञा म्हणजे सर्व माणसानी एकमेकांवर प्रेम करावे. आणि प्रेम म्हणजे शारीरिक जीवनाचा दुसऱ्यासाठी त्याग करणे: दुसरी वेगळी व्याख्या नाही. आणि माझा प्रेमाचा कायदा पाळतांना तो तुम्ही काही न समजता मालकाच्या आज्ञा पाळणाऱ्या गुलामा सारखा पाळणार नाही; तर तुम्ही माझ्या सारखी स्वतंत्र माणसे म्हणून जगाल, कारण जीवनाच्या पित्याच्या ज्ञानातून वहात येणारा जीवनाचा उद्देश मी तुम्हाला स्पष्ट केला आहे. अपघाताने निवडली म्हणून नाही, तर माझी शिकवण हेच फक्त सत्य आहे ज्याच्यामुळे माणसे मुक्त केली जातील म्हणून तुम्ही ती स्वीकारली.

जगाची शिकवण आहे की माणसांनी एकमेकांशी वाईट वागावे. पण माझी शिकवण आहे की त्यांनी एकमेकांवर प्रेम करावे. म्हणून जग जसा माझा केला तसा तुमचा द्वेष करील. जगाला माझी शिकवण समजत नाही आणि म्हणून तुमचा छळ होईल आणि देवाची सेवा करतो असे समजून तुम्हाला इजा केली जाईल. त्याचे आश्चर्य वाटून घेऊ नका, पण ते तसेच असणार आहे हे समजून घ्या. जग खरा देव न समजल्याने, तुमचा छळच करील, परंतु तुम्ही सत्यच जाहीर केले पाहिजे. त्यानी मला ठार मारल्यावर तुम्ही दुःखी व्हाल, परंतु त्यांनी मला सत्य जाहीर केले म्हणून ठार मारलेले असेल, आणि माझा मृत्यू सत्याच्या बळकटी साठी आवश्यक आहे. जेथे मी सत्यापासून मागे हटणार नाही, तो माझा मृत्यू तुम्हाला बळ देईल, आणि तुम्हाला सत्य काय आणि असत्य काय आणि असत्याच्या आणि सत्याच्या ज्ञानाचा परिणाम समजेल. तुम्हाला हे समजेल की आत्म्याच्या जीवनात न ठेवता आणि शारीरिक जीवनात माणसांनी विश्वास ठेवणे हा खोटेपणा आहे, आणि ते सत्य पित्याशी एकरूप होण्याचा भाग आहे ज्याचा परिणाम म्हणून आत्म्याचा शरीरावर विजय होतो. जेव्हा मी शारीरिक जीवनात तुमच्यासह यापुढे नसेन तेव्हा, माझा आत्मा तुमच्यासह असेल; परंतु सर्व माणसांसारखे तुमच्यामध्ये आत्म्याचे बळ तुम्हाला नेहमीच जाणवणार नाही. काहीवेळा तुम्ही अशक्त व्हाल आणि आत्म्याचे बळ घालवून बसाल आणि मोहात पडाल, आणि काहीवेळा तुम्ही खऱ्या जीवनासाठी जागृत व्हाल. अनेक तासांची शरीराची गुलामगिरी तुमच्यावर येईल, परंतु काही काळापुरता; ज्याप्रमाणे बाळाच्या जन्माच्यावेळी एखादी स्त्री दुःख सहन करते आणि एका माणसाला या जगात आणल्याचा तिला आनंद होतो त्याच प्रमाणे तुम्ही दुःख सहन कराल आणि पुन्हा आत्म्यामध्ये पुनर्स्थापित व्हाल. हाच अनुभव तुम्हाला येईल जेव्हा शरीराने गुलाम बनवले असता तुम्ही आत्म्याने पुन्हा उठाल, आणि अशा आनंदाचा अनुभव घ्याल की तुम्हाला त्याच्यापेक्षा जास्त कशाचीही इच्छा होणार

नाही. हे अगोदरच जाणून घ्या: छळ, आतला संघर्ष, आणि आत्म्याचे नैराश्य असूनही, आत्मा तुमच्यामध्ये जिवंत असतो आणि एक खरा देव म्हणजे मी उघड केलेले पित्याच्या इच्छेचे ज्ञान होय.

आणि पिता, आत्मा याला संबोधून येशू म्हणाला: तू मला आज्ञा दिली होती ते मी केलेले आहे, आणि लोकांना उघड केले आहे की तू सर्व गोष्टींचा उगम आहेस, आणि त्यांना माझे समजले आहे. मी त्यांना शिकवले आहे की ते सर्व एका अनंत जीवनाच्या उगमांतून आलेले आहेत आणि म्हणून ते सर्व एक आहेत, आणि जसा पिता माझ्यामध्ये आणि मी पित्यामध्ये आहे, तसेच ते सुद्धा माझ्याशी आणि पित्याशी एक आहेत. मी त्यांना हेही उघड केले आहे की तू जसे प्रेमाने त्यांना या जगात पाठवले आहेस, तशी त्यांनी सुद्धा या जगाची प्रेमाने सेवा करावी.

१२

जेव्हा येशूने त्याच्या शिष्यांशी बोलणे संपवले, तेव्हा तो उठला आणि, पळून जाणे किंवा स्वतःचा बचाव करण्या ऐवजी, ज्युदासाला भेटायला गेला जो त्याला पकडण्यासाठी सैनिकांना घेऊन येत होता. येशू त्याच्या जवळ गेला आणि तो का आलेला आहे म्हणून विचारले. परंतु ज्युदासाने उत्तर दिले नाही आणि सैनिकांचा एक जमाव त्याचा भोवती जमला. पीटर त्याचे रक्षण करायला धावला आणि, एक सुरा काढून, लढू लागला. पण येशूने त्याला थांबवले आणि जो सुऱ्याने लढतो तो सुऱ्यानेच नाश पावतो असे म्हणत त्याला सुरा टाकून द्यायला सांगितले. मग तो जे त्याला पकडण्यासाठी आले होते त्यांना म्हणाला: मी आता पर्यंत तुमच्यामध्ये एकटा निर्भयपणे वावरलो आहे, आणि आता मला भीती वाटत नाही, तुम्हाला जे बरे वाटेल ते करण्या साठी मी मला स्वतःला तुमच्या हवाली करीत आहे. आणि त्याचे सर्व शिष्य पळून आणि त्याला सोडून गेले. नंतर सैनिकांच्या अधिकाऱ्याने येशूला बांधण्याचा आणि पूर्वीचा उच्च धर्मगुरू असलेल्या अनास कडे नेण्याचा हुकूम सोडला, जो त्यावर्षी उच्च धर्मगुरू होता आणि ज्याने येशूला ठार मारण्यासाठी खोटी सबब रचली होती त्या कैफासाच्याच घरात अनास रहात होता: ती सबब अशी की, जर त्याला ठार मारले नाही तर संपूर्ण राष्ट्र नाश पावेल. येशू, स्वतः पित्याच्या इच्छेत असल्याचे जाणवून, मृत्यूसाठी तयार होता आणि त्यानी त्याला पकडले तेव्हा त्याने विरोध केला नाही, आणि ते त्याला दूर नेत असतांना भ्याला नाही; परंतु जो तोच पीटर ज्याने आताच येशूला खात्री दिली होती की तो त्याला नाकारण्या ऐवजी मरेल, तोच पीटर ज्याने येशूचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला होता, आता जेव्हा त्याने पाहिले की येशूला शिक्षा करण्यासाठी नेत आहेत तेव्हा आपल्यालाही शिक्षा करायला नेतील म्हणून घाबरला, आणि तो येशू बरोबर नव्हता का असे द्वार पालाने जेव्हा विचारले, तेव्हा त्याला नाकारले आणि त्याला सोडून गेला. फक्त नंतर, जेव्हा कोंबडा आरवला, तेव्हा येशूने त्याला सांगितलेले सर्व त्याला समजले. त्याला समजले की शरीराचे दोन मोह आहेत-भीती आणि स्वार्थ-आणि जेव्हा बागेत प्रार्थना केली आणि शिष्यांना प्रार्थना करायला सांगितली तेव्हा त्यांना येशूने विरोध केला होता. आणि आता तो, पीटर, येशूने ज्या विरुद्ध त्याला धोक्याचा इशारा दिला होता त्या दोन मोहाला बळी पडला: त्याने वाईटाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला आणि सत्याचे रक्षण करण्यासाठी लढायला आणि तो स्वतः वाईट करायला तयार झाला होता; आणि आता शारीरिक दुःख सहनाच्या भीतीने त्याच्या प्रभूला त्याने नाकारले होते. जेव्हा शिष्यांनी त्याच्या रक्षणासाठी दोन सुरे तयार ठेवले होते तेव्हा प्रथम जेरुसालेमात लोकांपुढे जेव्हा परधर्मीय त्याच्याशी बोलू इच्छित होते, आणि आता सैनिकांपुढे जेव्हा त्यांनी त्याला बांधले आणि फिर्याद चालवण्यासाठी नेले तेव्हा येशू लढण्याच्या मोहाला किंवा भीतीच्या मोहाला बळी पडला नाही. येशूला कायफास समोर आणण्यात आले, ज्याने त्याला त्याच्या शिकवणी विषयी प्रश्न विचारायला सुरुवात केली. परंतु कायफासाला येशूच्या शिकवणी विषयी काही शोध घ्यायचा नसून त्याला गुन्हेगार ठरवायचे आहे हे जाणून, येशूने त्याला उत्तर दिले नाही, पण म्हणाला: मी काही लपवलेले नाही आणि आता काहीही लपवणार नाही: जर तुला माझी शिकवण काय आहे ही जाणून घ्यायची इच्छा असेल, तर ज्यांनी ती

ऐकलेली आहे आणि समजून घेतली आहे त्यांना विचार. या उत्तरावर उच्च धर्मगुरुच्या सेवकाने त्याच्या थोबाडात मारली. येशूने त्याला विचारले त्याने त्याला का मारले, पण त्या माणसाने त्याला उत्तर दिले नाही आणि त्या उच्च धर्मगुरुने सुनावणी चालू ठेवली. येशू ज्यूंची श्रद्धा नष्ट करण्याची बढाई मारीत होता असे पुरावे देणारे साक्षीदार आणण्यात आले. आणि उच्च धर्मगुरुने येशूला प्रश्न विचारले, पण ते काही शिकण्यासाठी विचारीत नाहीत, पण फक्त हे दाखवण्यासाठी की ती न्याय सुनावणी आहे हे पाहून, त्याने काहीच उत्तर दिले नाही. मग त्या उच्च धर्मगुरुने त्याला विचारले: मला सांग, तू देवाचा पुत्र, ख्रिस्त आहेस का? येशू म्हणाला: होय मी ख्रिस्त आहे, एक देवाचा पुत्र; आणि माझा छळ करतांना आता तुम्ही पाहाल मानवाचा पुत्र कसा देवासारखा आहे.

उच्च धर्मगुरुला हे शब्द ऐकतांना आनंद झाला आणि तो दुसऱ्या न्यायमूर्तींना म्हणाला: त्याला दोषी ठरवण्यास हे शब्द पुरेसे नाहीत काय? आणि ते न्यायमूर्ती म्हणाले: ते पुरेसे आहेत: आम्ही त्याला मृत्युदंड देत आहोत. आणि जेव्हा ते असे म्हणाले तेव्हा, लोक येशूवर तुटून पडले आणि त्याला मारायला, त्याच्या तोंडावर थुंकायला, आणि त्याचा अपमान करायला त्यांनी सुरुवात केली. तो शांत राहिला.

त्यावेळी कोणालाही ठार मारण्याचा ज्यूंना अधिकार नव्हता: त्यासाठी त्यांना रोमन राजपालाकडून परवानगी घेण्याची गरज होती. म्हणून येशूला त्यांच्या न्यायालयात दोषी ठरवून आणि त्याची बदनामी करून, त्यांनी त्याला रोमन राजपाल पिलाताकडे अशासाठी नेले की त्याने त्याला मृत्युदंडाची शिक्षा करण्याची आज्ञा द्यावी. पिलाताने विचारले की ते येशूला का ठार मारू इच्छितात, आणि त्यांनी उत्तर दिले की तो एक गुन्हेगार आहे. पिलात म्हणाला जर असे असेल तर, त्यांनी त्यांच्या स्वतःच्या कायद्या प्रमाणे त्याचा न्याय करावा. ते म्हणाले: आम्हाला असे पाहिजे की तुम्ही त्याला मृत्युची शिक्षा द्यावी, कारण तो रोमन सीझर पुढे दोषी आहे: तो देशद्रोही आहे, तो लोकांना भडकावतो, त्यांना सिझरचे कर द्यायला मना करतो, आणि स्वतःला ज्यूंचा राजा संबोधतो. पिलाताने येशूला त्याच्या समोर बोलावले, आणि म्हणाला: याचा अर्थ काय-तू ज्यूंचा राजा आहेस काय? येशू म्हणाला: तुम्हाला माझे राज्य काय आहे ते खरोखर जाणून घ्यायची इच्छा आहे, की तुम्ही फक्त उपचार म्हणून विचारता? पिलाताने उत्तर दिले: मी ज्यू नाही, आणि तू स्वतःला ज्यूंचा राजा म्हणवतोस की नाही ह्या मुळे मला काही फरक पडत नाही, परंतु मी तुला विचारतो तू कोण आहेस आणि ते तुला राजा का म्हणतात? येशूने उत्तर दिले: ते खरे सांगतात की मी स्वतःला राजा संबोधतो. मी खरोखरच एक राजा आहे, पण माझे राज्य पृथ्वीवरचे नाही, ते स्वर्गीय आहे. पृथ्वीवरच्या राज्यांकडे सैन्य असते आणि ते युध्दावर जातात आणि लढतात, परंतु तुम्ही पाहता आहात त्यांनी मला बांधले आहे आणि मारले आहे आणि मी विरोध केला नाही. मी एक स्वर्गीय राजा आहे आणि माझे सामर्थ्य आत्म्यात आहे.

पिलात म्हणाला: म्हणजे हे खरे आहे की तू स्वतःला राजा समजतोस? येशूने उत्तर दिले: तुम्हाला स्वतःला ते माहीत आहे. प्रत्येकजण जो आत्म्याने जगतो तो स्वतंत्र असतो. मी त्यानेच फक्त जगतो, आणि जर आत्म्याने जगले तर ते स्वतंत्र आहेत फक्त हे सत्य दाखवण्यासाठी मी लोकांना शिकवतो. पिलात म्हणाला: तू सत्य शिकवतोस, पण सत्य काय आहे ते कोणालाही माहीत नाही. प्रत्येकाचे त्याचे स्वतःचे सत्य असते. आणि हे म्हटल्या नंतर तो येशुपासून दूर वळला आणि पुन्हा परत ज्युंकडे गेला, आणि म्हाणाला: मला या माणसात काहीही गुन्हेगारी सापडली नाही. मी त्याला मृत्युदंड द्यावा अशी तुमची इच्छा का आहे? प्रमुख धर्मगुरू म्हणाले: त्याला शिक्षा झाली पाहिजे कारण तो लोकांत अशांतता निर्माण करतो. मग पिलाताने प्रमुख धर्मगुरू समोर त्याची चौकशी सुरु केली, पण हे सर्व उपचारा साठी आहे हे पाहून, येशूने काहीही उत्तर दिले नाही. मग पिलात म्हणाला: मी एकटा त्याला दोषी ठरवू शकत नाही. त्याला हेरोदाकडे न्या.

हेरोदासमोरच्या सुनावणीत, येशूने पुन्हा प्रमुख धर्मगुरुंच्या आरोपांना उत्तर दिले नाही, आणि हेरोदाने येशू एक निरर्थक माणूस ठरवून उपहासाने त्याला लाल झगा घालायचा हुकूम सोडला आणि परत पिलाताकडे पाठवले. पिलाताला येशूची द्या आली आणि त्याला फक्त सणानिमित्त क्षमा करण्यासाठी तो मुख्य धर्मगुरूंचे मन वळवू लागला. पण ते त्यांच्या मागणीवर ठाम राहिले, आणि ते सर्व, आणि त्यांच्या बरोबर असलेले लोक, येशूला खुसावर खिळण्यासाठी ओरडले. पिलाताने पुन्हा येशूला सोडून देण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला, पण धर्मगुरू आणि लोक ओरडले की त्याला शिक्षा झालीच पाहिजे. ते म्हणाले: तो स्वतःला देवाचा पुत्र म्हणवण्याचा अपराधी आहे. पिलाताने येशूला पुन्हा त्याच्याकडे बोलावले, आणि विचारले: तू स्वतःला देवाचा पुत्र म्हणवतोस त्याचा अर्थ काय? तू कोण आहेस? येशूने काहीच उत्तर दिले नाही. तेव्हा पिलात म्हणाला: तुला शिक्षा करण्याचा किंवा सोडून देण्याचा अधिकार मला असतांना तू मला उत्तर देत नाहीस हे कसे काय? येशूने उत्तर दिले: तुम्हाला माझ्यावर कोणताच अधिकार नाही. सर्व अधिकार वरून आहे. आणि पिलाताने तिसऱ्यांदा येशूला मोकळे सोडण्यासाठी ज्यूंचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण ते त्याला म्हणाले: जर ज्याला आम्ही सीझर विरुद्ध बंडखोर म्हणून दोषी ठरवले आहे, या माणसाला तुम्ही शिक्षा केली नाही तर तुम्ही सिझरचे मित्र नसून शत्रू आहात. आणि हे शब्द ऐकल्यावर पिलाताने माघार घेतली आणि येशूला शिक्षा करण्याची आज्ञा दिली. परंतु त्यांनी प्रथम त्याचे कपडे फाडले आणि त्याला झोडपले, आणि नंतर पुन्हा त्याला लाल झगा घातला. आणि त्यांनी त्याला मारले आणि त्याचा अपमान केला आणि त्याचा उपहास केला. नंतर त्यांनी त्याला त्याच्या शिक्षेच्या जागे पर्यंत एक क्रूस वाहून नेण्यासाठी दिला, आणि तेथे त्यांनी त्याला खुसावर खिळले, आणि तो खुसावर टांगलेला असतांना त्यांनी त्याचा उपहास केला. आणि या उपहासाला येशूने उत्तर दिले: पित्या, त्यांना यासाठी शिक्षा करू नकोस, ते काय करतात हे त्यांना समजत नाही. आणि नंतर, जेव्हा तो अगोदरच मृत्युच्या जवळ होता, तो म्हणाला: माझ्या पित्या! माझा आत्मा मी तुझ्या जबाबदारीवर सोपवतो. आणि त्याने आपले शीर झुकवून शेवटचा श्वास सोडला.



# संक्षिप्त शुभवर्तमानातील समाविष्ट साहित्य

INTRODUCTION:
Mark i. 1.
John xx. 31, i. 1-5, 9-18.
CHAPTER I:
Matt. i. 18-19.
Luke ii. 40-52, iii. 23.
Matt. iii. 1.
Mark i. 4.
Matt. iii. 4.
Mark i. 4.
Luke iii. 4-6, 10-14.
Matt. iii. 5-8, 10-13, iv. 1-3.
Luke iv. 3.
Matt. iv. 3.
Luke iv. 4.
Matt. iv. 4.
Luke iv. 9-11.
Matt. iv. 7-8.
Luke iv. 5-6, 9, 7-8.
Matt. iv. 10.
Luke iv. 13.
John i. 36-47, 49, 51.
Luke iv. 16-21.
CHAPTER II. :
Matt. xii. 1.
Mark ii. 23.
Luke vi. 1.
Matt. xii. 2, 7,
Luke xiii. 10-14, xiv. 3, 6, 5.
Matt xii. 11-12, 9-13, xv. 1
Mark vii. 1.
Matt. xv. 2.
Mark vii. 3-5.
Matt. xv. 3.
Mark vii. 10-13.
Matt. xv. 7-9.
Mark vii. 8, 14-15.
Luke xi. 41.
Mark vii. 16-21, 23.
John ii. 13-20.
Matt. xii. 6-7.
John ii. 23-25, iv. 4-6, 8, 7, 9-10, 13, 14, 19-21, 23-26, iii. 22-27, 31-36.
Luke xi. 37-39, 41 , vii. 37-48, xviii. 10-14, v. 33-38.
CHAPTER III. :
Matt. xi. 2-7, 16, 18-19, 16, 17, 19, 8-9, 11. Luke xvi. 16, xvii. 20, 23-24, 21.
John iii. 1-6, 8, 7, 9-13, 15-21.
Matt. xiii. 3-5, 7-8.
Mark iv. 26-29, 33, 24-25, 27, 29-30, 47-48, 10-11, 15, 18, 19-23, 12.
Luke viii. 18.
Matt. xiii. 31.
CHAPTER IV. :
Matt. ix. 35-36, v. 1-2.
Luke vi. 20-25, 20.
Matt. v. 13-24, xix. 7, 9-v. 33-34, 37-41.
Luke vi. 30, 37.
Matt. vii. 1, 3.
Luke vi. 39-40.
Matt. vii. 6, v. 39, 43-44, 46, vii. 12 vi. 1-12.
Mark xi. 25-26.
Matt. vi. 16-34.
Luke xi. 9.
Matt. vii. 9-11, 13-14.
Luke xii. 32.
Matt. vii. 15-17.
Luke vi. 45.
Matt. vii. 21-27.
Luke iv. 32.
Matt. iv. 14, 16, xii. 19-21.
CHAPTER V. :
Matt. xi. 25, 28-30.
John iv. 31-38, v. 1-2, 4, 2-3, 5-11, 15-17, 19-31, 36-40, 43-44.
Luke xix. 11-22.
Matt. xxv. 26-27.
Luke xix. 23-24.
Matt. xxv. 28.
Luke xix. 25-26.
Matt. xxv. 30.
John vi. 1-3, 5, 7.
Matt. xiv. 17.
John vi. 9-11, 26-33, 35-57, 60-63.
Luke x. 1-3.
Matt. x. 16.
Luke x. 4. Mark vi. 10-11.
Matt. x. 22-23, 19, 23, 26-34.
Luke xii. 49, 51-53, xiv. 26.
Matt. xii. 15, 24, 26-29, 31-32, 30, 33.
CHAPTER VI. :
Luke viii. 19.
Matt. xii. 46.
Luke viii, 20-21, xi. 27-28, ix. 57-58.
Mark iv. 35, 37-38, 40.
Luke ix. 59-62, x. 38-42 , ix. 23-25 xii. 15-21, xiii. 2-8, xii. 54-56, xiv. 25-33, 15-16, 18-23, xvi. 1-6, 8, 9-11, 13-17, 19-31.
Mark x. 17-27.
Luke xix. 1-10.
Mark xii. 41-44.
Matt. xxvi. 6-13, xxi. 28-29.
CHAPTER VII. :
John vii. 1-3, 5, 3, 4, 6-9, 11-12, 14-19, 21-29, 33-34, 38-40, 42-52, viii. 12-
14, 18-19, 21, 24-26, 28-29, 31-32, 34-44, 46, 48-59- ix. 1-3, 5-9, 11, 13-21,
24-31, 33-34, xi. 25, x. 1-3, 1, 5, 7-14, 17-18, 15, 17, 16, 24-38, 20-21, 39-
42.
Matt. xvi, 13-18.
CHAPTER VIII. :
Matt. x. 38-39 , xix. 27.
Mark x. 29-31.
Matt. xx. 1-3, 8-16.
Mark x. 35, 37-40.
Matt. xx. 23.
Mark x. 41-42.
Matt. xx. 25-27.
Mark x. 45.
Matt. xviii. 11-12.
Luke xv. 8, 10, xiv. 8-11, xv, 11-13, 15-18, 20-32.
Mark xii. 1-8.
Matt. xxi. 40-43.
Luke xvii. 5-10, xii. 35-39.
Matt. xxiv. 45-46, 48-51.
Mark xiii. 33.
Luke xxi. 34.
Matt. xxv. 1-7, 10.
Luke xiii. 24-25.

Matt. xvi. 27, xxv. 32, 34.
CHAPTER IX. :
Matt. xix. 13-14.
Luke xviii. 17.
Matt. xviii. 3, 5.
Luke ix. 48.
Matt. xviii. 10, 14, 6-8.
Luke xvii. 3.
Matt. xviii. 15-16.
Luke xvii. 4.
Matt. xviii. 17, 23-35, v. 25 , xviii. 18-20.
Mark x. 2.
Matt. xix. 3-6, 8-12, xvii. 24-25, 27, xxii. 16-21, xxiii. 15-22.
Luke ix. 52-56, xii. 13-14.
John viii 3-11.
Luke x. 25, 27, 29-35.
Matt. xvi. 21. Mark viii. 32-34.
Matt. xxii. 23-25, 28.
Luke xx. 34-36.
Matt. xxii. 31-32, 34-37, 39-40, 42-43.
Luke xii. 1.
Mark viii. 15.
Matt. xvi. 11-12.
Luke xx. 46.
Matt. xxiii. 2-8, 13, 15-16, 23, 28, 27, 30-31.
Mark iii. 28-29.
Matt. xxiii. 37-38-xxiv. 1-4, 12, 14.
CHAPTER X. :
Luke xi. 53-54.
John xi. 47-48.
Luke xix. 47-48.
John xi. 49-50, 52-57, 7-10, xii. 2-5, 8, 7, 12-14,
Matt. xxi. 10-11.
Mark xi. 15.
John xii. 19.
Mark xi. 18.
John xii. 20-28, 31-32, 34-36, 44-45, 47-50, 36, 42-43.
Matt. xxvi. 3-5, 14-16, 17-20.
John xiii. 11.
Matt. xxvi. 21.
Mark xiv. 18.
Matt. xxvi. 23, 26-28.
Luke xxii. 18.
John xiii. 4-7, 10, 12, 14, 17-18, 21-27, 30-35.
Matt. xxvi. 30-31, 33-35.
Luke. xxii. 35-36, 38.
Matt. xxvi. 36.
John xviii. 1.
Matt. xxvi. 37-45.
CHAPTER XI:
John xiii. 36-38, xiv. 1-28, xv. 1-2, 4-27, xvi. 1-13, 15-31, 33, xvii. 1, 3, 6,
4, 7-11, 15, 17, 18, 21, 23, 25-26.
CHAPTER XII. :
Matt. xxvi. 46-52, 5 5.
Luke xxii. 53.
Matt. xxvi. 56.
John xviii. 12-14.
Mark xiv. 53.
Matt. xxvi. 58, 69-75.
Mark xiv. 53.
Johia xviii. 19-23.
Matt. xxvi. 59-61. Mark xiv. 59.
Matt. xxvi. 62-68, xxvii. 2.
John xviii. 28-32.
Luke xxiii. 2.
John xviii. 33-38.
Luke xxiii. 5. Mark xv. 3-5.
Luke xxiii. 6-15.
Matt. xxvii. 23, 21-23.
John xix. 4, 6-15, 12, 15, 13.
Matt. xxvii. 24-25.
Luke xxiii. 23.
John xix. 13.
Matt. xxvii. 26, 28-29.
John xix. 16.
Matt. xxvii. 31.
John xix. 18.
Luke xxiii. 34-35.
Mark. xv. 29-32.
Luke xxiii. 39-43.
Matt. xxvii. 46-48, 50.
John xix. 28-30.
Luke xxiii. 46.

Published bythe Danish Peace Academy, September 2007.